# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०८-०६-१९८९ ते १६-१०-१९८९**

## रजिष्टर क्र. ०५

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**गुरुवार दि.८-६-८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा वृत्तांत. गुरुवार दि.८-६-१९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृह येथे मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी वर्गासह पुढील स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) श्री.गील कबालसिंग प्रितमसिंग
३) श्री.घडामोडे मोतीराम नारायणराव
४) श्री.जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) श्री.नवपुते कचरु चंद्रभान
६) श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) श्री.मगर शंकर जिजाराम
८) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
९) श्री.यादव अशोक सायन्ना
१०) श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
११) श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ

**विषय क्र. १ :**

दि.२८-४-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.मोरेश्वर सावे :** मनपाचे विधी सल्लागार आणि नगरसचिव यांचेशी गेल्या तीन दिवसांपासून संपर्क साधला असता संबंधीतांशी संपर्क होवू शकला नाही.तेव्हा संबंधीत अधिकारी या तीन दिवासाच्या काळात कोठे व का गेले होते याचा खुलासा करावा.

मा.सभापती : सदर प्रकरणी विचार करण्यात येईल.

श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.एकबालसिंग गील : इतिवृत्ताचे पान क्र.२ वरील क्र. २,४,६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे या प्रकरणी काय कार्यवाही झाली,याचा खुलासा करण्यात यावा.या प्रकरणी मागील ३/४ सभेत मागणी करुन अदयाप या प्रकरणी काहीही कार्यवाही झाली नाही याचा अर्थ स्थायी समिती सदस्यांना अंधारात ठेवण्यात येत आहे.

मा.सहा.संचालक-नगर रचना : सुराणा कॉम्प्लेक्स बांधकामाबाबतची जुनी संचिका उपलब्ध होवु शकत नाही.त्यासाठी संबंधीत भाडे पट्टाधारकांकडून झालेल्या बांधकामाचे नकाशे कार्यालयात दाखल झालेले आहेत त्याचे तपासणी काम चालु आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.एकबालसिंग गील : कार्यालयातून संचिका गहाळ झाली हे योग्य आहे काय?आणि संचिका उपलब्ध होत नाही,म्हणून झालेल्या बांधकामाचे नकाशे मांगवून तपासणी करणे योग्य आहे काय? ही चूक कोणाची आहे,याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : कार्यालयातून संचिका गहाळ होते ही बाब योग्य नाही.गेल्या तीन महिन्यांपासून या प्रकरणी स.सभासद विचारणा करत आहेत,तेव्हा या प्रकरणी कालमर्यादा निश्चित करता येईल का? याचा विचार होणे आवश्यक आहे.

श्री.एकबालसिंग गिल : सुराणा कॉम्प्लेक्सच्या बांधकामाबाबत कोणत्याही प्रकारचे कागदपत्र उपलब्ध नाही याचा अर्थ सदरील बांधकाम विनापरवाना आहे.असे समजून पाडून टाकण्यात यावे.

श्री.यादव अशोक सायन्ना : इमारत बांधून तयार झाल्यानंतर झालेल्या बांधकामाचे नकाशे दाखल करुन घेणे योग्य आहे काय?किंवा कायद्यात तशी तरतूद आहे काय? याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.कचरु नवपुते : प्रस्तुतचे गहाळ झालेल्या संचिकेबाबत ज्या संबंधित अधिकाऱ्याचा संबंध असेल अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.मिर्झा अन्वर बेग : कार्यालयातर्फे देण्यात येणाऱ्या बांधकाम परवान्याच्या प्रती संबंधीत झोन कार्यालयातही पाठविल्या जातात तेव्हा संबंधीत प्रकरणाच्या बांधकाम परवान्याची प्रत व नकाशा झोन कार्यालयातूनही गहाळ झाला आहे हे म्हणणे कितपत सत्य आहे?

श्री.मोरेश्वर सावे :परवानाधारक वास्तुशास्त्रज्ञामार्फत बांधकामाबाबतचे नकाशे तयार करुन बांधकाम परवानगीसाठी दाखल केले जातात तेव्हा या प्रकरणी संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून बांधकाम नकाशाच्या प्रती मागविण्यात याव्यात किंवा कार्यालयाच्या रजिस्टरवरुन या प्रकरणाचा शोध लावता येईल.

मा.सभापती : सुराणा कॉम्प्लेक्स बांधकाम प्रकरणावर झालेली चर्चा लक्षात घेता या प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१)सदरील प्रकरणाची मूळ संचिका गहाळ कशी झाली,या प्रकरणी कोण जबाबदार आहे याबाबत मा.उपआयुक्त यांनी चौकशी करुन संबंधीतावर जबाबदारी निश्चित करावी.आणि या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी.

२)संबंधीतांस नोटीस देऊन बांधकाम बंद करावे.

३)सुराणा कॉम्प्लेक्सचे भाडेपट्टाधारक यांचेकडे बांधकाम परवानगी बाबतचे कागदपत्राची वेळोवेळी मागणी करुनही अद्याप
पर्यंत मूळ कागदपत्रे दाखल केली नाहीत.यावरुन बांधण्यात आलेल्या इमारतीचे बांधकामाची परवानगी घेण्यात आलेली नाही असे सिध्द होते,ही बाब लक्षात घेता या इमारतीचे बांधकाम विनापरवाना झालेले आहे असे समजून मनपाचे विधी सल्लागार यांचेशी वैधानिक चर्चा करुन सदरची इमारत पाडून टाकण्याविषयी वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

श्री.स.अ.एकबालोद्दीन : मछलीखडक येथील खिंवसरा इमारतीचे बांधकामाबाबत कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक नगर रचना : खिंवसरा हयांनी चौथा व पाचवा मजला बांधकामाची परवानगी घेतलेली नाही.संबंधीतांस इमारत पाडण्याविषयी नोटीस देण्यात आलेली आहे.याप्रकरणी संबंधीताने न्यायालयातून मनाई हुकूम आणलेला आहे.

श्री.मोरेश्वर सावे : ज्या विभागात खिंवसरा यांचे बांधकाम चालू आहे त्या विभागाचे इमारत निरीक्षक यांचे नजरेस बांधकाम चालू असल्याची बाब मनाई हुकूम

मिळण्यापूर्वी आली नाही काय? तसेच या प्रकरणी न्यायालयाने मनाई हुकूम दिला आहे का?अन्य काही आदेश दिले आहेत याचा खुलासा व्हावा.

श्री.मोरेश्वर सावे : मूळ संचिकेच्या कागदपत्राची तपासणी केली असता या प्रकरणी न्यायालयाने मनाई हुकूम दिला नसून (States Cow) "जेसे थे" बाबत आदेश दिला आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : खिंवसरा यांचे बांधकाम प्रकरणी न्यायालयाचा "जेसे थे" चा आदेश दिलेला असतांना संबंधीत बांधकाम चालू आहे तेव्हा या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला म्हणून दावा दाखल करण्यात यावा.

श्री.मोतीराम घडामोडे : खिंवसरा यांचे बांधकामाबाबत न्यायालयाने "जेसे थे"आदेश दिला असतांना संबंधीत मालक पुढे बांधकाम करत आहे.या प्रकरणी न्यायालयाचया आदेशाचा अवमानबाबत कार्यवाही दाखल करण्याबरोबरच स्थायी समितीला या प्रकरणी इतर काही कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत काय?याचा विचार करुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मोरेश्वर सावे :कार्यालयाचे विधी सल्लागार हे योग्य प्रकारे काम करत नाहीत.त्यामुळे प्रशासकीय कामात अडथळे निर्माण होत आहेत.बरीच प्रकरणे विलंबीत आहेत.या बाबींचा विचार करुन सध्या अस्तित्वात असलेल्या विधीज्ञाच्या पॅनलवर नवीन विधीज्ञाची नेमणूक करण्याची मागणी केली आहे सध्या अस्तित्वात असलेल्या पॅनलवरील विधीज्ञाकडे किती प्रकरणे विलंबीत आहेत.याची माहिती मागविण्यात आली आहे.परंतु अद्याप माहिती मिळालेली नाही.

मा.सभापती : खिंवसरा यांचे बांधकाम प्रकरणी विधी सल्लागार यांचेशी चर्चा करुन न्यायालयीन आदेशाचा अवमान झाल्याबद्दल काय कार्यवाही झाली याबाबत स्वतः लक्ष देण्यात येईल.

**ठराव :**

दिनांक २८-४-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. २ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,श्रेयनगर जवळील मंजुरा रेखांकन सिटीस नं. १६०३१ सर्व्हे नं.४६ येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी १५० मीमी व १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.६२,६४०/- चे तयार करण्यात आले असून मंजुरीस्तव सादर.

**टीप** : सदरील काम विकासनिधी अंतर्गत करावयाचे आहे.

**संवाद :**

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : कामे करणेसाठी अंदाजपत्रकात पुरेशा तरतुदीची आवश्यकता आहे.यापुर्वी मंजुर झालेल्या कामाची (स्पील ओव्हर कामे) रक्कम चालू अंदाजपत्रकाच्या तरतुदीतुन वजा केली तर संपूर्ण वर्षात अंदाजे ६० लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देता येईल.तेव्हा शिल्लक रक्कमेतून किती कामे व कोणती कामे मंजुर करावयाची याचा विचार करणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर जवळील मंजुरा रेखांकन सिटीसनं. १६०३१ सर्व्हे नं.४६ येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी १५० मीमी व १०० मीमी व्यासाची

जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ६२,६४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.४० मधील बहादुरपूरा येथे ८० मीमी व १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ३०,१७०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र. २/९९४ दि. २१/३/८९ अन्वये मानयता मिळालेली आहे.

मनपा / पापु / जा.क्र. १११७ / ८९ दि.४-४-८९ अन्वये जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा विक्री झाली नाही.यानंतर स्थानिक गुत्तेदारांकडून कोटेशन मागविले असता खालीलप्रमाणे तीन कोटेशन प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| १) श्री.टेकचंद ठाकूर | अंदाजपत्रकीय दराने |
| २) श्री.मोहमद सलीम | ३% जास्त दराने |
| ३) श्री.शेख अमीर | २% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे कोटेशन ठेकेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचे असून अंदाजपत्रकीय दराचे आहे करीती मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४० मधील बहादुरपूरा येथे ८० मीमी व १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.टेकचंद ठाकूर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ३९ मधील रोकडीया हनुमान कॉलनी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ३०,०६०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.९७३ /४३ दि.१६-३-८९ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मनपा / जा.क्र / पापु / १११७ / ८९ दि. ४-४-८९ अन्वये जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा विक्री झाली नाही. यांनतर स्थानिक गुत्तेदारांकडून कोटेशन मागविले असता खालीलप्रमाणे तीन कोटेशन प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| १) श्री.शेख अमीर शेख दाऊद | अंदाजपत्रकीय दराने |
| २) श्री.टेकचंद ठाकूर | २ % जास्त दराने |
| ३) श्री.महंमद सलीम | ३ % जास्त दराने |

तुलनातमकदृष्टया सर्वात कमी दराचे कोटेशन ठेकेदार श्री.शेख अमीर शेख दाऊद यांचे असून अंदाजपत्रकीय दराचे आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३९ मधील रोकडीया हनुमान कॉलनी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.शेख अमीर शेख दाऊद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. २७ मधील मोहल्ला काली मस्जीद चौक येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ३२,७८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव सादर.

सदरील कामात लेबर पेमेंट रु.१०,४९४/- इतके आहे.अत्यंत तातडीच्या स्वरुपाचे काम असल्या कारणाने व पाण्याची या भागात फारच टंचाई असल्या कारणाने मनपा / पापु /जा.क्र. १४९४ / ८९ दि. ३/८९-९० अन्वये लघुनिविदा नोटीस बोर्डावर लावण्यात आली असता लघुनिविदेत दिलेल्या दिनांकापर्यंत एकही निविदा प्राप्त झाली नाही.

करीता स्थानिक गुत्तेदारांकडून कोटेशन प्राप्त केली असता खालील प्रमाणे तीन कोटेशन प्राप्त झाली

| | |
|---|---|
| १) श्री.सय्यद तौफिक अहमद | अंदाजपत्रकीय दराने |
| २) श्री.शेख सलीम गफुर | ४ % जास्त दराने |
| ३) श्री.मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर | ५ % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे कोटेशन श्री.सय्यद तौफिक अहमद यांचे असून अंदाजपत्रकीय दराचे आहे.

करीता सदरील प्रकरणी रक्कम रु. ३२,७८०/- चे अंदाजपत्रकास व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.सय्यद तौफिक अहमद यांचे दरपत्रकास मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२७ मो.काली मस्जीद चौक येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु.३२,७८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच काम तातडीच्या स्वरुपाचे असल्याने तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सय्यद तौफिक अहमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ५९ मधील नारेगांव येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ९३,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.९७५ / ४२ / दि.१६-३-८९ अन्वये मान्यता मिळाली आहे.

मनपा / पापु / निविदा / १११७ / ८९ दि. ४-४-८९ अन्वये जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | |
|---|---|
| १) श्री.मजहरुल हक | १% कमी दराने |
| २) श्री.अे.अे.अबेदी | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ठेकेदार श्री.मजहरुल हक यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ % कमी दराची आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणें वार्ड क्र. ५९ मधील नारेगांव येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ % कमी दराचे श्री.मजहरुल हक यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.    सिध्दार्थ गार्डन येथील प्राणी संग्रहालयात पाण्याची कमतरता आहे.त्यामुळे प्राणी संग्रहालयातील सर्व हिंस्त्र पशु व इतर जनावारांना पिण्यासाठी कमी पाणी मिळते त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडण्याचा संभव

नाकारता येत नाही.या कारणास्तव सदरील ठिकाणी नविन ८० मीमी व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.अंदाजपत्रक रक्कम रु. २३,१३५/- चे असून मंजुरीस्तव सादर.

सदरील कामात मजुरीची रक्कम रु.७,३१७/- आहे.अत्यंत तातडीच्या स्वरुपाचे काम असल्याने निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचे मार्फत अ-१ नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याच्या मंतुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ गार्डन येथील प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नविन ८० मीमी व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. २३,१३५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम अत्यंत तातडीच्या स्वरुपाचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचे मार्फत अ-१ नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,भारत नगर को ऑप.सोसायटी सि.टी.स.नं.९ शहानुरवाडी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३७,७५०/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतनगर को-ऑपरेटीव्ह सोसायटी सि.टी.स.नं.९ शहानुरवाडी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ३७,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. मधील जालनारोड लगत १५० मीमी व्यासाची जलवाहीनी (अे.सी.व सी.आय.) टाकणेच्या कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. ३,०१,४१०/- इतके होते.या मुळ अंदाजपत्रकात रोड क्रॉसिंग फकत एक ठिकाणी करण्यात आले आहे.त्यामुळे जलवाहीनी सुमारे ३३५ र.मी.वाढली आहे.त्यामुळे सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.३,५०,०५५/- चे तयार करण्यात आले असून सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालनारोड लगत १५० मीमी व्यासाची अे.सी.व सी.आय.जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. ३,०१,४१०/- ऐवजी सुधारीत रक्कम रु. ३,५०,०५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१० :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.१५ मधील काचीवाडा येथे १५० मीमी व्यासाची अे.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,००,२००/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १५ मधील काचीवाडा येथे १५० मीमी व्यासाची अे.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. २,००,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.११ :**

सन १९८८-८९ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागास ९० मे.टन ब्लिचिंग पावडर पुरवठा करणेबाबत दरपत्रके मागविली होती.त्यात सर्वात कमी दराचे दरपत्रक असणारे शिव केमिकल्स पैठण योना माल पुरवठा करणे बाबतचा कार्यालयीन आदेश क्र. मनपा / पापू / भांडार / ८५०९ / ८८ दि. १-१२-८८ अन्वये आदेश देण्यात आला.कार्यालयीन आदेशाप्रमाणे त्यांनी आजपर्यंत ५० मे.टन मालाचा पुरवठा केलेला आहे.सध्या पावसाळा सुरु होणार असल्यामुळे व नविन निविदा मंजुर होईपर्यंत शिव केमिकल्स,पैठण यांचेकडून बाकी ४० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्या पावसाळा सुरु होणार असल्यामुळे आणि नवीन निविदा मंजुर होईपावेतो मे.शिव केमिकल्स,पैठण यांचेकडून प्रति मे.टन रु. ३१००=०० या सन १९८८-८९ चे मंजुरी दराने तूर्त फक्त २० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१२ :**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.हर्षनगर वार्ड क्र. १६ येथील भूमिगत जलनिःसारण वाहीनी सारखी चोकअप होत असल्यामुळे तो बदलून व त्याचा व्यास २५० मीमी व्यासाच्या लाईनशी जोडणे बाबत रक्कम रु.१८,२११/- चे खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १६ मा.हर्षनगर येथील भूमिगत जलनिःसारण वाहीनी बदलून त्याचा व्यास २५० मीमी व्यासाच्या लाईनशी जोडणेच्या कामासाठी रक्कम रु. १८,२११/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१३:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मोहल्ला हर्षनगर वार्ड क्र. १६ येथील १३ बैठकीचे सार्वजनिक संडासाची दुरुस्ती व दोन स्वतंत्र वॉटर टँक बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३४,५२०/- चे तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.यादव अशोक सायन्ना : पडेगांव चिकलठाणा या ठिकाणी बांधण्यात आलेले शौचालय नागरिकांसाठी खुले होण्यापूर्वीच पडले आहेत.तसेच या शौचालयाचे दरवाजे नाहीसे झालेले आहेत.

उपअभियंता : सदरील प्रकरणातील शौचालयाचे बांधकाम सन १९८५ मध्ये झालेले असून ते एक / दीड वर्षापूर्वी देण्यात आलेले आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्षनगर वार्ड क्र. १६ येथील १३ बैठकीचे सार्वजनिक संडासाची दुरुस्ती व दोन स्वतंत्र वॉटर टँक बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. ३४,५२०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१४:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.हर्सुल वार्ड क्र. ८ येथील नागरिकांची विशेष करुन महिलांची संडासाबाबत कुचंबणा होते करीता पाच बैठकीचे सार्वजनिक शौचालयाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५३,२५०/- चे तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ८ येथील पाच बैठकीचे सार्वजनिक शौचालयाचे कामासाठी रक्कम रु. ५३,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१५:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मोहल्ला चिकलठाणा वार्ड क्र. ६० येथे सार्वजनिक संडासाला लोखंडी दरवाजा व पाण्याचे हौद तसेच किरकोळ दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.करीता अंदाजपत्रक रक्कम रुपये ७०,४१० चे तयार केले आहे.मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा वार्ड क्र. ६० येथे सार्वजनिक संडासाला लोखंडी दरवजा व पाणचे हौद तसेच किरकोळ दुरुस्ती करणेच्या कामाकरीता रक्कम रु.७०,४१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,औरंगपुरा,बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय ८० डी.पी.रस्त्यासाठी एस.बी.कॉलनी नाल्यामध्ये रिटेनिंग वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६,३४,६२५/- चे सन १९८९-९० च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च याच रस्त्याने रुंदीकरण करीता स्थायी समिती दि. ५-१-८९ रोजी मंजुरी केलेले अंदाजपत्रक रक्कम रु.२,९६,१६५/- च्या रकमेतून करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : रिटेनिंग वॉलसाठी ६ लाख रुपये खर्चाची मंजुरी मागणे हे योग्य वाटत नाही.तेव्हा यासाठी पर्याय म्हणून नाल्याच्या प्रवाहात बदल करता येईल का?याची पहाणी करण्यात यावी.

**ठराव :**

सदर प्रकरणी स्थळ पाहाणीनंतर निर्णय घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, गुलशन महल ते चंपा मस्जिद पर्यंत १०० डी.पी.रस्ता तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३४,२५,३६०/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.

तूर्त भाग "अ "रक्कम रु. १४,०४,६१०/- (रुंदीकरण) आणि भाग "ड "रक्कम रु.८,००,००० (पुलाचे बांधकाम ) अत्यंत तातडीचे प्रथम करणे जरुरी आहे.सदरील खर्च विकास योजना अंतर्गत रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलशन महल ते चंपा मस्जीद पर्यंत १०० डी.पी.रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. ३४,२५,३६०/- पैकी तूर्त भाग "अ " रक्कम रु. १४,०४,६१०/- (रुंदीकरण) आणि भाग "ड "रक्कम रु.८,००,००० (पुलाचे बांधकाम ) च्या खर्चास काम ताडीचे असल्यामुळे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,शहाबाजार येथील मनपा च्या मालकीच्या तीन खोल्या असलेल्या इमारतीमध्ये वाढीव खोल्या बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २,९४,९६५/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्य डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली इमारती या सदरखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,शहाबाजार येथील मनपा च्या मालकीच्या तीन खोल्या असलेल्या इमारतीमध्ये वाढीव खोल्या बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २,९४,९६५/ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,जाफरगेट साईट नं. ७८ येथील मनपाच्या नविन बांधलेल्या शाळेला कंपाऊंड वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२,६०,६२०/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.ही भिंत बांधल्यामुळे शाळेस संरक्षण व मोकळया जागेत अनधिकृत बांधकाम होणार नाही.सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,जाफरगेट साईट नं. ७८ येथील मनपाच्या नविन बांधलेल्या शाळेला कंपाऊंड वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२,६०,६२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बायजीपुरा (जुने ट्रेचिंग कंपाऊंड) येथील मनपाच्या कर्मचाऱ्यांचे निवासस्थान बांधून तयार आहेत त्याला पाणी पुरवठा (सम्प

बांधून छतावर टाक्या ठेवणे) करण्याकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. १,२१,२८०/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.पाणी पुरवठा लवकर होण्यास कर्मचाऱ्यांना राहण्याकरीता निवासस्थाने वापरात येऊ शकतील.सदरील खर्च इमारत दुरुस्ती या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपूरा (जुने ट्रेचिंग ग्राऊंड) येथील मनपा कर्मचाऱ्यांचे निवासस्थान बांधून तयार आहेत.त्याला (सम्प बांधून छतावर टाक्या ठेवणे ) पाणी पुरवठा करण्याच्या कामाकरीता रक्कम रु. १,२१,२८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,कलेक्टर ऑफिस(गुलशन महल) ते मजनू हिल ८० नियोजित अंतर्गत काम रस्त्याचे (रुंदीकरण,खडीकरण,फुटपाथ,डांबरीकरण) करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १४,६३,३७५/- सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च विकास योजना या सदराखाली करण्यात येईल.या रस्त्यामध्ये बाधीत होणारे कामे यापुर्वीच पाडलेली आहेत.त्या ठिकाणी पुन्हा अनधिकृत बांधकामे होऊ नये म्हणून मा.आयुक्त,मनपा यांचे आदेशावरुन स्थायी समितीची मान्यता गृहीत धरुन निविदाही मागविण्यात आल्या आहेत.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय (गुलशन महल) ते मजनुहिल या नियोजित ८० विकास रस्त्याचे कामातील डांबरीकरणाचे काम वगळता रुंदीकरण,खडीकरण आणि फुटपाथचे कामासाठी रक्कम (एकूण) ७,७०,३७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड नं. १ भिमनगर,भावसिंगपूरा येथील पुलाची उंची वाढविणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २०-४-८९ रोजी ऐनवेळी ठराव क्र. १०९८ / १४ नुसार अंदाजपत्रक रककम रु. ३,९४,५००/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. १ / ८९-९० जा.क्र.३४९९ / ८९ दि.२८-४-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दहा निविदा फॉर्म विकल्या गेल्या.त्यापैकी दर भरुन चार निविदा प्राप्त झाल्या त्या दि.१७-५-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनातमक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) एन.जी.गुणवानी | ४.५०% | अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| २) कुलवंतसिंग | ३ % | --//-- |
| ३) पॉल कन्स्ट्रक्शन | ४.६८ % | --//-- |
| ४) एस.ए.नवाब | ०.०१ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |

तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ०.०१ % कमी दराची निविदा श्री.एस.ए.नवाब यांची आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावातील कामासाठी गुत्तेदारासोबत दरपत्रकाचे दराबाबत वाटाघाटी करण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड नं. १ पडेगांव ते स्लॅटर हाऊस पर्यंत २० मीमी गाडीचे मिक्स सिल सरफेसींग करण्यासाठी स्थायी समिती बैठक दि.२०-४-८९ ठराव क्र. १०८६ / २ प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. २,३२,३००/-ला मंजुरी प्राप्त झ ालेली आहे.

शहर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१ / ८९-९० / जा.क्र.मनपा / बांधवि-१ / ३४९९ / ८९ दि. २८-४-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण एक निविदा विकली गेली व दर भरुन प्राप्त झाली ती दि.१७-५-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आली.

१) श्री.डी.एस.जग्गी ५ % अंदाजपत्रकापेक्षा जास्त

दि.१-६-८९ रोजी संबंधीत गुत्तेदारास मा.आयुक्त यांनी वाटाघाटी करीता बोलावले कारण या रस्त्यावर मनपाच्या वाहनांची मोठया प्रमाणात स्लॉटर हाऊसला जाण्यायेण्याकरीता वाहतुक आहे. व काम पावसाळयापूर्वी पूर्ण करावयाचे आहे.
गुत्तेदाराने ५% जास्त ऐवजी २% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२४:**

शहागंज वॉटर वर्क्स येथील १०० अश्वशक्तीची इलेक्ट्रीक मोटारीची वायंडींग जळाल्यामूळे त्यास रिवायंडींग करणे अत्यंत जरुरीचे होते.स्थायी समिती ठराव क्र. २८६ / दि.१७-८-८८ प्रमाणे मे.राम इलेक्ट्रीकल वर्क्स,औरंगाबाद हयांचे दर रु. ९,५००/- वायंडींगच्या कामासाठी मंजुरी होते.त्याच दरानी मोटारीचे रिवायंडींग करुन घेतले आहे,स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज वॉटर वर्क्स येथील १०० अश्वशक्तीची इले.मोटारीची रिवायडींग करुन घेतलेल्या मंजुरा दर रक्कम रु. ९,५००/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२५:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपाच्या पाचवी वर्ग असलेल्या शाळांसाठी सामान्य विज्ञानाच्या पेटया पुरविण्याची रक्कम रु. ११,८४०/- खर्च येईल. सदर

खरेदी ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट,मुंबई यांच्या मार्फत करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या पाचवी वर्ग असलेल्या शाळांसाठी सामान्य विज्ञानाच्या पेटया ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट मुंबई यांच्या मार्फत खरेदी करण्यासाठी रक्कम रु. ११,८४०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येईल.

**विषय क्र.२६:**

वार्ड क्र. ५२ बनेवाडी येथील महानगरपालिका मालकीच्या जागेची लेवल करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु. २६,५८८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरच्या जागेवर शिवाजी हायस्कूल समोरील झोपडपट्टी उठवून बनेवाडी येथील महानगरपालिका जागेजागेवर स्थलांतर करावयाचे आहे.जेणेकरुन ८० डी.पी.रोडची जागा उपलब्ध होईल.

मा.आयुक्त यांचे आदेशानुसार सदरचे काम तातडीचे असल्यामुळे सदरचे काम निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास्तव व सदरचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२६,५८८/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र.५२ बनेवाडी येथील महानगरपालिका मालकीच्या जागेची लेवल करणेच्या कामासाठी रक्कम रु. २६,५८८/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम तातडीचे असल्यामूळे निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२७:**

वार्ड क्र.४२ येथील अजबनगर येथील रोडचे १९८८-८९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु. ८१,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२८:**

वार्ड क्र. ५८ उल्कानगरी (गारखेडा) अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.२,९०,६२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ उल्कानगरी (गारखेडा) अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु. २,९०,६२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२९:**

वार्ड क्र. ४९ रमानगर येथे समाजमंदीर बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २०-४-८९ अन्वये ठराव क्र.११०४ नुसार रक्कम रु. १,३६,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त इ ााल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | २% जास्त दराने |

तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

दरपत्रकाच्या दराबाबत गुत्तेदाराशी वाटाघाटी करण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३०:**

वार्ड क्र. ४२ येथील सिल्लेखाना ते मोंढा या ८० फुट डी.पी.रोडचे काम करणेसाठी स्थायी समिती बैठक दि.११-१-८९ ठराव क्र. ७७५ नुसार एकत्रित रक्कम रु. १२,०२,७३२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.पैकी ३-२ खडी रस्त्याचे कामास रक्कम रु. ४,१४,२९५/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण आठ निविदा दर भरलेल्या प्राप्त इ ााल्या.

त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे .

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.कुलवंतसिंग | २७.३३ % | कमी दराने |
| २) | श्री.एस.ए.नवाब | २५.३ % | --//-- |
| ३) | श्री.पी.जे.तमखाने | २२.२२% | --//-- |
| ४) | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | २१.९८ % | --//-- |
| ५) | श्री.मंजितसिंग | २१.२१ % | --//-- |
| ६) | श्री.एस.एच.असोशिष्ट | १५.७ % | --//-- |
| ७) | श्री.बी.ए.काल्डा | १२.१२ % | --//-- |
| ८) | श्री.डी.अजितसिंग | ५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.३३ % कमी दराची श्री.कुलवंतसिंग गुत्तेदार यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.३३ % गुत्तेदारास काम दिल्यास योग्य काम होत नाही म्हणून इतक्या कमी दराने काम देण्यास स.सभासद श्री.मिर्झा अन्वर बेग यांचा आक्षेप नोंदवून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४२ सिल्लेखाना ते मोंढा या ८० फुट डी.पी.रोडचे कामापैकी ३-२ खडी रस्त्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.३३ % कमी दराचे श्री.कुलवंतसिंग गुत्तेदार यांचे दरपत्रकास

बहुमताने मंजुरी देण्यात येते.कामाची प्रतवारी चांगली राहील.याबाबत मा.शहर अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

**विषय क्र.३१:**

वार्ड क्र.१ येथील धुळे मुंबई महानगरपालिका जकात नाक्यासाठी शेड बांधणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने (१) रक्कम रु. ४४,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.(२) सदरचे काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे मा.आयुक्त यांचे आदेशान्वये कोटेशन मागविण्यात आले होते.पैकी तीन कोटेशन दर भरलेले प्राप्त झाले.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१) श्री.एस.ए. नवाब अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.अब्दुल सलाम ३ % जास्त दराने
३) श्री.सय्यद रफिकोद्दीन ४% जास्त दराने

तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.एस.ए.नवाब यांचे कोटेशन ए-१ कराराने मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४४,४००/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१ धुळे,मुंबई रोड मनपा जकात नाक्यासाठी शेड बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. ४४,४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३२:**

वार्ड क्र. ४५ येथील पैठणगेट येथील वाहतुक बेटाजवळील खडी रस्त्याचे कामासाठी रक्कम रु. २७,२३६/- ला स्थायी समिती दि. ठराव क्र. अन्वये प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१) श्री.नरेंद्रसिंग अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.एस.ए.नवाब ३ % जास्त दराने
३) श्री.पॉल कन्स्ट्रक्शन ५ % जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.नरेंद्रसिंग गुत्तेदार यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४५ पैठणगेट येथील वाहतुक बेटाजवळील खडी रस्त्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. नरेंद्रसिंग गुत्तेदार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३३:**

चिकलठाणा वार्ड क्र. ६० येथील महानगरपालिका झोन नं.५ च्या कार्यालयीन इमारतीची जरुरीची दुरुस्ती करणेंच्या कामासाठी प्रस्ताव क्र. १०३१ दि.२९-२-८८ नुसार

रक्कम रु. १,६७,३००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना दि. २१-६-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९० % कमी दराची श्री.एन.एन.दौड यांची निविदेस प्रस्ताव क्र. १२७ दि. ६-८-८८ नुसार स्थायी समितीची मान्यता मिळालेली असून काम सुरु करणेसाठी दि.१६-९-८८ ला कामाचा आदेश देऊन ठेकेदारास काम सुरु करणेसाठी आदेश देण्यात आला होत.परंतु सदरील इमारतीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे ऑफीस असल्याकारणाने त्यांना इमारत खाली करुन द्यावे म्हणून पत्र देण्यात आलेले असतांना देखील त्यांनी कार्यालय रिकामे न केल्यामूळे सदरील कामास दिलेली तीन महिन्याची मुदत संपली व कार्यालय रिकामे झाल्यानंतर म्हणजे दि. २-१-८८ ला कामाचे मार्क आऊट ठेकेदारास देण्यात आले,परंतु ठेकेदाराने निविदाचे नियमानुसार ९० दिवासांपर्यंतचा कालावधी झाल्यामुळे त्यांनी दिलेल्या दराने म्हणजे १९.९० % कमी दराने काम मिळणेसाठी दि. २३-१२-८८ च्या अर्जानुसार विनंती केलेली आहे.

तरी निविदाचे नियमानुसार व साहित्याचे भावाची वाढती महागाई लक्षात घेता आली.सदरील इमारत लवकर रिकामी न झाल्यामुळे सदरील ठेकेदार श्री.एन.एन.दौड यांची निविदा १९.९० % कमी दराचे ऐवजी अंदाजपत्रकाचे दराने मंजुर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६० चिकलठाणा येथील महानगरपालिका झोन नं.५ च्या कार्यालयीन इमारतीची जरुरीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी त्या इमारतीत असलेले महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे ऑफिस नोटीस देवूनही ९० दिवसांत रिकामे न झाल्याने व निविदाचे नियमानुसार व साहित्याचे भावाची वाढती महागाई लक्षात घेता ठेकेदार श्री.एन.एन.दौड यांची निविदा १९.९० %कमी दराचे ऐवजी अंदाजपत्रकीय दराने मंजुर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा कार्यालयात वेगवेगळया विभागासाठी "एअर कुलर " मागविण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६१,४५०/- चे तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांच्या मंजुरीनंतर सदरील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यात खालीलप्रमाणे एजन्सीज व दर होते.

| | | (मोठे ) १८"साईज | (छोटे) १६"साईज |
|---|---|---|---|
| १) मे.विमल सेल्स | | | |
| कार्पोरेशन | (वॉक्स) | ३,८००-०० | ३,५४०-०० |
| | (रिलॅक्स) | ३७४०-०० | ३,५४०-०० |
| २) मे.पगारीया | | | |
| एन्टरप्रायजेस | (वॉ) | ३,७५०-०० | २८५०-०० |
| | (रि) | ३,९७५-०० | -- |
| ३) मे.श्री.चिंतामणी | | | |
| ट्रेडींग कं. | (वॉ) | ३,७४५-०० | -- |
| | (रि) | --- | -- |

४) मे.शहा इलेक्ट्रीक
कंपनी (रिलॅक्स) ४,०००-०० ३,७००-००

वरीलप्रमाणे वरील एजन्सीतर्फे वॅाक्स मेक व रिलॅक्स मेक व कुल अेअर मेक कुलर मागविण्यात आले होते.त्यानुसार तुलनात्मक तक्ता तयार केला त्यात वॅाक्समध्ये मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांचे दर १८"मध्ये सर्वात कमी म्हणजे रु. ३,७४५-०० आहेत व १६"वॅाक्समध्ये मे.पगारीया यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु. २,८५०/- आहे,परंतु मे.पगारीया एन्टरप्रायजेस यांनी डिलरशीपचे कागदपत्र दाखल न केल्यामुळे द्वितीय निविदास चर्चा करुन प्रथम कमी दराच्या दरपत्रकानुसार दर देण्यास पत्रक देऊन संमती घेण्यात आली.तयानुसार मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी (द्वितीय क्रमांक ) यांना प्रथम क्रमांकाच्या निविदेच्या दरात १६"वॅाक्स मेक कुलर प्रती नग रु. २,८५०/- प्रमाणे १५ नग कुलर तसेच एकूण रक्कम रु. ४२,७५०/- व मे.श्री. चिंतामणी ट्रेडींग कं.यांना १८"कुलर ५ नग व १६" कुलर १५ नग पुरवठा करणेसाठी तसेच त्यांच्या रकमेस रक्कम रु. ६१,४७५/- मान्यतेस्तव व प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा कार्यालयात वेगवेगळया विभागासाठी "एअरकुलर" मागविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी वॅाक्स मेकचे १८" कुलरचे दर रक्कम रु. ३,७४५/- या दराने ५ नग तसेच वॅाक्स मेकचे सर्वात कमी दर रक्कम रु. २,८५०/-( १६") मे.पगारीया यांनी डीलरशीपचे कागदपत्र दाखल न केल्यामुळे वरील दराने द्वितीय निविदाधारक मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार प्रथम कमी दराच्या दरपत्रकानुसार (रक्कम रु.२,८५०/- प्रति नग ) १५ नग कुलर खरेदर करण्यास व एकूण रक्कम रु. ६१,४७५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,मनपा अंतर्गत टाऊन हॅाल येथील सर्वसाधारण सभा सभागृह व स्थायी समिती सभागृहामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण दोन १५० लिटरचे वॅाटर कुलर बसवावयाचे आहेत.

सदरील कामाकरीता सा.बां.विभागातील विद्युत विभागाच्या दर सूची नुसार रक्कम रु. २९,७४०/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले होते.सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता अनुक्रमे खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | निविदा दर/प्र.नग | कंपनी |
|---|---|---|---|
| १) | मे.नरीमन ॲण्ड सन्स,औरंगाबाद. | २२,३८५/- | उषा |
| २) | मे.नरीमन सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस | २२,४८५/- | व्होल्टाज |
| ३) | मे.परवीन ट्रेडर्स, औरंगाबाद. | २३,३५७/- | ब्लुस्टार |

वरील दर्शविलेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे.नरीमन ॲण्ड सन्स,औरंगाबाद यांच्या "उषा" कंपनीचे १५० लिटर वॅाटर कुलर करीता प्रति नग रु.२२,३८५/- (सर्वात कमी) हा निविदा दर आहे.दोन वॅाटर कुलर खरेदी करीता वरील दर्शविलेल्या दरानुसार रु.४४,७७०/- खर्च येईल.

सदरील कामाकरीता सुधारीत अंदाजपत्रक एकूण रु.४४,७७०/- चे बनविण्यात आले आहे.सदरील खर्च हा सामान्य प्रशासन या शिर्षातील फर्निचर व इतर साहित्य खरेदी या शिर्षकाखाली करण्यात येईल.उषा कंपनीचे दोन वॉटर कुलर एकूण रक्कम रु. ४४,७७०/- चे खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा अंतर्गत टाऊन हॉल येथील सर्वसाधारण सभा सभागृह व स्थायी समिती सभागृहामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण दोन १५०लिटरचे वॉटर कुलर बसविणेच्या कामाकरीता रक्कम रु.४४,७७०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु.२२,३८५/- प्रति नग (उषा कंपनीचे) या दराने दोन वॉटर कुलर मे.नरीमन ॲण्ड सन्स,औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३६:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,स्थायी समिती ठराव क्र.९२९ दि. १८-२-८९ अन्वये भावसिंगपुरा,भिमनगर येथे दगडी पुल बांधण्याचे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.परंतु सदरील काम उपलब्ध गुत्तेदारामार्फत करुन घेण्याबाबत ठरावात उल्लेख आलेला नाही. करीता सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.नरेंद्र रंगास्वामी नायडू यांचेकडून करवून घेणेबाबत मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा,भिमनगर येथे दगडी पुल बांधण्याचे काम उपलब्ध गुत्तेदार श्री.नरेंद्र रंगास्वामी नायडू यांचेकडून करवून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३७:**

प्रकल्प अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,फुलेनगर (उस्मानपुरा) झोपडपट्टीतील समाज मंदीरात इयत्ता पाचवी ते कला वाणिज्य व विज्ञान शाखेच्या पदवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या तसेच बेकार युवकांसाठी अभ्यासिका (Study Eentre) सुरु करण्यात यावे.अभ्यासिकेच्या लाभार्थिस रु. ५/-द.म.फी व रु. २०/- अनामत रक्कम भरावी लागेल.संबंधितांना पुस्तके घरी वापरता येणार नाहीत.या अभ्यासिकेत क्रमिक,सामान्य ज्ञानाची तसेच स्पर्धात्मक परीक्षेसाठी आवश्यक पुस्तके,वृत्तपत्रे,नकाशे इत्यादी पुरविण्यास, फर्निचर व ग्रंथपाल या शाखेतील किमान प्रमाणपत्र धारक व्यक्ती २६० ते ४९५/- या वेतनश्रेणीत व एक शिपाई रु. २००/- ते २८०/- या वेतनश्रेणीत नियुक्त करण्यास मान्यता दयावी.

वरील योजनेवर पहिल्या वर्षी रु.१,०८,०००/- (एक लाख आठ हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे.सदर खर्च कमकुवत घटकांसाठी राखीव निधीतून करण्यात यावा.योजना तरतूद व खर्चास मान्यता मिळण्यास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फुलेनगर (उस्मानपुरा) झोपडपट्टीतील समाजमंदीरात इयत्ता पाचवी ते कला वाणिज्य व विज्ञान शाखेच्या पदवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या तसेच बेकार

युवकांसाठी अभ्यासिका सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.या अभ्यासिकेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थिंना अनामत रक्कम रु. २०/- आणि दरमहा रु.५/- फी भरल्यानंतर लाभ घेता येईल.अभ्यासिकेतील पुस्तके इ.घरी वापरता येणार नाहीत.या अभ्यासिकेतील क्रमिक,सामान्य ज्ञानाची तसेच स्पर्धात्मक परीक्षेसाठी आवश्यक पुस्तके,वृत्तपत्रे,नकाशे इत्यादी पुरविण्यास फर्निचर व ग्रंथपाल शाखेतील किमान प्रमाणपत्रधारकाची रु.२६०-४९५ आणि रु.२०० ते २८० या वेतनश्रेणीत एक शिपाई नियुक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.यायोजनेकरीता पहिल्या वर्षाकरीता रु.१,०८,०००/- चा अपेक्षित खर्च कमकुवत घटकांसाठी राखीव निधीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**विषय क्र.३८:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केली की,मो.शहाबाजार वार्ड क्र.१४ येथे हयुम पाईप कल्व्हर्टचे काम करणे अत्यंत जरुरी आहे.करीता अंदाजपत्रक रक्कम रु.८८,०००/- चे तयार केले आहे.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १४ मो.शहाबाजार येथे हयुम पाईप कल्व्हर्टचे काम करणेसाठी रक्कम रु.८८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.३९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,सिटी क्लब ते जिल्हाधिकारी कार्यालय रोडवर फुटपाथ रस्ता दुभाजक व गटार तयार करण्याकरीता रक्कम रु.६,२३,००८/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मान्यता देण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.तसेच या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) पी.जे.तमखाने | १२.७१ % | कमी |
| २) एल.एम.पडघन | १५ % | कमी |
| ३) एस.ए.नवाब | १४.१० % | कमी |
| ४) जी.एम.बालचंदानी | ७.८६ % | जास्त |
| ५) एन.जी.गुणवानी | १५.६ % | कमी |
| ६) कुलवंतसिंग | ११.७७ % | कमी |
| ७) मझरुल हक | ५ % | कमी |
| ८) एस.एच.असोशिएट | ५.५ % | जास्त |

सदरील निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १५.६ % कमी दराची निविदा श्री.एन.जी.गुणवानी यांची प्राप्त झाली आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी क्लब ते जिल्हाधिकारी कार्यालय रोडवर फुटपाथ,रस्ता दुभाजक व गटार तयार करण्याकरीता रक्कम ६,२३,००८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६% कमी दराचे श्री.एन.जी.गुणवानी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टी.बी.हॉस्पीटल ते काझीवाडा नाला व काजीवाडा बस्ती ते काजीवाडा नाला दगडी गटार बांधण्यासाठी रु. ६,९५,७५०/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रु. ६,९५,७५०/-च्या अंदाजपत्रकास मान्यता देणेस्तव व प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच या कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण ९ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एन.जी.गुणवानी | १७ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) एस.एच.असोशिएट | ५.१०% | --//-- |
| ३) एस.ए.नवाब | १७.१० % | --//-- |
| ४) कुलवंतसिंग | ११.७७ % | --//-- |
| ५) एल.एम.पडघन | १२ % | --//-- |
| ६) मझरुल हक | १७ % | --//-- |
| ७) पी.जे.तमखाने | ९.९९ % | --//-- |
| ८) बी.अे.काल्डा | ९.९० % | --//-- |
| ९) एम.एम.बेग | १३.०९ % | --//-- |

उपरोक्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७.१०% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टी.बी.हॉस्पीटल ते काझीवाडा नाला व काजीवाडा बस्ती ते काजीवाडा नाला दगडी गटार बांधण्यासाठी रक्कम रु. ६,९५,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१०% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,पडेगांव कत्तलखाना येथे कातडी व हाडे साठविण्यासाठी गोदाम बांधण्यासाठी रु. ६,१३,१०८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मान्यता देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) एस.एच.असोशिएट | ७ % | जास्त |
| २)श्री. कुलवंतसिंग | ७ % | कमी |
| ३) जी.एम.बालचंदानी | ७.८६% | जास्त |
| ४) एन.जी.गुणवानी | ८% | कमी |
| ५) मझरुल हक | ८% | कमी |
| ६) एल.एम.पडघन | १३ % | कमी |
| ७) पी.जे.तमखाने | ५.६७ % | कमी |
| ८) एस.ए.नवाब | १६.१० % | कमी |

सदरील निविदामध्ये तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६.१० % कमी दराची निविदा श्री.एस.ए.नवाब यांची प्राप्त झाली आहे.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे,श्री.मोतीराम घडामोडे,श्री.प्रदीप जैस्वाज,श्री.कचरु नवपुते,श्री.शंकर मगर : पडेगांव येथील कत्तलखान्याच्या कामासाठी अनेक कामांना यापूर्वी मंजुरी दिली आहे.परंतु अद्याप सिल्लेखाना येथील कत्तलखाना हलविण्यात आला नाही.सिल्लेखाना येथे सद्य परिस्थितीत जनावारांची बेकायदेशीर कत्तल आजही चालू आहे.या ठिकाणी बेकायदेशीर कत्तल झालेल्या जनावारांचे रक्त मिश्रीत घाण पाणी रस्त्यावर पसरुन दुर्गंधी सुटते.त्यामुळे सिल्लेखाना येथील वाहतुक दिव्यांमुळे थांबणाऱ्यांना वाहन धारकांना आणि शहर बस वाहतुकीद्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या दुर्गंधीयुक्त पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे.तेव्हा सिल्लेखाना येथील कत्तलखान्याचे गोडावूनची भिंत पाडण्यात यावी म्हणजे त्या ठिकाणी बेकायदेशीर कत्तल होणार नाही.या बाबींचा विचार प्रथम करुन कार्यवाही व्हावी.तोपर्यंत या कामास मंजुरी देण्यास आमचा विरोध नोंदवावा.

श्री.मोतीराम घडामोडे : सदरील कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता नसतांना या कामासाठी दरपत्रके कशी मागविण्यात आली याचा खुलासा करण्यात यावा.

मा.उपआयुक्त : सदरील काम शक्य तितक्या लवकर पूर्ण होणे जरुरीचे आहे.ही बाब लक्षात घेऊन वेळ जावू नये म्हणून दोन्ही प्रकरणे एकत्र ठेवण्यात आली आहेत.

श्री.मोरेश्वर सावे,श्री.मोतीराम घडामोडे : सिल्लेखाना येथील कत्तलखाना हलविण्याबाबत आयुक्त / उपआयुक्त/महापौर यांनी संबंधितांशी चर्चा करुन सिल्लेखाना येथील कत्तलखाना किती दिवसाचे आंत पूर्णपणे पडेगांव येथे हलविला जाईल याबाबत संबंधितांकडून लेखी करारनामा करुन घ्यावा आणि त्यानंतरच या कामास मंजुरी देण्यात येईल.लेखी करारनामा मिळेपर्यंत प्रस्तावातील कामास आमचा विरोध राहील.

**ठराव :**

पडेगांव येथील कत्तलखान्याचे कामासाठी जी जी कामे बाकी आहेत ती सर्व कामे एकत्रितरित्या ठेवून अशा सर्वकामांना एकत्र मंजुरी घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मिलकॉर्नर ते भडकलगेट या रस्त्यावर फुटपाथ,रस्ता दुभाजक व रोडलगतची गटार तयार करणेच्या कामासाठी रु.३,४३,४७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रु. ३,४३,४७५/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एस.एच.असोशिएट | अंदाजपत्रकीय दराने | |
| २)श्री. कुलवंतसिंग | ११.७ % | कमी |
| ३) मझरुल हक | अंदाजपत्रकीय दराने | |
| ४) एन.जी.गुणवानी | १६ % | कमी |
| ५) एस.ए.नवाब | १२.२५ % | कमी |
| ६) पी.जे.तमखाने | १२.७१ % | कमी |

उपरोक्त निविदा मध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६ % कमी दराची निविदा श्री.एन.जी.गुनवाणी यांची प्राप्त झालेली आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे मीलकॉर्नर ते भडकलगेट या रस्त्यावर फुटपाथ,रस्ता दुभाजक व रोड लगतची गटार तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु. ३,४३,४७५/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६ % कमी दराचे श्री.एन.जी.गुनवाणी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.४३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,कार्यालयातील सिमेंट साठा संपुष्टात आला आहे व कामाची वाढती गती लक्षात घेता ५०० मे.टन सिमेंट खरेदीसाठी दि.२९-४-८९ रोजी निविदा मागविलेल्या असता खालील कंपन्यांकडून दरपत्रके वसूल झाली.

| | दर प्रतिमे.टन | सर्व करांसह मनपा गोडावूनपर्यंत पोहोच करणे. |
|---|---|---|
| १) मे.गोकुळ एजन्सी,औरंगाबाद | रु.१४८०/- प्र.मे.टन | |
| (जे.के.सिमेंट) | (प्रति बॅग ७४/-) | --//-- |
| २) ओरीएन्ट सिमेंट कंपनी | रु.१४२०/- प्र.मे.टन | |
| | (७१/- प्र.बॅग) | --//-- |
| ३) सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडीया | रु.१३०८/- प्र.मे.टन | --//-- |
| (भारत सरकार उपक्रम) | (६५.४० प्र.बॅग) | |
| ४) माणिकगढ सिमेंट कंपनी | रु. १३.५५/- प्र.मे.टन | --//-- |
| | (६७.७५ प्र.बॅग) | |
| ५) मे.पांडे ॲण्ड सन्स | रु.१३.३०/-प्र.मे.टन | --//-- |
| (एल.ॲण्ड टी.) | (६६.५० प्र.बॅग) | |
| ६) विक्रम सिमेंट कंपनी | रु.१३६०/- प्र.मे.टन | --//-- |
| | (६८/- प्र बॅग) | |

तुलनात्मक अवलोकन केले असता सर्वात कमी दराचे म्हणजे १३०८/- प्रति मे.टन सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडीया यांचे दरपत्रक आहे.तरी ५०० मे.टन खरेदी करण्यास अंदाजे रक्कम रु. ६,५४,०००/- (रु.सहा लक्ष चौपन्न हजार फक्त) तरी सदरील सिमेंट खरेदीसाठी कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यालयातील सिमेंट साठा संपुष्टात आल्याने व कामाची गती लक्षात घेता मे.सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडीया यांचेकडून तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर रक्कम रु. १३०८/- प्रति मे.टन या दराने केलेल्या ५०० मे.टन सिमेंट खरेदीस व रक्कम रु. ६,५४,०००/-च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १७-६-८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा इतिवृत्तांत. शनिवार दिनांक १७-६-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाढे यांच्या अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.**

या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) // गील इकबाल सिंग प्रितमसिंग
३) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
४) // नवपुते कचरु चंद्रभान
५) // पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) // मगर शंकर जिजाराम
७) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
८) // यादव अशोक सायन्ना
९) // स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१०) // सावे मोरेश्वर दिनानाथ

**विषय क्र.४४ :**

दिनांक ८-६-१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.मिर्झा अन्वर बेग :(मो.शहाबाजार भागात पुरवठा होत असलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्याचा नमुना सभागृहापुढे ठेवण्यात आला.)

मो.काचीवाडा,शहाबाजार भागातील नागरिकांना सभागृहापुढे ठेवलेल्या नमुन्याप्रमाणे दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे या पाण्यामध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळले जात असल्याचे दिसते.यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येईल.

जलगृह अभियंता : शहाबाजार,काचीवाडा भागात कार्यालयातर्फे काही कामे चालू आहेत.या ठिकाणी दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्याचा सर्व्हे करण्याचे काम चालू आहे आणि प्रतिबंधक उपाययोजना म्हणून या भागात पाण्यात टाकण्यात येणाऱ्या हॅलोजन गोळयांचे वाटप आणि ब्लिचिंग पावडरचा डोस वाढविण्यात आलेला आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : या भागात काम चालू असून नळांना घाण पाणी येत असल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे.तेव्हा आपण नागरिकांचे आरोग्याच्या दृष्टीने त्याबाबतची जाहीर सूचना वृत्तपत्रात दिली आहे काय?

कार्य.अभियंता : अशा प्रकारची जाहीर सुचना वृत्तपत्रात यापूर्वी दिली नाही ती देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.मिर्झा अन्वर बेग : वार्ड क्र.१९ मध्ये खांडकीचे काम चालू असून सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे.यामुळेच मागील सभेत २७.३३% कमी दराने काम

देण्यास आक्षेप घेतला होता.सभागृहाला अशी विनंती करतो की,वार्ड क्र. १९ मध्ये चालू असलेल्या खांडकी कामाची सभागृहाने प्रत्यक्ष पाहणी करावी.सदर गुत्तेदार या कामासाठी कमी प्रमाणात सिमेंट वापरत आहे.तसेच कामासाठी वापरण्यात येणारे साहित्यही निकृष्ट प्रतीचे आहे.

मा.सभापती : संबंधीत सभासदांचे तक्रारीनुसार शहर अभियंता,उपअभियंता व नगरसेवक यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन काम निकृष्ट दर्जाचे असल्यास काम बंद करावे व संबंधितांस बील अदा करण्यात येऊ नये.

श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.अलफखाँ हुसेनखाँ : औरंगाबाद टाइम्स गृहनिर्माण संस्थेने विकास खर्चाची संपूर्ण रक्कम कार्यालयात जमा केली आहे.या भागातील विकास कामे हाती घेण्यास संबंधित विभागास सूचना दिल्या असतांना गेल्या १५ दिवसांपासून या भागातील कामाची अंदाजपत्रके मंजुरीसाठी सभागृहासमोर का ठेवण्यात येत नाहीत?

श्री.यादव अशोक सायन्ना : मो.हर्षनगर / गीतानगर या भागात खडी रस्त्याचे काम करणेबाबत मागील सभेत मा.सभापती यांनी सूचना देवूनही या सभेत तेथील कामाचा समावेश का करण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा आणि त्याबाबत निर्णय होईपर्यंत सभेचे कामकाज पुढे सुरु करण्यात येऊ नये.

श्री.कचरु नवपुते : चिकलठाणा भागातील स्मशानभूमीचे कामाबाबत अनेक वेळा संबंधित विभागाकडे मागणी करण्यात आली आहे.१५ दिवसांपूर्वी या कामासाठी बजेट शिल्लक नाही असे सांगण्यात आले तेव्हा याबाबत सविस्तर खुलासा व्हावा.

उप अभियंता (बां-२) : चिकलठाणा भागातील स्मशानभूमीच्या कामाबाबत अंदाजपत्रक तयार करुन आवश्यक कार्यवाहीसाठी नगररचना विभागाकडे पाठविण्यात आले आहे.

कार्य.अभियंता : बांधकाम उपअभियंता यांनी नगररचना विभागाकडून संचिका मागवून घ्यावी व आवश्यक ती पुढील कार्यवाही त्वरीत करावी.

श्री.मोरेश्वर सावे : गत सभेत कार्यालयाचे विधी सल्लागार आणि सचिव हयांचेशी बऱ्याच दिवसांपासून संपर्क साधता आली नाही.तत्संबंधी खुलासा व्हावा.

मा.उप आयुक्त : कार्यालयाचे विधी सल्लागार सध्या सुटीवर मुंबईल गेले होते.

श्री.यादव अशोक सायन्ना : विषय क्र. १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुराणा कॉम्प्लेक्सच्या इमारतीचे नकाशे तपासणेबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

सहा.संचालक नगररचना : सुराणा कॉम्प्लेक्स करीता कार्यालयाने १५२x२५ चौ.मी. ची जागा सुराणा कॉम्प्लेक्स करीता जिने दिलेली आहे.यापैकी ७६x१८ चौ.मी.व एक इमारत बांधण्यात आली आहे.ही जागा कार्यालयाचे पत्रक क्र. ए एम सी / टी पी एस / १७८२ / ८३ दि. २-९-१९८३ अन्वये ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याने रू. १००/- प्रतिवर्ष याप्रमाणे भाडयाने दिलेली आहे.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : जाफरगेट येथील फॉडर मार्केटसाठी जी जागा संपादन केली आहे त्यात वेगवेगळया मालकाच्या दोन मालमत्ता संपादीत केल्या आहेत.त्या मोबदल्यात सदरील जागा भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे.याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.एकबालसिंग गील : सुराणा कॉम्प्लेक्स ही इमारत बेकायदेशीर व नियमबाहय बांधलेली आहे.तेव्हा ती पाडण्यात यावी आणि या इमारत बांधकामामध्ये अप्रत्यक्षरित्या मदत करणाऱ्या सर्व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी.कोणाचीही गय करण्यात येऊ नये.

श्री.यादव अशोक सायन्ना : मागील सभेत सुराणा कॉम्प्लेक्स बाबत झालेल्या चर्चेनंतर संबंधितांकडून काही मजकूर वृत्तपत्रात छापून आलेला आहे.त्याबाबत सभागृहाचे काय मत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : श्री.सुराणा स्थायी समितीला आव्हान करीत आहेत.या प्रकरणात तडजोड झ ाली तर इतर बिल्डर्सही तडजोड करण्याचे प्रयत्न करतील.तेव्हा अशा प्रकरणांना वेळीच पायबंद घालणे योग्य राहील.या प्रकरणी कायदेशीर काय कार्यवाही करता येईल याचा विचार करता येईल.त्यापूर्वी सहा.संचालक यांनी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

श्री.मोरेश्वर सावे : शहरातील नाल्याची जागा लिजवर देण्याबाबत वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आली होती.त्यात ज्या जागा लिजवर दिल्या जातील त्या जागेच्या मापाएवढीच जागा भाडेपट्टाधारकाने जमीन लेवलपर्यंत बांधून विना मोबदला महापालिकेला देण्याचे ठरले होते.कार्यालयाने प्रत्येक झोनकरीता इमारत निरीक्षक नेमले आहेत.तेव्हा सुराणा कॉम्प्लेक्सच्या कामाबाबत संबंधीत निरीक्षकांकडून कार्यालयास रिपोर्ट करण्यात आला होता का? याचा विचार करणे आवश्यक आहे.तेव्हा इमारत पाडण्याचा ठराव करण्यापूर्वी याचा संपूर्ण विचार अभ्यास करण्यासाठी कार्यालयाचे अधिकारी व सभासद यांची एक उपसमिती स्थापन करुन या उपसमितीचा अहवाल आल्यानंतर ठोस निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती : या इमारतीचे बांधकामामध्ये परवानगीचे नुतनीकरण वेळोवेळी होणे आवश्यक आहे.परंतु तशी कार्यवाही झालेली आढळत नाही.

श्री.एकबालसिंग गील : महापालिकेने लिजवर दिलेली जागा संबंधिताने सबलिज करुन अनेकांना दिली आहे.काही दिवसांपूर्वी याच इमारतीत सन १९८४ ची परवानगी असतांना नळ कनेक्शन दिले आहे.हे कसे शक्य आहे?

श्री.स.अ.एकबालुद्दीन : या इमारतीसाठी काही दिवसांपूर्वीच दोन नळ कनेक्शन देण्यात आले.देण्यात आलेले दोन नळ कनेक्शन आणि पुर्वीचे कनेक्शन असे एकूण सहा इंच पाईपलाईन इतके पाणी या इमारतीस पुरविले जात आहे.त्यामुळे आजुबाजूच्या नागरिकांना पाण्याचा त्रास होत आहे.तसेच या इमारतीचे जलनिःसारण कनेक्शन बाजुला असलेल्या कब्रस्तानचे जागेत मिळवले आहे.याबाबत गेल्या सहा महिन्यापासून लेखी तक्रारी केल्या आहेत.तेव्हा जलिःसारणासाठी संबंधिताने परवानगी घेतली होती काय?

श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.एकबालसिंग गील,श्री.कचरु नवपुते,श्री.रतनकुमार पंडागळे : विषय क्र.१२,१३,१५ व ३८ ची कामे तातडीची असल्याकारणाने "ए-१" नमुन्यावर देण्यात यावी.

मा.सभापती : विषय क्र. १२,१३,१५ व ३८ आणि या व्यतिरिक्त इतर कामासाठी कार्यालयाला आवश्यक आलेल्या पाईप करीता दरपत्रके मागविण्यात यावीत.आणि कार्यालयाने मागविलेले पाईप अशा कामांना पुरवठा करण्यात यावेत.

लेखाधिकारी : "ए-१" वर काम देतांना स्थानिक रजिस्टर गुत्तेदारापैकी किमान चार-पाच गुत्तेदारांकडून अशा कामासाठी दरपत्रके मागविण्यात यावीत आणि त्यातील कमी दराचे दरपत्रकधारकांकडून अशी कामे "ए-१" वर करुन घेता येतील.

श्री.मोरेश्वर सावे : विषय क्र.१६ च्या कामाबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी करण्यात आली आहे.तेव्हा या कामाच्या दरपत्रकास मंजुरी देण्यात यावी.तसेच विषय

क्र. ३९ व ४२ ची कामे श्री.गुणवानी गुत्तेदार यांना देण्याची मंजुरी देण्यात आलेली आहे.परंतु त्यांच्या कामाविषयी मा.आयुक्त यांच्याकडे बऱ्याच तक्रारी आहेत.

मा.सभापती : गुत्तेदार श्री.गुणवानी यांना नोटीस देऊन "त्यांचेकडे असलेली विलंबित कामे विहित वेळेत पूर्ण केली नाही तर पुढे कामे दिली जाणार नाहीत"असे कळविण्यात यावे.तसेच विषय क्र. ३९ व ४२ ची कामे श्री.गुणवानी ऐवजी दुसरे कमी दराचे गुत्तेदारांकडून कमीत कमी दरात करुन घेण्याबाबत शहर अभियंता यांनी वाटाघाटी कराव्यात.

सहा.संचालकनगररचना:बांधकाम परवानगीची मूळ संचिका उपलब्ध नसल्यामूळे सुराणा कॉम्प्लेक्सचे बांधकाम विना परवानगी आहे किंवा परवानगीप्रमाणे आहे हे मला सांगता येणार नाही.

श्री.यादव अशोक सायन्ना : सुराणा कॉम्प्लेक्स बाबत १५ दिवसांपूर्वी कार्यालयात दाखल झालेल्या नकाशातून काय निष्पन्न झाले आणि या संदर्भात मा.सभापती यांचेकडे दाखल केलेल्या दिनांक १७-६-८९ चे पत्रकाबाबत (श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.एकबालसिंग गील,श्री.मिर्झा अन्वर बेग यांच्या सहया असलेले) खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक नगररचना : सुराणा कॉम्प्लेक्स बाबत संबंधिताने दाखल केलेल्या नकाशाप्रमाणे आणि प्रत्यक्ष मोक्यावर वरील मोजमापाप्रमाणे तयार करण्यात आलेला अहवाल (१ ते ७ मुद्दे) वाचून दाखविला.

तसेच कार्तिकी समोरील बांधकामाबाबत संबंधिताने नाला ट्रेनिंगचे काम पूर्ण केल्यामुळे संबंधितास बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : कार्तिकी लॉजजवळील बांधकाम,सुराणा कॉम्प्लेक्स आणि खिंवसरा बांधकामाबाबत एक उपसमिती कायम करण्यात यावी.या उपसमितीने पंधरा दिवासांचे आत आपला अहवाल दाखल करावा.

मा.सभापती : सुराणा कॉम्प्लेक्स बाबत सभागृहापूढे प्रत्यक्ष अहवाल सादर केला असता या प्रकरणी अधिक खोलात जावून सविस्तर चौकशी करावी असे सभागृहास वाटते.याचा विचार करुन स्थायी समिती सभापती यांचे अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची चौकशी समिती नियुक्त करण्यात येते आहे.या समितीमध्ये सन्माननीय सभासद १) श्री.अलफखाँ हुसेनखाँ, २) श्री.मोरेश्वर सावे,३)श्री.यादव अशोक सायन्ना,४) श्री.मोतीराम घडामोडे,५) श्री.एकबालसिंग गील,६) मा.उपआयुक्त आणि संबंधित खात्याचे अधिकारी तसेच विधी सल्लागार यांचा समावेश राहील.ही समिती सुराणा कॉम्प्लेक्स,खिंवसरा व कार्तिकी हॉटेल समोरील बेकायदेशीर बांधकामाची चौकशी करील व आपला अहवाल स्थायी समितीला सादर करील.त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

कार्तिकी हॉटेलसमोरील बेकायदेशीर बांधकामाबाबत स्थायी समितीत चर्चा होत असतांना संबंधित अधिकाऱ्यांनी या कामास दिलेल्या परवानगीबद्दल समिती खेद व्यक्त करते.

श्री.रतनकुमार पंडागळे : समिती योग्य नाही त्यास माझा आक्षेप नोंदवावा.

**ठराव :**

१) "ए-१" वर काम देतांना स्थानिक गुत्तेदांरापैकी किमान चार-पाच पंजिकृत गुत्तेदारंकडून दरपत्रके मागवून त्यातील कमी दराचे दरपत्रकधारकांकडून विषय क्र.१२,१३,१५ आणि ३८ ची कामे "ए-१"वर करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
२)विषय क्र. ३९ व ४२ ची कामे गुत्तेदार श्री. गुणवानी यांचेऐवजी द्वितीय कमी दराचे गुत्तेदाराकडून कमीत कमी दरात करुन घेण्याबाबत मा.शहर अभियंता यांनी वाटाघाटी करुन अहवाल सादर करावा.
अ.क्र.१ व २ मध्ये दर्शविलेल्या दुरुस्ती आणि वाढ यासह दिनांक ८-६-१९८९ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,जाफरगेट आठवडी बाजाराला कंपाऊंड वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२,९९,२३०/- चे सन ८८/८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

दि.१९-६-१९८९ रोजी सकाळी ९.०० वाजता सदर कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,समर्थनगर प्लॉट नं.२०,२१,२२,२३ च्या पाठीमागे राहणाऱ्या नागरिकांना रस्ता करुन देणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६४,६४०/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अलफखाँ हुसेनखाँ,श्री.मोरेश्वर सावे : अंदाजपत्रकाप्रमाणे आतापर्यंत किती रकमेच्या कामांना मंजुरी मिळाली आहे तसेच सदर रक्कम वजा जाता किती रक्कम शिल्लक आहे याबाबतचा संपूर्ण तपशील लेखाधिकारी यांनी पुढील सभेत सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर प्लॉट नं. २०,२१,२२,२३ च्या पाठीमागे राहणाऱ्या नागरिकांना रस्ता करुन देण्याच्या कामाकरीता रक्कम रु. ६४,६४०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,औरंगपुरा येथील टिळक पथ ते सचिन टायपिंग रस्त्याचे दुबारा खडीकरण करुन डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२१,३००/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च रस्ते दुरुस्ती या सदराखाली करण्यात येईल.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगपूरा येथील टिळकपथ ते सचिन टायपिंग रस्त्याचे दुबारा खडीकरण करुन डांबरीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु. २१,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,बायजीपूरा येथील जकात नाक्याच्या इमारतींवर पहिला मजला तसेच गार्डरुम बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१६-३-८९ विषय क्र. २६ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.१,६९,८७०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. १/ ८९-९० / जा.क्र.३४९६ / ८९ बांधवि-१ दि. २८-४-८९ रोजी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.ए.नवाब | ३.३०% | कमी |
| २) श्री.एन.जी.गुनवाणी | १०% | कमी |
| ३) श्री.कुलवंतसिंग | ५ % | जास्त |

वरील अ.क्र.२ श्री.एन.जी.गुनवाणी यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १०% कमी दराची आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

कमीत कमी रकमेत शहर अभियंता यांनी वाटाघाटी करुन अहवाल सादर करावा.

**विषय क्र.४९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,सिटी चौक येथील रस्त्याचे खडीकरण करणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १६-३-८९ विषय क्र. २८ प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. १९,४००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. १ / बांधवि-१ /३४९९ /८९ दि.२८-४-८९ नुसार निविदा फॉर्म मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पाच निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.झेड.ए.सिद्दीकी | १९.१९ % | कमी |
| २) श्री.एस.एम.मनडोर | १५ % | कमी |
| ३) श्री.कुलवंतसिंग | २०.१० % | कमी |
| ४) श्री. अब्दुल सलाम | १६.१६ % | कमी |
| ५) श्री.एस.ए.नवाब | २२.२० % | कमी |

वरीलपैकी श्री.एस.ए.नवाब यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२० % कमी दराचे आहेत.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटीचौक येथील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२०% कमी दराचे श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडे असलेली विलंबित कामे विहित वेळेत पूर्ण न झाल्यास त्यांना यापुढे कामे दिली जाणार नाहीत असे नोटीसद्वारे कळविण्यात यावे अशी सूचना मा.सभापती यांनी केली.

**विषय क्र.५०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,शहागंज येथील साईट नं.४० कडबीमंडी येथे वायर फेन्सींग करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१६-३-८९ विषय क्र.२६ प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. १४,६८०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. जा.क्र.मनपा / बांधवि-१ / ३४९९ / ८९ दि. २८-४-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण चार दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.के.बी.काल्डा | ४.९९ % | कमी |
| २) श्री.आसाराम ॲण्ड सन्स | २१.७२ % | कमी |
| ३) श्री.सलीम एस.ब्रदर्स | १५.०१ % | कमी |
| ४) श्री.एस.एस.मंडोरे | ५% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.७२ % कमी दराचे श्री.आसाराम ॲण्ड सन्स यांचे दरपत्रक आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज येथील साईट नं.४० कडबीमंडी येथे वायर फेन्सींग करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.७२ % कमी दराचे श्री.आसाराम ॲण्ड सन्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,खुल्या बाजारातून बांधकामासाठी लागणारे टॉर स्टील (पिळदार लोखंड) खरेदी करण्यात यावे.यासाठी सर्व विभागांची मागणी नोंदविली असता एकूण १०० मे. टन टॉर स्टील खरेदी करणे आवश्यक आहे.ज्याची अंदाजीत किंमत रु.७,५०,०००/- होते.तरी प्रस्ताव स्थायी समितीकडे प्रशासकीय खर्चास मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बांधकामासाठी लागणारे टॉर स्टील (पिळदार लोखंड) खुल्या बाजारातून १०० मे.टन खरेदी करणेसाठी अंदाजीत रक्कम रु. ७,५०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्तीच्या कामासाठी ४X४० वॅट टयुब रॉड मागविणे आहे.सदरील कामाचे इ.स.१९८९-९० साठी अंदाजपत्रक रक्कम रु. ४,००,०००/- चे एकूण १०,०००/- नगाचे करण्यात आले आहे.तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

श्री.स.अ.एकबालुद्दीन : गेल्या दिड दोन महिन्यापासून वार्ड क्र. १८ मध्ये बंद असलेले लाईट पूर्ववत चालू करण्यासाठी मागणी केली जात आहे.परंतू अदयाप काम झ ालेले नाही.

श्री.यादव अशोक सायन्ना : विद्युत साहित्य खरेदी करीता बऱ्याच रकमेची मंजुरी देवूनही या विभागातील तक्रारी दूर झालेल्या नाहीत.तेव्हा या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी.

श्री.मोरेश्वर सावे : विद्युत विभागातर्फे लाईट दुरुस्तीचे काम झाल्यानंतर त्या वॉर्डाचे संबंधित नगरसेवक किंवा नगरसेविकांचे गैरहजेरीमध्ये त्यांनी नेमून दिलेल्या नागरिकाचे प्रमाणपत्र प्रत्येक कामाचे वेळी घेण्यात यावे म्हणजे विद्युत विभागाच्या कामाबाबतच्या तक्रारी दूर होण्यास मदत होईल.

श्री.यादव अशोक सायन्ना : वार्ड क्र.१ येथील आप्पाचे वाडी येथे लाईटची व्यवस्था नाही.त्या दृष्टीने गेल्या एक वर्षापासून या भागासाठी पोलची मागणी केलेली आहे.परंतु अद्याप काम झालेले नाही.याचा खुलासा व्हावा.

श्री.मिर्झा अन्वर बेग : १० लाख रुपयांची व्ही टाईप गटारे मागविण्यास मंजुरी दिली आहे.हया व्ही टाईप गटारी कोठे असविल्या हया बाबत खुलसा व्हावा.

श्री.मोरेश्वर सावे : कार्यालयाचे भांडार विभागाची वेळोवेळी पडताळणी बऱ्याच दिवसांपासून झाली नसल्याचे समजते.सभागृहाने कचराकुंडी खरेदीस मंजुरी दिली आहे.त्याप्रमाणे खरेदी झाली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.स.अ.एकबालोद्दीन : गतवर्षी ६० हातगाडया खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली होती.परंतु वार्डामध्ये एकही हातगाडी दिसत नाही.तेव्हा हातगाडी खरेदी प्रकरणी चौकशी व्हावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : शहरातील कचरावाहू गाडयावर महापालिकेचा डिझेल व दुरुस्ती करीता दरमहा १५ ते २० हजारांचा खर्च होतो.या गाडया वारंवार पंक्चर किंवा नादुरुस्त असतात त्यामुळे सफाईचे कामात अडथळा निर्माण होतो.याचा विचार करुन जुन्या झालेल्या गाडया विकून नविन गाडया खरेदी करता येतील का ? हे पाहणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्तीच्या कामासाठी ४x ४० वॅट टुयब रॉड खरेदीसाठी (एकूण १००००नग) रक्कम रु. ४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच कार्यालयासाठी भांडार विभागातर्फे खरेदी करण्यात आलेल्या विविध साहित्याची चौकशी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५३:**

मो.घासमंडी येथे दगडी गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४४,३००/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घासमंडी येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. ४४,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

लेखाधिकारी यांचे सूचनेप्रमाणे "ए-१" वर काम करुन घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५४:**

झोन क्र. १,२,३, आणि ४,६ करीता सन १९८९-९० वर्षाकरीता बांबू आणि सुतळीचा पुरवठा करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ५१,१५०/- ला स्थायी समिती ठराव क्र. १०९३ दि. २०-४-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. १ / मनपा / युजिडी / १९९५ / ८९ दि.१५-४-८९ द्वारे निविदा (कोटेशन) मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून पुढीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | | पुरवठा धारकाचे | नांव | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विवरण | एकक | मोदेराज ट्रेडींग कं. | अजज अहमद | ताईबा टिंबर मार्ट |
| १ | बांबु १ १/२" ते २ | प्र.र.मी. | ५.५० | ४.२५ | ४.१० |
| २ | सुतळी दोरी | प्रति किलो | - | २८.०० | २३.०० |

तुलनात्कदृष्टया कमी मे.ताईबा टिंबर मार्ट यांचे दरपत्रक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.१,२,३,४ आणि ६ करीता सन १९८९-९० वर्षाकरीता बांबू आणि सुतळीच्या खरेदीकरीता तुलनात्मकदृष्टया कमी दराचे म्हणजेच (१) बांबू - रक्कम रु. ४.१० प्र.र. मीटर व (२) सुतही दोरी २३.०० प्रति किलो या दराचे मे.ताईबा टिंबर मार्ट यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५५:**

पुस्तक पेढी योजनेखाली इ.१ ली, २री, ३री , ५वी, ६वी, ७वी च्या विद्यार्थ्यांना नविन क्रमिक पुस्तकांचे संच उपलब्ध करुन देणेकरीता खर्चाच्या प्रमाणात शासनाकडून अनुदान मंजुर केले जाते.शिक्षण संचलनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे पत्रक क्र. प्राशिक / ३९८९ / ८९-९० पु-पे-मा (नं.-प-प्राशि) १९-ड (६) दि. २४-४-८९ प्रमाणे शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण,विभागाकरीता पुस्तक पेढी योजने अंतर्गत सन १९८९-९० करीता एकूण रक्कम रु. १६,०००/- (सोळा हजार रु.) अनुदान मंजुर झाले आहे.

सर्वसाधारण घटक योजना - ४,०००/-
विशेष घटक योजना- १२,०००/-
१६,०००/-

करीता पुस्तक पेढीसाठी पुस्तके खरेदी करीता रु. १६,०००/- (सोळा हजार रुपये) मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुस्तकपेढी योजनेखाली इयत्ता १ली, २री, ५वी, ६वी, ७वी च्या विद्यार्थ्यांना नविन क्रमिक पुस्तकांचे संच उपलब्ध करुन देणेकरीता पुस्तक पेढीसाठी

पुस्तके खरेदी करीता रक्कम रु. १६,०००/- (सोळा हजार रुपये) खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५६:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ७ मधील लेखा भवन समोर १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामांतर्गतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३५,७९८/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ७ मधील लेखा भवन समोर १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ३५,७९८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५७:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,वार्ड क्र. ४ मधील घाटी येथे श्री.गंगावणे यांच्या घरापासून मुख्य जलवाहिनी पर्यंत १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १७,३००/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मोरश्वर सावे : समर्थनगर भागातील ड्रनेज चोकअप झालेले आहे. त्यामूळे तेथील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे.तेव्हा याबाबत ठोस आश्वासन देण्यात यावे.तसेच औरंगाबाद अशोका हॉटेलकडून येणाऱ्या पाण्याबाबत वर्षभरापासून मागणी केली जात असतांनाही अद्याप या प्रकरणी कोणतीही कार्यवाही झालेली नाही.त्यावरही खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता : समर्थनगर येथील पोलीस वर्कशॉपसमोरील कामास मी स्वतः भेट दिली आहे.काम पूर्ण होत आहे.औरंगाबाद अशोक हॉटेलबाबत पुढील सभेत खुलासा करण्यात येईल.

भांडार अधिक्षक : स्थायी समितीने दिलेल्या मंजुरीनुसार प्रतिनग रु. ७९५/- या दराने १२० कचरा कुंडया खरेदी करण्यात आल्या असून त्यांचे वाटप विभागीय कार्यालयास करण्यात आले आहे.ते खालीलप्रमाणे-

झोन क्र.१ - १०+१० = २० कचराकुंडया
झोन क्र.२ - १०+१० = २० कचराकुंडया
झोन क्र.३ - १२+१५ = २७ कचराकुंडया
झोन क्र.४ - १०+१० = २० कचराकुंडया
झोन क्र.५ - ५+५ = १० कचराकुंडया
झोन क्र.६- १३+१० = २३ कचराकुंडया

श्री.मोरश्वर सावे : भांडार अधिक्षकांनी सुचविल्याप्रमाणे त्या त्या झोनला कचराकुंडयांचा पुरवठा करण्यात आला नाही.

श्री.यादव अशोक सायन्ना : विभागीय कार्यालयात वाटप करण्यात आलेल्या कचरा कुंडयांपैकी काही कचरा कुंडया चौकाचे (चौरस्त्याचे) जागेवर ठेवून गैरवापर होतो.

श्री.मिर्झा अन्वर बेग : स्थायी समितीमध्ये हातगाडया खरेदी करतांना हातगाडयांचा जो नमुना कार्यालयास देण्यात आला होता.त्याप्रमाणे त्या पुरविण्यात आल्या नाहीत.पुरविण्यात आलेल्या हातगाडया अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असल्यामुळे याबाबत चौकशी व्हावी.

श्री.स.एकबालोद्दीन :वार्ड क्र. १८ मधील उघडया गटारीवर स्लॅब टाकण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.स्थायी समितीने यापूर्वी मंजुर केलेल्या तीन लाखांचे कामामध्ये वार्ड क्र. १८ येथे उघडया गटारीवर स्लॅब टाकणेचे कामाचा समावेश होता.समावेश असलेल्या जागेपैकी फक्त एका ठिकाणी स्लॅब टाकण्यात आला आणि इतर ठिकाणी स्लॅब टाकण्याचे काम झालेले नाही.स्लॅब न टाकलेल्या भागांमध्ये काळा दरवाजा ते धन ऑईस फॅक्टरी आणि देना बँक ते चौक येथील भागांचा समावेश होतो.काळा दरवाजा ते धन आइस फॅक्टरी या ठिकाणचे गटारीवर स्लॅब न टाकल्यामुळे या गटारीचे घाण पाण्ी बाजूस असलेल्या कब्रस्तानमध्ये शिरते. तसेच वार्ड क्र. १८ मध्ये पाण्याचे पाईपलाईनच्या कामाचे दोन टेंडर मंजूर झाले. परंतु अद्याप काम झ ाालेले नाही तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

श्री.मिर्झा अन्वर बेग : वार्ड क्र. १९ मध्ये मंजुर झालेल्या कामासाठी संबंधित गुत्तेदाराकडून बांधकाम साहित्यासाठी चार वेळा मागणी करण्यात आली परंतु कार्यालयाकडून साहित्य मिळाले नाही.त्यामुळे कामास विलंब होत आहे.याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता : वार्ड क्र. १९ मध्ये चालू असलेल्या कामाला लागणारे साहित्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराने वेळेवर साहित्य पुरवठा न केल्यामुळे संबंधितास प्रतिदिन रु. १००/- याप्रमाणे दंड आकारणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४ मधील घाटी येथे श्री.गंगावणे यांच्या घरापासून मुख्य जलवाहिनीपर्यंत १०० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. १७,३००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.५८:**

उप अभियंता बांध-१ यांनी तोंडी प्रस्ताव मांडला की,वार्ड क्र.६ गीतानगर (आझाद कॉलेज समोर) खडी रस्ते तयार करण्यासाठी सन १९८८-८९ चे डि.एस.आर.दराने रक्कम रु.६७,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ६ गीतानगर (आझाद कॉलेज समोर) खडी रस्ते तयार करण्यासाठी रक्कम रु. ६७,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५९:**

उप अभियंता स्लम यांनी तोंडी प्रस्ताव मांडला की,किलेअर्क स्लम भागात खांडकी पेव्हींगचे काम करण्यासाठी रक्कम रु. ५२,४१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किलेअर्क स्लम भागात खांडकी पेव्हींगचे काम करण्यासाठी रक्कम रु. ५२,४१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २३-६-८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा इतिवृत्तांत. शुक्रवार दि.२३-६-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृह येथे मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) // इकबालसिंग प्रितमसिंग गील
३) // घडामोडे मोतीराम नारायणराव
४) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) // नवपुते कचरु चंद्रभान
६) // स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन

**विषय क्र.६०:**

दिनांक १७-६-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.अलफखान हुसेनखान : मागील सभेमध्ये बजेट बाबत खुलासा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती.या मागणीनुसार आजच्या सभेमध्ये बजेट नरतुदीतील रक्कम यातून स्पील ओव्हरच्या कामाची रक्कम चालू वर्षात मंजुर झालेल्या कामाची रक्कम वजा जाता किती रक्कम शिल्लक राहिली आहे याचा विचार करुन आगामी कामांना मंजुरी देण्याचा विचार करण्यात यावा.तसेच वरील सुचनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कामाचे संचिकेवर अर्थसंकल्पातील तरतुद,स्पील ओव्हर कामाची रक्कम,चालू वर्षात मंजुर झालेल्या कामाची रक्कम व शिल्लक रक्कम यांचा प्रत्येक संचिकेवर खुलासा करणे आवश्यक आहे.

मा.उप आयुक्त : मागील सभेत अशा प्रकारची सूचना मांडण्यात आली होती.परंतू लेखा विभागातील अधिकारी वर्ग रजेवर असल्यामुळे याबाबतची माहिति सभागृहास देता आली नाही.सदर माहिति पुढील सभेत देण्यात येईल.

मा.आयुक्त : शहर विकासाच्या दृष्टीने १० कोटी रुपयांची योजना शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहे.या योजने अंतर्गतची रक्कम शासनाकडून मंजुर होवून आल्यानंतर रस्त्याची कामे हाती घेता येतील. तरीही विकास योजने अंतर्गतच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत व या कामासाठी मंजुर केलेली सर्व रक्कम चालू वर्षात खर्च होईल असे नाही.याचा विचार करुन शहरातील काही विकास सदस्यांची कामे हाती घेतली आहेत.

| अ.क्र. | शिर्षक | अर्थ संकल्प तरतुद | स्पील ओव्हर कामाची रक्कम | चालू वर्षात मंजुर झालेली एकूण रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विकास रस्ते | १.३० कोटी | ८२.१२ लाख | ३० लाख | | |
| २ | भांडवली रस्ते | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | जलनिःसारण | ७० लाख | ३७ लाख | ३३ लाख | | |
| ४ | पाणी पुरवठा | ७० लाख | ५३.७८ लाख | १६ लाख | | |
| ५ | भांडवली इमारती | ८५ लाख | ६५ लाख | ८.६८ लाख | | |

शासनाकडे मागणी करण्यात आलेल्या योजनेत पाणी पुरवठा व ड्रेनेज कामाचाही समावेश करण्यात आला आहे.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : कार्यालयातर्फे फुटकळ कामांना (रेटलिस्ट) मंजुरी देण्यात येते.अशा कामांचा अहवाल मंजुरीनंतर १५ दिवसाचे आत स्थायी समितीचे माहितीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

मा.सभापती : अनेकविध कामांच्या खर्चासाठी काही ठराविक रकमेपर्यंत बंधन असणे आवश्यक आहे.तसेच या कामाच्या खर्चासाठी मा.आयुक्त यांची मंजुरी घेणे बंधनकारक असावे.

श्री.मोतीराम घडामोडे : सिडको भागातील बरीचशी कामे मंजुरीअभावी थंडावली आहेत.ही बाब लक्षात घेता या विभागाचे अधिकाऱ्यांना रु. १,०००/- पर्यंतची कामे मंजुर करण्याचे अधिकार देण्यात यावेत.मंजुरीसाठी लागणारा विलंब लक्षात घेता जलवाहीनीचे लिकेज बंद करण्यासारख्या सामान्य कामासाठी देखील किमान ४/५ दिवसांचा कालावधी लागतो व पर्यायाने पाणी वाया जाते.

मा.आयुक्त : विभागीय अधिकारी यांना नियमाप्रमाणे मोजमाप वही नोंदविण्याचे अधिकार नसल्यामुळे स.सभासदांचे सुचनेप्रमाणे जलवाहिनी दुरुस्तीसाठी मंजुरी देण्याचे अधिकार देता येणार नाहीत.

श्री.मोतीराम घडामोडे : सिडको भागातील एन-६ व ७ येथील शाळेच्या मैदानांची जागा उंचसखल असल्यामुळे शालेय मुलांना उपयोग घेता येत नाही.तेव्हा या मैदानाचे सपाटीकरण करुन त्या ठिकाणी झाडे लावण्यात यावीत.

**ठराव :**

दिनांक १७-६-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६१:**

श्री.आर.पी.नाथ यांनी दि.२३-६-८८ ला स.नं.५०,५१,५२ व ५३/१ मधील त्यांची जमीन मंजुर विकास योजने अंतर्गत आरक्षण क्रमांक १६० "खुली जागा" खालील जमीन खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यात यावी किंवा या जमीनीत रेखांकन मंजुर करावे या संबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दि.२३-६-८८ रोजी दिली.त्यानुसार भुसंपादन करुन खाजगी वाटाघाटीने जमीन घेण्यास दि.१७-९-८८ रोजी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.सदर जागेचे मुल्यांकन करण्यात आले असून अर्जदराचे वरील आरक्षणात बाधीत असलेले एकूण क्षेत्र १.३७ हेक्टर जमीनीचा मावेजा रक्कम रु.६,१७,७०४/- एवढा ठरविण्यात आला आहे.तरी आरक्षित जमीन प्रथम नोंदणीकृत दस्तऐवजाने ताब्यात घेऊन त्यानंतरच वरील मावेजाची रक्कम श्री.आर.पी.नाथ यांना देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी सादर.

**विषय क्र.६२:**

मालमत्ता अधिकारी,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला ओ की,सन १९८९-९० सालात अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना गणवेश वाटप करावयाचा आहे.२६ कर्मचाऱ्यांचे पॅन्टसाठी ६२ मीटर,टयुनिकसाठी ११७ मीटर तर शर्टसाठी ११३ मीटर कापड खरेदी करावयाचे आहे.मा.उप आयुक्त यांचे मान्यतेनुसार दरपत्रके मागविण्यात आली असता खालील दरपत्रके प्राप्त झाली.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

पुरवठा दराचे नांव व दर प्रती मीटर

| अ.क्र. | कपडा प्रकार | संतोष सेल्स कार्पोरेशन | मनोज इंटरप्राईजेस | रेमंड रिटेल शॉप | विजय जनरल स्टोअर्स |
|---|---|---|---|---|---|
| १ | विमल नेव्ही ब्ल्यू | ८४-३५ | ८४-७५ | - | ८४-०० |
| २ | रेमंड टेरीकॉट पांढरा खाकी नेव्ही ब्ल्यू | ८१-७५ | ८२-५० | ८६-०० | ८१-५२ |
| ३ | शर्ट आकाशी रंग | ४७-३० | ४८-०० | ४९-०० | ४६-७५ |

वरील चार पुरवठादारांपैकी विजय जनरल स्टोअर्सचे दर कमी आहेत.त्यांचे दराप्रमाणे वर नमुद केलेल्या कपडयाची किंमत रु. १९,५९४=६९ होते.सदरचा खर्च अग्निशमन दलाचे कर्मचाऱ्यांचे गणवेशासाठी करण्यात आलेल्या तरतुद रकमेमधून करण्यात येईल.विजय जनरल स्टोअर्सचे दर स्विकारण्यात येऊन गणवेश कपडा खरेदी करण्यास मान्यता देणेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दीष्ट केल्याप्रमाणे अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना इ.स.१९८९-९० अंतर्गतच्या खरेदी करावयाच्या गणवेश कापडासाठी (अनुक्रमे पॅन्ट,टयुनिक आणि शर्ट इ.) दाखल झालेल्या एकूण तीन दरपत्रकांपैकी विजय जनरल स्टोअर्स हयांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रकास व तद्अनुषंगाने रक्कम रु. १९,५९४-६९ च्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

प्रशासकीय सुसूत्रतेच्या दृष्टीने योग्य तो रंग पसंतीचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६३:**

मालमत्ता अधिकारी,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,अग्निशमन दलासाठी खालील साहित्य खरेदी करावयाचे आहे.

१) हैड्रोलीक प्रेशर टेस्टींग मशीन नग १
२) होस बायडींग मशीन नग १
३) होस पाईप टेस्टींग मशीन नग १
४) फस्ट एड बॉक्स नग ४

मा.उप आयुक्त यांचे मान्यतेनुसार दरपत्रके मागविण्यात आली असता खालील दरपत्रके प्राप्त झाली.त्यांचा तुलनातमक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | | विजय जनरल स्टोअर्स | इलेक्ट्रॉनिक सेल्स कार्पोरेशन | मनोज इन्टरप्राइजेस |
|---|---|---|---|---|
| १ | हैड्रोलिक प्रेशर टेस्टींग मशिन | ७,७७५-०० | ७,९२५-०० | ७,७९०-०० |
| २ | होस बायंडींग मशीन | ३,४००-०० | ३,५५०-०० | ३,५५०-०० |
| ३ | होस पाईप टेस्टींग मशीन | ६,७५०-०० | ६,८००-०० | ६,७७५-०० |
| ४ | फस्ट एड बॉक्स | १,०५०-०० | १,०९५-०० | १,१२०-०० |

वरील तीन दरपत्रकापैकी विजय जनरल स्टोअर्सचे दर कमी आहेत.त्यांचे दराप्रमाणे वर नमुद केलेल्या साहित्याची किंमत रु. २२,१२५/- होते.सदरचा खर्च अग्निशमन दलाचे साहित्य खरेदी करण्यासाठी असलेल्या तरतुद रक्कम रु. १ लाख मधून करण्यात येईल.विजय जनरल स्टोअर्सचे दर स्विकारणत येऊन साहित्य खरेदी करण्यास मान्यता देणेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दीष्ट केल्याप्रमाणे,अग्निशमन दलासाठी खरेदी करावयाच्या अनुक्रमे (१) हैड्रोलिक प्रेशर टेस्टींग मशीन - १ नग,(२) होस बायडींग मशीन -१ नग,(३)होस पाईप टेस्टींग मशीन १ नग,(४) फस्ट एड बॉक्स -४ नग खरेदीसाठी दाखल झालेल्या एकूण तीन दरपत्रकांपैकी विजय जनरल स्टोअर्स हयांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अनुक्रमे (१) रु.७,७७५/- , (२) ३,४००/-, (३) ६,७५०/-,(४) १,०५०/- या दराचे दरपत्रकास व तद्बनुषंगाने रक्कम रु.२२,१२५/- च्या खर्चास आणि वरील साहित्य खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६४:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,वार्ड क्र. १७ मधील लोटाकारंजा येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२३,०००/- चे असून मंजुरीस्तव सादर.

सदरील कामात लेबर पेमेंट ७,०५८/- इतके आहे.उन्हाळयामध्ये सदरील भागातील २० ते ३० नळांना पाणी येणे बंद झाले होते.त्यामुळे सदरील ठिकाणी पाण्याची अत्यंत टंचाई निर्माण झाली होती.अशा प्रकारे सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असल्या कारणाने उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचेतर्फे "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आले आहे.कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १७ मधील लोटाकारंजा येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. २३,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचेकडून "अ-१"नमुन्यावर करुन घेतलेल्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,क्रांतीचौक पाण्याच्या टाकीजवळील महानगरपालिका कर्मचारी निवास स्थानाची खास दुरुस्ती करणेच्या कामासाठी सन १९८८-

८९ च्या सा.बां. खात्याने डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४०,०००/- चे तयार करण्यात आलेले असून सदरील काम तातडीचे व पावसाळयापूर्वी करावयाचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.अब्दुल सलाम,कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकाचे दराने "अे-१"निविदावर करुन घेणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक पाण्याच्या टाकीजवळील महानगरपालिका कर्मचारी निवास स्थानाची खास दुरुस्ती करणेसाठी रक्कम रु. ४०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.अब्दुल सलाम कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून "अे-१"निविदावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६६:**

वार्ड क्र.४२ सिल्लेखाना ते मोंढा या ८० फुट डी.पी.रोडचे सि.सि.मॅडीयम कर्बींग व एस.एस.ग्रील या व इतर कामासाठी स्थायी समिती बैठक दि.११-१-८९ ठराव क्र. ७७५ अन्वये सामुहिक रक्कम रु. १२,०२,७३२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.पैकी सी.सी.मॅडीयम कर्बींग व एच.एस.ग्रीलचे रक्कम रु. ३,३०,५१०/- चे अंदाजपत्रक आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या होत्या.शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या.त्या दि.२६-५-८९ ला उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.पी.जे.तमखाने | ११.११ % | कमी |
| २) श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | ७.२२ % | कमी |
| ३) श्री.एस.ए.नवाब | ४.५० % | जास्त |
| ४) श्री.डी.अजितसिंग | ५ % | जास्त |
| ५) श्री.कुलवंतसिंग | ५ % | जास्त |
| ६) श्री.एस.एच.असोशिएटस | ७ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.११% कमी दराची श्री.पी.जे.तमखाने गुत्तेदार यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोतीराम घडामोडे : रस्ते व इतर कामासाठी पैसा कमी असल्याबाबत सभागृहात चर्चा झ ााली आहे.ही बाब लक्षात घेता एम.एस.ग्रीलचे काम शहरातील मोठया कंपन्या किंवा भांडवलदार व्यापारी यांचेमार्फत करुन घेण्यात यावेत.

मा.आयुक्त : कार्यालयाने शहरामील २३ ठिकाणच्या चौकांचा विकास करण्याच्या दृष्टीने या चौकातील ग्रील इ.कामाबाबतचे नकाशे शहरातील कंपन्या व भांडवलदार यांचेकडे पाठविले आहेत. परंतु या योजनेस अद्याप योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४२ सिल्लेखाना ते मोंढा या ८० फुट डी.पी.रोडचे सी.सी.मॅडीयम कर्बींग व एस.एस.ग्रील या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात

कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% कमी दराचे श्री.पी.जे.तमखाने गुत्तेदार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच ग्रीलचे कामासाठी उद्योजकांकडून प्रतिसाद मिळाल्यास संबंधितांकडून काम करुन घेण्यात यावे अन्यथा या कामासाठी मंजुर झालेल्या गुत्तेदाराकडुन काम करुन घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६७:**

वार्ड क्र. ४५ टेलीफोन भवन ते क्रांतिचौक पोलीस स्टेशन या ५० डी.पी.रोडचे रुंदीकरणासह डांबरीकरणाचे कामासाठी सा.बां. खात्याचे डी.एस.आर.सन १९८८-८९ चे दराने रक्कम रु. ३,२३,७८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : शहरातील बहुतेक रस्त्यावर बांधकाम साहित्य पडलेले असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. तेव्हा अशा प्रकारचे बांधकाम साहित्य त्वरीत हलविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

मा.आयुक्त : शहरात चालु असलेल्या कार्यालयीन कामाबाबत संबंधीत गुत्तेदाराने या कामासाठी रस्त्यावर असलेले सर्व बांधकाम साहित्य (दगड माती इ.) पूर्णपणे उचलले आहे.अशा आशयाचे प्रमाणपत्र संबंधित विभागाचे विभागीय अधिकाऱ्यांनी दिल्यानंतरच गुत्तेदारास कामाच्या देयकांची अदाई करण्यात यावी.

श्री.प्रदीप जैस्वाल :भाजी मार्केट औरंगपूरा येथील सुराणा कॉम्प्लेक्सकडून बारुदगर नाल्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर मोठया प्रमाणात खाचखळगे आहेत.यात पावसाचे पाणी साचल्यामुळे मार्केटमध्ये येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.या ठिकाणी डांबरीकरण करण्याच्या कामास यापूर्वीच मंजुरी मिळाली आहे.तेव्हा हे काम का झाले नाही? याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : पावसाळा सुरु झाल्यामुळे डांबरीकरणाचे काम होऊ शकणार नाही.तेव्हा तात्पुरती सोय म्हणून या रस्त्यावर व कठीण मुरुम टाकून रस्ता वाहतुकीसाठी योग्य करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४५ टेलीफोन भवन ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन या ५० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरणासह डांबरीकरणाचे कामासाठी रक्कम रु.३,२३,७८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६८:**

वार्ड क्र ३६ मधील किराडपुरा येथे कैकाडीबाबा ते रोषन मजीद पर्यंत १५० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६८१८५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ९८९ दि.१८-३-८९ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदर काम हाती घेण्यासाठी दि. ४-४-८९ रोजी जाहीर नोटीस अन्वये दरपत्रके मागविण्यात आली असता एकूण दोन दरपत्रके वसूल झाली आहेत.

१) श्री.अे.अे.अबेदी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ % कमी
२) श्री.फारुकी ए.एम. ७.२ % कमी

सबब तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ % कमी दराची श्री. अे.अे.अबेदी यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३६ किराडपुरा येथील कैकाडीवाडा ते रोषनमजीद पर्यंत १५० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ % कमी दराचे श्री.ए.ए.अबेदी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६९:**

वार्ड क्र. ४ घाटी झोपडपट्टी (आसिफिया कॉलनी) येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. १०६८ दि. ५-४-८९ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. १३,३५०/- ला मान्यता मिळाली आहे.सदर काम हाती घेण्यासाठी कोटेशन मागविण्यात आले असता एकूण तीन कोटेशन प्राप्त झाले ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १) श्री.जावेदखान | अंदाजपत्रकीय दराने |
| २) श्री.मॅकवेल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकापेक्षा ३% जास्त |
| ३) श्री.सिद्दीकी गफरखान | ५ % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रक श्री.जावेदखान यांचे आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४ घाटी झोपडपट्टी (आसिफिया कॉलनी) येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.जावेदखान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७०:**

चैतन्यनगर अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९८८-८९ च्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,०३,०००/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चैतन्यनगर अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रु. १,०३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७१:**

मा.मोतीकारंजा जवळील नाईकवाडा भागात २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण पाईप लाईन टाकणेच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३०,३००/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मोतीकारंजा जवळील नाईकवाडा भागात २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण पाईप टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ३०,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७२:**

गारखेडा परिसरातील विनायकनगर (सि.टी.एस.नं.१५३५९) मध्ये १५० मीमी व्यासाची चिनी मातीची जलनि:सारण वाहिनी टाकणे व सेप्टीक टँक बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १,३९,५२५/- ला ठराव क्र.९६१ दि.१७-२-८८ अन्वये आणि सदरील काम गुत्तेदार श्री.सी.बी.आनंद यांचेमार्फत अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३.९५ % जास्त दराने करुन घेण्यास ठराव क्र. १९ दि. ७-४-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदरील कामावर सेप्टीक टँकसाठी खोदकाम करतांना कठीण खडक लागल्यामुळे अतिरिक्त कामासाठी (एक्स्ट्रा ॲटम) रक्कम रु. १४,८७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.(एक्स्ट्रा ॲटमचा खर्च मुळ अंदाजपत्रकाच्या रकमेतून भागविता येईल.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा परिसरातील विनायकनगर (सि.टी.एस.नं.१५३५९) मध्ये १५० मीमी व्यासाची चीनी मातीची जलनि:सारण वाहिनी टाकणे व सेप्टीक टँक बांधणेच्या कामामध्ये खोदकाम करतांना कठीण खडक लागल्यामुळे अतिरिक्त कामासाठी (एक्स्ट्रा ॲटम) रक्कम रु. १४,८७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र.७३:**

वार्ड क्र.१ पडेगांव येथील कत्तलखान्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १७-६-८९ ला खालील बाबींच्या पूर्तते अभावी स्थगित ठेवला होता.सबब---

१) सदर कत्तलखान्यासाठी रोडला डांबरीकरण झालेले नाही.सदर डांबरीकरणासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २,३२,३००/- चे तयार करण्यात आलेले आहे.परंतू सदरचे काम स्थगित ठेवण्यात आलेले आहे.(स्थायी समिती विषय क्र. २३ दिनांक १७-६-८९)
२) सदर कत्तलखान्यासाठी पाण्याची व्यवस्थेबाबत उप अभियंता (पा.पु.) यांचेशी चर्चा केली असता सदरचे पाईप लाईनचे काम ऑगस्ट पर्यंत पूर्ण होईल असे त्यांनी सांगितले.
३) सदर कत्तलखान्याच्या विद्युतीकरणाच्या कामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना ५१ पोल टाकण्यासाठी पत्र दिलेले आहे.सदरचे काम हे गोदाम बांधण्याचे अगोदर पूर्ण होईल.
४) सदरचे कत्तलखान्यासाठी कातडी व हाडे ठेवण्यासाठी गोदामाची अत्यंत आवश्यकता आहे.कारण गोडाऊन झाल्याशिवाय सिल्लेखाना येथील कत्तलखान्याचे लोक तेथे जाण्यास तयार नाहीत.

सबब सदर कामाची निकड लक्षात घेता स्थायी समिती बैठक दि. १७-६-८९ विषय क्र.४१ गोदामाचे बांधकामासाठी रक्कम रु. ६,१३,१०८/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव आणि सदरचे कामाची एजन्सी जी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.१०% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

सिल्लेखाना,समर्थनगर आणि सभोवतालच्या परिसरातील बहुसंख्य नागरिकांचे गंभीर स्वरुपाच्या तक्रारी अनुसार अत्यावश्यक बाब म्हणून पडेगांव येथील स्थलांतरीत पशुवधगृहाचे काम युध्द पातळीवर करुन सिल्लेखाना येथील पशुवधगृह अविलंब १००% स्थलांतरीत करावयाचे असल्याने पडेगांव गृहाकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण व तद्अनुषांगिक रक्कम रु. २,३२,३००/- च्या अंदाजपत्रकास व तत्संबंधीत गुत्तेदार श्री.डी.एस.जग्गी हयांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ % जास्त दराचे दरपत्रकास बहुमताने मंजुरी देण्यात येते.तसेच आवश्यक बाब म्हणून जलवाहीनी टाकणे व विद्युतीकरणाचे कामासाठी आवश्यक ते पोल टाकणेस बहुमताने मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे पडेगांव पशुवधगृहासाठी कातडी व हाडे साठविणेस्तव गोदामाची आत्यावश्यकता असल्याने गोदामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,१३,१०८/- च्या अंदाजपत्रकास आणि गुत्तेदार श्री. एस.ए.नवाब हयांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.१० % कमी दराचे दरपत्रकास बहुमताने मंजुरी देण्यात येते.उक्त कामे निर्धारित वेळेत पार पडतील हयाची संबंधित कार्यकारी अभियंता हयांनी विशेष खबरदारी घ्यावी.

सिल्लेखाना पशुवधगृह अविलंब स्थलांतराचे संदर्भात तेथील खाटीककिंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हयांचेमार्फत स्थलांतरासंबंधी कालबध्द लेखी स्वरुपाचा अहवाल न आल्याने तसेच गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब हयांच्या कामाचे बाबतीत असंख्य तक्रारी असल्याने स.सभासद सर्वश्री कचरु चंद्रभान नवपुते,मोतीराम नारायणराव घडामोडे आणि प्रदीप शिवनारायण जैस्वाल हयांनी प्रस्तावित ठरावास आक्षेप नोंदविला

यानंतर मा.सभापती हयांनी सभा संपल्याचे घोषीत केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २९-६-८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.गुरुवार, दिनांक २९-६-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात स्थायी समिती सभेस मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखाँ हुसेनखाँ
२) // गील एकबालसिंग प्रितमसिंग
३) // घडामोडे मोतीराम नारायणराव.
४) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) // नवपुते कचरु चंद्रभान
६) // पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) // मगर शंकर जिजाराम
८) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
९) // यादव अशोक सायन्ना
१०) // स.अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
११) // सावे मोरेश्वर दिनानाथ.

**विषय क्र.७४:**

दिनांक २३-६-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : मागील सभेत अर्थ संकल्पातील तरतुदीबाबत खुलासा करण्यात येईल असे मा.उप आयुक्त यांनी आश्वासन दिले होते.पण तशी व्यवस्था झालेली दिसत नाही.

मा.उप आयुक्त :दि.२३-६-८९ च्या सभेत खुलासा केल्याप्रमाणे लेखाविभागातील अधिकारी वर्ग आजही रजेवर आहे.तेव्हा उपलब्ध कर्मचारी वृंदाकडून अर्थसंकल्पाबाबतची माहिती तयार करुन पुढील सभेत दाखल करण्यात येईल.

श्री.मोतीराम घडामोडे : सिडको भागातील एन-६ व ७ येथील शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सुचना संबंधित अधिकाऱ्यांना मा.आयुक्तांनी मागील सभेत दिल्या आहेत.त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी.

मा.सभापती : सिडको भागातील एन-६ व ७ येथील शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करण्याचे अंदाजपत्रक तयार करुन स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी दाखल करण्याची व्यवस्था संबंधित अधिकाऱ्यांनी करावी.

श्री.अशोक सायन्ना : समर्थनगर येथील बडोदा बँकेसमोरील रस्ता खराब झाल्यामुळे या रोडलगत असलेले दवाखाने,शाळा,बँक आणि इतर नागरिकांना या रस्त्यावरुन रहदारीस त्रास सहन करावा लागत आहे.उप अभियंता बांधकाम-१ सध्या पावसाळा असल्यामुळे सदर रस्त्यावर खडी / कठीण मुरुम टाकून रस्त्याची दुरुस्ती करुन घेण्यात येईल.

श्री.प्रदीप जैस्वाल,श्री.मिर्झा अन्वर बेग : समर्थनगर भागाप्रमाणेच औरंगपुरा भाजीमंडी,बुढीलेन,इ.भागातील रस्त्याची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही.तेव्हा वरीलप्रमाणे व्यवस्था त्या ठिकाणी करण्यात यावी.

श्री.कचरु नवपुते : सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे शहरातील जीर्ण इमारती पडण्याची शक्यता आहे.तेव्हा याबाबत वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मोरेश्वर सावे : विषय क्र. ६७ मधील मा.आयुक्त यांचेकडील संवादाची संमलबजावणी पावसाळयात काटेकोरपणे करण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक २३-६-८९रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७५:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,वार्ड क्र.१३ मधील कटकट दरवाजा जवळील सर्व्हे नं. ११३१५ मधील औरंगाबाद टाईम्स कॉलनी मध्ये वितरण व्यवस्थेसाठी २००,१५० मीमी, व १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. २,१८,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ मधील कटकट दरवाजा जवळील स.नं.११३१५ मधील औरंगाबाद टाईम्स कॉलनी मध्ये वितरण व्यवस्थेसाठी २०० मीमी, १५०मीमी व १०० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणेसाठी रक्कम रु. २,१८,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७६:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन १९८९-९० सालासाठी स्लुस व्हॉल्व्हज् खरेदी करण्यासाठी रक्कम रु. ७,६७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ७,६०,०००/- रकमेत कोणकोणत्या आकाराचे व किती स्लूस व्हॉल्व्हज् खरेदी करण्यात येणार आहेत याचा बोध होत नाही.तेव्हा सविस्तर तपशीलासह प्रस्ताव देणे आवश्यक आहे.

उप अभियंता रक्कम रु. ७,६०,०००/- अंदाजपत्रकात-(पाणी पुरवठा)

| आकार | संख्या |
|---|---|
| १) ८० मीमी स्लूस व्हॉल्व्ह | २६२ नग |
| २) १०० --//-- --//-- | ९७ नग |
| ३) १५० --//-- --//-- | ५० नग |
| ४) २०० --//-- --//-- | ९ नग |
| ५) २५० --//-- --//-- | ४ नग |
| ६) ३०० --//-- --//-- | ३ नग |
| ७) ४५० --//-- --//-- | ३ नग |

खरेदी करण्यात येणार आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० सालासाठी स्लुस व्हॉल्व्हज् खरेदी करण्यासाठी रक्कम रु. ७,६७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७७:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मोहल्ला मुकुंदवाडी येथील संजयनगर वार्ड क्र.५९ च्या लायन्स क्लबच्या वसाहतीकरीता खडी रस्ता तयार करणेबाबत नागरिकांची मागणी आहे.सदर कामासाठी रक्कम रु. ८६,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५९ मुकुंदवाडी येथील संजयनगर लायन्स क्लबच्या वसाहतीकरीता खडी रस्ता तयार करणेसाठी रक्कम रु. ८६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र.१६ हर्षनगर येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १३,४००/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १६ हर्षनगर येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रु. १३,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.७९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र.८ हर्सुल येथील डॉ.आंबेडकर पुतळयाचे मागील प्रस्तुतच्या छत नसलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन ती समाज मंदिर म्हणून वापरण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.८६,९१५/- चे सन १९८८-८९ च्या सां.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदींमधून करण्यास हरकत नाही.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ८ हर्सुल येथील डॉ.आंबेडकर पुतळयाचे मागील प्रस्तुतच्या छत नसलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन ती समाज मंदिर म्हणून वापरण्याच्या कामासाठी रक्कम रु. ८६,९१५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,जमालबाबा दर्गा कबाडीपूरा येथील पुलाची उंची वाढविणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२०-४-८९ ठराव क्र. १०८७ अन्वये रक्कम रु. २०,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत पाच दर निर्दीष्ट निविदा दाखल झाल्या.त्यांच्या तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १) श्री.आसाराम अँड सन्स | १३.७२ % कमी |
| २) श्री.एम.कलीमोद्दीन | ०.०९ % कमी |
| ३) श्री.अब्दुल सलाम | अंदाजपत्रकीय दराने |
| ४) कुलवंतसिंग | ३ % कमी दराने |
| ५) सलीम एस.ब्रदर्स | ७ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.७२ % कमी दराची निविदा श्री.आसाराम ॲण्ड सन्स यांची आहे.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.स.अ.एकबालुद्दीन : सदर कामासाठी तरतुद करण्यात आलेल्या रकमेतून पुलाचे काम आवश्यकतेप्रमाणे पूर्ण होणार नाही असे वाटते.तेव्हा या कामाची पाहणी केल्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावातील कामाची स.सभासद श्री.मिर्झा अन्वर बेग,री.स.अ.एकबालोद्दीन,शहर अभियंता व उप अभियंता (बांधकाम-१) यांनी पाहाणी करुन अहवाल दाखल करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८१:**

वार्ड क्र. ५७ येथील वैद्यकिय महाविदयालय तृतीय श्रेणी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था औरंगाबाद शहनुरवाडी कॉलनीत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९८८-८९ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. १,०७,६९३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.विचारार्थ सादर.सदर ले-आऊट चे १०० % विकास निधी भरलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५७ येथील वैद्यकिय महाविदयालय तृतीय श्रेणी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था औरंगाबाद शहानुरवाडी कॉलनीत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी रक्कम रु. १,०७,६९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८२:**

वार्ड क्र.५८ येथील अलंकार गृहनिर्माण संस्था गारखेडा अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९८९-९० चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.२,८०,५३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर ले-आऊट चे १०० % विकास निधी भरलेला आहे. .विचारार्थ सादर. सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५८ येथील अलंकार गृहनिर्माण संस्था गारखेडा अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी रक्कम रु. २,८०,५३२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८३:**

वार्ड क्र. ५८ मो.भरतनगर येथे १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४५,४००/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ मो.भरतनगर येथे १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ४५,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८४:**

वार्ड क्र. ४१ मो.खोकडपूरा दगडी खदान जवळ १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४०,५०७/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४१ मो. खोकडपूरा दगडी खदान जवळ १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु.४०,५०७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५:**

वार्ड क्र. ५७ मोहल्ला स्टेट बँक कॉलनी येथील नालीचे दुरुस्ती बाबत अंदाजीत रक्कम रु. १३,८००/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५७ मोहल्ला स्टेट बँक कॉलनी येथे नालीचे दुरुस्तीकरीता रक्कम रु. १३,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

श्री.मोतीराम घडामोडे : पत्रकार कॉलनीबाबत सर्वसाधारण सभेत ठराव मंजुर झालेला आहे.पण त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही.यावर खुलासा व्हावा.

मा.सभापती : सदर प्रकरणी मालमत्ता अधिकारी यांनी पुढील सभेत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.अशोक सायन्ना : शहरातील सार्वजनिक दिवाबत्ती बाबतच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत.अनेकवेळा तक्रारी नोंदवूनही जनतेची कामे होत नाहीत.विद्युत विभागात आवश्यक साहित्य उपलब्ध नाही.त्यामुळे तक्रारीत भर पडत आहे.तेव्हा जुन्या मंजुरा दराने विद्युत साहित्य खरेदी करण्यास परवानगी दयावी.

मा.सभापती : शहरातील सार्वजनिक दिवाबत्तीच्या तक्रारी संबंधी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिकारी यांचेशी चर्चाकेली आहे.त्यानुसार नजिकच्या काळात सार्वजनिक दिवाबत्ती तक्रार निवारण मोहिम हाती घेण्यात येणार आहे.या

कामासाठी म.रा.विद्युत मंडळाचे कर्मचारी व मनपाचे स्टॉफची मदत घेवून सर्व शहरातील तक्रारी दूर करण्यात येतील.जनतेच्या तक्रारी लक्षात घेवून अधिक विलंब न लावता जुन्याच दराने योग्य टयुबलाईट ताबडतोब खरेदी करण्याची मागणी स.नगरसेवकांनी केलेली आहे.या कामासाठी आवश्यकतेनुसार जुन्या दराने विद्युत साहित्य खरेदी करण्यात येईल.

श्री.मोतीराम घडामोडे : पावसाळयात शहरातील नादुरुस्त रस्त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.यादृष्टीने शहरातील नादुरुस्त रस्त्याची खास पथकाद्वारे पाहणी करुन रस्त्यावर साचणारे पाणी,खाचखळगे त्वरीत दुरुस्त करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

मा.सभापती : स.सभासदांची सूचना योग्य असून त्याप्रमाणे खास पाहणी पथक योजण्यात येईल.

श्री.अशोक सायन्ना : शहाबाजार,भिमसंदेश आणि विजयनगर भागात गटारीची व्यवस्था नाही.त्यामुळे रस्त्यावरुन पाणी वाहते व नागरिकांना त्रास होतो.तेव्हा वरील भागात गटारीची व्यवस्था व्हावी.

उप अभियंता (स्लम) : शहाबाजार भागातील वस्ती वाढलेली आहे ही बाब लक्षात घेवून या ठिकाणी गटारीच्या कामाची अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहेत.

उप अभियंता (ड्रेनेज) : भिमसंदेश भागात गटारीची जरुरी नाही तसेच विजयनगर भागात ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

श्री.प्रदीप जैस्वाल : गांधीनगर भागातील सार्वजनिक संडासाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून बंद आहे.या कामी वारंवार मागणी करण्यात आली पण काहीही प्रगती झालेली नाही.

उप अभियंता (स्लम) :सदर काम सध्या अर्धवट स्थितीत आहे.संबंधीत गुत्तेदार यांना कामाचे पहिले बील दिले.नंतरच्या कामाचे बील दिलेले नाही.काम बंद असल्यामुळे गुत्तेदार यांना यापूर्वी ३/४ पत्रे देण्यात आली आहेत.याशिवाय आज पुन्हा पत्र देण्यात येते आहे.

मा.सभापती : संबंधित गुत्तेदारांना देण्यात येणाऱ्या पत्राची प्रत (सभापती,स्थायी समिती) यांना देण्यात यावी आणि यापुढे संबंधित गुत्तेदारास काम देवू नये.आणि उरलेले काम "ए-१" वर करुन घ्यावे.

श्री.अशोक सायन्ना : भावसिंगपुरा,मिटमिटा येथील समाजमंदिर अत्यंत मंद गतीने चालू आहे.या कामाबाबत अनेकवेळा चर्चा होऊनही संबंधित अधिकारी कामात दिरंगाई करीत आहेत.

उप अभियंता(बांध-१) : पडेगांव शाळेचे प्लिंथ लेवलपर्यंत म्हणजेच २० ते २५ % काम झ ालेले आहे.झालेले काम अत्यंत कमी असल्याने संबंधित गुत्तेदारास नोटीसही देण्यात आली आहे.या कामाची मुदत अंदाजे ११/१२ महिन्याची असून आतापर्यंत ७ महिन्याचा कालावधी संपलेला आहे.शाळेसाठी आवश्यक असलेल्या जागेबाबतची टिप्पणी मालमत्ता अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आली आहे.

मा.सभापती : पडेगांव शाळेसाठी आवश्यक असलेल्या जागेबाबत मालमत्ता अधिकारी,उप-अभियंता बांध-१,आणि सन्माननीय सभासद श्री.एकबालसिंग गील यांचेसमवेत प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यवाही करण्यात येईल.या शिवाय ज्या कामांची मुदत संपली आहे.परंतु कामे पूर्ण झाली नाहीत किंवा ज्या कामाची गती अत्यंत मंद आहे.अशा सर्व गुत्तेदारांविरुध्द संबंधित अधिकाऱ्यांनी

कार्यवाही करावी.अन्यथा अशा कामाबाबत संबंधित अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल.

तसेच शहरातील कामांबाबत स्थायी समिती सदस्यांच्या तक्रारीबाबत सभासदांनी आपल्या लेखी तक्रारी आठ दिवस अगोदर सभापती यांचेकडे दाखल कराव्यात म्हणजे उचित सूचनांचा समाधानकारक खुलासा संबंधित अधिकाऱ्यांमार्फत देता येईल.

श्री.एकबालसिंग गील : मेडीकल कॉलेज येथील नर्सेस स्टॉफने देवगिरी कॉलेज शेजारील स.नं. १२ येथे गृहनिर्माण संस्थेसाठी जागा घेतली आहे.या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मागविण्यात आलेली माहिती त्वरीत पाठविण्यात यावी.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे घोषीत केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक.६-७-८९ रोजीच्या स्थायी समितीचा वृत्तांत.गुरुवार दि.६-७-१९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृह येथे मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निन्मनिर्दिष्ट सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३) श्री.घडामोडे मोतीराम नारायणराव
४) श्री.जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) श्री.नवपुते कचरु चंद्रभान
६) श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) श्री.मगर शंकर जिजाराम
८) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
९) श्री.यादव अशोक सायन्ना
१०) श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
११) श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ.

**विषय क्र.८६:**

दिनांक २९-६-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.रतनकुमार पंडागळे : रमानगर भागात समाजमंदिर बांधण्याबाबत यापूर्वीच्या सभेमध्ये निर्णय झालेला आहे.त्या कामाबाबत काय झाले?याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता (बां-१) : सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे सदर कामासाठी प्राप्त झालेल्या कमी दराचे दरपत्रकधारक गुत्तेदाराबरोबर दरपत्रकाचे दरापेक्षा ०.५० % कमी दराने करुन देण्यास सम्मती दिली आहे.

श्री.रतनकुमार पंडागळे : रमानगर भागात बांधण्यात येणाऱ्या समाजमंदिराची जागा बदलण्यात येत असल्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळालेली आहे.याबाबत खुलासा व्हावा.

मा.सभापती : रमानगर भागात समाजमंदिर बांधण्यासाठी जागेची पाहणी करण्यात आली.समाजमंदिर पार्कींग,गार्डन इ.ची व्यवस्था होईल अशी जागा निवडण्यात आली आहे.पाहणीच्या वेळी संबंधित अधिकारी सोबत होते.

श्री.रतनकुमार पंडागळे : आताच खुलासा केल्याप्रमाणे समाजमंदिराचे जागेची पाहणी झालीच नाही.तेव्हा यापूर्वी मुळ जागेवरच समाजमंदिर बांधण्यात यावे.

मा.सभापती : रमानगर समाजमंदिरासाठी आता ज्या जागेची पाहणी करण्यात आली आहे ती जागा महानगरपालिकेची असून मोकळी आहे.तसेच जनतेच्या हिताच्या दृष्टीने या ठिकाणी समाजमंदिर होणे योग्य आहे.

श्री.मोरेश्वर सावे व प्रदीप जैस्वाल : मागील सभेमध्ये अर्थसंकल्पाबाबत माहिती देण्याचे आश्वासन उप आयुक्त यांनी दिले होते.त्याबाबतचा खुलासा करण्यासंबंधी आज मा.उप आयुक्त सभागृहात हजर नाहीत.या शिवाय बरेच अधिकारी सभेत उपस्थित नसल्याचे दिसते.तेव्हा यापुढे ज्या अधिकाऱ्यांना सभेस

उपस्थित राहता येणार नसेल अशा अधिकाऱ्यांनी त्यांचे प्रतिनिधीस सभेस उपस्थित राहण्याबाबत पाबंद करावे.

समर्थनगर भागात पाणी साचून राहू नये म्हणून खडी व कठीण मुरुम टाकण्याचा निर्णय मागील सभेत घेण्यात आला होता.परंतु सदर काम योग्य झालेले नाही.

उप अभियंता (बां-१) : समर्थनगर भागातील बडोदा बँकेसमोरील रोडवर या भागात उपलब्ध असलेले साहित्य (वाळू,खडी,माती) टाकून पाणी साचणार नाही अशी व्यवस्था केली आहे.काही ठिकाणी अद्याप थोडे पाणी साचते त्याबाबतही व्यवस्था करण्यात येईल.

शहर अभियंता : उप अभियंता यांनी खुलासा केल्याप्रमाणे खडी वाळू माती टाकण्यात आली आहे.पण त्यावर रोलर फिरवलेला नाही.या रस्त्यावर आज रोलर फिरवण्यात येत आहे.आणि त्याप्रमाणे काम सुरु झाले आहे.

स.अ.एकबालोद्दीन : वार्ड क्र. १८ मध्ये मशीदीजवळील रस्त्यावर पाणी साचते.त्यामुळे या भागातील शाळा,दवाखाने व अन्य कामासाठी या रस्त्यावरुन जाण्या येण्यास नागरिक विद्यार्थ्यांना त्रास होत आहे.

उप अभियंता (बां-१) : वार्ड क्र. १८ मधील सदर रस्त्याचे डांबरीकरणाचा प्रस्ताव मंजुर झ ालेला आहे.सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने डांबरीकरणाचे काम हाती घेता येत नाही याशिवाय या रस्त्यावरुन नळ कनेक्शनचे पाईप टाकल्यामुळे या ठिकाणी नेहमीच पाणी राहते.

श्री.रतनकुमार पंडागळे : रमानगर समाज मंदिराचे जागेतील बदलाबाबत लेखी आक्षेप (सभापती कडे) नोंदवला.

श्री.यादव अशोक सायन्ना : पडेगांव मिटमिटा येथील समाजमंदिराचे कामाबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : पडेगांव मिटमिटा येथील समाजमंदिराचे बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी केली.या कामास वापरण्यात येणाऱ्या विटा निकृष्ट दर्जाच्या असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर विटा बांधकामासाठी वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.याशिवाय सदर काम जलद गतीने पूर्ण करण्याबाबत गुत्तेदाराशी चर्चा केली असता काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन गुत्तेदाराने दिले.तसेच मिटमिटा भागातील शाळेच्या कामाचीही पाहणी केली.शाळेसमोर साचणारे पाणी उपसून टाकण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.तसेच सेप्टीक टँक साफ करण्याच्या सूचना दिल्या.याशिवाय या इमारतीतील संडास व बाथरुमची सध्या असलेली व्यवस्था इमारतीच्या बाहेर योग्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.यादव अशोक सायन्ना : मागील सभेच्या इतिवृत्तामध्ये पडेगांव भावसिंगपूरा येथील समाजमंदिर व शाळा बांधकामाचे जागेबाबत मागील सभेत चर्चा झाली होती.यासंबंधी कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

मालमत्ता अधिकारी : पडेगांव,मिटमिटा येथील समाजमंदिर व शाळेच्या बांधकामासाठी सरकारी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मा.तहसीलदार यांना पत्र लिहिले आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : पडेगांव,भावसिंगपूरा येथील समाजमंदिर व शाळेच्या बांधकामाचे जागेसाठी तहसिलदारांना पत्र लिहून हा प्रश्न सुटणार नाही.

मा.सभापती : पडेगांव,भावसिंगपूरा समाजमंदिर व शाळेच्या जागेसंबधी संबंधीत वार्डाचे नगरसेवक,मालमत्ता अधिकारी यांचे समवेत मा.तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन प्रश्न सोडविण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

श्री.शंकर मगर : वार्ड क्र. ३७ येथील इंदिरानगर भागात दगडी गटार बांधण्याची मागणी केली होती.याविषयी मागील सभेतही चर्चा झाली आहे.परंतु तशी नोंद इतिवृत्तात नाही.या कामाचे अंदाजपत्रकाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता,प्रत्येक वेळी अंदाजपत्रक तयार आहे.पुढच्या मिटींगमध्ये ठेवण्यात येईल असे आश्वासन अनेक वेळा देण्यात आले.आजच्या विषयपत्रिकेवरही या कामाचे प्रस्तावित अंदाजपत्रकाचा समावेश नाही.तेव्हा या प्रकरणी चौकशी व्हावी.

मा.सभापती : स.सभासदांचे सुचनेप्रमाणे कामाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी पुढील सभेत ठेवण्याची व्यवस्था उपअभियंता (स्लम) यांनी करावी.

श्री.मिर्झा अन्वर बेग : नुर कॉलनी गटारीचे बांधकामाबाबत मागील सभेत चर्चा झाली त्याचा उल्लेख इतिवृत्तांत नाही.तेव्हा या कामाचे काय झाले याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता (स्ल्म) : सदर कामाचे गुत्तेदार यांना नोटीस दिली आहे.या नोटीसचे उत्तरी संबंधीत गुत्तेदारानी काम लवकर पूर्ण होईल असे आश्वासन दिले आहे.

मा.सभापती : स.सभासद श्री.मिर्झा अन्वर बेग व उप अभियंता (स्लम) यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन काम लवकर पूर्ण करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी.तसेच इंदिरानगर येथील दगडी गटारीचे कामाबाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा करण्यात येईल.

श्री.मोरेश्वर सावे : पावसाळयाचे दिवस असल्यामुळे नादुरुस्त रस्त्यावरील खड्डयात पाणी साचून त्यांचा त्रास नागरिकांना होतो. या संदर्भात अशा रस्त्याची पाहणी करण्याबाबत पाहणी पथक नेमण्यात येईल असे आश्वासन मागील सभेत दिले होते.या पाहणी पथकाचे नेमणूकी बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : ठरल्याप्रमाणे संबंधीत विभागाचे अधिकारी व मी स्वतः यांच्या समवेत एकत्रितरित्या पाहणी करुन या पाहणीत निदर्शनास आलेल्या नादुरुस्त रस्त्यांची दुरुस्ती त्वरीत करण्याची कार्यवाही केली जाईल.याविषयी स.सभासद आणि नगरसेवक यांनी त्याचे वार्डातील नादुरुस्त रस्त्यांबाबत लेखी माहिती उपलब्ध करुन दिल्यास अशा रस्त्याचे कामास प्राधान्य देण्यात येईल.

श्री.अलफखान हुसेनखान : नागरिकांना उन्हाळयाच्या दिवसात होणारा पाण्याचा त्रास लक्षात घेवून सभागृहाने शहरातील विहीरींद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यास मंजुरी दिली आहे.पावसाळा असला तरी शहरातील नागरिक या विहिरीच्या पाण्याचा उपयोग घेत आहेत.तेव्हा सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने उपयोगात असलेल्या अशा विहीरीमध्ये ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यात येतो काय? याचा खुलासा करावा.

उप अभियंता (पा.पु.) : सध्या उपयोगात असलेल्या अशा सर्व विहीरींमध्ये ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यासाठी संबंधीत विभागीय कार्यालयात ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

मा.सभापती : नागरिकांच्या आरोग्या विषयी प्रश्न उपस्थित झालेला असतांना वैद्यकीय अधिकारी सभेत उपस्थित नाहीत ही बाब योग्य नाही तेव्हा वैद्यकीय अधिकारी यांना सभेत उपस्थित राहण्याबाबत मा.सचिव यांनी पत्र द्यावे.

श्री.प्रदीप जैस्वाल : गांधीनगर येथील सार्वजनिक संडासाबाबत मागील सभेत चर्चा झालेली आहे.तेव्हा या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता (स्लम) : गांधीनगर संडासाच्या बांधकाम करणाऱ्या गुत्तेदारांना नोटीस दिली.त्यानुसार गुत्तेदाराने काम सुरु केले आहे.या सार्वजनिक शौचालयावर पत्रे टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.आज भांडी बसविण्यात येणार आहेत.

मा.सभापती : उपअभियंता यांनी स.सभासदासोबत कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी.

श्री.यादव अशोक सायन्ना :नागसेन कॉलनी येथील समाजमंदिराचे बांधकामाबाबत काय कार्यवाही झाली? याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता(बां.-१) :नागसेन कॉलनी येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामास मंजुरी मिळालेली आहे.यावेळी स.सभासदांनी समाजमंदिरासाठी जागा उपलब्ध असल्याचा खुलासा केला होता.स.सभासदांनी मंजुर ले-आऊटमधील मोकळया जागेत समाजमंदिराचे बांधकाम करण्यास सुचविले आहे.बांधकाम नियमाप्रमाणे मंजुर ले-आऊट मधील मोकळया जागेमध्ये फक्त २५% बांधकाम करता येते.ही बाब लक्षात घेता समाजमंदिराच्या बांधकामासाठी उक्त मंजुर ले-आऊट मधील मोकळी जागा कमी पडते.

मा.सभापती : नागसेन कॉलनी येथे बांधण्यात येणाऱ्या समाजमंदिराचे बांधकामाबाबत स्वत: लक्ष घालून काम अविलंब कसे सुरु करता येईल याचा प्रयत्न करता येईल.

श्री.एकबालसिंग गील : मागील सभेमध्ये मेडीकल कॉलेज स्टाफ नर्सेसने देवगीरी कॉलेज शेजारी स.नं.१२ येथील गृहनिर्माण संस्थेच्या जागेप्रकरणी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पठविण्यात येणाऱ्या माहिति विषयी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : आजच्या सभेत सहा.संचालक नगररचना उपस्थित नसल्यामुळे सदर माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.याशिवाय काही अधिकारी नेहमीच स्थायी समिती सभेस उपस्थित नसतात.त्यामुळे सभासदांच्या प्रश्नांना व्यवस्थित उत्तरे मिळू शकत नाहीत.तेव्हा ही सभा याबाबत खेद व्यक्त करत आहे.या प्रकरणी मा.आयुक्त यांना पत्र देवून सर्व अधिकाऱ्यांना सभेस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.तसेच महाराष्ट्र शासनाकडून शासकीय अधिकारी मनपा भेटीस आल्यामुळे मा.उप आयुक्त सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचा खुलासा करण्यात आला आहे.परंतु महानगरपालिका प्रशासनाने महाराष्ट्र शासनाकडून मनपा भेटीसाठी शासकीय अधिकारी येणार ही बाब स्थायी समितीचे सभापती मा.महापौर व स्थायी समिती सभासद यांचे पासून अंधारात ठेवण्यात आली.या बाबतही सभा खेद व्यक्त करते.

**ठराव :**

दिनांक २९-६-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तांत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७:**

उप अभियंता (गलिच्छ वस्ती सुधारणा) यांनी प्रस्ताव सादर केली की,दिनांक १४-१२-८८ च्या स्थायी समितीत विषय क्र. ६७७ वर मोहल्ला संजयनगर वार्ड क्र. ३८ येथे ३५०

मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार बसविणे बाबतच्या अंदाजपत्रक रक्कम रु.१,८५,५००/- च्या खर्चास मान्यता मिळाल्यानंतर जाहिर प्रकटनाद्वारे निविदा मागविण्यात आल्या.एकूण अकरा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.के.मिसाळ | २१.२१ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) श्री.शेख शरीफ | १३.७८६ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) श्री.सतीश पी.मुंडळे | २२.५ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) श्री.शेख इकबाल अहमद | ०५.०० % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५) श्री.आनंद बिल्डर्स | १७.३६ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ६) श्री. सुरेश वि.सावधानी | १६.१६ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ७) श्री. सजनानी कन्स्ट्रक्शन | ११.५० % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ८) श्री.कुलवंतसिंग | ०५.५० % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ९) श्री.एस.अे.नवाब | ११.१० % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| १०) श्री.एन.जी.गुणवाणी | १४.९ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ११) श्री.जे.के.ग्रोव्हर ॲण्ड कंपनी | १७.५० % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकापेक्षा २२.५ % कमीची निविदा श्री. सतीश पी. मुंडले यांची असून ठेकेदारास दर पृथ्थकरणाबाबत खुलासा विचारण्यात आला.करीता २२.५ % अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची श्री.सतिश पी.मुंडले यांची निविदा स्विकारणे बाबतच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला संजयनगर वार्ड क्र. ३८ येथे ३५० मीमी व्यासाची पूर्वरचित अर्धगोलाकार गटार बसविण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २२.५ % कमी दराचे श्री.सतिश पी.मुंडले यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८८:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला गीतानगर वार्ड क्र. (७) येथील स्लम भागात दगडी गटार टाकणे बाबतच्या कामासाठी रक्कम रु. ६७०२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ७ गीतानगर येथे दगडी गटार टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ६७०२५ /- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मोहल्ला पडेगांव वार्ड क्र. १ येथील सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये १६,०००/- चे तयार करण्यात आले आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ पडेगांव येथे सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रु. १६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०:**

उप अभियंता,(ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला रोझाबाग,वार्ड क्र.(७) येथे स्लम विभागात ३५० मीमी व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार टाकणेबाबतच्या कामासाठी रक्कम रु. ८७,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ७ मो.रोझाबाग येथे स्लम विभागात ३५० मीमी व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ८७,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९१:**

उप अभियंता (जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.  मो.मकसुद कॉलनी येथील चेंबर दुरुस्त करणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १६,६७०/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अलफखान हुसेनखान : ड्रेनेजच्या कामासाठी आवश्यक असलेले चार इंच,सहा इंच,सी.आय व आर.सी.सी.पाईप तसेच दहा इंच १८,इंच पाईप परिसर अभियांत्रिकी विभागाकडे पडून असलेले चांगले जुने पाईप खरेदी करण्यासाठी विचार व्हावा.

मा.सभापती : शहरात पाणी पुरवठा व ड्रेनेजचे काढण्यात आलेले जुने पाईप कार्यालयात जमा होणे आवश्यक आहे.तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.  मो.मकसुद कॉलनी येथील चेंबर दुरुस्त करणेबाबतचे रक्कम रु. १६,६७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,बिसमिल्ला कॉलनी वार्ड क्र. ४ येथे वि.टी. रोड तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ८६,५००/- चे सन १९८८-८९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.या रस्त्याचा पृष्ठभाग पाणीपुरवठा लाईनमुळे खराब झाल्याने या ठिकाणी प्रथम रिमेंटींग करण्याचा समावेश अंदाजपत्रकात आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४ मो.बिसमिल्ला कॉलनी येथे वि.टी.रोड तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रु. ८६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३:**

इ.स.१९८९-९० या वित्तीय वर्षात महानगरपालिका संचलित सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभा तथा महानगरपालिका प्राधिकरण निश्चित करेल अशा विशेष प्रसंगोपात वेळी चहापान,अल्पोपहार,तथा थंड पेय पुरविणे साठी जाहीर प्रकटनाद्वारे मोहोरबंद लखोटयातून दरपत्रके मागविण्यात आली होती.तद्अनुषंगाने १) विभागीय व्यवस्थापक महिला आर्थिक विकास महामंडळ,विकास भवन अदालत रोड,औरंगाबाद. आणि २) पूर्णिमा लॉज दिवाण देवडी,औरंगाबाद हया उभयंताची दरपत्रके निर्धारीत मुदतीत प्राप्त झाली त्यांचा तुलनात्मक तक्ता निम्ननिर्दिष्ट केल्याप्रमाणे.

१) अ) उपमा,पोहे,शिरा,साबुदाणा खिचडी,दही मिसळ,शेव व चिवडा प्रत्येक वस्तुच्या प्रति प्लेट रु.२.५०.

ब) इडली सांबर,वडासांबर,उत्तप्पा,समोसा,बटाटावडा,साबुदाणा वडा,कचोरी आणि बाकरवडी प्रत्येक वस्तुच्या प्रति प्लेट साठी रु. ३.००.

क) १) श्रीखंड रु. २४=०० प्रति किलो
२) गुलाबजामुन रु. ३२=०० प्रति किलो
३) जिलेबी रु. ३२=०० प्रति किलो

ड) १) चहा प्रति कप रु. १=००
२) नेस कॉफी प्रति कप रु. १=५०

इ) थंड पेय :-
१) गोल्ड स्पॉट रु. ३=५० प्रति बाटली
२) लिमका रु. ३=२५ प्रति बाटली
३) थम्सअप रु.३=२५ प्रति बाटली
४) मांझा रु.३=२५ प्रति बाटली
५) लस्सी रु.३=०० प्रति ग्लास

२) पूर्णिमा लॉज :-

| | | | |
|---|---|---|---|
| | १) गुलाबजामुन | २ नग | चार वस्तुंची एक प्लेट |
| | २) समोसा चटणीसह | २ नग | रु.१३=०० |
| | ३) बटाटा वेफर | - | |
| | ४) मका चिवडा | - | |
| २) | १) फ्रुट सॉट | १ वाटी | चार वस्तुंच्या एक प्लेटसाठी |
| | २) कचोरी चटणीसह | २ नग | रु. १४=०० |
| | ३) मिक्स फरसाण | - | |
| | ४) सँडविच | २ नग | |
| ३) | १) श्रीखंड | १ वाटी | पांच वस्तुचे एक प्लेटसाठी |
| | २) पुरी | ५ नग | रु. १४=०० |
| | ३) भाजी | १ वाटी | |
| | ४) खमंग ढोकळा | २ नग | |
| | ५) लोणचे किंवा कोशिंबीर | | |
| ४) | १) रवा शिरा | एक प्लेट | चार वस्तुंचे एक प्लेटसाठी |
| | २) बटाटा पोहा | एक प्लेट | रु.१२=०० |
| | ३) खमंग ढोकळा | २ नग | |
| | ४) बटाटा वडा चटणीसह | २ नग | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | १) चहा | १ कप | रु. १=२५ |
| | २) दुध | १ कप | रु. १=५० |
| | ३) नेसकॉफी | १ कप | रु. १=५० |

६) थंड पेय :-

| | | |
|---|---|---|
| १) गोल्ड स्पॉट | प्रति बाटली | रु. ३=५० |
| २) लिमका | प्रति बाटली | रु. ३=५० |
| ३) मांझा | प्रति बाटली | रु. ३=५० |

७) आईसक्रीम :-
पॉट मेड आईसक्रीम - रुपये ३=०० प्रति कप
अटी :-
१) चार दिवस अगोदर आज्ञापन
२) कमीत कमी १०० माणसांचे आज्ञापन
३) तीस दिवसांत देयक अदाई
४) नसता विलंबासाठी २ % व्याज

येणेप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या. पुर्णिमा लॉज यांनी नियमाप्रमाणे रक्कम रु.२०००/- अनामत जमा केली.

महिला आर्थिक विकास महामंडळ हयांनी महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक जोडले आहे.त्यामुळे अनामत रक्कम निहित केली नाही.

महिला आर्थिक विकास महामंडळाचे चहापान,थंडपेय यांचे दरपत्रक कमी दराचे आहे.इतर वस्तुंची तुलना करणे शक्य नाही.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० या वित्तीय वर्षात महापालिका संचलित सर्वसाधारण सभा,स्थायी समिती सभा महानगरपालिका प्राधिकरण निश्चित करेल अशा विशेष प्रसंगोपात वेळी चहापान,अल्पोपहार तथा थंड पेय पुरविणे साठी प्रस्तावात दर्शविलेल्या कमी दराचे मे.विभागीय व्यवस्थापक महिला आर्थिक विकास महामंडळ,विकास भवन,अदालत रोड औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधित संस्थेने पदार्थांची प्रतवारी चांगल्या प्रकारे राहील याची दक्षता घ्यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९४:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,दिनांक २१-३-८९ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. १० / १००२ तहत मंजुरी मिळाल्यानंतर किराडपूरा वार्ड क्र.१२ येथे भुमीगत जलनिःसारण वाहिनी टाकणे तसेच अस्तित्वात असलेल्या भूमिगत गटारीची दुरुस्ती करणेबाबतच्या अंदाजपत्रक रक्कम रु.४,७६,०००/- च्या खर्चाच्या कामास प्रकट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.जे.नवाब | ०९ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) श्री.एन.जी.गुणवानी | १२ % | --//-- |
| ३) जे.के.ग्रोव्हर अँड कंपनी | १७.५ % | --//-- |
| ४) एम.एम.बेग | १८.८९ % | --//-- |
| ५) पी.जे.तमखाने | १२.७१ % | --//-- |
| ६) बी.अे.काल्डा | ११.९ % | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ७) पॉल कन्स्ट्रक्शन | १०.९० % | --//-- |
| ८) कुलवंतसिंग | ५ % | --//-- |

सर्वात कमी दराची निविदा श्री.एस.एम.बेग यांची असून ती १८.८९ % कमी दराची आहे.करीता ठेकेदाराकडून दराचे पृथ्थकरण (रेटॲनालिसिस) मागविण्यात आले.जे योग्य आहे अशी शिफारस कार्यकारी अभियंता यांनी केली असून ती निविदा मान्य करणेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शाविल्याप्रमाणे वार्ड क्र. १२ किराडपूरा येथे भूमीगत जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तसेच अस्तीत्वात असलेल्या भुमीगत गटारीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.८९ % कमी दराच्या श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५:**

जलगृह,अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.४६ येथील मो.समर्थ नगर येथील मा.प.विधी महाविदयालयाच्या मुलांच्या वसतीगृहाच्या उत्तरेकडील खाजगी जागेतून जाणारी १५० मीमी व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १४,०९५/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ मो.समर्थनगर येथील मा.प.महाविदयालयाच्या खाजगी जागेतून जाणारी १५० मीमी व्यासाची जलवाहिनीच्या कामासाठी रक्कम रु. १४,०९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.२२ नंदनवन कॉलनी येथे ५० फुट वि.टी.रोड तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,०३,७००/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर. दराप्रमाणे तयर करण्यात आले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली तयार करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२२ मो.नंदनवन कॉलनी येथे ५० फुट वि.टी.रोड तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रु. ३,०३,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

सदर काम पावसाळा संपल्यानंतर सुरु करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिली आहे की, जमालबाबा दर्गा कबाडीपूरा येथील पुलाची उंची वाढविण्याबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २०-४-८९ ठराव क्र.१०८७ अन्वये रक्कम रु. २०,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत पाच दरनिर्दीष्ट निविदा दाखल झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.आसाराम अँड सन्स १३.७२ % कमी
२) श्री.एम.कलीमोद्दीन ०.०९ % कमी
३) श्री.अब्दुल सलाम अंदाजपत्रकाप्रमाणे
४) कुलवंतसिंग ३ % कमी
५) श्री.सलीम एस.ब्रदर्स ७ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.७२ % कमी दराची निविदा श्री. आसाराम अँड सन्स यांची आहे.विचारार्थ सादर.

सदर प्रकरणी दि. २९-६-८९ च्या स्थायी समितीमध्ये विषय क्र. ७ स्थळ पाहणी ठरली आहे.श्री.अन्वर बेग,श्री.मुजाहेद यांच्या बरोबर पाहणी केली आहे.तरी पुन्हा प्रकरण स्थायी समितीसमोर ठेवण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जमालबाबा दर्गा किराडपूरा येथील पुलाची उंची वाढविणेच्या कामासाठी तुलनातमकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १३.७२ % कमी दराची श्री.आसाराम ॲण्ड सन्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८:**

शहरअभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. १ भिमनगर,भावसिंगपूरा येथील पुलाची उंची वाढविणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती दि. २०-४-८९ ठराव क्र.१०९८ नुसार रक्कम रु. ३,९४,५००/- च्या दरपत्रकास मंजूरी प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयाने निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दीष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

१) श्री.एन.जी.गुनवाणी ४.५० % जास्त
२) श्री.कुलवंतसिंग ३ % जास्त
३) श्री.पॉल कन्स्ट्रक्शन ४.६८ % जास्त
४) श्री.एस.ए.नवाब ०.०१ % कमी

सदर प्रकरणी स्थायी समिती बैठक दि. ८-६-८९ रोजी ठराव क्र. २२ अन्वये गुत्तेदारास वाटाघाटीकरीता (जा.क्र.मनपा / बां वि-१ / ३९४ / ८९) मा.शहर अभियंता यांच्या कार्यालयात दि.२१-६-८९ रोजी दुपारी बोलावण्यात आले व गुत्तेदारास ०.०१ % कमी मुळ दराव्यतिरिक्त आणखी ०.५० % कमी दराप्रमाणे काम करण्यास संमती दर्शविली आहे.तेव्हा श्री.एस.ए.नवाब यांचे निविदाचे दर ०.०१ % कमी ऐवजी ०.५० % कमी दराचे निविदास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१ भिमनगर,भावसिंगपूरा येथील पुलाची उंची वाढविण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांनी वाटाघाटीची संमती दिल्यानुसार उपरोक्त काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१ % कमी ऐवजी ०.५०% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड नं. ४० येथे जाफरगेट आठवडी बाजारला कंपाऊंडवॉल व ओटे बांधण्याबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.

२,९९,२३०/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

सदर प्रकरणी दि. १७-६-८९ च्या स्थायी समिती सभेमध्ये चर्चा झाली की, दि. १९-६-८९ रोजी स्थायी समिती पाहणी करावयाची आहे ठरले.

दि.१९-६-८९ रोजी मा.चेअरमन स्थायी समिती श्री.अन्वर बेग सदस्य यांनी करावयाच्या कामाची पाहणी केली आहे.तरी पुन्हा स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : प्रस्तावातील कामाची पाहणी करण्यासाठी सर्व सभासदांना पाहणीची वेळ,ठिकाण आणि दिनांक याची माहिती दिलेली दिसत नाही.वास्तविक पाहता प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले होते.त्या दृष्टीने कामाची पाहणी करण्यासंबंधीची माहिती सर्व सभासदांना देणे आवश्यक होते परंतु तशा प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसत नाही.तेव्हा यांपुढे ज्या कामाबाबत पाहणीचा वेळ,ठिकाण आणि दिनांक सर्व सभासदांना कळविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

मा.सभापती : स.सभासदांची सुचना मान्य करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४० मो.जाफरगेट आठवडी बाजाराला कंपाऊंडवॉल व ओटे बांधणे बाबतच्या कामासाठी रक्कम रु. २,९९,२३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,स्वच्छतेच्या कामासाठी २ नग १२१० एस.के. / ३६ / वॉक्स टाईप मॉडेल टिप्पर्स घेणे जरुरीचे आहे.त्यासाठी रु. ८.२४ लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.त्यास मंजुरी मिळाली.

तसेच टिप्पर्स पुरवठा करण्यासाठी रिजनल मॅनेजर,टाटा इंजिनिअरींग अँड लोकोमोटीव्ह कंपनी लिमीटेड मुवठ हयांचे कडून दरपत्रक बोलावले असता त्यांनी दिनांक २-६-८९ रोजी एक्स उमन डिलीव्हरीचे दर रु. ३,४७,१९८/- असे दिले आहेत.त्यावर ३ % दमन सेल्स टॅक्स,१२% महाराष्ट्र सेल्स टॅक्स,१ % ऑक्ट्रॉय ट्रान्स पोर्टेशन,ट्रांझीट इन्शुअरन्स,टेप रजिस्ट्रेशन इ.चे चार्जेस वेगळे असे मिळून एकूण किंमत रु. ४,०८,०००/- होते.२ टिप्पर्स खरेदीसाठी ठेवलेल्या बजेटमधून व एक टिप्पर घसारा निधीतून खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळावी.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : स्वच्छतेच्या कामासाठी महापालिकेकडे असलेली सर्व वाहने बरीच जुने झालेली आहेत.त्यामुळे वारंवार वाहने नादुरुस्त होण्याचे प्रकार नेहमी उद्भवतात परिणामी स्वच्छतेच्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.ही बाब लक्षात घेता,जुनी झालेली महापालिका मालकीची सर्व वाहने लिलावाद्वारे विक्री करुन त्या रकमेतून नवी वाहने खरेदी करण्यात यावी.या प्रकरणात मागील सभेमध्ये चर्चा झाली आहे.गेल्या आठवडयात विभाग क्र.२चे एक कचरावाहू वाहन सहा दिवसापासून बंद आहे.या प्रकरणी

चौकशी केली असता सदर वाहन जुने असल्यामुळे त्याचे दुरुस्तीसाठी लागणारे आवश्यक पार्ट शहरात उपलब्ध नाहीत असा खुलासा करण्यात आला.

उप अभियंता यांत्रिकी : विभाग क्र. २ चे कचरावाहू वाहन जुने आहे या वाहनाचे दुरुस्तीसाठी लागणारे पार्ट शहरात उपलब्ध नसल्यामुळे पुण्याहून मागवून वाहन दुरुस्तीची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री.प्रदीप जैस्वाल : स्वच्छतेच्या कामासाठी वापरण्यात येणारी वाहने फार खराब आहेत.एखादे वाहन झोन परिसरात पंक्चर झाले तर पंक्चर झालेल्या वाहनाचे टायर घेवून वाहन चालकांना सेन्ट्रल गोडावूनला जावे लागते. या ठिकाणाहून पंक्चर काढेपर्यंत चार तास निघून जातात एक वाजला म्हणून कामगार निघून जातात.त्यामुळे कचरा उचलण्याच्या कामावर परिणाम होतो.

श्री.मोरेश्वर सावे : टिप्पर खरेदी बरोबरच या वाहनासाठी लागणारे कामगार देण्याची व्यवस्था व्हावी.तसेच स्वच्छतेच्या कामासाठी आणखी दोन टिप्पर खरेदी करण्यात यावे.

श्री.यादव अशोक सायन्ना : सभागृहाने जुनी झालेली वाहने लिलाव करण्याचा ठराव घेवून बरेच दिवस झाले आहेत,परंतु सदर वाहनाचा लिलाव झालेला नाही.त्यामुळे महापालिकेचे नुकसान झाले.विरोधी पक्षनेता यांना देण्यात आलेली गाडी सुपर डिलक्स आहे काय? याबाबत कंपनीकडून खुलासा मागवण्यात यावा असे ठरले होते.याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता यांत्रिकी : सभागृहाने जुनी झालेली तीन वहाने लिलाव करण्याची परवानगी दिलेली आहे. विरोधी पक्षनेता यांना देण्यात आलेल्या गाडी बाबत माहिती शहर अभियंता यांचेकडे मिळू शकेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वच्छतेच्या कामासाठी जरुरी असलेले दोन नग १२१० एस.के./ ३६ / वॉक्स टाईप एक्स उमन डिलीव्हरीचे मॉडेल टिप्पर्स खरेदी करीता प्रति नग रु. ३,४७,१९८/- त्यावर ३% दमन सेल्स टॅक्स,१२ %महाराष्ट्र सेल्स टॅक्स ,१ % ऑक्ट्रॉय,ट्रान्सपोर्टेशेन ट्रांझिट इन्शुअरन्,टेप रजिस्ट्रेशन इ.चार्जेस मिळून एकूण किंमत रु. ४,०८,०००/- या दराने मे. रिजनल मॅनेजर,टाटा इंजिनियरींग अँड लोकोमोटीव्ह कं.लि.मुंबई यांचे कडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.दोन टिप्पर्स खरेदीसाठी एकूण रक्कम रु.८,१६,०००/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१:**

मो.जुनाबाजार वार्ड क्र. १८ येथे गफार कादरी यांचे घरासमोर १५० मीमी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेचे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ११,७३५/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला जुनाबाजार वार्ड क्र. १८ येथे डॉ.गफार कादरी यांचे घरासमोर १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ११,७३५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : पैठणगेट भागात आयलँडच्या कामास सभागृहाने मंजुरी दिलेली आहे.परंतु अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कामास न्यायालयाकडून मनाई हुकूम मिळालेला आहे.तेव्हा मनाई हुकूमाबाबतचे कागदपत्र आवक / जावक विभागामध्ये केंव्हा प्राप्त झाले? आणि प्राप्त झाल्यानंतर सदर कागदपत्र संबंधित विभागामार्फत पोहचण्यास विलंब का झाला? याबाबत चौकशी व्हावी.न्यायालयाकडून मिळालेल्या मनाई हुकूमाबाबत त्वरीत कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे.अनेक प्रकरणामध्ये न्यायालयीन कागदपत्र विधी सल्लागाराकडे वेळेवर न पोहोचल्यामुळे अशा प्रकरणात एकतर्फी निकाल लागलेला आहे.

श्री.एकबालसिंग गील : भूविकास बँकेच्या खाली असलेल्या हॉटेलबाबतचे प्रकरण न्यायालयात चालू आहे.सदर प्रकरणाचे सुनावणीचे कामी महापालिकेचे विधीज्ञ तारखेस हजर नसल्यामुळे एकतर्फी निकाल लावण्याची माहिती मिळालेली आहे.

श्री.मोरेश्वर सावे : सर्वसाधारण सभेने विधी सल्लागार पॅनलवर नविन विधीज्ञांची नेमणूक करण्याची मंजुरी दिलेली आहे.परंतु या प्रकरणी कार्यवाही झालेली दिसत नाही.

मा.सभापती : मा.आयुक्त यांना पत्र देवून विधी सल्लागारांच्या पॅनल नेमणूकीबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती मागविण्यात यावी.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक१३-७-८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा वृत्तांत. गुरुवार दिनांक १३ जुलै,१९८९रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका समिती सभागृह येथे मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी वर्गासह पुढील स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हूसेनखान
२) // गील एकबालसिंग प्रितमसिंग
३) // घडामोडे मोतीराम नारायणराव
४) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) // नवपुते कचरु चंद्रभान
६) // पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) // मगर शंकर जिजाराम
८) // यादव अशोक सायन्ना
९) // स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१०) // सावे मोरेश्वर दिनानाथ

**विषय क्र. १०२ :**

दिनांक ६-७-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : मागील सभेतील विषय क्र. ९९ मध्ये ठरल्याप्रमाणे शहरातील नादुरुस्त रस्त्यांची पाहणीची वेळ ठिकाण व दिनांक ठरवणेबाबत काय निर्णय झाला याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : विषय क्र. ९९ ची पाहणी झालेलीच आहे.यापुढे ज्या विषयाबाबत पाहणीचा निर्णय घेण्यात येईल त्या विषयाचे पाहणीची वेळ,दिनांक व ठिकाण सर्व सभासदांना कळविण्यात येईल असे मागील सभेतच स्पष्ट केले होते.

श्री.मोरेश्वर सावे : आजच्या वृत्तपत्रात होर्डींगबाबत कायम करण्यात आलेल्या उपसमितीबाबत वृत्त प्रसिध्द झालेले आहे. ते योग्य नाही.उपसमितीने घेतलेला निर्णय प्रसिध्द करण्याचे अधिकार उपसमितीला नाहीत.उपसमितीमध्ये जे निर्णय घेतले जातात त्या निर्णयांची शिफारस स्थायी समितीला करणे आवश्यक आहे.तेव्हा अशा प्रकारचा चुकीचा पायंडा पाडणे योग्य होणार नाही.या उपसमितीच्या सभेची सूचना सर्व सभासदांना देणे आवश्यक होते.एखादया विषयाबाबत उपसमिती कायम करण्याचा उद्देश म्हणजे सर्व सभासदांचा वेळ जाऊ नये म्हणून उपसमिती कायम करण्यात येते.या ठिकाणी तो उद्देश सफल करण्यात येते.या ठिकाणी तो उद्देश सफल झालेला नाही.

मा.सचिव : दि. १०-७-८९ ला सायंकाही ६ नंतर दि.११-७-८९ ला दुपारी ४ वाजता उपसमितीची मिटींग आयोजीत करण्याची सूचना मिळाली. या सूचनेनुसार दि. ११-७-८९ उपसमितीचे आयोजनेबाबत सूचना तयार करुन संबंधित सभासदांना दुरध्वनीद्वारे सूचना देण्यात आलेली आहे.

मा.आयुक्त : एखाद्या विशिष्ट विषयाबाबत उपसमिती कायम करतांना कार्यालयाचे विधी सल्लागार यांचा वैधानिक सल्ला घेऊनच उपसमिती कायम करण्यात यावी असे वाटते.

श्री.कचरु नवपुते : मागील सभेमध्ये शहरातील उपयोगात असलेल्या विहीरींमध्ये ब्लिचिंग पावडर टाकण्यात येते असा खुलासा करण्यात आला होता.परंतु वार्ड क्र. ६० मधील विहीरीत ब्लिचिंग पावडर टाकण्यात येत नाही. या भागातील सर्व विहीरीतील पाण्याचा उपयोग नागरिक नेहमीच घेतात.

श्री.मोतीराम घडामोडे : शहरातील उपयोगात असलेल्या विहीरीत ब्लिचिंग पावडर टाकण्यासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

श्री.एकबालसिंग गील : मागील सभेमध्ये भूविकास बँकेजवळील हॉटेल बाबत न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणात काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

विधी सल्लागार : क्रांतीचौक भूविकास बँकेजवळील हॉटेल नायगराचे सरकारी जमीनीवर असलेले अनधिकृत बांधकाम सन १९८० मध्ये काढण्यात आले होते. सन १९८३ ला नायगरा हॉटेलचे मालकाने याच जागेवर पुन्हा बांधकाम केले आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.सदर जागेच्या मालकी हक्काबाबत वाद चालू आहे.

श्री.मोरेश्वर सावे : सदर प्रकरणी वाटाघाटी करुन प्रकरण निकाली काढणे सोयीचे होईल असे वाटते.

मा.आयुक्त : मालकी हक्क निर्विवाद असलेल्या प्रकरणात चर्चा करणे योग्य असते.प्रस्तावित प्रकरणाच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद असल्याने या प्रकरणी चर्चा करणे योग्य होणार नाही.

मा.सभापती : सदर प्रकरणात मा.आयुक्त यांनी मा.जिल्हाधिकारी व भूविकास बँक प्राधिकरण यांचेशी चर्चा करुन प्रकरण निकाली काढता येईल काय? याबाबत जातीने लक्ष घालावे.

श्री.एकबालसिंग गील : सर्वसाधारण सभेने विधी सल्लागार पॅनलवर नविन विधीज्ञांची नेमणूक करण्याबाबत मागील सभेत चर्चा झाली होती त्याबाबत खुलासा व्हावा.

विधी सल्लागार : पॅनलवर काम करीत असलेल्या विधीज्ञांच्या कामाची पाहणी केली असता पॅनलवरचे वकील बऱ्यांपैकी काम करतात असे दिसते.सन १९७४ पासून कर आकारणीबाबतची २००० प्रकरणे न्यायालयात कार्यरत आहेत.

मा.आयुक्त : ज्या मालमत्ता कराच्या प्रकरणात न्यायालयाकडून मनाई हुकूम मिळालेला आहे असे गृहीत धरुन त्या वर्षाची कर आकारणी स्थगित ठेवून त्या पुढील वर्षाची कर आकारणी नियमितपणे करण्यात येते.

श्री.मोरेश्वर सावे : मालमत्ता कराची अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे विलंबित आहेत.या प्रकरणात विशेष लक्ष दिले जात नाही. त्यामुळे मनाई हुकूम असलेल्या प्रकरणात महापालिकेच्या पॅनलवर किती वकील काम करतात? एकूण किती प्रकरणे न्यायालयात कार्यरत आहेत?त्यापैकी किती प्रकरणे निकाली निघाली ? निकाली निघालेल्या प्रकरणांपैकी किती प्रकरणाचा निकाल महापालिकेच्या वतीने लागला? या शिवाय शिल्लक असलेल्या प्रकरणाची कारणे कोणती? त्यात महापालिकेची किती रक्कम गुंतलेली आहे? प्रकरण दाखल झाल्याची तारीख इ.बाबतची सविस्तर माहिती १५ दिवसाचे आत सभागृहास देण्यात यावी.

विधी सल्लागार : मालमत्ता कराबाबतची प्रकरणे सन १९७४ पासून न्यायप्रविष्ट आहेत. सन १९८२ पासूनचे रेकॉर्ड अद्यावत आहे.तेव्हा सभागृहास सविस्तर माहिती देण्यास किमान एक महिन्याचा कालावधी लागेल.

मा.सभापती : एक महिन्याचे आत विधी सल्लागारांनी माहिती द्यावी.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : माजी प्रशासकांचे काळात बरेच रेकॉर्ड टाऊन हॉल व सेंट्रल गोडावून येथे ठेवण्यात आले आहे.या रेकॉर्डमध्ये बरीच महत्वाची कागदपत्रे असण्याची शक्यता आहे.तेव्हा या रेकॉर्डची तपासणी करुन महत्वाचे रेकॉर्ड शोधून काढण्यासाठी चार कर्मचारी नेमण्यात यावेत.

श्री.शंकरराव मगर : जे नागरिक टॅक्स लावण्याची मागणी करतात त्यांना टॅक्स लावला जात नाही.उलट अशा नागरिकांना कर आकारणी बंद आहे असे सांगण्यात येते.

मा.आयुक्त : काही नागरिकांनी विनापरवानगी घरे बांधली आहेत अशा घरांना टॅक्स लावला पाहिजे असे बंधनकारक नाही.स्लम भागातील घरांना टॅक्स लावण्यात येईल.

श्री.मोतीराम घडामोडे : मागील सभेत चर्चा झाल्याप्रमाणे शहरातील नादुरुस्त रस्त्याचे खडड्े बुजविण्याचे ४० % काम पूर्ण झाल्याचे दिसते.त्याबद्दल अधिकाऱ्यांचे अभिनंदन.उर्वरित काम जलद गतीने करुन घेण्यात यावे.

**ठराव :**

दिनांक ६-७-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०३:**

वार्ड क्र.५७ मो.हमालवाडी,आर.टी.ओ.ऑफिसच्या मागे असलेली ड्रेनेज लाइन अप्रुटींग करुन ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजित रक्कम रु. ३७,१३०/- चे तयार करण्यात आले आहे. काम तातडीचे असल्याने सदरील काम ए-१ वर अंदाजपत्रकीय दराने श्री.ए.आर.शेख यांचेकडून करुन घेण्यात येते.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५७ मो. हमालवाडी आर.टी.ओ.ऑफिसच्या मागे असलेली ड्रेनेज लाईन अप्रुटींग करुन ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ३७,१३०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता सदरील काम श्री.ए.आर.शेख यांचेकडून ए-१ वर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०४:**

वार्ड क्र. ५७ मोहल्ला हमालवाडी रेल्वेस्टेशच्या पाठीमागे गटार बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ४०,९१५/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५७ मोहल्ला हमालवाडी रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे गटार बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. ४०,९१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०५:**

झोन क्र. ६ मध्ये विविध ठिकाणचे सार्वजनिक संडास दुरुस्त करणे बाबतचे अंदाजित रक्कम रुपये १३,३३३/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झो.क्र.६ मध्ये विविध ठिकाणचे सार्वजनिक संडास दुरुस्त करणेसाठी रक्कम रु. १३,३३३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०६:**

वार्ड क्र. ५७ मो.रचनाकार कॉलनी येथे दगडी गटार बांधणे बाबतचे अंदाजित रक्कम रुपये २,३१,८७४/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.रचनाकार कॉलनी येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. २,३१,८७४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०७:**

वार्ड क्र.४५ मो.पैठणगेट ते रॉक्सी सिनेमा रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ६,९०८/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४५ मो.पैठणगेट ते रॉक्सी सिनेमा रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु.६,९०८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १०८:**

वार्ड क्र.२१ घाटी येथे श्री.इनायत अली यांचे घरासमोरील १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजित रक्कम रुपये १५,२२५/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २१ घाटी येथे श्री.इनायत अली यांचे घरासमोरील १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. १५,२२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच काम तातडीचे असल्याने "ए-१" वर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०९:**

वार्ड क्र. १७ मो.घासमंडी येथील दगडी गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४४,३००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ५२ / १० दिनांक १७-६-८९ नुसार मंजुरी मिळालेली असून सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने उपलब्ध गुत्तेदारांकडून अ-

१ निविदे तहत करुन घेण्याचे ठरले त्यात उपलब्ध गुत्तेदाराचा नावाचा उल्लेख नाही.सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.मो.रजिऊद्दीन सिद्दीकी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात यावे अशी मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १७ मो.घासमंडी येथील दगडी गटार बांधणेच्या कामास स्थायी समितीने मंजुरी दिल्याप्रमाणे सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.मो.रजिऊद्दीन सिद्दीकी यांच्या कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत

**विषय क्र. ११०:**

सन १९८८-८९ हया आर्थिक वर्षासाठी डिझेल / पेट्रोल ऑईल व लुब्रीकन्टस पुरवठा करण्यासाठी मे.सी.टी.पारीख,औरंगाबाद हयांचे दर मंजुर करण्यात आले होते.सन १९८९-९० हया आर्थिक वर्षासाठी नविन एजन्सीचे टेंडर मंजूर होईपर्यंत गतवर्षीच्या एजन्सीकडून डिझेल / पेट्रोल इ. घेण्यासाठी मा.आयुक्तांनी स्थायी समितीची मंजुरी मिळेल हया आशेवर मंजुरी दिली होती.स्थायी समितीची हया करीता मंजुरी मिळावी.

सन १९८९-९० हया आर्थिक वर्षात डिझेल / पेट्रोल इ. पुरवठा करण्याच्या व वर्षभराचा करार करण्याच्या कामासाठी औरंगाबाद शहरातील पेट्रोल पंपवाल्याकडून दरपत्रके बोलावली असता एकूण दोन दरपत्रके वसूल झाली.डिझेल / पेट्रोल पुरवठा करण्यासाठी दोन्ही एजन्सीचे दर सारखेच आहे.इतर लागणाऱ्या ॲटमस करीता दोन्ही एजन्सीचे दर कमी जास्त आहेत.त्याकरीता शहर अभियंता यांनी दोन्ही पेट्रोल पंपाच्या मालकांना ते दोघांच्या दरपत्रिकेतील कमी दराच्या दरात पुरवठा करण्यास तयार आहेत काय? हयाबाबत पत्र देवून विचारणा केली असता १) मे.चुन्नीलाल आसाराम ॲण्ड कं.औरंगाबाद व २) मे.कैलास मोटर्स,औरंगाबाद हया दोघांनीही कमी दरात पुरवठा करण्यास तयार आहेत म्हणून लेखी कळविले आहे.दोघांचे प्राप्त झालेले कमी दर खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रमाणे आहेत.

दोघांनीही कंपनीने दर जर वाढविले तर हया प्रमाणे वाढीव दर घ्यावे लागतील अशी अट घातलेली आहे ती अट मंजुर करण्यास हरकत नाही पण त्यासाठी त्यांना कंपनीने वाढविलेल्या दरांची अधिकृत प्रत द्यावी लागेल.

| अ.क्र. | मालाचा तपशील | युनिट | कमी आलेले दर |
|---|---|---|---|
| १ | डिझेल | १ लिटर | ३.८० |
| २ | पेट्रोल | --//-- | ९.३९ |
| ३ | इंजिन ऑईल बॅरल (सर्व्हो सुपर ४० नंबर ) | २०५ लिटरचे बॅरल | ३०७५.०० |
| ४ | इंजिन ऑईल ४० नं.(सर्व्हो सुपर) | ५ लिटरचा डब्बा | ७९.७० |
| ५ | इंजिन ऑईल ४० नं.१लि.सेल्ड टिन (सर्व्हो सुपर) | १ लिटरचे टिन | |
| ६ | इंजिन ऑईल २० डब्ल्यु १४० सिआरबी | १ लिटरचे टिन | ३३.०० |
| ७ अ) | इंजिन ऑईल २० डब्ल्यु १४० सिआरबी | ५ लिटर टिन | १५०.०० |
| ब) | इंजिन ऑईल २०डब्ल्यु १४०(सुपर सर्व्हो) | ५ लिटर टिन | १०५.०० |
| ८ | इंजिन ऑईल जी टी एक्स | ५ लिटरचा टिन | १७८.०० |
| ९ | गिअर ऑईल ९०/१४० नंबर सर्व्हो सुपर | १ लिटरचा टिन | १८.२५ |
| १० अ) | गिअर ऑईल ९० नंबर भारत अक्टुमा | ५ लिटरचा टिन | ८६.२५ |
| ब) | गिअर ऑईल १८० नंबर भारत ॲक्टुमा | ५ लिटरचा टिन | ८६.६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ अ) | गिअर ऑईल बॅरल ९० नं.भारत ॲक्टुमा | २०५ लिटरचे बॅरल | ३४३५.०० |
| ब) | गिअर ऑईल बॅरल १४० नं.भारत ॲक्टुमा | २०५ लिटरचे बॅरल | ३५००.०० |
| १२ अ) | गिअर ऑईल बॅरल ९० नं.भारत ॲक्टुमा | २०५ लिटरचे बॅरल | |
| १२ अ) | गिअर ऑईलटि.क्यु.टिन | ५ लिटरचे टिन | १६० |
| ब) | ऑईल ८० डब्ल्यु/९० | ५ लिटरचे टिन | १५० |
| १३ अ) | चॉसिस ग्रीस सर्व्हो सुपर | २ किलोचे | ४८.८५ |
| ब) | चॉसिस ग्रीस वि.वि.सी. | २ किलोचे | ४२.०० |
| क) | चॉसिस ग्रीस सर्व्हो सुपर | १ किलो टीन | २६.५० |
| ड) | चॉसिस वि.पी.सी. | १ किलो | २१.२५ |
| इ) | चॉसिस १८० किलाचे | १/२ किलो | ११.४० |
| ई) | १८० किलोचे बॅरल सर्व्हो सुपर | १८० किलो | ३४५०.०० |
| १४ अ) | व्हील बेरींग ग्रीस सि.आर.बी.कॅस्टॉल | १ किलोचे टिन | ३३.०० |
| ब) | व्हील बेरींग ग्रीस सि.आर.बी.कॅस्टॉल | १/२ किलो | १८.०० |
| क) | व्हील बेरींग ग्रीस सि.आर.बी.कॅस्टॉल | २ किलो | ६५.०० |
| ड) | व्हील बेरींग ग्रीस सि.आर.बी.कॅस्टॉल सर्व्हो सुपर | १८० किलोचे | ३८५०.०० |
| १५ अ) | ब्रेक ऑईल रेड गारलिंग सि.आर.बी. | १ किलो टिन | ९९.०० |
| ब) | ब्रेक ऑईल रेड गारलिंग सि.आर.बी. | १/२ लिटरचे टिन | ५०.०० |
| क) | ब्रेक ऑईल रेड गारलिंग सि.आर.बी. | १/४ लिटरचे टिन | २५.०० |
| १६ अ) | ब्रेक ऑईल व्हाईट | १ लिटरचे टिन | ५०.०० |
| ब) | ब्रेक ऑईल व्हाईट | १/२ लिटरचे टिन | २६.०० |
| क) | ब्रेक ऑईल व्हाईट | १/४ लिटरचे टिन | १४.०० |
| १७ | कॉटन वेस्ट | १०० किलो | ७००.०० |
| १८ | बॅटरी वॉटर ६५० मी.लिटर | प्रत्येक बॉटल | ३.०० |
| १९ | ॲसिड वाटर | १ बॉटल | ४.८० |
| २० | पिवळा कापड प्रिग साईज | प्रत्येकी | ४.०० |
| २१ | कलर पॉलिस टीन १०० गॅम | १ टीन | १८.०० |
| २२ | ट्रान्सफार्मर ऑईल | ५ लिटरचे टीन | १३५.०० |
| २३ | हैड्रोलिक ऑईल ६८ नं. | प्रत्येक बॅरल २०५ लिटरचे | ३४५०.०० |

बिलाचे अदाई दर १५ दिवसाला बिल दिल्यानंतर ८ दिवसांच्या आंत बिलांची अदाई करण्याची अट देखील मंजुर करण्यास हरकत नाही.कामाच्या सोयीच्या दृष्टीने एजन्सीकडून डिझेल,पेट्रोल,ऑईल,लुब्रीकन्टस खरेदी करण्यास स्थायी समितीची मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० या आर्थिक वर्षासाठी डिझेल,पेट्रोल,ऑईल व लुब्रीकन्टस बाबतची दरपत्रकास मंजुरी मिळेपर्यंत सन १९८८-८९ चे मंजुरा दराने मे.सी.टी.पारीख यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या डिझेल,पेट्रोल,ऑईल व लुब्रीकन्टस खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सन १९८९-९० वर्षासाठी मे.चुन्नीलाल आसाराम ॲंड कंपनी व मे. कैलास मोटार्स,औरंगाबाद यांचेकडून प्रस्तावात दर्शविलेल्या कमी दराने व अटीसह (अ.क्र.१ ते २३

ॲटम करीता) कार्यालयास आवश्यक असलेले डिझेल,पेट्रोल,ऑईल व लुब्रीकन्टस खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १११:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (एक) (एल) अन्वये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) बाबतचे विनियम स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

वरील विनियमास मंजुरी मिळाल्यानंतर अधिनियमाचे कलम ४६५ (३) (अ) अन्वये अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येतील.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर विषयाबाबत पुढील सभेत विचार करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ११२:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,कार्यालयात प्रभारी अधिकारी प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा यांचे पत्रक जा.क्र./ प्रा.आ.प्र.शा./ अधिक्षक २५५१ / ८९,कार्यालय,प्रादेशिक,आरोग्य प्रयोगशाळा,औरंगाबाद दि.१६-५-८९ अन्वये पाणी तपासणी वर्गणी भरणे बाबतचे बिल रक्कम रुपये १४,८००/- (सन १९८७-८८ या सालाकरीताचे ) प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा हयांचेकडे जमा करणेचे परवानगी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा यांचे पत्रक जा.क्र.प्रा.आ.प्र.शा./ अधिक्षक / २५५१ / ८९ दि. १६-५-८९ अन्वये सन १९८७-८८ सालाकरीताचे पाणी तपासणी वर्गणीचे बील रक्कम रुपये १४,८००/- प्रादेशिक आरोग्य प्रयोग शाळा,औरंगाबाद हयांचेकडे जमा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केली की, मोहल्ला गांधीनगर वार्ड क्र.४० येथील जलनि:सारण वाहिनीवर बऱ्याच प्रमाणात कनेक्शन असल्यामुळे ती सारखी चोकअप होत असल्याकारणाने तिचा व्यास बदलणे आवश्यक आहे.करीता अंदाजपत्रक रक्कम रुपये २९,८२०/- चे तयार करण्यात आले आहे.मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४० मोहल्ला गांधीनगर येथील जलनि:सारण वाहिनीचा व्यास बदलण्यासाठी रक्कम रु.२९,८२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११४:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.गांधीनगर वार्ड क्र. ४० येथे भूमिगत जलनि:सारण वाहिनी ३०० एम.एम.व्यासाची टाकणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३२,३२८/- चे तयार करण्यात आले असून मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला गांधीनगर (वार्ड क्र.४०) येथे भूमिगत जलनिःसारण वाहिनी ३०० मीमी व्यासाची टाकणेच्या कामासाठी रक्कम रु.३२,३२८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११५:**

उपअभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मोहल्ला इंदिरानगर,वार्ड क्र.३७ येथे सर्व्हे नं.३२ मध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी सरफेस ड्रेन बांधणे अत्यंत आवश्यक आहे.करीता अंदाजपत्रक रक्कम रु. २,००,०००/- (दोन लाख रुपयांचे) तयार करण्यात आले आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३७ मोहल्ला इंदिरानगर येथील सर्व्हे नं.३२ मध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी सरफेस ड्रेन बांधणेच्या कामाकरीता रक्कम रु. २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११६:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन १९८९-९० सालासाठी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये ३,४५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.मा.आयुक्त यांचे दिनांक २२-५-८९ च्या आदेशान्वये निविदा क्र.मनपा / पापु / भांडार / १६९४ / ८९ दि. २९-५-८९ च्या अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता आखरी तारखेस म्हणजे दि. १२-६-८९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत दोन निविदा उपलब्ध झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

१) शिव केमिकल्स,पैठण रु. ३,१७०/- प्रति मे.टन
२) श्री.केमिकल्स इंडस्ट्रीज,बीड रु. ४,७५०/- प्रति मे.टन

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक शिव केमिकल्स,पैठण यांचे रु. ३,१७०/- प्रति मे.टन या दराचे आहे.

तरी रक्कम रु. ३,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास व शिव केमिकल्स,पैठण यांच्या रु. ३,१७०/- प्र.मे.टन या दरास मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

ब्लिचिंग पावडर खरेदीकरीता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावित असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ११७:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सिडको-हडको मधील सिडको भागातील स्कीमच्या घरांचे १/२" नळ नव्या ३" व्यासाच्या ए.सी.पाईपलाईनवर बदलणे बाबतच्या कामासाठी मनपा / पापु /निविदा /१३४३ / ८९ दि. २-५-८९ अन्वये जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्या पुढीलप्रमाणे -

१) संजीव खर्डीकर अंदाजपत्रकीय दराने
२) एस.के.मिसाळ ११ % जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया संजीव खर्डीकर यांची निविदा कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दराची स्विकारणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ११ मधील सिडको भागातील स्कीमच्या घरांचे १/२" नळ नव्या ३" व्यासाच्या ए.सी.पाईप लाईनवर बदलण्याचे काम श्री.संजीव खर्डीकर आणि श्री.एस.के.मिसाळ यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने प्रत्येकी ५० % याप्रमाणे करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

नियमाप्रमाणे एखाद्या कामावर प्राप्त झालेले कमी दराचे दरपत्रक मंजुर करण्याऐवजी सदर काम प्रकरणी अपवाद म्हणून मंजुरी देण्यास हरकत नसावी असे मा.आयुक्त यांनी सुचविले.

**विषय क्र. ११८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,महानगरपालिकेमध्ये उपलब्ध असलेली वाहने फारच अपुरी आहेत,कचरा वाहतुकीसाठी वाहनांची फार आवश्यकता आहे.तसेच उपलब्ध वाहनांपैकी काही वाहने फारच जुनी असल्यामुळे त्यांचे दुरुस्ती व देखभालीवर फार मोठया प्रमाणात खर्च होत आहे.खर्चात काटकसर करण्याच्या दृष्टीने व जुनी वाहने निकालात काढण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता जुनी वाहने टप्प्याटप्प्याने निकाली काढणे आवश्यक आहे.त्यादृष्टीने खालील दर्शविलेली वाहने हया चालू आर्थिक वर्षात निकाली काढून त्याऐवजी नवीन वाहने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

| अ.क्र. | जुने वाहन क्रमांक | कंपनी मेक | खरेदीचे वर्ष |
|---|---|---|---|
| १ | एम एच बी ३०२० | डॉज ट्रक | १९६६ |
| २ | एम एच बी ३५९३ | डॉज ट्रक | १९६८ |
| ३ | एम एच बी ९५७६ | मेटॅडोर ट्रक | १९७८ |
| ४ | एम एच बी ९५७८ | मेटॅडोर ट्रक | १९७८ |

वरील वाहने वापरण्यात खर्चिक व जुनी झाल्याबाबत तांत्रिकदृष्टया तपासणी झाली त्यादृष्टीने वरील वाहने नियमाप्रमाणे हरासीद्वारे निकाली काढण्याची परवानगी मिळावी.

सन १९८९-९० वर्षात नविन वाहने खरेदीसाठी १० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.त्यापैकी सन ८८-८९ मध्ये जी वाहने खरेदीची मान्यता देण्यात आली त्यापैकी ४.७ लाखाची रक्कम चालू आर्थिक वर्षात अदा करावयाची आहे.अग्निशामक दलांसाठी एक छोटे फायर टेंडर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.त्यास ४.५ लाख खर्च अपेक्षीत आहे.असे एकूण ९.२ लाख खरेदीचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे.तसेच कचरा वाहून नेण्यासाठी एक टिप्पर ज्याची अंदाजे किंमत ४.१४ लाख आहे असे एकूण १३.३४ लाख रु.ची नविन वाहने खरेदीसाठी "भांडवली खर्च इमारती" मधून ४ लाख रुपयांची तरतुद भांडवली खर्च वाहने खरेदीकरीता वळती करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.तरी भांडवली खर्च नविन वाहने खरेदीकरीता १४ लाख रुपयांस मान्यता देण्यास विनंती आहे.त्यात खालील वाहने खरेदी करण्यात येतील.

१) मागील वर्षाची खरेदी ४.७ लाख

२)फायर टेंडर लहान १ ४.५ लाख
४०७ टाटा चासीस वर
३) टाटा टिप्पर मोठे १ ४.१४ लाख
१३.३४ लाख

तसेच जुनी वाहने हरास करुन त्या जागी घसारा निधीतून (डिप्रेसिएशन फंड) खालील वाहने खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) गारबेज कॉपॅक्टर टाटा १ ४०७ चॉसिसवर (लहान) | रु. ४.५ लाख |
| २) टाटा टिप्पर मोठे १ | रु.४.१४ लाख |
| ३) टाटा ४०७ ट्रक २ | रु.४.१४ लाख |
| ४) सन ८८-८९ मध्ये मान्य झालेल्या वाहन खरेदीवरील खर्च | रु.४.०२ लाख |
| | रु.१६.८१ लाख |

वरील वाहने घसारा निधीतून १७ लाख रुपयांची सुधारीत तरतुद करुन खरेदीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेली अ.क्र.१ ते ४ ची उपलब्ध वाहने फार जुनी झालेली असल्यामुळे या वाहनांचे दुरुस्ती व देखभाल यावर होणाऱ्या खर्चात काटकसर करण्याच्या दृष्टीने चालू आर्थिक वर्षात टप्प्याटप्प्याने निकाली काढून त्यातून नवीन वाहने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सन १९८९-९० मध्ये नविन वाहन खरेदीसाठी एकूण १० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली असून (अग्निशामक दलासाठी १ छोटे फायर टेंडर रु. ४.५ लाख + कचरा वाहून नेण्यासाठी एक टिप्पर रु. ४.१४ लाख + ८८ / ८९ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या वाहनाची देय रक्कम रु. ४.७ लाख ) एकूण रक्कम रु. १३.३४ म्हणजे एकूण रु.१४ लाख रुपयांची वाहने खरेदी करावयाची असल्यामुळे या वाहनांची देय रक्कम अदा करण्यासाठी १९८९ / ९० मधील नवीन वाहने खरेदीच्या रु. १० लाखाच्या तरतुदीत,भांडवली इमारती या शिर्षकातून रु. ४ लाखाचे हस्तांतर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच घसारा निधीच्या सुधारीत तरतुदीतून रु. १७ लाखाची वाहने खरेदी करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,महाराष्ट्र शासनाचे कर्मचाऱ्यांना १-१-१९८६ पासून सुधारीत वेतनश्रेणी अधिसूचना वित्त विभाग क्र. वेपूर- १२८८ / १४५ / सेवा - १० दि.१-१-१९८८ अन्वये मान्य केली आहे व दि. १-१-८६ ते ३१-८-८८ पर्यंतची वेतन निश्चितीमुळे देय असलेली रक्कम भविष्य निर्वाह निधीत जमा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना जे जे आर्थिक फायदे देय राहतील.ते आर्थिक फायदे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना देण्याचे धोरण महानगरपालिकेने मान्य केले आहे.त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाचे कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचे धर्तीवर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी दिनांक १-१-८६ पासून खालील अटीवर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

अ) चौथे वेतन आयोग महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दि. १-१-८६ पासून लागू होईल.
ब) सुधारीत वेतनश्रेणीत निश्चितीमुळे देय होणारी दिनांक १-१-८६ ते ३१-८-८८ पर्यंत एकूण ३२ महिन्यांची रक्कम प्रत्येक कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात येईल.
क) सुधारीत वेतनश्रेणी निश्चितीमुळे देय होणारी दिनांक १-९-८८ ते ३०-६-८९ एकूण १० महिन्याची थकबाकी रोख स्वरुपाने देण्यात येईल.
ड) सुधारीत वेतनश्रेणी दिनांक १-१-८६ पासून लागू केल्यास ३ ते ४ लाखाचा मासिक आर्थिक बोजा वाढेल व एकूण थकबाकी १-१-८६ ते ३१-८-८८ ची थकबाकी कर्मचाऱ्यांचे जी.पी.एफ.मध्ये जमा करणे आहे.तसेच १-९-८८ ते ३०-६-८९ दहा महिन्याची थकबाकी नगदी द्यावी लागेल.

सन १९८९-९० चे अंदाजपत्रकात थकबाकी देणेकरीता रक्कम रुपये ४६,००,०००/- ची तरतुद करण्यात आलेली आहे.सन १९८९-९० मध्ये खर्च करावयाचा असल्यास अतिरिक्त रक्कम रु.१ कोटी ६ लाखाची तरतुद करावी लागेल.

**संवाद :**

श्री.रतनकुमार पंडागळे : वाढलेली महागाई आणि सुरु झालेले शाळा / कॉलेज यांचा विचार करता कर्मचाऱ्यांना पैशाची जास्त प्रमाणात गरज असते.ही बाब लक्षात घेता चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे देय असलेली रक्कम कर्मचाऱ्यांना रोख देण्यात यावी.यासाठी तुर्त ५०% रक्कम देण्यात यावी व उरलेल्या ५०% रकमेचे समान हप्त्यात वाटप करण्यात यावे.

मा.आयुक्त : शासनाने महापालिकेला विकास कामासाठी ५ कोटी रुपयांची तरतुद केली असून महापालिकेला ५ कोटी रुपयांचा निधी उभा करावयाचा आहे.ही बाब लक्षात घेता कर्मचाऱ्यांना देय असलेल्या स्वरुपात देणे शक्य होणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीच्या धर्तीवर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिनांक १-१-८६ पासून सुधारीत वेतनश्रेणी निम्न निर्दिष्ट अटींसह मंजुरी देण्यात येते.
अ) चौथे वेतन आयोग महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिनांक १-१-८६ पासून लागू होईल.
ब) सुधारीत वेतनश्रेणीत निश्चितीमुळे देय होणारी दिनांक १-१-८६ ते ३१-८-८८ पर्यंतची एकूण ३२ महिन्याची रक्कम प्रत्येक कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात येईल आणि ३१ डिसेंबर १९९१ पर्यंतच्या तीन वर्षाच्या कालावधीत ती काढून घेण्याची त्याला परवानगी असणार नाही.परंतु या कालावधीत सेवेतून निवृत्त झालेले किंवा अशा सेवेत बंद झ ाालेले कर्मचारी याला अपवाद रहातील.
क) सुधारीत वेतनश्रेणीमुळे देय होणारी दिनांक १-९-८८ ते ३०-६-८९ पर्यंतची एकूण दहा महिन्याची थकबाकी रोख स्वरुपात देण्यात येईल.

तद्अनुषंगाने कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी प्रित्यर्थ दिनांक १-१-८६ पासून हस्तांतरीत करावयाच्या व भविष्य निर्वाह निधीत जमा करावयाच्या एकूण रक्कम रु.१,५०,००,०००/- च्या अंदाजित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सन १९८९-९० चे सुधारीत अर्थ संकल्पात पगार आणि भत्ते या शिर्षकात रक्कम रु. १,०६,००,०००/- ची तरतुद करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## -:ऐनवेळचे प्रस्ताव :-

**विषय क्र. १२०:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा वजलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरामध्ये ड्रेनेजचे कामासाठी ३०० मीमी व २५० मीमी व्यासाचे एन पी-२ क्लास आर.सी.सी.पाईपची आवश्यकता आहे.याबाबत कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग २ औरंगाबाद यांचेकडे चौकशी केली असता त्यांचे कार्यालयीन प.क्र.११० दि. ४-७-८९ द्वारे त्यांचेकडे वरील पाईप उपलब्ध असून त्यांचे दर अनुक्रमे रु. ६९.६० व रु. ४८.५० प्रति मिटर असल्याबाबत त्यांनी कळविलेला आहे.सदरील दर खुल्या बाजारातील दरापेक्षा बराच कमी असून सदरील पाईप शासनाचे कोठयातील असल्यामुळे त्याची प्रत चांगली असून त्याची चाचणी घेतलेली असते.करीता ३०० मीमी व्यासाचे ९४२.५ मीटर व २५० मीमी व्यासाचे ४७२.५० मीटर पाईप कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग २ औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेसाठी रक्कम रु.८८,२८०/- ची मंजुरी होणेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरामधील ड्रेनेजच्या कामासाठी ३०० मीमी २५० मीमी व्यासाचे एम पी-२ क्लास आर.सी.सी.पाईप अनुक्रमे रक्कम रू.६९.६० व रु.४८.५० प्रति मीटर या दराने,३०० मीमी व्यासाचे ९४२.५ मीटर पाईप कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग २ औरंगाबाद हयांचेकडून खरेदी करणेस व व्यासाची रक्कम रु. ८८,२८०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२१:**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की,४० वॅट ४ नविन टयुब रॉड खरेदी करण्याकरीता कार्यालयीन जा.क्र.मनपा / विद्युत / २०६ /८९ दि.२२-५-८९ च्या जाहीर प्रगटनाद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदा वसूल झाल्या.त्या दि.५-७-८९ रोजी उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.सर्व कंपनीच्या टयुब हया आय.एस.आय.मार्कस आहेत.व फिलिप्स,बजाज,क्रॉम्प्टन मेक आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | उत्पादक कंपनीचे नाव | दर प्रतिनग |
|---|---|---|---|
| १ | मे.प्रकाश टयुब लि.मुंबई | गॅलक्सी सूर्या | १८.४५ |
| | लि.मुंबई | सूर्या | २२.८५ |
| २ | मे.चिंतामणी | बजाज | २५.९१ |
| | ट्रेडींग कं.औरंगाबाद | इलेक्ट्रान | २२.१८ |
| ३ | मे.पगारीया | क्रॉम्प्टन | २३.९० |
| | इन्टरप्राईजेस | एचएमटी | २३.९० |
| | | ईसीई | २१.७५ |
| ४ | मे.जयभारत ट्रेडींग कं. | बजाज | २६.१० |
| ५ | मे.सत्य | फिलीप्स | ३१.०० |
| | इलेक्ट्रीकल्स | बजाज | २४.५० |

वरील निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे मे.प्रकाश टयुब लि.मुंबई यांच्या "गॅलेक्सी" या टयुब रॉडची किंमत सर्वात कमी म्हणजे प्रति नगास रु.१८.४५ असे आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

मेसर्स पगारीया इन्टरप्राईजेस यांचेकडून क्रॉम्प्टन कंपनीचे टयुबरॉड प्रतिनग रक्कम रु.२३.९० या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २७-७-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. गुरुवार दिनांक २७ जुलै,१९८९रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका समिती सभागृह येथे मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३) श्री.जैस्वाल प्रदीप शिवनारायण
४) श्री. नवपुते कचरु चंद्रभान
५) श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
७) श्री.यादव अशोक सायन्ना
८) श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबोद्दीन.

**विषय क्र. १२२:**

दिनांक १३-७-८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : दि.१३-७-८९ च्या सभेमध्ये चर्चा करतांना मालमत्ता कराची अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट असून याबाबत एकूण किती प्रकरणे न्यायालयात चालू आहेत,किती प्रकरणांचा निकाल लागला,निकाली लागलेल्या प्रकरणांपैकी किती प्रकरणांचा निकाल महापालिकेच्या बाजूने लागला इ.बाबत चर्चा झालेली असतांनाही स्थानिक वृत्तपत्रात या प्रकरणी ४ कोटी रुपये खर्च झाल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.वस्तुतः सभागृहामध्ये खर्चाबाबत कुठल्याही प्रकारचे वक्तव्य झालेले नसतांना वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या चुकीचे वृत्ताबाबत कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी यांनी काय खुलासा केला याबाबत माहिती देण्यात यावी.

जनसंपर्क अधिकारी : "मालमत्ता कराबाबत महापालिकेच्या न्यायालयात ४ कोटी खर्च" अशा मथळयाखाली छापून आलेल्या चुकीच्या वृत्ताबाबत खुलासा तयार करण्यात आला असून महापालिकेतर्फे करण्यात आलेला खुलासा वृत्तपत्रात छापून यावा या दृष्टीने प्रत्यक्ष संपर्क साधून तयार केलेला खुलासा वृत्तपत्रांकडे लवकरच हस्तांतर करण्यात येईल.

मा.सभापती : महापालिका कामकाजाविषयी चुकीचे वृत्त प्रसिध्द झाल्यास त्याबाबतचा वास्तविक खुलासा करण्याची जबाबदारी जनसंपर्क अधिकारी यांची आहे.याबाबत संबंधितांस यापुर्वीही आवश्यक त्या सुचना दिलेल्या आहेत.तरीही दि. १३-७-८९ चे सभेच्या संदर्भाने प्रसिध्द झालेल्या चुकीचे वृत्तांबाबत जनसंपर्क अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारचा खुलासा झालेला नाही ही बाब गंभीर आहे अशा प्रकारे चुकीचे वृत्त प्रसिध्द झाल्यामुळे स्थायी समिती विषयी जनमानसात गैरसमज निर्माण होतील.तेव्हा

महानगरपालिका कामकाजाबाबत प्रसिध्द होणाऱ्या चुकीचे वृत्ताबाबत जनसंपर्क अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क साधून चुकीच्या वृत्ताबाबत दुरुस्त खुलासा वृत्तपत्रात करावा.नसता याबबत जनसंपर्क अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

श्री.रतनकुमार पंडागळे : दि.१३-७-८९ च्या सभेमध्ये १ ते १७ पर्यंतचे विषय सर्वानुमते पारीत करण्यात आले होते.परंतु इतिवृत्तामध्ये विषय क्र. १५ वर पुन्हा चर्चा होवून या कामाकरीता फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे नमुद करण्यात आले आहे.तेव्हा एकदा पारीत झालेल्या ठरावावर पुन्हा चर्चा कशी झाली याचा खुलासा व्हावा.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : ब्लिचिंग पावडर किंवा कार्यालयासाठी आवश्यक असलेले अन्य केमिकल खरेदी करतांना या केमिकलसाठी नियमाप्रमाणे आवश्यक असलेली गुणवत्ता पुरवठा धारकाकडून पुरविण्यात येणाऱ्या केमिकलमध्ये आहे किंवा नाही हे तपासून पाहण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यावर असते.तेव्हा ब्लिचिंग पावडर किंवा अन्य आवश्यक केमिकल खरेदी करतांना नियमाप्रमाणे आवश्यक असलेल्या गुणवत्ताबाबत संबंधित अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल.

श्री. रतनकुमार पंडागळे : ब्लिचिंग पावडर खरेदी संबंधी मा.आयुक्त यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे.तसेच दि. १३-७-८९ च्या सभेत हा विषय मंजुरही झालेला आहे.तेव्हा त्या मंजुरीनुसार ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यास मंजुरी देण्यात यावी.

मा.सभापती : ब्लिचिंग पावडर खरेदी बाबत चुक लक्षात आल्यानंतर ती दुरुस्तीसाठी पुन्हा मांडू नये असे नाही.ब्लिचिंग पावडर खरेदी हा प्रतिष्ठेचा प्रश्न होवू शकत नाही व ब्लिचिंग पावडर खरेदीचा प्रस्ताव मंजुर झालेलाच नाही.

श्री.यादव अशोक सायन्ना : विषय क्र.११६ / १५ नियमाप्रमाणे मंजूर झालेला आहे.स.सभासदांनी सूचित केल्याप्रमाणे जर हा विषय विषय क्र. १७ नंतर पास झाला आहे तर तो विषय,विषय क्र.१७ नंतर पास झाल्याचे का दाखवण्यात आले नाही? या शिवाय सभागृहाने यापूर्वी २० टन ब्लिचिंग पावडर खरेदीस मंजुरी दिली आहे.ब्लिचिंग पावडर तातडीने खरेदी करणे आवश्यक होते.तर सभागृहाने मंजुरी दिल्याप्रमाणे २० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदीस मंजुरी दिली आहे.ब्लिचिंग पावडर तातडीने खरेदी करणे आवश्यक होते तर सभागृहाने मंजुरी दिल्याप्रमाणे २० मे.टन ब्लिचिंग पावडर का खरेदी करण्यात आले नाही? याशिवाय आजच्या सभेमध्ये सचिव यांनी सभागृहात पत्रक देऊन विषय क्र. १५ बाबत फेरविचार करण्याची जी विनंती केली आहे ती लक्षात घेता दि. १३-७-८९ च्या सभेला सचिव सभागृहात उपस्थित नव्हते का?

श्री.मिर्झा अन्वर बेग : सभागृहाने २० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यास मंजुरी केंव्हा दिली होती? या २० मे.टन ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्याबाबत संबंधितांस आदेश केव्हा दिला होता,तसेच मागविलेला माल कार्यालयात केव्हा आला,याची माहिती देण्यात यावी.यासाठी ब्लिचिंग पावडर खरेदी आणि वितरण याबाबतची साठा नोंदवही सभागृहात मागविण्यात यावी.

कार्य.अभियंता : ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी सभागृहाने मंजुर केलेल्या दरपत्रक धारकांकडून
,

(पापु,ड्रेनेज स्लम) ५० मे टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात आले.तसेच २० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करीता सभागृहाने दिलेल्या नंतरच्या मंजुरीनुसार ब्लिचिंग पावडराचा पुरवठा करण्यासाठी वितरकास दयावयाच्या आदेशावर सुटीवर जाण्यापूर्वी सही केली होती.व तसेच पत्र वितरकास देण्याकरीता जलगृह विभागाचे भांडारपाल श्री.जोशी हयांना पत्र दिले परंतु सदर आदेश वितरकाला न मिळाल्यामुळे मालाचा पुरवठा झालेला नाही.यानंतर प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी वितरकास मंजुरीप्रमाणे १० मे.टन ब्लिचिंग पावडर पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत.म्हणजेच मंजुरीप्रमाणे २० मे.टन ब्लिचिंग पावडर + उपलब्ध असलेला ब्लिचिंग पावडरचा साठा किमान ४५ दिवस पुरेल.

श्री.यादव अशोक सायन्ना : कार्य.अभियंता यांनी आताच खुलासा केल्याप्रमाणे ब्लिचिंग पावडरची परिस्थिती लक्षात घेता सभागृहाविषयी मा.आयुक्त यांचा गैरसमज निर्माण झालेला आहे.ही बाब लक्षात घेता यावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक वाटते.

श्री.एकबालसिंग गील : ब्लिचिंग पावडरवरील सर्व बाबींचा विचार करता वितरकाला पुरवठा करण्याचे आदेश न मिळाल्यामुळे संबंधीताने माल दिला नाही.तेव्हा १० मे.टन ब्लिचिंग पावडरचा आदेश वितरकाचे हातात देण्यात यावा व माल मागवून घेण्यात यावा आणि ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी नवीन दरपत्रके मागविण्यात यावीत.

मा.सभापती : सन १९८८-८९ करीता मंजुर झालेले ब्लिचिंग पावडरच्या दरपत्रक धारकाकडून मागविण्यात आलेले ब्लिचिंग पावडर,यानंतर सभागृहाने मंजुर केलेला २० मे.टन ब्लिचिंग पावडर याप्रमाणे वितरकास माल पुरवठा करण्याबाबत वेळोवेळी दिलेले आदेश त्यानुसार वितरकाकडून पुरवठा झालेला माल,कार्यालयाच्या विविध विभागासाठी वितरण करण्यात आलेल्या मालाची नोंद इत्यादी बाबत लेखाधिकारी यांनी तपासणी करुन आपला अहवाल द्यावा.याशिवाय मागील सभेमध्ये जलगृह अभियंता यांनी वरील प्रकरणाचे चर्चेच्या वेळी २० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदीचे आदेश देण्यात आल्याची माहिती,सभागृहाला दिली आहे.तेव्हा जलगृह अभियंता यांचे खुलाशाप्रमाणे आदेश देऊनही अंमलबजावणी का करण्यात आली नाही.याबाबतही लेखाधिकारी यांनी आपला अहवाल पुढील सभेत दाखल करावा.

तसेच नागरिकांचे हित लक्षात घेऊन दरम्यानचे काळात ब्लिचिंग पावडरचा साठा कमी पडल्यास मा.आयुक्त यांचे अधिकारांत ब्लिचिंग पावडर खरेदी करावे.तसेच यापुर्वी सभागृहाने मंजुर केलेल्या २० मे टनाव्यतिरिक्त आणखी १० मे.टन ब्लिचिंग पावडर मंजुरा दराप्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्याबाबतची निविदा जास्त खप असलेल्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक १३-७-१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२३:**

वार्ड क्र. ३५ येथे अस्तित्वात असलेली १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन पुरेशी नसल्याने व चांगल्या स्थितीत नसल्याने सदर लाईन बदलून त्याऐवजी ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.५१,६६०/- चे तयार करण्यात आले असून सदर काम भांडवली जलनिःसारण खर्च या सदराखाली करण्यात येईल.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : वार्ड क्र.२५ मधील दिलेल्या कामाबाबतचे अंदाजपत्रक तयार झालेले आहे.परंतु त्या अंदाजपत्रकांचा आजच्या विषयपत्रिकेवर समावेश नाही.विषय पत्रिकेचे अवलोकन करता वार्ड क्र. २५ बाबत दिलेल्या कामाची मागणी केल्यानंतर दाखल झालेल्या इतर वार्डाची कामे विषय पत्रिकेवर कशी घेण्यात आली,याचा खुलासा व्हावा.वार्ड क्र.२५ मधील सरस्वती भुवन कॉलनी येथील कामाचे अंदाजपत्रक आजच्या विषय पत्रिकेवर नाही.या कामात वेळोवेळी मागणी करण्यात आलेली आहे.या भागातील नागरिक नियमितपणे मालमत्ता कराचा भरणा करतात. अनेकवेळा मागणी करुनही काम होत नसेल,तर या भागातील नागरिंकांनी मालमत्ता कर भरणे बंद करावे का? याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : स.सभासदांच्या भावना लक्षात घेवून या प्रकरणी मी स्वतः लक्ष घालीन.

कार्य.अभियंता : स.सभासदांना आताच मागणी केल्याप्रमाणे स.भु.कॉलनी येथील कामाचे अंदाजपत्रक पुढील सभेत ठेवण्यात येईल.

श्री.अशोक सायन्ना : एखादया कामामध्ये विशिष्ट समाजाच्या नावाने उल्लेख करणे योग्य होणार नाही.याची सभागृहाने नोंद घ्यावी.

**ठराव :**

वार्ड क्र. ३५ येथे अस्तित्वात असलेली १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन पुरेशी नसल्याने व चांगल्या स्थितीत नसल्याने सदर लाईन बदलून त्याऐवजी ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ५१,६६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२४:**

वार्ड क्र. ३८ मो.कैलासनगर येथील पश्चिमेकडील शेवटच्या गल्लीत ड्रेनेज लाईन नसल्याने तेथील सांडपाणी रस्त्याने वाहते.करीता या भागासाठी १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४४,४५१/- चे तयार करण्यात आल असून सदर खर्च भांडवली जलनिःसारण खर्च या सदराखाली करण्यात येईल.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३८ मो.कैलासनगर येथील पश्चिमेकडील शेवटच्या गल्लीत १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता रक्कम रु. ४४,४५१/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२५:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. २४ मधील मो.नागेश्वरवाडी येथील गणपती विसर्जन विहिरीतील गाळ काढण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु. १७,६००/- चे

तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.गणपती विसर्जनाचा काळ जवळ आला असल्या कारणाने सदरील काम निविदा न मागविता तातडीने करावयाचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद यांचेमार्फत "अ-्" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २४ मधील मो.नागेश्वरवाडी येथील गणपती विसर्जन विहिरीकील गाळ काढण्याचे कामासाठी रक्कम रु. १७,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्या कारणाने निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद यांचे मार्फत "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२६:**

वार्ड क्र.२५ साजन सरीता,मज्जीदजवळ गटार दुरुस्ती करणेबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.१०,१२०/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील ठिकाणी सांडपाणी रोडवरुन वाहत असल्याने व नागरिकांचा त्रास लक्षात घेता सदरील काम तातडीने करावयाचे असल्याने सदर काम गुत्तेदार श्री.दीपक जैस्वाल यांच्याकडून "अ-१" निविदेवर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२५ साजन सरीता,मज्जीद जवळ गटार दुरुस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रु.१०,१२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम तातडीने करावयाचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.दीपक जैस्वाल यांच्याकडून "अ-१" निविदेवर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र.४ दिलरस हौसिंग सोसायटी येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,७५,५००/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल :सभागृहापुढे विषय मांडतांना कामाची लांबी,रुंदी आणि विकास खर्चाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी असे यापुर्वी ठरले होते.वरील विषयासंबंधी कोणताही उल्लेख नाही.

उपअभियंता(बांध-१) : सदरील संस्थेला विकास खर्चापोटी एकूण रक्कम रु.४,६१,४००/- आकारण्यात आला असून विकास खर्चा प्रित्यर्थ संस्थेने एकूण ७५% रक्क्कम रु.३,२०,७३८/- जमा केले आहेत.संस्थेच्या लेआऊटमध्ये एकूण १०३० मी.लांबीचे व ५.५. मी.रुंदीचे रस्ते आहेत.

श्री.प्रदीप जैस्वाल,श्री.कचरु नवपुते : १०० टक्के विकास खर्च भरलेल्या वसाहतीमध्ये नागरी सुखसोयी उपलब्ध करुन देण्याची मागणी करुनही या भागातील कामे होत

नाहीत आणि कमी विकास खर्च भरलेल्या वसाहतीच्या कामांना प्राधान्य दिले जाते,म्हणून या कामास आमचा विरोध नोंदवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४ दिलरस हौसिंग सोसायटी येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रु. १,७५,५००/- च्या अंदाजपत्रकास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,एकूण १००० मे.टन ओ.पी.सी.सिमेंट खरेदी करण्यास्तव प्रशासकीय मंजुरी दि. १०-७-८९ रोजी मिळाल्याप्रमाणे सिमेंटच्या निविदा मागविण्यात आल्या असता खालील कंपनीचे दरपत्रके आली आहेत.

| अ.क्र. | कंपनीचे नांव | प्रति मे.टनास | एकूण मागणी १००० मे.टन (त्याची किंमत रु.) | एकूण रक्कम सर्व करासहीत मनपाच्या नाक्यसहीत |
|---|---|---|---|---|
| १ | मे.ओरीएंट सिमेंट कंपनी | रु. १२९०=०० | रु.१२,९०,०००=०० | --//-- |
| २ | सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया | रु.११७८=०० | रु.११,७८,०००=०० | --//-- |
| ३ | मे.पांडे ॲण्ड सन्स (L&T) कंपनी | रु.१३००=०० | १३,००,०००=०० | --//-- |

सर्वात कमी दर सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचे आहेत.सर्व करासह.म.न.पा.च्या गोडावूनपर्यंत पोहचते करण्यात येणार आहे.त्यांची किंमत रक्कम रु. ११७८=०० दर प्रति मे.टनासह रु.११,७८,०००=०० खर्चास स्थायी समिती मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.यादव अशोक सायन्ना : सिमेंटचा साठा नसल्यामुळे किती कामे बंद आहेत तसेच सध्या कार्यालयाकडे किती बॅगचा साठा उपलब्ध आहे याचा खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : सिमेंटचा साठा नसल्यामुळे कोणतेही काम बंद नाह,सर्व कामे चालू आहे.तसेच कार्यालयाकडे आज ४४० बॅग्ज शिल्लक आहेत.

श्री.यादव अशोक सायन्ना : पडेगांव येथील शाळेचे बांधकाम सिमेंट पुरवठा नसल्यामुळे बंद आहे असे समजते.तसेच या कामाची गती अत्यंत मंद आहे.कामाचा कालावधी लक्षात घेता मुदतीच्या आंत काम पूर्ण होईल असे वाटत नाही.काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी वारंवार मागणी करण्यात आली,परंतु सभासदांच्या मागणीकडे अधिकारी दुर्लक्ष करतात.

उप अभियंता (बांध-१) : पडेगांव येथील शाळेच्या बांधकामाबाबत कामाचा आदेश दिल्यानंतर गुत्तेदाराला ५०० बॅग सिमेंट देण्यात आले आहे.याशिवाय एक महिन्यापूर्वी याकामासाठी २०० बॅग सिमेंट देण्यात आले आहे.देण्यात आलेल्या ७०० बॅग सिमेंटपैकी ५०० बॅग या कामावर खर्च झालेल्या आहेत,खर्च झालेल्या ५००

बॅग सिमेंट प्रमाणे काम योग्य प्रकारे झालेले आहे.याकामासाठी अंदाजे १२ महिन्याचा कालावधी असून कामाचा आदेश दिल्यापासून आठ महिने पूर्ण झाले आहेत.एवढया अवधित स्लॅब लेव्हल पर्यंत काम व्हावयास पाहिजे.पूर्ण झालेला ८ महिन्याचा कालावधी लक्षात घेता कामाची गती कमी वाटते.

शहर अभियंता : पडेगांव शाळेचे बांधकाम बाबत संबंधित गुत्तेदारास काम लवकर पूर्ण करण्याबाबत प्रत्यक्ष सूचना समज दिली आहे.

मा.सभापती : पडेगांव येथील शाळेच्या बांधकामाबाबत संबंधित गुत्तेदारास पुन्हा पत्र देवून कामाची गती वाढविण्याबाबत सूचना दयाव्यात.आणि मुदतीच्या आत काम पूर्ण करुन घेण्याबाबत शहर अभियंता यांनी प्रयत्न करावेत.तसेच पडेगांव शाळेच्या कामाबाबत सविस्तर अहवाल पुढील सभेत दाखल करावा.योग्य अवधीत जर संबंधित गुत्तेदारकाम करुन देणेस तयार नसेल तर इतर गुत्तेदाराकडून काम करुन घेण्याचे प्रयत्न करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकूण १००० मे.टन ओ.पी.सी.सिमेंट तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असलेल्या सिमेंट कॉर्पोरेश ऑफ इंडिया यांचेकडून रु.११७८/- प्रति मे.टन या दराने खरेदी करण्यास तसेच तद्अनुषंगाने एकूण रक्कम रु. ११,७८,०००=०० च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२९:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.४१ मधील मोहल्ला खोकडपूरा येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २८,९९०/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

तसेच सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असल्या कारणाने निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री.अर्शद नोमी यांचेमार्फत "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

सदरील कामात साहित्याची किंमत वजा जाता लेबर पेमेंटची रक्कम रु. ८,५००/- इतकी आहेतरी सदरील रक्कम रु. २८,९९०/- चे अंदाजपत्रकास व उपलब्ध गुत्तेदार श्री.अर्शद नोमी यांचेमार्फत "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४१ मधील मोहल्ला खोकडपुरा येथे १०० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. २८,९९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम तातडीच्या स्वरुपाचे असल्या कारणाने निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री.अर्शद नोमी यांचेमार्फत "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे प्रस्ताव :-**

**विषय क्र. १३०:**

जलगृह अभियंता यांनी सन १९८९-९० वर्षाकरीता तुरटी खरेदी करणेसाठी रक्कम रु. १,२९,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

मा.आयुक्त यांच्या दि.२०-६-८९ च्या आदेशानुसार तुरटी खरेदी करण्यासाठी(दुसऱ्या वेळेस) निविदा पत्रक क्र.मनपा / पापु / १८६५ / ८९ दिनांक २२-६-८९ अन्वये दरपत्रके मागविण्यात आले असता एकूण दोन निविदा विकल्या गेल्या,त्यापैकी आखरी तारखेस दोन निविदा वसुल झाल्या त्याचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र केमिकल्स रु. १८७५/- प्र.मे.टन
२) गणपती केमिकल्स रु. १९२५/- प्र.मे.टन

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक महाराष्ट्र केमिकल्स यांचे रु. १८७५/- प्रति टन या दराचे आहे.तरी रक्कम रु.१,२९,५००/- च्या अंदाजपत्रकास व तुलनात्मकदृष्टया कमी दराचे रु. १८७५/- प्र.मे.टन या दराच्या महाराष्ट्र केमिकल्स यांच्या दरास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० या वर्षाकरीता तुरटी खरेदी करणेसाठी रक्कम रु. १,२९,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी तुलनातमकदृष्टया सर्वात कमी दराचे मे.महाराष्ट्र केमिकल्स यांचे रक्कम रु. १८७५/- प्रति मे.टन या दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३१:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,सध्या पाणी पुरवठा भांडारात फक्त ३ टन तुरटीचा साठा शिल्लक असून तो फक्त ८ दिवस पुरेल इतका आहे.

सध्या तुरटी खरेदीचे टेंडरचे काम फायनलाईन करणेचे काम सुरु आहे व त्यास बराच अवधी लागणार असल्यामुळे व दर जास्त असल्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत व एम.एस.एस.आय.डी.सी.हे माल पुरवठा करत नाहीत.त्यामुळे नवीन निविदा मंजुर होईपर्यंत श्री.गणपती केमिकल्स व मायनप्लस लि.भंडारा हयांचेकडून रु. १९००/- प्र.मे.टन या दराने १० मे.टन ॲलम खरेदी करण्याच्या परवानगी मिळणेस्तव सादर.सदर काम तातडीचे असल्याने खरेदी करण्यात आली आहे.तरी कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागासाठी तातडीने श्री.गणपती केमिकल्स व मायनप्लस लि.भंडारा हयांचेकडून रु. १९००/- प्र.मे.टन या दराने खरेदी करण्यात आलेल्या १० मे.टन तुरटीच्या खरेदीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-८-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट,१९८९रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका समिती सभागृहात स्थायी समिती सभेस मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखाँ हुसेनखाँ
२) // गील एकबालसिंग प्रितमसिंग
३) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
४) // नवपुते कचरु चंद्रभान
५) // पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) // मगर शंकर जिजाराम
७) // यादव अशोक सायन्ना
८) // स.अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतुबोद्दन
९) // सावे मोरेश्वर दिनानाथ
१०) // घडामोडे मोतीराम नारायणराव.

स.सभासद,श्री.मोतीराम घडामोडे यांनी तोंडी प्रस्ताव मांडला की,स्थायी समिती सदस्य,श्री.मिर्झा अन्वर बेग यांचे वडील श्री.मिर्झा हमीद बेग यांचे दुःखद निधना निमित्त सभागृहातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.त्यास स.अ.एकबालुद्दीन यांनी अनुमोदन दिले.

स्थायी समिती सदस्य,श्री.मिर्झा अन्वर बेग यांचे वडील पै.श्री.मिर्झा हमीद बेग यांचे दुःखद निधनानिमित्त सभागृहाने ००.२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : जिप क्र.चे वाहन चालक यांनी स्थायी समिती,सभापती व प्रशासनास पत्रक देवून प्रभारी उप शिक्षणाधिकारी यांचेकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्या बाबत तक्रार केली आहे.(पत्रक सभागृहास वाचून दाखविले) यावर चर्चा व्हावी.

मा.उप आयुक्त : जीप क्र.१६४५ चे वाहन चालक यांनी दिलेल्या तक्रार अर्जा पुर्वी प्रभारी शिक्षणाधिकारी यांनी संबंधित वाहन चालकाचे कामा विषयी लेखी तक्रार दाखल केलेली आहे.तेव्हा वाहन चालक (जीप क्र.१६४५) आणि प्रभारी शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची प्रशासन शहानिशा करुन योग्य ती कार्यवाही करील.

श्री.प्रदीप जैस्वाल : जीप क्र. १६४५ चे वाहन चालक यांनी त्यांच्या तक्रारींची प्रत स्थायी समिती सदस्य व सभापती यांच्याकडे दाखल केलेली असल्याने त्यावर योग्य ती चौकशी होणे आवश्यक आहे.

मा.सभापती : प्रभारी शिक्षणाधिकारी आणि जीप क्र. १६४५ चे वाहन चालक यांनी परस्परांविरुध्द प्रशासनाकडे लेखी तक्रार केल्या आहेत.तेव्हा या प्रकरणी मा.उप आयुक्त चौकशी करतील.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : जीप क्र.१६४५ चे वाहन चालक यांनी मा.आयुक्त यांना पत्र दिले आहे.तेव्हा या प्रकरणी प्रशासकीय चौकशीअंती यावर सभागृहात विचार करणे उचित राहील.

श्री.प्रदीप जैस्वाल : महानगरपालिकेच्या उर्दु माध्यमातील शाळांची तपासणी करण्यासाठी आयुक्तांचे स्वीय सहाय्यक व पशुधन विकास अधिकारी यांची नियुक्त करण्यात आल्याचे पत्रक शिक्षण विभागाकडून काढण्यात आले आहे.हे योग्य आहे काय? याचा खुलासा व्हावा.

श्री.मोरेश्वर सावे : महापालिकेच्या शाळांची तपासणी करण्यासाठी शिक्षण विभागा व्यतिरिक्त अन्य विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याऐवजी शिक्षण क्षेत्रात काम करीत असलेल्या ज्येष्ठ व अनुभवी शिक्षकांची या कामी नियुक्ती झाली असती तर ते अधिक श्रेयस्कर झाले असते.तसेच उपशिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त भार सांस्कृतिक अधिकारी यांच्याकडे सोपवणे अप्रस्तुत आहे.

मा.उपायुक्त : सांस्कृतिक अधिकारी यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन रिक्त असलेल्या उपशिक्षणाधिकारी पदाचे काम तात्पुरत्या स्वरुपात त्यांच्याकडून करुन घेण्यात येत आहे.उपशिक्षणाधिकारी या पदावर योग्य उमेदवाराची नियुक्त झाल्यानंतर संबंधितांकडील तात्पुरता भार काढून घेण्यात येईल.

मा.सभापती : प्रभारी शिक्षणाधिकारी यांनी उर्दु शाळा तपासणीसाठी काढलेला आदेश रद्द करावा.त्याऐवजी उर्दु व इतर शाळांचे तपासणीकरीता ज्येष्ठ व अनुभवी शिक्षकांची,अधिकाऱ्यांची नियुक्त करण्यात यावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : शिक्षण विभागाशी संबंधित मुद्दयांबाबत उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे,विचारणा केली असता संबंधितांनी अरेरावीची भाषा वापरली.तेव्हा सभासदांना महापालिका कामकाजाविषयी अधिकाऱ्यांना प्रश्न विचारण्याचे अधिकार आहेत किंवा कसे याबाबत खुलासा व्हावा.

मा.सभापती : सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांसंबंधी संबंधीत अधिकाऱ्यांनी अरेरावीची भाषा केली असेल तर ते योग्य नाही.सदर बाब सभासदांनी वरिष्ठांचे नजरेस आणून द्यावी.यापुढे संबंधितांनी असे वागू नये.

श्री.एकबालसिंग गील : घाटी शाळेतील शिक्षकांनी दिनांक २०-७-८९ रोजी पत्र देऊन शालेय इमारतीच्या अडचणींचा खुलासा केला आहे.या शाळेच्या इमारतीस संरक्षक भिंत नाही.सदर इमारतीची दारे व खिडक्या तुटलेल्या असून इमारतीतील फॅनही काढून नेलेले आहेत,तसेच या इमारतीजवळ असलेल्या विहीरीवर या भागातील नागरिक स्नान करतात.यामुळे शिक्षकांना अध्यापन व विद्यार्थ्यांना अध्ययन करणे जिकीरीचे झाले आहे.

श्री.मोरेश्वर सावे : चेलीपूरा माध्यमिक शाळेचे स्वच्छतागृह शेजारी असलेल्या नागरिकांनी पाडून टाकल्याची माहिती मिळाली आहे.तेव्हा सदरील स्वच्छतागृह कुणी व का पाडले? तसेच पाडण्यात आलेल्या स्वच्छतागृहाची नुकसान भरपाई कोण देणार याचा खुलासा होणे आवश्यक आहे.चेलीपूरा हायस्कूल आणि त्या लगत असलेली जमीन महापालिका मालकीची आहे.परंतु महापालिकेच्या दुर्लक्षामुळे अनेक संस्थांनी सदरील जागा अनधिकृतपणे बळकावली आहे.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : चेलीपुरा हायस्कूल आणि त्या लगतची जागा महापालिका मालकीची नाही.सदरील जमीन सरकारी आहे.नगरपरिषद काळात या जमीनीबाबत न्यायालयात वाद चालू होता.

मा.सभापती : चेलीपूरा हायस्कूल जवळील पाडून टाकण्यात आलेल्या स्वच्छतागृहाबाबत निवासी उपअभियंता यांनी चौकशी करुन आपला अहवाल पुढील सभेत दाखल करावा,तसेच या हायस्कूलसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी.

श्री.यादव अशोक सायन्ना : दिनांक २८-७-८९ रोजी मा.सभापती आणि चिकलठाणा वार्डाचे नगरसेवक यांच्यासमवेत या भागातचालू असलेल्या इमारत बांधकामाची पाहणी केली असता सदर इमारतीचा पाया मातीत भरण्यात आला आहे आणि त्यावर इमारत बांधण्याचे काम चालु आहे.या कामासाठी महापालिकेला अंदाजे २ लाखावर खर्च येणार आहे.तेव्हा होणारा खर्च योग्य आहे काय? याबाबत खुलासा व्हावा व मातीच्या पायावर सिमेंट कॉंक्रीटचे चालू असलेले काम तांत्रिकद्ष्टया योग्य आहे काय?

श्री.कचरु नवपुते : स.सभसदांनी सुचवल्याप्रमाणे आम्ही या कामास भेट दिली व आजही ते काम चालू आहे.चालू असलेले काम निकृष्ट दर्जाचे आहे.

श्री.मोरेश्वर सावे : महापालिका अधिकाऱ्यांना कामाबाबत प्रत्यक्ष सांगूनही योग्य ती अंमलबजावणी होत नाही ही खेदाची बाब आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : चिकलठाणा येथे चालू असलेल्या इमारत बांधकामा संबंधिचे उप अभियंता आणि शहर अभियंता सभागृहात उपस्थित नाहीत.याशिवाय आणखी काही अधिकारी सभागृहात उपस्थित नसल्याचे दिसते. तेव्हा सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत उत्तरे कोण देणार.

श्री.रतनकुमार पंडागळे : उप अभियंता व शहर अभियंता या पदांचा कार्यभार एकाच अधिकाऱ्याकडे आहे.

मा.सभापती : शहरातील बांधकामासाठी आवश्यक असलेले स्टील खरेदीकरीता शहर अभियंता मुंबईला रवाना झाले असल्याचे समजते.तेव्हा स.सभासदांना या प्रश्नाबाबत पुढच्या बैठकीत अहवाल देण्यात येईल.

श्री.यादव अशोक सायन्ना : चिकलठाणा येथील बांधकामाव्यतिरिक्त पडेगांव येथील शाळेच्या बांधकामाबाबतही आजच्या सभेत खुलासा मागविला जाणार आहे तेव्हा हा प्रश्न उपस्थित केल्यानंतरही संबंधित अधिकारी सभागृहात नाहीत असा खुलासा करण्यात येईल.तेव्हा सभासदांनी विचारलेल्या सगळयाच प्रश्नांची उत्तरे पुढील सभेत मिळणार असतील तर आजची सभा पुढे ढकलणे ठीक राहील.यापुर्वी सर्व अधिकाऱ्यांनी सभेस उपस्थित रहावे असे सूचित केले असतांनाही आज बरेच अधिकारी सभेस उपस्थित नाहीत हे योग्य नाही.कामात दिरंगाई होते.गावात काविळीची साथ आहे.काविळीच्या साथीने काही मृत्यू झाले आहेत व नागरिक त्रस्त आहेत.महापालिकेचे जबाबदार अधिकारी मात्र कामात निष्काळजीपणा करीत आहेत.

श्री.अशोक सायना यांनी भांडार विभागातील खरेदी करण्यात आलेल्या विविध साहित्यासंबंधी लेखी तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे.

मा.सभापती : स्थायी समितीच्या सदस्यांनी व नगरसेवकांनी आरोग्य,पाणी,भांडार,बांधकाम,शाळा इत्यादी संबंधी लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत.

एकाच अधिकाऱ्याकडे अन्य दोन तीन विभागाचा कार्यभार यापुढे न देता त्या त्या विभागातील ज्येष्ठ व अनुभवी कर्मचाऱ्यास,अधिकाऱ्यास

अतिरिक्त कार्यभार देण्यात यावा व स सभासदांनी वेळोवेळी एखादया विषयासंबंधी मागणी केल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची उत्तरे द्यावीत. आरोग्य व इतर संबंधीत अधिकाऱ्यांनी त्यांचे कामाकडे जातीने लक्ष द्यावे.

नगरसेवकांच्या तक्रारींची चौकशी केल्या जाईल.यापुढील स्थायी समितीच्या बैठकीस अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बाबत आयुक्तांना पत्र देण्यात येईल.

श्री.मोरेश्वर सावे : अधिकारी हे सभागृहाने दिलेल्या आदेशांचे पालन करीत नाहीत.

श्री.यादव अशोक सायन्ना : नगरसेवकांच्या प्रश्नांना योग्य उत्तरे मिळत नाहीत व दिलेल्या आश्वासनांचे पालन होत नाही व हेतुतः बैठकीत अधिकारी गैरहजर राहतात.अधिकाऱ्यांच्या या प्रवृत्तीचा आम्ही निषेध करतो व मा.सभापतींनी यापुढे ही सभा चालवू नये.

यावर सर्वच स्थायी समिती सदस्यांनी पाठींबा दिला व सभागृहा बाहेर निघुन गेले.स.सभासदांनी केलेल्या मागणी नुसार आजची सभा तहकुब करण्यात येते.पुढील सभेची तारीख व वेळ आपणास नंतर कळविण्यात येईल असे मा.सभापतींनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १९ ऑगस्ट,१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा वृत्तांत. शनिवार,दिनांक १९-८-८९रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) // गील इकबालसिंग प्रितमसिंग
३) // घडामोडे मोतीराम नारायण
४) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) // मगर शंकर जिजाराम
६) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
७) // यादव अशोक सायन्ना
८) // स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
९) // सावे मोरेश्वर दिनानाथ.

**विषय क्र. १३२:**

दिनांक २७-७-८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : जीप क्र.१६४५ च्या गैरवापराबाबत चौकशीची प्रगती काय? याचा खुलासा व्हावा.

मा.उपायुक्त : सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे काम चालू आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : चिकलठाणा येथील इमारत बांधकामाबाबत झालेल्या चर्चेनुसार खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : चिकलठाणा येथे विभागीय कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे.सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या जुन्या बांधकामावर स्लॅब टाकून इमारत उभारण्यात येत आहे.जुन्या बांधकामाचा पाया मातीत भरलेला आहे.बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतांना सदर बाब माजी शहर अभियंता याचें निदर्शनास आणून देण्यात आलेली होती.बांधकामाचा पाया मातीत असलेमुळे या इमारतीमध्ये आर.सी.सी.बॅनचा वापर करण्यात आलेला आहे व तो तांत्रिकदृष्टया योग्य आहे.

निवासी उपअभियंता : मा.आयुक्त व स.सभासद श्री.नवपुते यांचे समवेत या कामाची पाहणी करण्यात आली आहे.या इमारतीचे बांधकामामध्ये लिंटल लेव्हल आणि स्लॅब लेव्हल या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे आर.सी.सी.रिंग देण्यात आले आहे.या रिंगमुळे बांधकामाला कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही.

श्री.यादव अशोक सायन्ना : चिकलठाणा येथील इमारत बांधकामाबाबत करण्यात आलेला खुलासा समाधानकारक नाही.तेव्हा या बांधकामाची शासकीय स्तरावर संपूर्ण चौकशी करण्यात यावी.

मा.सभापती : स.सभासदांच्या भावना लक्षात घेता चिकलठाणा येथील बांधकाम तूर्त बंद ठेवण्यात यावे व या बांधकामासाठी "क्वालीटी कंट्रोल" मार्फत चौकशी करण्यात यावी.

श्री.यादव अशोक सायन्ना : पडेगांव येथील शाळेच्या बांधकामाबाबत खुलासा व्हावा.

शहर अभियंता : पडेगांव येथील शाळेचे बांधकाम मंदगतीने चालू असल्यामुळे संबंधीत गुत्तेदारास नोटीस देण्यात येऊन दंड आकारण्यात येणार आहे.या नोटीसचे उत्तरी गुत्तेदाराने माहे ऑक्टो / नोव्हें ८९ पर्यंत काम पूर्ण करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल असा खुलासा केला आहे.गुत्तेदाराच्या खुलाशाप्रमाणे विचार करता जानेवारी १९९० ला संपूर्ण इमारत तयार होईल असे वाटते.

श्री.प्रदीप जैस्वाल : पडेगांव येथील कत्तलखान्याच्या बांधकामाबाबत खुलासा व्हावा.४ स्प्टेंबरला श्री.गणेश उत्सवाला सुरुवात होत आहे.पडेगांव कत्तलखाना येथील बांधकामाची पाहणी करुन अंदाजे दीड महिन्याचा कालावधी पूर्ण झालेला आहे.

मा.सभापती : स.सभासदांनी खुलासा केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या पाहणी नंतर सदर कामाची पुन्हा पाहणी करण्यात आली.पडेगांव कत्तलखाना रोडवर बसविण्यात येणाऱ्या विद्युत पोलबाबत म.रा.वि.मंडळाचे अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली आहे व काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

शहर अभियंता : पडेगांव कत्तलखाना येथील बांधकामाची गती योग्य प्रमाणात आहे.परंतु ४ सप्टेंबर पर्यंत काम पूर्ण हाईल असे वाटत नाही.

श्री.मोरेश्वर सावे : पडेगांव येथील कत्तलखान्याच्या संरक्षक भिंतीचे काम प्रथम पूर्ण करण्यात यावे व इतर कामे ठराविक वेळेत पार पाडावीत यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत.

श्री.यादव अशोक सायन्ना : पडेगांव कत्त्लखाना येथील संरक्षक भिंतीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.त्यामुळे या ठिकाणी असलेल्या जनावारांची चोरी होते,म्हणून संबंधित लोक त्या ठिकाणी जनावरे ठेवत नाहीत.

श्री.प्रदीप जैस्वाल : पडेगांव कत्तलखाना येथील संरक्षक भिंतीचे काम जलदगतीने पूर्ण करावे असे ठरले होते.परंतु सदर काम पूर्ण न झाल्यामुळे जनावारांची कत्तल शहरात होत आहे आणि पर्यायाने रोगराई वाढत आहे.तेव्हा या बाबींचा विचार करुन आजच्या सभेमध्ये कंपाऊंड वॉल्वचे काम पूर्ण करुन घेण्याच्या दृष्टीने ठोस कार्यवाही व्हावी किंवा सिल्लेखाना येथील चौकात असलेले वाहतुक नियंत्रक दिवे काढून टाकण्यात यावेत म्हणजे सिल्लेखाना येथील दुर्गंधीबाबत नागरिकांकडून वारंवार येणाऱ्या तक्रारींना सभासदांना तोंड द्यावे लागणार नाही.

श्री.मोरेश्वर सावे : सिल्लेखाना येथील कत्तलखाना पडेगांव येथे स्थलांतर करण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.पडेगांव येथील कत्तलखान्यासाठी दोन कंपाऊंड वॉलची आवश्यकता आहे.यापैकी जनावरे ठेवण्याच्या भागास त्वरीत कंपाऊंड वॉल करुन घेण्यात यावी.शहरातील काही भागात उघडयावर

जनावारांच्या चामडयांची देवाण घेवाण चालते तसेच उघडयावर मांस विक्री चालते अशा प्रकारचे अवैध व्यवहारांस आळा घालण्यात यावा.

पशुधन विकास अधिकारी : पडेगांव कत्तलखाना येथे चामडयाच्या गोदामाची व्यवस्था नसल्यामुळे शहरात चामडयांचा खरेदी विक्रीचा व्यवहार होतो.तेव्हा पडेगांव कत्तलखाना येथे हाडांचे गोदामाप्रमाणेच चामडयासाठीच्या गोदाम व्यवस्थेस प्राधान्य देणे आवश्यक आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : मागील सभेत ठरल्याप्रमाणे ब्लिचिंग पावडर अहवालाबाबतची प्रगती विदित करावी.

लेखाधिकारी -१ : सदर बाबतीत माहिती गोळा करण्याचे काम चालू आहे.पुढील सभेत याबाबत अहवाल देण्यात यईल.

श्री.शंकर मगर : महापालिकतर्फे शहरातील शेणाचे ढीग उचलण्याची मोहिम हाती घेण्यात आली होती,अशी माहिती मिळाली आहे.तेव्हा हे कोणत्या पध्दतीने पार पाडण्यात आले? या कामासाठी वापरण्यात आलेले अर्क्स कोणते? उचलण्यात आलेले शेण कुठे टाकण्यात आले ? इ.बाबतची सविस्तर माहिती मिळण्यासाठी पत्र दिले आहे.इंदिरानगर भागातही बरेच शेणाचे ढीग आहेत.तेव्हा या मोहिमेत इंदिरानगर भागातील शेणाचे ढीग का उचलण्यात आले नाहीत? याचा खुलासा व्हावा.

पशुधन विकास अधिकारी : शहरातील शेणाचे ढीग उचलण्यासाठी प्रत्येक विभागाकरीता तीन दिवस याप्रमाणे माहे जुलैमध्ये मोहिम हाती घेण्यात आली होती. या कामासाठी प्रति ट्रक रु. ३०५/- (लेबर चार्जेससह) या दराने खाजगी मालकीच्या ट्रकद्वारे शहरातील शेणाचे ढीग सिध्दार्थ उद्यान आणि ट्रेचिंग ग्राऊंड येथे स्थलांतर करण्यात आले.विभाग क्र. ३ मध्ये मोंढा भागातील अजित दालमील व इतर भागातील मोठया प्रमाणात अस्तित्वात असलेले शेणाचे ढीग उचलण्यात आले आहेत.जुलै २४,२५ तारखेस जादा पाऊस झाल्यामुळे हे काम बंद आहे.हया मोहिमेमध्ये एकूण १५९ ट्रक्स शेण उचलण्यात आले असून त्यापैकी काही ट्रक्स सिध्दार्थ उद्यान व बाकीचे ट्रेचिंग ग्राऊंड येथे स्थलांतर करण्यात आले आहे.

याबाबत संबंधीतांकडून झालेला खर्च नियमाप्रमाणे वसुल करण्यात येईल.

श्री.स.अ.एकबालुद्दीन : सिध्दार्थ उद्यानामधील काही लाईट बंद असल्याने त्या ठिकाणी काही अनुचित प्रकार होतात.तेथील लाईट काही गुंड फोडतात.

श्री.एकबालसिंग गील,श्री.अशोक सायन्ना,श्री.स.अ.एकबालुद्दीन : सिध्दार्थ उद्यानास शहरातील अनेक नागरिक दररोज भेट देतात.या ठिकाणी टाकण्यात आलेल्या शेणाच्या दुर्गंधीचा त्रास येथे येणाऱ्या नागरिकांना होत आहे.तेव्हा सिध्दार्थ उद्यानाऐवजी अन्य ठिकाणी शेण स्थलांतर करणत योग्य झाले असते.

मा.सभापती : पावसाळयाचे दिवसात ट्रक्सना विशेष काम नसते.ही बाब लक्षात घेता शहरातील शेण उचलण्याचे कामी खाजगी ट्रक्ससाठी देण्यात आलेला दर योग्य नाही.तेव्हा यापुढे अशा प्रकारची मोहिम हाती घेतांना वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन नियमाप्रमाणे टेंडर मागविण्यात यावे.यापुढे त्याच दराने उचलण्यात येणार नाही.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : अर्थ संकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचा विचार करुन कामांना मंजुरी देण्यात यावी असे यापुर्वी सुचविण्यात आले आहे.परंतु या बाबींचा विचार न करता ठराव पारीत केले जातात.हे योग्य नाही.महापालिकेकडे सध्या पैसा उपलब्ध नाही.

मा.सभापती : महापालिकेचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी उत्पन्नात भर कशी घालता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे, शहरात बऱ्याच नागरिकांनी विनापरवानगी नळ कनेक्शन घेतले `आहेत.याशिवाय मालमत्ता कराची थकबाकीही वसूल होणे आवश्यक आहे.महापालिकेने सुलभ शौचालय योजनेखाली टोपलीच्या संडासाचे जलधौत संडासात रुपांतर करण्यासाठी मोठया प्रमाणावर कर्ज वाटप केले आहे.या सर्वांचे वसुलीसाठी सभागृहात विचार होणे आवश्यक आहे.

श्री.स.अ.एकबालुद्दीन : महापालिका कर्मचाऱ्यांना शहरात होत असलेल्या विनापरवानगी बांधकामाबाबत ताबडतोब माहिती मिळते.पण अनधिकृत नळ कनेक्शन बाबत कर्मचाऱ्यांना माहिती मिळत नाही हे कितपत सत्य आहे? वार्ड क्र. १८ मधील नागरिकांना पाण्याचा कमालीचा त्रास होत आहे.याबाबत अनेकवेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.अधिकारी पाहणी करतात पण काम होत नाही.

जलगृह अभियंता : वार्ड क्र. १८ मधील पाण्याच्या तक्रारीबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य ती व्यवस्था करण्यात येईल.

श्री.मोरेश्वर सावे : विभागीय कार्यालयामार्फत वसुल करण्यात येणाऱ्या निरनिराळया प्रकारचे कराबाबत वार्ड निहाय यादी तयार करुन संबंधित वार्डाचे नगरसेवक आणि वसुली अधिकारी यांचेमार्फत कर वसुली जादा प्रमाणात होऊ शकेल.

श्री.प्रदीप जैस्वाल : विनापरवानगी नळ कनेक्शन बाबत दंड आकारुन अशा प्रकारचे नळ कनेक्शन्स नियमित करण्यात यावेत.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : विना परवानगी नळ कनेक्शन नियमित करतांना दंड आकारण्याचा कालावधी कसा निश्चित करण्यात येईल?

श्री.मोरेश्वर सावे : विनापरवानगी नळ कनेक्शन नियमित करतांना संबंधितांकडून तीन वर्षापर्यंतचा कर वसुल करुन नळ कनेक्शन नियमित करण्यात यावे.नसता नळ कनेक्शन कट करण्यात यावेत.

श्री.शंकर मगर : नियमाप्रमाणे नळ कनेक्शन घेतलेल्या मालकांना पाण्याबाबतचे बील तीन-तीन वर्षापासून दिले जात नाही,याबाबत खुलासा व्हावा.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : नगर परिषद काळात विभागीय कार्यालयाकडून आलेल्या नळ कनेक्शन बाबतच्या संचिकांना मंजुरी दिल्यानंतर सदर कनेक्शन बाबत ग्राहक नंबर दिला जात होता.ती पध्दत बंद करुन विभागीय कार्यालयामार्फत खाते नंबर देण्याची पध्दत सुरु झाल्याचे कळते.यामुळे मुख्य कार्यालयाकडून मंजुर झालेले नळ कनेक्शन प्रत्येक साईटवर जोडल्यानंतर या नळ कनेक्शनला विभागीय कार्यालयात खाता नंबर पडत नाही आणि पर्यायाने अशा नळ धारकांना तीन-तीन वर्षे किंवा त्यापेक्षाही जास्त कालावधीसाठी पाणीपट्टीची मागणी केली जात नाही.

श्री.मोरेश्वर सावे : लाईट किंवा फोनचे बील वेळेवर भरले नाही तर संबंधीत विभागाकडून लाइट किंवा फोनचे कनेक्शन कट केले जाते.त्याप्रमाणे थकबाकी असलेल्या नळ धारकांचे नळ कनेक्शन कट करण्यात यावे.

श्री.शंकर मगर : महापालिका प्रशासनाने नुकत्याच १०२ शिक्षकांच्या बदल्या केल्या आहेत.या बदल्यामध्ये काही शिक्षकांच्या बदल्या विशिष्ट हेतूने दुरच्या शाळेत करण्यात आलेल्या आहेत.

श्री.प्रदीप जैस्वाल : चिकलठाणा शाळेत काम करणाऱ्या शिक्षकाला कारण न दर्शविता निलंबीत करण्यात आले आहे.सदर शिक्षकाचा सेवाकाल विचारात घेता अशा प्रकारे निलंबनाचा आदेश देणे योग्य होणार नाही.

मा.उपायुक्त : एकाच शाळेत तीन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षाचे कालावधीत काम करणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत.यात कोणत्याही प्रकारचा विशिष्ट हेतू समोर ठेवून बदल्या करण्यात आलेल्या नाहीत.
स.सभासदाने खुलासा केल्याप्रमाणे चिकलठाणा शाळेतील निलंबीत करण्यात आलेल्या शिक्षकाबाबत माहिती नाही.

मा.सभापती : निलंबीत करण्यात आलेल्या शिक्षकासंबंधी उपायुक्तांनी चौकशी करावी.

**ठराव :**

दिनांक २७ जुलै,१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३३:**

वार्ड क्र. ४५ मो.पैठणगेट येथे इटकाम गटारीचे काम करणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १०,४४०/- चे तयार करण्यात आले आहे.सदर ठिकाणी गटार नसल्यामुळे पाणी डांबरी रोडवरुन वाहते व साचते.त्यामुळे रोड खराब होत आहे.करीता सदर काम तातडीने करून घ्यावयाचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.एच.असोशिएट यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने "अ-१" निविदेतहत करुन घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४५ मो.पैठणगेट येथे इटकाम गटारीचे कामासाठी रक्कम रु. १०,४४०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.एच.असोशिएटस यांच्याकडून "अ-१" निविदेतहत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३४:**

वार्ड क्र. १५ मो.शहागंज मार्केट येथे १५० मीमी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत रक्कम रु. ११,२४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता सदर काम तातडीने करुन घेण्यासाठी उपलब्ध गुत्तेदार श्री.शे.रफीक यांच्या मार्फत "अ-१" निविदेतहत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. मो.शहागंज मार्केट ये१५० मीमी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ११,२४०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.शे.रफीक यांच्या मार्फत "अ-१" निविदेतहत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३५:**

वार्ड क्र. १५ नवाबजानी गल्लीत तुटलेले मेनहोल्स तोडून नव्याने बांधणे तसेच इतर मेनहोल्सची उंची वाढविणेबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ७,६५०/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील ठिकणी असलेले मोनहोल्स हे पूर्णपणे तुटलेले असल्यामुळे सदरील लाईन नेहमी चोकअप असल्याने नव्याने मेनहोल्स बांधणे जरुर आहे व मेनहोल्सची उंची वाढविणे आवश्यक आहे.यामुळे नागरिकांचा त्रास दूर होवू शकेल व काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्यामुळे गुत्तेदार श्री. सी.पी. गायकवाड यांच्याकडून "अ-१" निविदेवर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १५ नवाबजानी गल्लीत तुटलेले मेनहोल्स तोडून नव्याने बांधणे तसेच इतर मेनहोल्सची उंची वाढविणेच्या कामासाठी रक्कम रु. ७,६५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.सी.पी. गायकवाड यांच्याकडून "अ-१" निविदेवर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३६:**

वार्ड क्र. १३ कटकट दरवाजाजवळील श्री.गायके यांचे ले-आऊट अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ११-१-८९ विषय क्र. ४ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ७०,०२०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दहा दरनिर्दीष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या दि. १९-६-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.मॅकवेल कन्स्ट्रक्शन | २६% | कमी |
| २) श्री.सय्यद रफीकोद्दीन | १९.०५ % | कमी |
| ३) श्री.जावीद खान माजीद खान | १८.८९ % | कमी |
| ४) श्री.अबीद कन्स्ट्रक्शन | १५.७८६ % | कमी |
| ५) श्री.अब्दुल सलाम | १९.१० % | कमी |
| ६) श्री.विक्रम पाटील | १२ % | कमी |
| ७) पॉल कन्स्ट्रक्शन | २१.६९ % | कमी |
| ८) श्री.एस.ए.नवाब | २५.३० % | कमी |
| ९) श्री.एस.एच.असोशिएटस | २२ % | कमी |
| १०) रविंद्रसिंग | २६.७७ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७७ % कमी दराचे श्री.रविंद्रसिंग यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १३ कटकट दरवाजावळील श्री.गायके यांचे ले-आऊट अंतर्गत खडी रस्ते तयार करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७७ % कमी दराचे श्री.रविंद्रसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३७:**

गुलशन महल ते कलेक्टर ऑफिस येथे ८० फुट डी.पी.रोड तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. ८-६-८९ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदर

कामासाठी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा दरनिर्दिष्ट प्राप्त झाल्या.त्या दि. ११-६-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.आर.जी.बालचंदानी | ७.८६ % | जास्त |
| २) | // एन.जी.गुणवानी | १४.०२ % | कमी |
| ३) | // एस.ए.नवाब | १७.१७ % | कमी (दुसरे) |
| ४) | // कुलवंतसिंग | १७.७७ % | कमी (पहिले) |
| ५) | // एल.एम.पडघन | ६.५ % | कमी |
| ६) | // एस.एच.असोशिएटस | ५ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७७ % कमी दराचे श्री.कुलवंतसिंग यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलशन महल ते कलेक्टर ऑफिस येथे ८० फुट डी.पी.रोड तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७७% कमी दराचे श्री.कुलवंतसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३८:**

वार्ड क्र. ६० येथील चिकलठाणा आठवडी बाजाराच्या शेजारी खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९८८-८९ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. १७,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून यापूर्वीच्या अंदाजपत्रकामधील बचतीच्या रकमेतून सदरील काम तातडीचे असल्यामुळे "ए-१" नमुन्यावर उपलब्ध गुत्तेदार मे.एस.एच.असोशिएटस यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६० येथील चिकलठाणा आठवडी बाजाराच्य शेजारी खडी रस्त्याचे कामासाठी रक्कम रु. १७,५५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.एच.असोशिएटस यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने "अ-१" निविदेवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३९:**

वार्ड क्र. ५५ रेल्वेस्टेशन येथील मनपा गेस्ट हाऊस येथील स्टाफ क्वार्टरची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सा.बां. खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. ३२,५३३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम तातडीचे असल्यामुळे जाहीर कोटेशन मागवून सर्वात कमी दर असलेले श्री.सलीम पटेल यांचे असून त्यांचेकडून सदरील काम "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**विषय क्र. १४०:**

सहाय्यक आयुक्त-२ महापालिका यांनी प्रस्ताव सादर केली की,पशुधन विकास अधिकारी यांचे दवाखान्यात औषधी ठेवण्यासाठी गोदरेज कंपनीचे फ्रीज खरेदी करावयाचे आहे.त्यासाठी गोदरेज कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.नरिमन सेल्स ॲण्ड सर्व्हीस यांचेमार्फत

दरपत्रक मागविण्यात आले असता त्यांनी ३०० लिटर क्षमतेच्या फ्रिजची किंमत खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| | |
|---|---|
| १) गोदरेज फ्रिज मॉडेल (Pup Dix white capoeity ३००Ltes) | १०,७२०=०० |
| २) स्टील स्टँड | २००=०० |
| ३) Holtage carreator २ AH | ५२५=०० |

वरील प्रमाणेच्या किंमतीनुसार एक नग फ्रिज खरेदी करण्यासाठी येणार एकूण खर्च रक्कम रु. ११,४४५/- एवढा येईल.सदरचा खर्च हा प्राणी संग्रहालय या विभागासाठी करण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पशुधन विकास अधिकारी यांचे दवाखान्यात औषधी ठेवण्यासाठी गोदरेच कंपनीचे फ्रिज गोदरेज कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. नरिमन सेल्स ॲण्ड सर्व्हीस यांचेतर्फे खरेदी करण्यास (३०० लिटर क्षमतेचे) तसेच सदरील खरेदीसाठी रक्कम रु. ११,४४५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४१:**

सहाय्यक आयुक्त-२ औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केली की,सिडको पाणी पुरवठा बीलासाठी लागणारा कागद हा पूर्व छपाई केलेली संल्स कॉम्प्यूटर स्टेशनरी (Pre Pointed Continus Computer Stationary) खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. मराठवाडा अटा सर्व्हीसेस | ५५०=०० | प्रति हजार |
| २) मे. राजा सेल्स कार्पोरेशन | ४१५=०० | --//-- |
| ३) मे.संतोष सेल्स कार्पोरेशन | ४१६=०० | --//-- |
| ४) मे. मंगल पेपर मार्टस् | ४७५=०० | --//-- |

वरीलप्रमाणेच्या प्राप्त झालेल्या निविदामध्ये मे. राजा सेल्स कार्पोरेशन औरंगाबाद यांचा दर सर्वात कमी आहे.त्यांचेतर्फे १,५०,००० नग स्टेशनरी खरेदी करण्यास येणारा खर्च रक्कम रु. ६२,३२५/- एवढा येईल.सदरचा खर्च हा पाणी खरेदीकरीता करण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको पाणी पुरवठा बीलासाठी लागणारा कागद हा पूर्व छपाई केलेली संलग्न कॉम्प्युटर स्टेशनरी खरेदी करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असलेले दरपत्रकधारक मे.राजा सेल्स कार्पोरेशन यांच्याकडून रु. ४१५/- प्रति हजार याप्रमाणे १,५०,०००/- नग स्टेशनरी खरेदी करण्यास तसेच सदर कामासाठी रक्कम रु. ६२,३२५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४२:**

सहाय्यक आयुक्त-२ औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९८९-९० या वर्षात महापालिकेस लागणाऱ्या कचरावाहू हातगाडया खरेदी

करावयाच्या आहेत.त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| कचरावाहू हातगाडया | १) मे.एम.एस.एस. | - ८७४=०० प्र.नग |
| मजुर चालवतील असे | आय.डी.सी. | |
| हँडल चाकावर सॉलिड रबर | २) मे.इन्शा हार्डवेअर | ८९९=०० प्र.नग |
| रिंग,४०x४०x५ एम.एम. | ३) मे.हरप्रित | १२३२=४० प्र.नग |
| अँगल फ्रेम,१८गेज शीट | इन्टरप्रायझेस | |

वरीलप्रमाणे निविदा धारकांनी निविदा सोबत दाखल केलेल्या हातगाडयांची तपासणी शहर अभियंता यांनी केलर असून त्याप्रमाणे त्यांनी मे. एम.एस.एस.आय.डी.सी.औरंगाबाद यांचेतर्फे खरेदीची शिफारस केली आहे.महानगरपालिकेस एकूण १३० नग हातगाडया खरेदी करावयाच्या आहेत.त्यासाठी मे.एम.एस.एस.आय.डी.सी.असे दरानुसार रक्कम रु. १,१३,६८५/- एवढा खर्च येईल.विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : स्थायी समितीने यापूर्वी दिलेल्या मंजुरीनुसार किती हातगाडया मागविण्यात आल्या होत्या? त्या गाडयांची आज काय परिस्थिती आहे? आणि या गाडया कोणत्या एजन्सी कडून मागविण्यात आल्या होत्या?याबाबत खुलासा व्हावा.

सहा.आयुक्त-२ : स्थायी समितीच्या मंजुरीप्रमाणे गतवर्षी ६० हातगाडया मागविण्यात आल्या होत्या.त्यापैकी खराब झालेल्या हातगाडया संबंधीत एजन्सीकडून विनामुल्य दुरुस्त करुन घेण्यात येत आहेत.दुरुस्तीसाठी पाठविलेल्या हातगाडया माहे डिसेंबर,१९८९ पर्यंत दुरुस्त होवून परत येतील असे एजन्सीने मान्य केले आहे.

श्री.प्रदीप जैस्वाल,श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.एकबालसिंग गील : स्थायी समितीने यापूर्वी मंजुर केलेल्या आकारमानाप्रमाणे हातगाडया पुरविण्यात आलेल्या नाहीत.या हातगाडयाच्या चाकांना रॉडची व्यवस्था नसल्यामुळे त्या वारंवार खराब होतात.अनेक हातगाडया नादुरुस्त असून परिणामी निकामी पडून आहेत.

श्री.मोरेश्वर सावे : नादुरुस्त हातगाडया डिसेंबर पर्यंत दुरुस्त करुन मिळणार असल्याने या गाडया दुरुस्त होऊन आल्यानंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हातगाडया खरेदी करण्यास मंजुरी देण्यात यावी.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : स.सभासंदांच्या सूचनेस माझी सहमती आहे.तेव्हा हातगाडया खरेदी संदर्भात नंतर विचार करण्यात यावा.

श्री.मोरेश्वर सावे : मंजुरीप्रमाणे ६० हातगाडया विभागीय कार्यालयास केंव्हा आणि किती प्रमाणात वितरण करण्यात आल्या? याचा खुलासा व्हावा.६० हातगाडया खरेदीस मंजुरी असली तरी प्रत्यक्षात ६० पेक्षा कमी हातगाडया आलेल्या आहेत आणि देयक मात्र ६० हातगाडयांचे दिलेले आहे.तेव्हा याची चौकशी व्हावी.

मा.सभापती : यापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या हातगाडया व कचराकुंडया अस्तित्वात आहेत किंवा नाहीत,खरेदी करण्यात आलेल्या हातगाडया व कचराकुंडया अस्तित्वात आहेत किंवा नाहीत,खरेदी करण्यात आलेल्या हातगाडया / कचराकुंडया व इतर स्वच्छतेचे साहित्य वाटप कसे झाले? मंजुरी निविदेतील आकारमानाप्रमाणे आहेत किंवा नाहीत,या हातगाडया /

कचराकुंडया यात तांत्रिक दोष काय आहेत? हातगाडयांच्या नमुन्याची शिफारस कुणी केली? खरेदीबाबतचे देयक कुणी तयार केले? इ.बाबतची संपूर्ण चौकशी जलगृह अभियंता श्री.यु.बी.देशमुख आणि मालमत्ता अधिकारी श्री.एन.ए.वाहुळ यांनी लेखाधिकारी श्री.सदाव्रते हयांचे मार्गदर्शनाखाली करुन अहवाल सादर करावा.

श्री.मिर्झा अन्वर बेग : यापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या हातगाडयांची चौकशी पूर्ण होण्यापूर्वी नविन हातगाडया खरेदी करण्यास मंजुरी दिली तर पूर्वी खरेदी केलेल्या हातगाडया चौकशीचे काम पूर्ण होणार नाही तेव्हा चौकशी पूर्ण झाल्यानंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन हातगाडया खरेदी बाबत विचार व्हावा.

श्री.मोरेश्वर सावे : हातगाडया खरेदीबाबत सभागृहापुढे ठेवण्यात आलेला प्रस्ताव अयोग्य आहे.या प्रस्तावात मागील खरेदी केलेल्या हातगाडयांचे वितरणाबाबतची माहिती असणे आवश्यक आहे.

शहर अभियंता : हातगाडया पुरवठासाठी तीन टेंडर प्राप्त झालेले आहेत.यापैकी एम.एस.एस.आय.डी.सी.ने बनवलेली गाडी योग्य वाटते.यात चाकाचे डायमीटर ३० से.मी.असून अँगल साईज ५ एम.एम.ऐवजी ४.५ एम.एम.ची आहे.तेव्हा ४.५ मीमी ऐवजी ५ मीमी अँगल साईज करुन घेण्यात यावी आणि चाकासाठी मजबूत ॲक्सल रॉड वापरण्यात यावा.

श्री.यादव अशोक सायन्ना : अधिकाऱ्यांनी केलेल्या खुलाशाची नोंद ठरावात नाही.नमुन्यासाठी दाखल केलेली हातगाडी निविदेतील अटीप्रमाणे नाही तरीही हातगाडी खरेदीचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला जात आहे.यावरुन सभागृहाची दिशाभूल केली जात आहे.असे स्पष्ट होते.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. १४३:**

टाटा १२१० चासीसवर फायर टेंडर बांधणे व फायर ब्रिगेडच्या ॲक्सेसरीज सोबत पुरवठा करणेच्या कामाकरीता निविदा पत्रके वसुल झालीत.त्यांचे आलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे.कन्सेन्ट इंजिनियर्स पुणे | रु. ३,०५,५९५=०० |
| २) मे.ओमगणेश आयर्न वर्क्स,कोल्हापूर | रु. २,६८,८०१=०० |
| ३)मे.महादेव आयर्न वर्क्स, कोल्हापूर | रु. २,४३,०००=०० |
| ४) एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद. | रु. २,६५,८०१=०० |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे मे.महादेव आयर्न वर्क्स,कोल्हापूर यांचे दरपत्रक असून ते रु. २,४३,०००/- चे आहे.मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाटा १२१० चासीसवर फायर टेंडर बांधणे व फायर ब्रिगेडच्या ॲक्सेसरीज सोबत पुरवठा करणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी

दराचे म्हणजे रु. २,४३,०००/- चे मे.महादेव आयर्न वर्क्स,कोल्हापूर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४४:**

वार्ड क्र. ४७ मो.कोकणवाडी येथील दगडी गटार दुरुस्त करणेबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १६,२८७/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने हे काम "अ-१" निविदे अंतर्गत उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घेण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४७ मो.कोकणवाडी येथील दगउी गटार दुरुस्त करणेच्या कामाकरीता रक्कम रु. १६,२८७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४५:**

वार्ड क्र. २४ मो.स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे दगडी गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १६,८००/- चे तयार करण्यात आलेले आहे.सदर अस्तित्वात असलेली गटार ही संपूर्णपणे तुटलेली आहे इतरत्र घाण व सांडपाणी वाहात राहून नविन गटार बांधणे जरुरी आहे.करीता सदरील काम "अ-१" निविदा अंतर्गत उपलब्ध गुत्तेदाराकडून करण्यात येईल.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २४ मो.स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता रक्कम रु. १६,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४६:**

वार्ड क्र. २५ मो.सरस्वती कॉलनी येथील जाधव कोचिंग क्लासेस जवळ गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १५,८००/- चे तयार करण्यात आले आहे.सदर ठिकाणी पावसाळयात पाणी साचते व येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना त्रास होतो.त्यामुळे ही गटार बांधणे जरुर आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २५ मो.सरस्वती कॉलनी येथील जाधव कोचिंग क्लासेस जवळ गटार बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. १५,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४७:**

वार्ड क्र.४ मो.दिलरस हौसिंग सोसायटी आशिफ बाग येथे १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १,१२,९८१/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील सोसायटीतील नागरिकांना रक्कम रु. ४,६१,४००/- एवढा विकास निधी जमा

करावयास सांगितले होते,परंतु प्रत्यक्ष ६६.४७ % विकास खर्च जमा झालेले आहे.(रु.३,०६,७२५/-) करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४ मो.दिलरस हौसिंग सोसायटी अशिफ बाग येथे १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. १,१२,९८१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. १४ दमडी महल भागातील महाराष्ट्र हौसिंग सोसायटी अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ४८,३६०/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १४ दमडी महल भागातील महाराष्ट्र हौसिंग सोसायटी अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु. ४८,३६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. ६ उध्दव पाटीलविद्यालय, छत्रीबाग येथे खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५५,१००/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ६ उध्दव पाटील विद्यालय,छत्रीबाग येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु. ५५,१००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. २७ अग्रसेन भवन ते बोहरी कठडा सराफा येथे खडी रस्ते करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ११,९८०/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२७ अग्रसेन भवन ते बोहरी कठडा सराफा येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु. ११,९८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,सिध्दार्थ उद्यानातील निल गायींच्या पिंजऱ्यात (display eage) दुभाजक तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु. १४,६२०/-चे सन १९८९-९० च्या सा.बां. खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च १९८९-९० वर्षाच्या भांडवली इमारती या सदरातून करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानातील निल गायींच्या पिंजऱ्यात दुभाजक तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु. १४,६२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चिकलठाणा येथील एम.आय.डी.सी.परिसरातील २५ चौकांमध्ये सोडीयम व्हेपर २५० वॅट फिटींगचा पुरवठा करणे व लावण्याच्या कामाकरीता रक्कम रु. २,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील एम.आय.डी.सी.परिसरातील २५ चौकांमध्ये सोडीयम व्हेपर २५० वॅट फिटींगचा पुरवठा करणे व लावण्याच्या कामाकरीता रक्कम रु. २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.यावर्षी तुर्त १२ चौकात रक्कम रु. १,००,०००/-च्या सोडीयम व्हेपरच्या फिटींगच लावण्यात याव्यात.

**विषय क्र. १५३:**

वार्ड क्र. ४६ समर्थनगर येथे बजरंग व्यायाम शाळेजवळ रिटेनिंग वॉल बांधणे व रस्ता रुंदीकरण करणे बाबतच्या कामा बाबतच्या कामासाठी अंदाजपत्र रक्कम रु. १,३४,५३०/- ला स्थायी समिती बैठक दिनांक २८-४-८९ रोजी ऐनवेळी मंजुरी प्राप्त झ ााली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण १० निविदा फॉर्म भरुन प्राप्त झाल्या.त्या उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) रविंद्रसिंग | २०.१० % | कमी |
| २) श्री.एस.एच.असोशिएटस | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३) // एल.एम.पडघन | १२ % | कमी |
| ४) // एन.जी.गुनवाणी | ११ % | कमी |
| ५) // थोरात एस.के. | २१ % | कमी |
| ६) // पॉल कन्स्ट्रक्शन | ११.९९ % | कमी |
| ७) // एस.नी.सदवणी | १४% | कमी |
| ८) // अन्सारी जी.एम. | २१.८६ % | कमी |
| ९) // प्रविण मजदूर संस्था | २३.१० % | कमी |
| १०) // आर.जी.बालचंदानी | ७.८६ % | जास्त |

श्री.प्रविण मजदूर संस्था यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा २३.१०% कमी दराचे आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ समर्थनगर येथे बजरंग व्यायाम शाळेजवळ रिटेनिंग वॉल बांधणे व रस्ता रुंदीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.१० % कमी दराचे श्री.प्रविण मजदूर संस्था, यांचे दरपत्रकास सर्वानंमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५४:**

वार्ड क्र. ४९ मधील भारतनगर को-आरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी सि.स.नं.९,शहानुरवाडी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ३७,७५०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र. ८ दि.८-६-८९ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदरच्या कामासाठी जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) अर्शद नोमी | ०.०१ % | कमी |
| २) के.बी.काल्डा | ६% | जास्त |
| ३) नवनित कन्स्ट्रक्शन | ७ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ठेकेदार श्री.अर्शद नोमी यांची आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४९ मधील भारतनगर को-आप हौसिंग सोसायटी सि.स.नं.९,शहानुरवाडी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराचे श्री. अर्शद नोमी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. ३९ येथे अभिनय टॉकीजच्या बाजुने मोंढयाकडे जाणाऱ्या ६० डी.पी.खडी रस्ता तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ७०,०६५ /- चे सन १९८९-९० च्या सा.बां. खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**संवाद :**

मा.सभापती : प्रत्येक प्रस्तावात वार्ड क्रमांक,कामाची लांबी / रुंदी इत्यादी बाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी असे यापूर्वी सुचविण्यात येवूनही आवश्यक माहिती प्रस्तावात नोंदविण्यात येत नाही.तेव्हा खर्च संबंधित अधिकाऱ्यांनी यापुढे वरील सविस्तर माहितीचा उल्लेख प्रस्तावात येईल याबाबत दक्षता घ्यावी.

**विषय क्र. १५६:**

शहर अभियंता,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सिध्दार्थ उद्यानातील अस्वलांच्या पिंजऱ्यात वाढ करुन मोठा करण्याचे कामासाठी सा.बां. खात्याच्या सन १९८८-८९ च्या मंजुर डी.एस.आर.प्रमाणे रक्कम रु. ३९,३३६/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानातील अस्वलांच्या पिंजऱ्यात वाढ करुन मोठा करण्याचे कामासाठी रक्कम रु. ३९,३६६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५७:**

वार्ड क्र. मो.बारापुल्ला कोतवालपुरा येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५६,५००/- चे तयार करण्यात आले असून सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने "अ-१" निविदेतहत सदर काम श्री. एस.एन. आनंद गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बारापुल्ला,कोतवालपुरा येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ५६,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता गुत्तेदार श्री.एस.एन.आनंद यांचेकडून "अ-१" निविदेतहत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५८:**

वार्ड क्र. २० मो.डावरे बिल्डींग ते अंजली पुलापर्यंत १५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३०,२००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी अद्यापही ड्रेनेज लाईन नाही.करीता नागरिकात अडचणी निर्माण झालेल्या आहेत.करीता सदर काम तातडीने करणे आवश्यक असून सदर काम "अ-१" निविदे अंतर्गत उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २० मो.डावरे बिल्डींग ते अंजली पुलापर्यंत १५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ३०,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५९:**

वार्ड क्र.१४ शहाबाजार येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३३,७००/- चे तयार करण्यात आलेले आहे.सदरील काम

करणे आवश्यक आहे.कारण सदरील १५० मीमी व्यासाच्या लाईनवर जास्त लोड असल्यामुळे सदर लाईन चोकअप होते.त्यामुळे नविन लाईन टाकणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १४ मो.शहाबाजार येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु.३३,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६०:**

वार्ड क्र. ६ मो.उमराव कॉलनी,गणेश कॉलनी जवळ १५० मीमी व्यासाची चिनी मातीची

ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १,३८,२२२/- ला स्थायी समिती ठराव क्र.१०९० दि.२०-४-८९ द्वारे मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी निविदा सूचना क्र.३/ ५३९४ /८९ दि.१६-६-८९ द्वारे निविदा मागविल्या असता एकूण तेरा निविदा विकण्यात आल्या असून केवळ आठ निविदा वसुल झालेल्या आहेत त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) महेमुद खान | २० % | कमी |
| २) मझरुल हक्क | २५ % | कमी |
| ३) मुस्ताफ अहेमद | २०.५ % | कमी |
| ४) पी.जे.तमखाने | १५.५५ % | कमी |
| ५) एम.एम.बेग | १८.९० % | कमी |
| ६) आनंद बिल्डर्स | २१.३ % | कमी |
| ७) बि.ए.काल्डा | १४.८६ % | कमी |
| ८) सुरेश बी.सदवाणी | १७ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २५ % कमी दराचे श्री. मझरुल हक्क यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ६ मो.उमराव कॉलनी,गणेश कॉलनी जवळ १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तुलनातमकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २५ % कमी दराचे श्री.मझरुल हक्क यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६१:**

वार्ड क्र. चैतन्यनगर अंतर्गत खडी रस्त्याचे काम करणेसाठी स्थायी समिती बैठक दि. २६-६-८९ ठराव क्र. ७० अन्वये रक्कम रु. १,०३,०००/- ला सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.सदरचे कामासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अब्दुल सलाम | २४.१०% | कमी |
| २) // अब्दुल वकील कुरेशी | २३.१ % | कमी |
| ३) // पी.जे.तमखाने | २२.७२ % | कमी |

| | | |
|---|---|---|
| ४) // सय्यद रफिकोद्दीन | २१५३ % | कमी |
| ५) // रविंद्रसिंग | १८.६० % | कमी |
| ६) // अन्सारी जी.एम.मुजताबा | १७.७८६ % | कमी |
| ७) // आनंद बिल्डर्स | १८ % | कमी |
| ८) // एस.एच.असोशिएटस | १५.७ % | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २४.१० % कमी दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चैतन्यनगर अंतर्गत खडी रस्त्याचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.१० % कमी दराचे श्री.अब्दुल सलाम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६२:**

सहाय्यक आयुक्त-२,औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, विनियम व उपविधीची पुस्तके छपाई करुन घ्यावयाची आहेत.त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | मे.श्री.मुद्रणालय | मे.लिबर्टी लॉ बुक वाईंडर्स अँड प्रिंटर्स |
|---|---|---|
| १) उपविधी मराठी / इंग्रजी छपाई | ७१.८० प्रति पेज | ६८.०० प्रति पेज |
| २) प्लॅस्टीक कव्हर | ९.९० प्रति नग | ९.०० प्रति नग |
| ३) वायंडीग चार्जेस | १२.७० प्रति पुस्तक | ११.०० प्रति पुस्तक |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्त्यात मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर्स ॲण्ड प्रिंटर्स यांचे दर कमी आहेत.उपविधीची १०० पुस्तके छपाई करुन घ्यावयाची आहेत.करीता उक्त कमी दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६३:**

वार्ड क्र. १३ गणेश कॉलनी ते एस.टी.कॉलनी पुलापर्यंत नाल्यातील ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे बाबतच्या निविदेस स्थायी समितीचा ठराव क्र. ४५८ / ३ दि.२१-१०-८९ नुसार सदर काम श्री.एस.जी.पहिलाजानी,गुत्तेदार यांचेमार्फत अंदाजपत्रकाच्या दरपेक्षा २४.९० % कमी दराने करुन घेण्यास मंजुरी मिळाली होती.

परंतु संबंधित गुत्तेदार काम करण्यास तयार नसल्याने त्यांचे १ % अनामत रक्कम जप्त करुन सदर काम दुसऱ्या क्रमांकावर असलेले गुत्तेदार श्री. शेख शरीफ यांचेमार्फत त्यांनी निविदेत दर्शविल्याप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकाच्या २१ % कमी दराने तयार आहात काय याबाबत खुलासा मागविण्यात आला होता.परंतु संबंधीताने खुलासा केलेला नसल्याने सदर काम तिसऱ्या क्रमांकावर असलेले गुत्तेदार श्री.सुखवीर सिंग यांनी त्यांनी दर्शविलेल्या दराप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकाच्या १८ % कमी दराने काम करण्यास तयार आहात काय याबाबत खुलासा घेतला असून सदर गुत्तेदाराने काम करावयास मान्य केलेले आहे.

करीता सदर काम अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८ % कमी दराने श्री.सुखबीरसिंग गुत्तेदार यांच्या मार्फत करुन घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र. १६४:**

वार्ड क्र. ४ मो.आरिफ सोसायटी अशिफ बाग घाटी येथे प्लॉट नं. ८९ ते सोसायटीच्या मोकळया जागेपर्यंत ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ८०,६७५/- चे तयार करण्यात आले असून सदर सोसायटीने एकूण विकास खर्चाची रक्कम रु. ८,१६,१४८=७५ कार्यालयात जमा केलेली आहे तसेच सदर काम तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस्तव सादर करण्यात येत असून सदर काम बी-१ लघु निविदा मागवून करण्यात येईल.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४ मो.आरिफ सोसायटी अशिफ बाग घाटी येथे प्लॉट नं. ८९ ते सोसायटीच्या मोकळया जागेपर्यंत ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेकरीता रक्कम रु. ८०,६७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६५:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. २५ मधील मो.सरस्वती कॉलनी येथे १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३९,७५२/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २५ मधील मो सरस्वती कॉलनी येथे १०० मीमी व्यासची जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ३९,७५२/- च्या अंदाजिपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २५-८-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा वृत्तांत. शुक्रवार दि.२५ ऑगस्ट,१९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृह येथे मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दीष्ट स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री.अलफखान हुसेनखान | सदस्य |
| २) | --//-- गिल इकबालसिंग प्रितमसिंग | // |
| ३) | --//-- घडामोडे मोतीराम नारायणराव | // |
| ४) | --//-- जैस्वाल प्रदीप शिवनारायण | // |
| ५) | --//-- नवपुते कचरु चंद्रभान | // |
| ६) | --//-- पंडागळे रतनकुमार नारायणराव | // |
| ७) | --//-- मगर शंकर जिजाराम | // |
| ८) | --//-- मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | // |
| ९) | --//-- यादव अशोक सायन्ना | // |

**विषय क्र. १६६:**

दिनांक १९,ऑगस्ट,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल,श्री.अशोक सायन्ना,श्री.कचरु नवपुते : महानगरपालिका संचलित जकात विभागात भ्रष्टाचार व अनागोंदी चालू असल्या बाबतचे सा.चपराक या वृत्तपत्रात वृत्त प्रसिध्द झाले आहे.पुराव्या शिवाय उघडपणे वृत्तपत्रात बातमी छापली जाणे शक्य नाही.तेव्हा हे वृत्त चुकीचे असेल तर संबंधीत वृत्तपत्र व्यवस्थापनावर कार्यवाही करणे शक्य आहे याबाबत कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

विधी सल्लागार : सा.चपराक मध्ये प्रसिध्द झालेल्या जकात विभागासंबंधीच्या वृत्ताबाबत संबंधीत वृत्तपत्राचे संपादकांना नोटीस देण्यात आली आहे.दिलेल्या नोटीस बाबत त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झालेला नाही.

श्री.रतनकुमार पंडागळे : विधी सल्लागार यांचे सुचनेप्रमाणे नोटीस बाबत खुलासा आल्या नंतर त्यावर विचार करणे सोयीचे होईल.

मा.सभापती : महापालिका प्रशासनाच्या संबंधाने वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या चुकीचे वृत्ताबाबत योग्य तो खुलासा करण्याचे काम जनसंपर्क अधिकारी यांचे आहे.यापुर्वीही प्रसिध्द झालेल्या चुकीच्या वृत्ताबाबत जनसंपर्क अधिकारी यांना खुलासा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.आवश्यक त्या सूचना देण्यात येवूनही जनसंपर्क अधिकारी यांनी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्या बाबत खुलासा केलेला नाही व आज सभागृहात उपस्थित नाहीत.अशा अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करावी.याशिवाय प्रसिध्द झालेल्या वृत्ताबाबत मा.आयुक्त व लेखाधिकारी यांचेशी चर्चा करण्यात येईल.

लेखाधिकारी : शहरात आयात होणाऱ्या मालावर महापालिकेला दररोज सरासरी १.९३ लाख चा महसूल मिळतो.याशिवाय औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांचे लेखे तपासणीचे आदेश जकात निरीक्षकांना दिले आहेत.

श्री.मिर्झा अन्वर बेग : नुर भागातील खांडकीचे काम अर्धवट स्थितीत आहे.झोन नं. १मध्ये आठ लाख रुपयाचे दुरुस्तीच्या कामासाठी टेंडर मागविण्यात आले.

नुर कॉलनी भागातील खांडकीचे काम अर्धवट आहे.झोन नं. १ मध्ये दुरुस्तीच्या कामाकरीता लाखो रुपयांचे निविदा मागविण्यात आल्या.परंतु झ ोन नं. १ मध्ये दुरुस्तीचे काम अर्धवट स्थितीत सोडले.

श्री.प्रदीप जैस्वाल : जीप क्रमांक १६४५ चे गैरवापराबाबत चौकशीचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : वाहन चालक आणि प्रभारी उपशिक्षण अधिकारी यांनी परस्पर विरोधी केलेल्या तक्रारींची चौकशी मा.उपआयुक्त हे करीत असल्याचे समजते.

श्री.यादव अशोक सायन्ना : विषय क्र. ३२ प्रमाणे चिकलठाणा येथील काम बंद करण्यासंबंधी तसेच ते तांत्रिकदृष्टया योग्य नसल्याने कॉलीटी कन्ट्रोलला पत्र लिहून हया कामाची शहानिशा करुन घेण्याची कार्यवाही व्हावी.अशी मागणी सर्वानुमते करण्यात आली होती याचा खुलासा व्हावा.

शहर अभियंता : कॉलीटी कन्ट्रोलला बांधकामासंबंधीचे पत्र लिहीण्यात आलेले नाही.संबंधीत कामाचे गुत्तेदार यांना मात्र काम बंद करण्याकरीता रजिस्टर पोस्टाने पत्र दिलेले आहे.

श्री.अशोक सायन्ना : अजुनही चिकलठाणा येथील वादग्रस्त इमारतीचे बांधकाम चालू आहे.तेव्हा पत्र केव्हा लिहीले याचा खुलासा व्हावा व प्रत्यक्ष जावक रजिस्टर सभागृहात आणून पत्र पाठविण्याची पोच पावकी दाखविण्यात यावी अशी मागणी केली.

मा.सभापती : संबंधीत जावक रजिस्टर दाखल करावे असे आदेश दिले.

सहाय्यक आयुक्त : यांनी आदेशाच्या ३५ मिनिटानंतर सदर जावक रजिस्टर स्वतः जावून घेवून आलो व सभागृहात दाखल केले.

श्री.अशोक सायन्ना : रजिस्टर पाहून म्हणालो की, अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती चूक आहे.यापुर्वी हे काम बंद करण्यात आलेले नसून आज हया संबंधीची चर्चा होत असतांनाच संबंधितांशी आजच हे पत्र रजिस्टर पोस्टाने पाठविले आहे. म्हणूनच मागणी केल्यानंतर देखिल ३५ मिनिटे जावक रजिस्टर सभागृहात उशीरा आले.शहर अभियंता हे सभागृहाची दिशाभूल करीत असून तांत्रिकदृष्टया योग्य नसणाऱ्या बांधकाम करणाऱ्या गुत्तेदारास पाठीशी घालीत आहोत याची चौकशी व्हावी.

मा.सभापती : मा.आयुक्त आल्यानंतर या संबंधीची चौकशी केली जाईल,तेव्हा तसेच हया संबंधी क्वालीटी कंन्ट्रोलला ताबडतोब पत्र देण्यात यावे.

श्री.प्रदीप जैस्वाल : भांडार अधिकाऱ्याने हातगाडया दुरुस्ती करण्यासाठी मागच्या बैठकीत सांगितले होते.प्रत्यक्षात मात्र त्या गाडया रेल्वे स्टेशन झोन मध्ये पडून आहेत.या सभागृहाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : हातगाडया,कुंडया व इतर सफाईच्या वस्तुंची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.त्यांनतर सभासदाच्या मागणीचा विचार होईल.

स.सभासदांच्या मागणी नुसार क्रमांक १४५,१५१,१५६,१५८,१५९ या कामांकरीता अे-१ मागविण्याची परवानगी देण्यात येते.

कामांसाठी टेंडर मंजुर असुनही हया शिवाय वार्ड क्र.२० मध्ये कामे केली जातात या बाबत तक्रार केली असता चालू काम आहे त्या स्थितीत सोडून देण्यात आले आहे,व सदर गुत्तेदाराने दुसरीकडे काम करण्यास सुरुवात केली आहे.

उप अभियंता (स्लम) : नुर कॉलनी येथे मंजुरी नुसार खांडकीचे काम केले आहे.सदर काम पूर्ण झाल्याबाबत गुत्तेदाराने लेखी कळविले आहे.

मा.सभापती : स.सभासद,श्री.अन्वर बेग हयांना सदर काम दाखवून पुढील काम सुरु करावे.

चिकलठाणा येथील कामाबाबत अद्याप पर्यंत क्वॉलिटी कंट्रोलला पत्र लिहिण्यात आले नसल्याचे कळते.या शिवाय मागील सभेमध्ये हातगाडया दुरुस्तीसाठी दिल्याची माहिति अधिकाऱ्यांनी सभागृहात दिली होती.परंतु प्रत्यक्ष झोनमध्ये जुन्या गाडया इतस्तत: पडून असल्याचे दिसून येते.ही माहिती देवून भांडार अधिकाऱ्याने तेव्हा जुन्या गाडया दुरुस्तीला देण्यात आल्या आहेत.अशी माहिती देवून अधिकाऱ्यांनी सभागृहाची दिशाभूल केल्याचे सिध्द होते.

**ठराव :**

दिनांक १९-८-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६७:**

महानगरपालिकेच्या कार रिपेअर्स करण्याच्या कामासाठी निविदा पत्रके बोलावली असता फक्त एकच निविदा पत्रक वसुल झाले असून ते मे. लेटेस्ट मोटर गॅरेज,औरंगाबाद हयांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७ % कमी दराचे आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कार रिपेअर्स करण्याच्या कामासाठी मे.लेटेस्ट मोटर गॅरेज,औरंगाबाद हयांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७ % कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६८:**

विविध प्रकारच्या वाहनांचे सिट,कुशन,टॉपअड,कॅबिन टॉपच्या कामासाठी वार्षिक करार करण्याच्या कामासाठी सन १९८९-९० हया वर्षासाठी वार्षिक करार करावयाच्या कामासाठी निविदा पत्रके बोलावली असता एकूण दोन निविदा पत्रके वसुल झालीत,ती खालीलप्रमाणे (अ) मे.परमार ॲटो गॅरेज,औरंगाबाद.

१) टॉपअड ट्रॅक्टरचे रु. ६००/- २) कॅबिन टॉप मटेरियलसह मेटॅडोर रु. ११५०/-,महेंद्रा मिनी ट्रक रु. १२००/-,प्रिमियर पी-४ रु. १३००/-,प्रिमियर पी-६ रु. १३००/-,फायर ब्रिगेड वाहन रु. १५००/-,३) सिट कुशनिंग रेक्झीन रु. ९०/- प्रति मिटर,२ १/२" फोम रु. ४६/- प्रति मिटर,२ १/२" फोम रु. ३५/- प्रति मिटर,काथा रु. १२/- प्रति किलो,स्कृपिन रिबेड ४५/-,जिप कुशन करण्याचे लेबर चार्ज रु. ४००/- ट्रक टॅक्टरचे रु. ३५०/-,जिपला क्लॉथ कव्हर शिवून बसविणे रु. ८७०/-

२) (ब) मे.याकुब मोटर गॅरेज,औरंगाबाद.

१) जिप टॉपअड नविन शिवून बसविणे रु. १७००/- २) कॅबिन टॉप मटेरियलसह टाटा टिप्पर,ट्रॅक्टर रु. १५००/-,टाटा कॉम्पॅक्टर रु. १९५०/-,विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारच्या वाहनांचे सिट,कुशन,टॉपअड,कॅबिन टॉपच्या कामासाठी मे. परमार ॲटो गॅरेज,औरंगाबाद आणि मे.याकुब मोटार गॅरेज,औरंगाबाद यांचे खालील दर्शविलेल्या दराचे दरपत्रकाप्रमाणे वार्षिक करारावर काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(अ) मे.परमार ॲटो गॅरेज,औरंगाबाद.

३) टॉपअड ट्रॅक्टरचे रु. ६००/- २) कॅबिन टॉप मटेरियलसह मेटॅडोर रु. ११५०/-,महेंद्रा मिनी ट्रक रु. १२००/-,प्रिमियर पी-४ रु. १३००/-,प्रिमियर पी-६ रु. १३००/-,फायर ब्रिगेड वाहन रु. १५००/-,३) सिट कुशनिंग रेक्झीन रु. ९०/- प्रति मिटर,२ १/२" फोम रु. ४६/- प्रति मिटर,२ १/२" फोम रु. ३५/- प्रति मिटर,काथा रु. १२/- प्रति किलो,स्कृपिन रिबेड ४५/-,जिप कुशन करण्याचे लेबर चार्ज रु. ४००/- ट्रक टॅक्टरचे रु. ३५०/-,जिपला क्लॉथ कव्हर शिवून बसविणे रु. ८७०/-

४) (ब) मे.याकुब मोटर गॅरेज,औरंगाबाद.

१) जिप टॉपअड नविन शिवून बसविणे रु. १७००/- २) कॅबिन टॉप मटेरियलसह टाटा टिप्पर,ट्रॅक्टर रु. १५००/-,टाटा कॉम्पॅक्टर रु. १९५०/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९:**

वार्ड क्र. ४६ मो.समर्थनगर येथील हनुमान मंदिरा पासून मुक्ती सोपान पर्यंत दगडी चैनल बांधणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १,७४,२००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील ठिकाणी वाहणारे सांडपाणी याचा नागरिकांना होणारा त्रास दुर होण्या करीता सदर ठिकाणी दगडी चैनल बांधणे आवश्यक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ४६ मो.समर्थनगर येथील हनुमान मंदिरापासून मुक्ती सोपान पर्यंत दगडी चैनल बांधणे बाबत तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,७४,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७०:**

वार्ड क्र. २८ मो.शहागंज येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ९४८०/- दि.२१-३-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी दि. १६-५-८९ सूचना क्र.२ / ४०५ द्वारे "अ-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा वसूल झाल्या आहेत, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | आजमखान | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | कैसर खान | २ % जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. आजम खान यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २८ मो.शहागंज येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.आजम खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७१:**

जिन्सी वॉटर वर्क्स पंप हाऊस मधील जुने पंप काढुन त्या जागी जास्त डिस्चार्जचे ४० अश्व शक्तीचे किर्लोस्कर कंपनीचे दोन पंपसेट बसवणे,दोन ए.टी.एल.स्टार्टर,१०० के.व्ही.ए.चे ट्रान्सफार्मर सी.टी.पी.टी. युनिट,डी.पी.स्ट्रक्चरचे इरेक्शन हया सर्व कामासाठी रक्कम रु. ३.७५ लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मंजुरी मिळावी तसचे वॉटर सप्लाय मशिनरीशी संबंधीत तातडीचे काम असल्यामुळे हया कामासाठी निविदा पत्रके बोलावण्यात आली असता खाली दर्शविल्याप्रमाणे कमी दर आले आहेत.त्या एजन्सीचे कमी असलेले दर खालील तक्त्यात दर्शविले आहेत.

| टे.क्र. | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय किंमत | कमी दराची एजन्सी | भरलेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | ४० हॉर्स पॉवरचे किर्लोस्कर कंपनीचे २ मोटार पंप सेट २ नग | १,३०,०००/- | मे.इंडस्ट्रीयल सेल्स कार्पो.औरंगाबाद | १,२१,९००/- |
| २ | ए.टी.एल.स्टार्टर २ नग | ८०,०००/- | मे.इंडस्ट्रीयल सेल्स कार्पो.औरंगाबाद | ७१,८००/- |
| ३ | १०० के.व्ही.ए.ट्रान्सफार्मर १ नग | ७५,०००/- | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ७४,९१०/- |
| ४ | सि.टी.पी.टी.युनिट | १७,०००/- | --//-- | १७,०००/- |
| ५ | डी.पी.स्ट्रक्चर व १ ते ४ चे इरेक्शन काम टेस्टींग ट्रायलसह | ७३,०००/- | --//-- | ७९,५५९=५० |
| | एकूण | ३,७५,०००/- | एकूण | ३,६४,१६९=५० |

वरीलप्रमाणे कमी दराच्या ज्या त्या एजन्सीच्या कामास मंजुरी मिळावी.तसेच हे काम कॅपिटल वर्क्सचे असल्यामुळे हयावर होणारा खर्च "कॅपिटल अकौंट" वॉटर सप्लाय" हया सदराखाली ठेवलेल्या रकमेतून करण्यास मंजुरी मिळावी.एकूण १ ते ५ पर्यंतच्या कामासाठी होणाऱ्या रक्कम रु. ३,६४,१६९=५० च्या खर्चास मंजुरी मिळावी.

**संवाद :**

मा.सभापती : प्रस्तावात दर्शविलेले साहित्य खरेदी करतांना सदर साहित्य योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र शहर अभियंता यांनी प्रमाणित करावे.सदर साहित्य निकृष्ट दर्जाचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येंईल.तसेच नियमांची वैधानिक पुर्तता होते किंवा कसे हयावर लेखाधिकारी हयांनी दक्षता घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १०० क्र.व्ही.ए. ट्रान्सफार्मर खरेदीची कार्यवाही तुर्त स्थगित ठेवण्यात येवून अ.क्र.१ व२ आणि ४व ५ मध्ये दर्शविलेले साहित्य खालील दर्शविलेल्या एजन्सीकडून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दराप्रमाणे खरेदी करण्यास एकूण रक्कम रु. ३,६४,१६९=५० च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| टे.क्र. | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय किंमत | कमी दराची एजन्सी | भरलेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | ४० हॉर्स पॉवरचे किर्लोस्कर कंपनीचे २ मोटार पंप सेट २ नग | १,३०,०००/- | मे.इंडस्ट्रीयल सेल्स कार्पो.औरंगाबाद | १,२१,९००/- |
| २ | ए.टी.एल.स्टार्टर २ नग | ८०,०००/- | मे.इंडस्ट्रीयल सेल्स कार्पो.औरंगाबाद | ७१,८००/- |
| ३ | १०० के.व्ही.ए.ट्रान्सफार्मर १ नग | ७५,०००/- | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ७४,९१०/- |
| ४ | सि.टी.पी.टी.युनिट | १७,०००/- | --//-- | १७,०००/- |
| ५ | डी.पी.स्ट्रक्चर व १ ते ४ चे इरेक्शन काम टेस्टींग ट्रायलसह | ७३,०००/- | --//-- | ७९,५५९=५० |
| | एकूण | ३,७५,०००/- | एकूण | ३,६४,१६९=५० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२:**

वार्ड क्र.५८ येथील उल्का नगरी (गारखेडा) अंतर्गत खडी रस्त्याचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. २८ दि. ८-६-८८ अन्वये रक्कम रु. २,९०,६२०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. २ दि. ४-७-८९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.मंजितसिंग २७.२५ % कमी
२) श्री.मोहम्मद सलीम २६.१ % कमी
३) श्री.आनंद बिल्डर्स २१ % कमी
४) श्री.पी.जे.तमखाने १९.९९ % कमी
५) श्री.एस.ए.नवाब १९.१९ % कमी
६) श्री.एस.एच.असोसिएटस १५.७ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२५ % कमी दराची श्री.मंजितसिंग यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५८ येथील उल्कानगरी (गारखेडा) अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२५ % कमी दराची श्री. मंजितसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७३:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १ मधील भावसिंगपुरा स.नं.२६ येथे ८० मीमी व १०० मीमी व १५० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या

कामासाठी रक्कम रु. १,७७,५००/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र. १९ दि. २९-६-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदरील कामसाठी क्र. १८४७ दि. २०-६-८९ अन्वये तिसऱ्यांदा जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली.ती ठेकेदार श्री.एस.बी.साधवानी यांची असून अंदाजपत्रकीय दराची आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ मधील भावसिंगपुरा स.नं. २६ येथे ८० मीमी व १०० मीमी व १५० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय दराचे श्री. एस.बी. साधवानी,ठेकेदार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७४:**

वार्ड क्र.४९ रमानगर येथे समाजमंदिर बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. ८-६-८९ ठराव क्र. २९ अन्वये रक्कम रु. १,३६,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यात सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा होती.परंतु दि. ८-६-८९ च्या स्थायी समितीमध्ये आणखी दर कमी करण्यासाठी वाटाघाटीसाठी गुत्तेदारास कळवावे असे सर्वानुमते ठरले.सबब दि. १६-६-८९ प. क्र. १५३ अन्वये गुत्तेदारास वाटाघाटीसाठी पत्र दिले असता गुत्तेदाराने दि. २१-६-८९ अन्वये सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दराऐवजी ०.५ % कमी दराने करण्यास लेखी संमती दर्शविली आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४९,रमानगर येथे समाजमंदिर बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५ % कमी दराचे गुत्तेदार,श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७५:**

वार्ड क्र. १८ मो.कबाडीपुरा येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. २२,२१०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. १८ / दि. २१-३-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी दि. १६-५-८९ सूचना क्र. ४०५ अन्वये "अ-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा वसूल झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १) अन्सारी जी.एम. | १० % जास्त |
| २) एस.ए.वाहोदीन | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी दराचे म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री.एस.ए.वाहोदीन यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. १८ मो.कबाडीपुरा येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार,श्री.एस.ए.वाहोदीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७६:**

वार्ड क्र. ३६ मो.तेलंगवाडा,जिन्सी येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ९,८८७/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. २० / १०१२ / दि. २१-३-

८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. २ / मनपा / युजिडी / ४०५ / दि. १६-५-८९ द्वारे "अ-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता फक्त एकच निविदा वसूल झाली. ती श्री. मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांची असून दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२ % कमी आहेत.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३६,मो.तेलंगवाडा,जिन्सी येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करणे बाबत ०.०२ % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे गुत्तेदार श्री. मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १७७:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ४ मधील श्रेयनगर जवळील मंजुर रेखांकन सि.टी.स.नं.१६०३१ स.नं. ४६ येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी १५० मीमी व १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु.६२,६४०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. २ दि. ८-६-८९ अन्वये मंजुरी मिळाली आहे.

सदर कामासाठी जाहीररित्या निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे निविदा पत्रके प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) दिलीप जैस्वाल | २३ % | कमी |
| २) अर्शद नोनी | १६ % | कमी |
| ३) के.बी.काल्डा | १२.९९ % | कमी |
| ४) लक्ष्मी कन्स्ट्रक्शन | १२.७५ % | कमी |
| ५) बी.एम.काथार | ८ % | कमी |
| ६) नवनीत कन्स्ट्रक्शन | ७.५ % | कमी |
| ७) सजनानी कन्स्ट्रक्शन | २.१५ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३ % कमी दराची श्री. दिलीप जैस्वाल यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४८ मधील श्रेयनगर जवळील मंजुर रेखांकन सि.टी.स.नं.१६०३१ स.नं. ४६ येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी १५० मीमी १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३ % कमी दराचे श्री. दिलीप जैस्वाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७८:**

वार्ड क्र. ७ मधील लेखाभवन समोर १०० मीमी व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ३५,७९८/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ५६ दि. १७-६-८९ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदर कामासाठी जाहीररित्या निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) आर.एम.मैत्री | १५.५ % | कमी |
| २) अर्शद नोमी | १० % | कमी |
| ३) मो.इसाक मो.हुसेन | ८.५ % | कमी |
| ४) सजनानी कन्स्ट्रक्शन | १.४६ % | कमी |

५) बी.एम. काथार ८ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५ % कमी दराची श्री.आर.एम.मैत्री यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ७ मधील लेखाभव समोर १०० मीमी व्यासाची ऐ.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५ % कमी दराची श्री.आर.एम.मैत्री यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७९:**

वार्ड क्र. ४ मधील घाटी येथे श्री.गंगावणे यांच्या घरापासून ते मुख्य जलवाहीनी पर्यंत १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. १७,३००/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र. ५७ दि. १७-६-८९ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदर कामासाठी जाहीररित्या निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

१) दिलीप जैस्वाल अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३ % कमी

२) डी.एच.राजपूत ७ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३ % कमी दराची श्री.दिलीप जैस्वाल यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४ मधील घाटी येथे श्री.गंगावणे यांच्या घरापासून ते मुख्य जलवाहीनीपर्यंत १०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३ % कमी दराचे श्री. दिलीप जैस्वाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८० :**

वार्ड क्र. १ मधील भीमनगर (भावसिंगपुरा) येथे श्री.डांगे यांचे घराजवळ ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ९,५००/- चे तयार करण्यात आले आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ भीमनगर (भावसिंगपुरा) येथे श्री.डांगे यांचे घराजवळ ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८१ :**

वार्ड क्र. ४९ मधील नाथनगर येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या रक्कम रु.८,०७०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. २०२ दि. ११-८-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदर कामासाठी जाहीररित्या निविदा (पाईपसह) मागविण्यात आल्या असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली असून ती ठेकेदार श्री.अर्शद नोमी यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५ % जास्त दराची आहे.

ठेकेदार श्री. नोमी यांनी दि. २५-५-८९ रोजी लेखी अर्ज देऊन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असल्याचे लिहीले आहे.सदरील कामासाठी आवश्यक असणारे पाईप जॉईंट कार्यालयातर्फे पुरवठा करण्यात येणार आहे.

तेव्हा श्री.अर्शद नोमी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस्तव सादर.(सदरील कामात मजुरीची रक्कम रु. ३,०३६/- ) इतकी आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४९ मधील नाथनगर येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेचे काम ठेकेदार श्री. नोमी यांनी लेखी दिल्याप्रमाणे त्यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८२ :**

वार्ड क्र. १६ मधील हर्षनगर भागात ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १०,९००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील कामात साहित्य मनपातर्फे पुरवठा केल्या जाणार आहे.साहित्याची किंमत वजा जाता मजुरीची किंमत रु. ४,९९३/- इतकी आहे.अत्यंत तातडीचे स्वरुपाचे काम असल्याकारणाने निविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री. उत्तम सरादे यांचे मार्फत "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने सदरचे काम करुन घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १६ हर्षनगर भागात ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. १०,९००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्याकारणाने उपलब्ध गुत्तेदार श्री.उत्तम सरादे यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने "अ-१" नमुन्यावर करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८३:**

वार्ड क्र. १ मधील पडेगांव कत्तलखाना येथे पाणी पुरवठा व्यवस्था करणेस्तव विविध कामे करणेचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,६९,३७५/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१ मधील पडेगांव कत्तलखाना येथे पाणी पुरवठा व्यवस्था करणेस्तव विविध कामे करणेसाठी रक्कम रु. २,६९,३७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८४:**

जलगृह अभियंता यांनी सन १९८९-९० वर्षाकरीता सी.आय.स्पेशल्स खरेदी करण्यासाठी रक्कम रु. ४,१०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

मा.आयुक्त यांच्या दि. २७-६-८९ च्या आदेशानुसार सी.आय.स्पेरॉल्स खरेदी करण्यासाठी निविदापत्रक क्र. १९१३ / ८९ दि. २९-६-८९अन्वये दरपत्रके मागविण्यात आली

असता फक्त एक निविदा एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांची प्राप्त झाली त्यांचा दर खालीलप्रमाणे आहे.

१) मे.एम.एस.एस.आय.डी.सी.,औरंगाबाद

अ) ८० मीमी ते ३०० मीमी सी.आय.स्पेशल्स — १२.६० प्रति किलो

ब) १०० मीमी च्या पुढील ४५० मीमी पर्यंत — १३.९० प्रति किलो

तरी रक्कम रु. ४,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास व रक्कम रु. १२.६० प्रति किलो व रु. १३.९० प्रति किलोच्या एम.एस.एस.आय.डी.सी.औरंगाबाद यांच्या दरास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० या वर्षाकरीता आवश्यक असलेले सी.आय स्पेशल खरेदी करीता रक्कम रु. ४,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास आणि ८० मीमी ते ३०० मीमी सी.आय.स्पेशल करीता रक्कम रु. १२.६० प्रति किलो व १०० मीमी च्या पुढील ४५० मीमी पर्यंतचे रक्कम रु. १३.९० प्रति किलो या दराने मे.एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५:**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की,मोहल्ला इंदिरानगर वार्ड क्र. ३२ येथील सर्व भागातील मलवाहीनी नादुरुस्त झाली असल्यामुळे लाईन चोकअप होवून दुर्गंधी नेहमी पसरत असते.त्याकरीता सदरील लाईनची दुरुस्ती करणे व काही ठिकाणी नविन

**संवाद :**

मा.सभापती : इंदिरानगर बायजीपूरा भागात व इतर स.नं.२०,२५,३० मध्ये मलवाहीनीच्या कामासाठी रु.७ लाखाचे खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.परंतु प्रत्यक्षात मलवाहीनी टाकण्याचे काम झाले नाही आणि सदर कामाचे देयक हस्तांतर करण्यात आले अशी संबंधीत गुत्तेदाराची तक्रार आहे.याबाबत उप अभियंता स्लम यांनी चौकशी करुन सविस्तर माहिती पुढील सभेत सादर करावी. याशिवाय स.सभासद श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.शंकरराव मगर श्री.यादव अशोक सायन्ना यांनी सदर भागास प्रत्यक्ष भेट द्यावी आणि मलवाहीनीचे कामाबाबत त्या परिसरातील नागरिकांशी चर्चा करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला इंदिरानगर वार्ड क्र. ३२ येथील सर्व भागातील नादुरुस्त मलवाहीनी लाईनची दुरुस्ती करणे व काही ठिकाणी नविन १५० मीमी व्यासाची एस.डब्ल्यू.जी.पाईप लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु.४,४२,१५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८६:**

सहाय्यक आयुक्त-२ औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९८९-९० मध्ये महापालिकेस लागणारे किटकनाशक औषधी खरेदी करावयाची

आहे.त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सहा निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | बी.एस.सी. पावडर ५०% किलोची बॅग | नोव्हान सीबा कंपनी | सिन्टेटिक फिनेल | स्पेंटड फिनेल | लिक्वीड सोप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.श्री.केमिकल्स | - | - | १०.५० | ३३.०० | ८.७० |
| २ | मे.एस.एन.एस.फार्मास्युटीकल्सा | - | - | १२.८५ प्र.लि. | १०.०० प्र.लि. | ६.०० प्र.लि. |
| ३ | मे.अभिनव केमिकल्स | - | - | ११.०० प्र.लि. | ११.८०प्र.लि. | ५.००प्र.लि. |
| ४ | मे. देशकेम प्रॉडक्टस | - | - | १६.५० प्र.लि. | ११.८०प्र.लि. | ५.००प्र.लि. |
| ५ | मे.गुंजाळ ट्रेडींग कं. | ११.०० प्र.बॅग | २१५.००प्रलि. | | | |
| ६ | मे.जे.के.इन्टरप्रादजेस | ९८.०० प्र.बॅग | - | ११.४८ प्र.लि. | | |

**संवाद :**

श्री.मोतीराम घडामोडे : किटक नाशक खरेदीबाबत श्री.केमिकल्स यांनी अभिनव केमिकल्स बाबत केलेली तक्रार रास्त आहे.नियमाप्रमाणे एकाच कामाचे दरपत्रकात दोन दर देता येणार नाहीत अशी अट आहे.आणि संबंधीत एजन्सीने दोन दर दिलेले आहेत.याच अटीनुसार अभिनव केमिकल्स यांचे दरपत्रक रद्द करण्यात यावे.(पत्रक सभापतीकडे हस्तांतर केले)

लेखाधिकारी : किटकनाशक खरेदीची संचिका मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही. तरीपण अटी असलेले दरपत्रक मंजूर करता येत नाही,असा दंडक आहे.

मोतीराम घडामोडे : गेल्या तीन वर्षापासून फिनेल खरेदीबाबत मे. अभिनव केमिकल्स यांचेच दरपत्रक मंजूर व्हावे असा सहेतुक प्रयत्न होत आहे.फिनेल खरेदी बाबत मागील तीन वर्षात वसूल झालेल्या दरपत्रकाचे दराबाबतचा तक्ता वाचून दाखवला या प्रकरणात बऱ्याच मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असावा,असा माझा जाहीर आरोप आहे.तेव्हा फिनेल खरेदीबाबतच्या मागील तीन वर्षातील फिनेल खरेदी अंतर्गत प्रकरणाची चौकशी करण्यात यावी व हया फिनेल खरेदीच्या प्रकरणात भ्रष्टाचार आढळून न आल्यास मी स्थायी समितीच्या सदस्य पदाचा राजीनामा देईन.निजाम बंगला येथील प्रयोगशाळेत फिनेलच्या नमुन्याची तपासणी होवू शकत नाही तसा अधिकार या प्रयोगशाळेला नाही.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : ५० % पेक्षा कमी प्रतवारी असलेले बी.एच.सी.पावडर खरेदी करण्यात येवू नये.

आरोग्य वैद्य.अधिकारी : निजाम बंगला येथील प्रयोगशाळा शासकीय आहे आणि या प्रयोगशाळे व्यतिरिक्त इतर ठिकाणावरुन तपासण्यात आलेल्या फिनेल नमुन्याबाबतचा अहवाल ग्राहय धरता येणार नाही.

मा.सभापती : लेखाधिकारी यांनी भांडार विभागाची गत तीन वर्षाच्या दरम्यान स्विकारण्यात आलेल्या फिनेलच्या निविदाची सखोल चौकशी करावी या संबंधी तक्रारी असणाऱ्यांशी संपर्क साधावा व शक्य तेवढया लवकर अहवाल सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या साहित्य खरेदीसाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले. तरीपण दरम्यानचे काळात सार्वजनिक आरोग्याचे हित लक्षात घेता तांत्रिकदृष्टया योग्य प्रतवारी असलेल्या विक्रेत्याकडून आवश्यकतेनुसार फिनेल खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. १३ गुलशन महल ते चंपा मज्जीद पर्यंत १०० फुट डी.पी.रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. १७ दि. ८-६-८९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ३४,२५,३६०/- पैकी तुर्त भाग "अ" १४,०४,६१०/- रुंदीकरण आणि भाग "ड" ८,००,०००/- (पुलाचे बांधकामाच्या) कामास तातडीचे काम असल्यामुळे सर्वानमते मंजुरी देण्यात आली आहे.सदर कार्यालयीन निविदा क्र. ३५५२ / ८९ दि. २७-६-८९ नुसार निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि. १५-७-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.ए.सी.कोंढारी | २ % | जास्त |
| २) // डी.अजितसिंग | ५ % | जास्त |
| ३) // एस.ए.नवाब | ९.७३ % | कमी |
| ४) // बी.ए.काल्डा | १७.९९ % | कमी |
| ५) // एस.एच.असोशिएटस | १३.९ % | कमी |
| ६) // एस.एम.मन्डोर | १२.७ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९ % कमी दराचे श्री.बी.ए.काल्डा यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १३ गुलशन महल ते चंपा मज्जीद पर्यंत १०० फुट डी.पी.रस्ता तयार करणेच्या कामापैकी तुर्त भाग अ-१४,०४,६१०/- रुंदीकरण आणि भाग "ड" ८,००,०००/- पुलाचे बांधकामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९ % कमी दराचे श्री.बी.ए.काल्डा यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,जाफरगेट साईट नं. ७८ येथील मनपाच्या नविन बांधलेल्या शाळेला कंपाऊंडवॉल बांधण्याच्या कामाबाबत स्थायी समिती बैठक दि. ८-६-८९ ठराव क्र. १९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,६०,६२०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा के.३५५१ दि. २७-६-८९ रोजी निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.एच.असोशिएटस | ७ % | कमी |
| २) // कुलवंतसिंग | १६ % | कमी |
| ३) // आनंद बिल्डर्स | ७.३ % | कमी |

| | | |
|---|---|---|
| ४) // एस.ए.नवाब | १४.२१ % | कमी |
| ५) // विशाल कन्स्ट्रक्शन | १७.५५ % | कमी |
| ६) // कैसर खान | २० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराचे श्री.कैसर खान यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट साईट नं. ७८ येथील मनपाच्या नविन बांधलेल्या शाळेला कंपाऊंडवॉल बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २० % कमी दराचे श्री.कैसर खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,समर्थनगर येथील प्लॉट नं. २० ते २३ च्या पाठीमागे खडी रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४६ दि. १७-६-८९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ६४,६४०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी निविदा क्र. ३५५१ / ८९ दि. २७-६-८९ नुसार निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सुखबीरसिंग | २१ % | कमी |
| २) // सय्यद रफिकउद्दीन | १९.५३ % | कमी |
| ३) // एस.एच.असोशिएटस | २० % | कमी |
| ४) // रविंद्रसिंग | २२ % | कमी |
| ५) // नरेंद्रसिंग | १३ % | कमी |
| ६) // कुलवंतसिंग | १०.७० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२ % कमी दराचे श्री. रविंद्रसिंग यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर येथील प्लॉट न्र. २० ते २३ च्या पाठीमागे खडी रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२ % कमी दराचे श्री. रविंद्रसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,शहाबाजार येथील मनपाच्या मालकीच्या तीन खोल्या असलेल्या इमारतीमध्ये वाढीव खोल्या बांधणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. ८-६-८९ ठराव क्र. १८ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,९४,९६५/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी निविदा क्र. ३ / ३५५१ /८९ दि. २७-६-८९ नुसार निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.ए.नवाब | ११ % | कमी |
| २) // एम.एम.बेग | ११.५ % | कमी |

| | | |
|---|---|---|
| ३) // एस.एच.असोशिएटस | ७ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५ % कमी दराचे श्री. एम.एम.बेग यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार येथील मनपाच्या मालकीच्या तीन खोल्या असलेल्या इमारतीमध्ये वाढीव खोल्या बांधणेच्या कामासाठी तुलनात्कदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५ % कमी दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ४५ येथील टेलिफोन भवन ते क्रांतिचौक पोलीस स्टेशन या ५० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरणासह डांबरीकरणाचे कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २३-६-८९ ठराव क्र. ६७ अन्वये रक्कम रु. ३,२३,७८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.सदरील अंदाजपत्रकाचे रकमेमधून फक्त रोडचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले असून डांबरीकरणाचे काम करणे बाकी आहे.

तसेच सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार दर निर्दीष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. पी.जे.तमखाने | २२.७२ % | कमी |
| २) // अब्दुल वकील कुरेशी | २०.३० % | कमी |
| ३) // एस.ए.नवाब | १६.१६ % | कमी |
| ४) // एस.एच.असोशिएटस | २०.१ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७२ % कमी दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४५ येथील टेलीफोन भवन ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन या ५० फुट डी.पी. रोडचे रुंदीकरणासह डांबरीकरणाचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७२ % कमी दराचे श्री.पी.जे.तमखाने यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ५८ येथील मो.गारखेडा येथील अलंकार गृहनिर्माण संस्था अंतर्गत खडी रस्त्याचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ८२ दि. २९-६-८९ अन्वये रक्कम रु. २,८०,५३२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली असून सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. २ नुसार निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दरनिर्दीष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मनजितसिंग | २७.२५ % | कमी |
| २) मे.आनंद बिल्डर्स | २४.३ % | कमी |
| ३) पी.जे.तमखाने | २२.७२ % | कमी |
| ४) एस.ए.नवाब | २१ % | कमी |

५) एस.एच.असोशिएटस १८.४ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२५ % कमी दराची श्री.मनजितसिंग यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५८ येथील मो.गारखेडा येथील गृहनिर्माण संस्था अंतर्गत खडी रस्त्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२५ % कमी दराची श्री.मनजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. ५७ येथील वैद्यकिय महाविद्यालय तृतीय श्रेणी कर्मचारी गृहनिर्माण संस्था शहानुरवाडी येथील खडी रस्त्याचे कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २९-६-८९ ठराव क्र. ८१ अन्वये रक्कम रु. १,०७,६९३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली असून सदरील काम हात घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. २ नुसार निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पाच दरनिर्दीष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. एस.एच.असोशिएटस | २६ % | कमी |
| २) सुखबीरसिंग | २५.२५ % | कमी |
| ३) मो.मुश्ताक अहमद | २४.७५ % | कमी |
| ४) अब्दुल सलाम | २३.१० % | कमी |
| ५) रविंद्रसिंग | १८.६० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६ % कमी दराची मे.एस.एच .असोशिएटस यांची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५७ येथील वैद्यकिय महाविद्यालय तृतीय श्रेणी कर्मचारी गृहनिर्माण संस्था शहानुरवाडी येथील खडी रस्त्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६ % कमी दराचे मे.एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९४:**

मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहेत की,महानगरपालिका सभागृहात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे तैलचित्र लावणेसाठी ५'X ३' आकाराचे तैलचित्र श्री. दिलीप बडे यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले आहे.या तैलचित्राचे बील रक्कम रु. ८,०००/- (अक्षरी रुपये आठ हजार फक्त) श्री. बडे यांनी सादर केलेले आहे.रक्कम रु. ८,०००/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सभागृहात लावण्यात आलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तैलचित्राचा खर्च रक्कम रु. ८,०००/- (आठ हजार फक्त) ला कार्योत्तर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९५:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,वार्ड क्र. ११ मधील सिडको नविन औरंगाबाद येथील सेक्टर एन-९ (एच) मधील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधरणा करणेसाठी २५० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ६९,३११/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ११ मधील सिडको नविन औरंगाबाद येथील सेक्टर एन-९ (एच) येथील पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी २५० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ६९,३११/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९६:**

उप अभियंता (ग.व.सु) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला हर्षनगर,वार्ड क्र. १४ येथील भूमीगत जलनि:सारण वाहिनीची दुरुस्ती करणे करीता स्थायी समिती ठराव क्र. १२ दि. ८-६-८९ अन्वये स्थानिक गुत्तेदराकडून अ-१ नमुन्यावर दरपत्रके मागविली असता एकूण तीन दरपत्रके दर भरलेली वसुल झाली.

| | | |
|---|---|---|
| १) सलीम अहमद | अंदाजपत्रकीय दरात | |
| २) हबीबखान | ३ % | जास्त |
| ३) शेख इकबाल | ५ % | जास्त |

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रक श्री.सलीम अहमद यांचे दरपत्रक मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला हर्षनगर वार्ड क्र. १४ येथील भुमिगत जलनि:सारण वाहिनीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सलीम अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९७:**

उप अभियंता ग.व.सुधारणा यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला पडेगांव वार्ड क्र. १ येथील स्लम भागातील सार्वजनिक संडास दुरुस्त करणे खांडकी करणे व दगडी गटार बांधणेच्या कामासाठी एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रु. २९,३००/- चे तयार करण्यात आले असून मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला पडेगांव वार्ड क्र. १ येथील स्लम भागात सार्वजनिक संडास दुरुस्त करणे,खांडकी करणे व दगडी गटार बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. २९,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र.३० येथील म.न.पा.ची के.प्रा.शाळा दुरुस्ती करणे बाबतच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सार्वजनिक बांधकाम

खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. १४५६०/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च इमारती दुरुस्ती या सदराखाली करण्यात येईल.

सदर काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार स्थायी समितीची मंजुरी अपेक्षित धरुन ( कारण मुलांना बसण्याकरीता जागा अपूर्ण होती) हे काम श्री.हाजीखान गुत्तेदार यांच्याकडून अे-१ करारनामा वर अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे हाती घेण्यात आले आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३० येथील के.प्रा.शाळाची दुरुस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रु. १४,५६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे अे-१ करारनाम्यावर गुत्तेदार श्री.हाजीखान यांचे मार्फत अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे करुन घेण्यास सर्वानमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १९९:**

वार्ड क्र. ४६ मो.समर्थनगर येथे भूषण कॉम्प्लेक्स पासून हनुमान मंदिरापर्यंत नाल्यात मोठी दगडी गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१५,६००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील नाल्याचे पाणी पावसाळयात नागरिकांच्या घरात घुसते त्यामुळे नागरिकांना त्रास होतो.करीता सदर काम करणे आवश्यक आहे व सदर गटारीची लांबी २१५ मीटर आहे व सदर काम जलनि:सारण भांडवली खर्चाच्या तरतुदीतून करण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ मो.समर्थनगर येथील भूषण कॉम्प्लेक्स पासून हनुमान मंदिरापर्यत नाल्यात मोठी दगडी गटार बांधणेबाबत रक्कम रु. १५,६००/- च्या अंदाजपत्रकास आणि सदर गटारीची लांबी २१५ मीटर आहे तरी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २००:**

वार्ड क्र. २३ मिलकार्नर परधीपुरा येथे सार्वजनिक संडास दुरुस्त करणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १८,३५०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.२३ / १०१५ दि. २१-३-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२ / ४०५ / ८९ दि. १६-५-८९ द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आल्या असून सदरील दोन्ही निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.फारुकी ए.एस | ४ % | जास्त |
| २) श्री.शेख शरीफ | ०.०५ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५ % कमी दराचे श्री.शेख शरीफ यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २३ मिल कॉर्नर मो.पारधीपुरा येथे सार्वजनिक संडास दुरुस्त करणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५ % कमी दराचे श्री.शेख शरीफ यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०१:**

सन १९८९-९० या आर्थिक वर्षा करीता इंटरनॅशनल टॅक्टर्सच्या करीता लागणारे स्पेअरपार्टस पुरवठा करण्यासाठी वार्षिक करारनामा करण्याकरीता निविदा पत्रके बोलावली असता एकूण दोन निविदा पत्रके वसूल झाली.त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | दर |
|---|---|
| १) मे.जैन ट्रेडर्स,औरंगाबाद | प्राईजलिस्ट + २५ % |
| २) मे.शिल्पा ट्रेडर्स,औरंगाबाद | प्राईजलिस्ट + २५ % |

पैकी मे.जैन ट्रेडर्स,औरंगाबाद यांचे दर कमी दराचे आहेत.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० आर्थिक वर्षाकरीता इंटरनॅशनल ट्रॅक्टरच्या स्पेअरपार्टस पुरवठा करण्यासाठी मे.जैन ट्रेडर्स,औरंगाबाद यांचे दर प्राईज लिस्ट+२५ % कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की,विविध प्रकारच्या वहानांच्या ॲटो इलेक्ट्रीकचे काम,स्पेअरपार्टसह करुन घेण्याच्या कामासाठी व १९८९-९० या आर्थिक वर्षात उपरोक्त कामाचे वार्षिक करार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार(४) निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.भारत आर्मेचर,औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दर + ४० % |
| २) मे.डी.सी.ॲटो इलेक्ट्रीशियन, औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दर + १६ % |
| ३) मे.परमार ॲटो गॅरेज,औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दर + ३५ % |
| ४) मे.मुश्ताक अहमद इलेक्ट्रीशियन, औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दर + १६ % |

वरीलप्रमाणे मे.डी.सी.ॲटो इलेक्ट्रीशियन व मे.मुश्ताक अहेमद इलेक्ट्रीशियन यांचे दर सारखेच म्हणजे अंदाजपत्रकीय दर + १६ % असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता त्या दोघांनीही दर कमी करुन अंदाजपत्रकीय दर + ४ % जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी कळविले आहे.तेव्हा दोघांचेही दर सारखेच असल्याने १९८९-९० सालात करुन घेण्यात येणारे काम दोन्ही एजन्सी मार्फत करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारच्या वाहनांच्या ॲटो इलेक्ट्रीकलचे काम स्पेअर पार्टसह सन १९८९-९०या आर्थिक वर्षाचे साठी करुन घेण्याकरीता मागविण्यात आलेल्या दर पत्रकापैकी वाटाघाटी ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय दर + ४ % जास्त दराने मे.डी.सी.ॲटो इलेक्ट्रीशियन व मे.मुश्ताक अहेमद या दोन्ही एजन्सी मार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३:**

सन १९८९-९० या आर्थिक वर्षाकरीता अँबसेडर कारला लागणारे स्पेअर पार्टस पुरवठा करण्याच्या कामासाठी व वार्षिक करार करण्यासाठी निविदा पत्रके मागविली असता फक्त एकच निविदा पत्रक वसूल झाले असून ते मे.वर्धमान मोटर्स,औरंगाबाद हयांचे आहे.

मे.वर्धमान मोटर्स,औरंगाबाद हे हिंदुस्थान मोटार कंपनीचे स्पेअर पार्टसचे अधिकृत विक्रेते आहेत व त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.कंपनीची प्राईज लिस्ट + २४ % (नॉन एक्साईज ॲटमस करीता) व प्राईज लिस्ट + ४३ % (एक्साईजएबल ॲटम करीता) स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० या आर्थिक वर्षाकरीता अँबेसेडर कारला लागणारे स्पेअर पार्ट पुरवठा करण्याच्या कामासाठी हिन्दुस्थान मोटार कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. वर्धमान मोटर्स,औरंगाबाद यांचे कंपनीचे प्राईजलिस्ट +नॉन एक्साईजेबल ॲटम करीता २४ % व प्राईजालिस्ट + ४३ % एक्साईजेबल ॲटम करीता या दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९८९-९० या आर्थिक वर्षात जीपचे स्पेअर पार्टस खरेदी करण्याकरीता वार्षिक करार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार (४) निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे. जैन ट्रेडर्स,औरंगाबाद | प्राईज लिस्ट पेक्षा १६ % कमी दराने |
| ३) मे.शितल ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद | प्राईज लिस्ट पेक्षा २ % कमी दराने |
| ३) मे.शिल्पा ट्रेडर्स,औरंगाबाद | प्राईज लिस्ट पेक्षा १० % कमी दराने |
| ४) मे.भारत ॲटो स्पेअर औरंगाबाद | प्राईज लिस्ट + २० % जास्त दराने अटीसह |

वरीलपैकी सर्वात कमी दर मे.जैन ट्रेडर्स यांचे असून प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० या आर्थिक वर्षाकरीता जीपच्या स्पेअर्स पार्टस खरेदी करण्याकरीता प्राईज लिस्ट पेक्षा १६ % कमी या सर्वात कमी दर मे. जैन ट्रेडर्स यांचे असून दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०५:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मी चिकलठाणा वार्ड क्र. ६० येथे गलिच्छ वस्ती विभागात व्ही टाईप दगडी गटार करणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ६०,०००/- चे तयार करण्यात आले असून मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र.६० मो.चिकलठाणा येथे गलिच्छ वस्ती विभागात व्ही टाईप दगडी गटार करणेच्या कामाकरीता रक्कम रु. ६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. २०६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ठराव क्र. ५१ दिनांक १७-६-८९ रोजी खुल्या बाजारातून टॉर स्टील (पिळदार लोखंड) खरेदीस्तव मान्यता मिळाली होती व त्याप्रमाणे टाटा आयर्न अँड स्टील कंपनी मुंबई यांचेकडे लोखंड खरेदीस्तव रक्कम जमा करण्यात आली होती व त्याप्रमाणे ८६.६०० मे.टन लोखंडाचा टाटा कंपनरकडून आदेश मिळाला आहे.सदरील स्टील वाहतुकीसाठी दि. १०-८-८९ रोजी अल्प मुदतीची निविदा (दरपत्रक) मागविण्यात आले असता एकूण तीन दरपत्रके वसूल झाली असून खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

| | |
|---|---|
| १) न्यू विजय मोटार सर्व्हीस | रु. २५५=०० प्र.मे.टन |
| २) आर.के.रोडवेज | रु. २५०= ००प्र.मे.टन |
| ४) परफेक्ट कॉन्ट्रक्टर अँड ट्रान्सपोर्टेशन | रु. २४५=०० प्र.मे.टन |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व प्र.मे.टन रक्कम रु. २४५=०० प्रमाणे परफेक्ट कॉन्ट्रॅक्टर अँड ट्रान्सपोर्टेशन यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाटा आयर्न अँड स्टील कंपनी मुंबई येथून टॉर स्टील (पिळदार लोखंड) (८६.६०० मे.टन) वाहतुकीसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व प्रति मे. टन रक्कम रु. २४५=०० या दराचे परफेक्ट कॉन्ट्रॅक्टर अँड ट्रान्सपोर्टेशन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०७:**

स.सभासद श्री.यादव अशोक सायन्ना व श्री. प्रदीप जैस्वाल यांनी तोंडी प्रस्ताव मांडला की, बीड,परभणी व नांदेड इ.ठिकाणी अतिवृष्टी आणि पूर यामुळे आपदग्रस्त झ ालेल्या लोकांना शासकीय सामाजिक स्तरावर आर्थिक मदत होत आहे.ही बाब विचारात घेता महापालिकेतर्फे आपदग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत विचार व्हावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड,नांदेड व परभणी आणि अन्य आपदग्रस्त झालेल्या नागरिकांना आर्थिक सहाय्य देण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महापालिकेतर्फे रक्कम रु. १,००,००१/- (रुपये एक लाख एक फक्त) ची आर्थिक मदत मुख्यमंत्री निधीस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.परंतु सदरील आर्थिक मदत औरंगाबाद महानगरपालिकेच्या बाहेर द्यावयाची आहे,म्हणून येत्या सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव शिफारस करण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २-९-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शनिवार, दिनांक २ सप्टेंबर,१९८९रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखाँ हुसेनखाँ
२) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
३) // नवपुते कचरु चंद्रभान
४) // पंडागळे रतनकुमार नारायणराव
५) // मगर शंकर जिजाराम
६) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
७) // यादव अशोक सायन्ना
८) // स.अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतुबोद्दीन

**संवाद :**

श्री.यादव अशोक सायन्ना : येत्या दोन दिवसानंतर शहरात गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. या उत्सवाचे काळात शहरातील नागरिकांना गणेशोत्सवातील विविध कार्यक्रमांचा आनंद लुटता यावा या दृष्टीने सार्वजनिक दिव्यांची व्यवस्था करणे व मोकाट जनावरे पकडण्याचे काम हाती घेणे आवश्यक आहे.सार्वजनिक दिव्यांबाबत अनेक दिवसांपासून तक्रारी आहेत.तेव्हा किमान गणेशोत्सवाचे काळात तरी लाईटची व्यवस्था चोख राहील या दृष्टीने सतर्क असणे अगत्याचे आहे.

निवासी उप अभियंता : गणेशोत्सवानिमित्त शहरातील महत्वाच्या ठिकाणी फोकस लावण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.उत्सव सुरु होण्यास अल्प कालावधी राहील्यामुळे दोन-तीन दिवसांत सार्वजनिक दिव्यांची सर्व व्यवस्था चोख होणे शक्य नाही.करी पण सार्वजनिक दिव्यांबाबत आलेल्या तक्रारीपैकी ८० % काम पूर्ण करण्यात आले आहे.हया कामाकरीता स्वतंत्र पथक आवश्यक आहे.

स.अ.एकबालुद्दीन : अद्याप सिध्दार्थ उद्यानचे लाईटची व्यवस्था योग्य झालेली नाही.२/४ दिवसांपूर्वी एका भामटयाने वाघाचे पिंजऱ्याजवळ महिलेच्या गळयातील मंगळसुत्र ओढून जवळच्या नाल्यात पळ काढल्याची घटना घडली आहे.ही बाब लक्षात घेता सिध्दार्थ उद्यानातील विद्युत व्यवस्था चोख असणे आवश्यक आहे.

मा.सभापती : सिध्दार्थ उद्यानातील विद्युत व्यवस्था पुनरकार्यान्वित करण्यात आल्या बाबतचा खुलासा संबंधीताने नुकताच दिला आहे.तेव्हा यापुढे लाईट फोडले गेले तर उद्यानाकील चौकीदारांना जबाबदार धरण्यात येईल,याची संबंधीत अधिकाऱ्याने नोंद घ्यावी.

श्री.शंकरराव मगर : विद्युत विभागाने ८० % तक्रारी दुर केल्याचा खुलासा नुकताच सभागृहात केला आहे.पण अनेक वेळा लेखी व तोंडी माहिती देऊनही अहिंसानगर आणि व्यंकटेशनगर उद्यानातील लाईट व्यवस्था अद्याप कार्यान्वित झालेली नाही.याबाबत गेल्या एक वर्षापासून सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : संत एकनाथ रंग मंदिरा करीता तात्पुरत्या स्वरुपात विद्युत कनेक्शन घेण्यात आले आहे.महानगरपालिकेच्या चुकीच्या धोरणांमुळे प्रति दिन रु. २५०/- ते ३००/- जादा विद्युत भार महापालिकेला सोसावा लागत आहे.तेव्हा या रंगमंदिरा करीता लाईटचे कनेक्शन केंव्हा घेण्यात आले? त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान किती झाले याचा खुलासा व्हावा तसेच संत एकनाथ रंग मंदिराचे उद्‌घाटन केव्हा झाले?

मा.उप आयुक्त : संत एकनाथ रंग मंदिर या ठिकाणी तात्पुरते कनेक्शन आहे.महाराष्ट्र विधान सभा सुवर्ण महोत्सवा निमित्त येत्या १६ व १७ तारखेस संत एकनाथ रंग मंदिरामध्ये काही कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.त्यादृष्टीने रंग मंदिरामध्ये विद्युत ट्रान्सफार्मर बसविण्याचे काम चालु आहे.हे पूर्ण झाल्या नंतर कायम स्वरंपाचा विद्युत पुरवठा घेण्यात येईल.

मा.सभापती : स.सभासद,श्री.अशोक सायन्ना यांनी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा शहर अभियंता यांनी ताबडतोब करावा.तसेच गणेशोत्सवाचे काळात सार्वजनिक दिव्यांची व्यवस्था चोख राहण्याचे दृष्टीने मा.उप आयुक्त व शहर अभियंता यांनी विशेष लक्ष द्यावे.

मालमत्ता अधिकारी : संत एकनाथ रंगमंदिर दि. १-१०-८८ पासून सुरु झाले आहे.या रंग मंदिराला कायम स्वरुपी विद्युत पुरवठा करण्याचे दृष्टीने दि. १२-४-८९ ला या विभागातर्फे पत्र देण्यात आले असता मा.शहर अभियंता यांचे कडून डी.पी.स्ट्रक्चरचे काम पूर्ण झाल्या नंतर वरील प्रमाणे व्यवस्था करुन घेण्यात येईल असा खुलासा दि. १९-४-८९ ला करण्यात आला आहे.

श्री.रतनकुमार पंडागळे : गणेशोत्सवाचे काळात सार्वजनिक दिव्यांची व्यवस्था चोख राहण्याचे दृष्टीने सभागृहात निर्णय घेण्यात यावा आणि संत एकनाथ रंगमंदिराचे तात्पुरते विद्युत कनेक्शन बाबत संबंधित विभागाला माहिती पुरविण्याबाबत कालावधी निश्चित करण्यात यावा व विषय पत्रिके वरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात यावी.

यादव अशोक सायन्ना : मागील सभेमध्ये चिकलठाणा येथिल ईमारतीचे बांधकामाबाबत माहिती विचारली असता सदरमाहिती सभागृहात ३५ मिनिटे उशिरा देण्यात आली.वर्तमान सभेत संत एकनाथ रंग मंदिराचे लाईट बाबत माहिती मागून एक तासाचा कालावधी उलटलेला आहे.तेव्हा या बाबींचा निषेध करण्यात येतो.

निवासी उप अभियंता : एकनाथ रंग मंदिराचे विद्युत कनेक्शन बाबत २१ जून,१९८८ ला फाफर्म भरण्यात आलेला आहे आणि अंदाजे माहे सप्टेंबर,१९८८ ला या इमारतीसाठी तात्पुरतं विद्युत कनेक्शन घेण्यात आले.

मा.सभापती : एकनाथ रंग मंदिराचे उद्‌घाटनापासून आज पावेतो या ठिकाणी तात्पुरते विद्युत कनेक्शन असल्याची माहिती संबंधीत अधिकाऱ्याने सभागृहात दिली आहे.या तात्पुरत्या विद्युत कनेक्शन मुळे महापालिकेला जो अवाजवी आर्थिक भार सोसावा लागल त्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांवर जवाबदारी सोपवून

सदर रक्कम त्यांचे कडून वसूल करण्याची कार्यवाही मा.आयुक्त यांनी करावी.

श्री.यादव अशोक सायन्ना : ब्लिचिंग पावडर खरेदीच्या अहवाला बाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : ब्लिचिंग पावडरच्या खरेदी व वितरणा बाबतच्या अहवालाच्य प्रती पुढील सभेपूर्वी सर्व सभासदांना देण्यात येतील.

श्री.रतनकुमार पंडागळे : मागील सभेमध्ये फिनेल खरेदीच्या प्रस्तावावर चर्चा करतांना फिनेल खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा उल्लेख इतिवृत्तांमध्ये नोंदविला आहे. तो योग्य आहे काय? तसेच मागील तीन वर्षाचे काळात फिनेल खरेदी बाबत दरपत्रके मागविण्यात आली होती काय? याचा खुलासा व्हावा.

श्री.कचरु नवपुते : सा.चपराक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्ता बाबत संबंधीतास नोटीस देण्यात आल्याची माहिती मागील सभेत देण्यात आली होती.तेव्हा देण्यात आलेल्या नोटीस बाबत वृत्त संस्थे कडून खुलासा झाला याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

विधी सल्लागार : सा.चपराकचे संपादकास महापालिकेतील जकात विभागा विषयी प्रसिध्द झालेल्या वृत्ता बाबत कार्यालयाने दिलेली नोटीस पोस्टा मार्फत अनसर्व्हड (Unserverd) असा शेरा नोंदवून परत आलेली आहे.तेव्हा या संबंधीची पुढील कार्यवाही करण्याबाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा करुन कायदेशीर नोटीस बजावण्यात येईल.

श्री.यादव अशोक सायन्ना : ब्लिचिंग पवडर खरेदी व वितरणा बाबत चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाला काय? याचा खुलासा व्हावा आणि या प्रकरणी आजच चर्चा व्हावी.

श्री.रतनकुमार पंडागळे : ब्लिचिंग पावडर खरेदी व वितरणा बाबत अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालाच्या प्रती सर्व सभासदांना दिल्या नंतरच या विषयी चर्चा करण्यात यावी.

श्री.कचरु नवपुते : ब्लिचिंग पावडर प्रकरणात आजच व या सभेत चर्चा सविस्तर चर्चा व्हावी.

सुमारे४.३५वाजतास.सभासद,श्री.रतनकुमार पंडागळे,श्री.स.अ.एकबालुद्दीन,श्री. अलफखाँ हुसेनखाँ आणि श्री.मिर्झा अन्वर बेग यांनी सभागृह सोडले.

लेखाधिकारी : ब्लिचिंग पावडर विषयीचा खरेदी व वितरणाबाबत तयार केलेला अहवाल सभागृहास वाचून दाखविण्यास सुरुवात केला.(अहवाल वाचन चालू असतांना मध्येच हस्तक्षेप करुन)

श्री.यादव अशोक सायन्ना : आता पर्यंत वाचून दाखवण्यात आलेल्या अहवालावरुन मंजुरी शिवाय काही प्रमाणात ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात आल्याचे दिसते. या शिवाय आज पावेतो सदर ब्लिचिंग पावडरचे देयक हस्तांतर करण्यात आले नाही. तेव्हा खरेदी केलेल्या मालाचे देयक देण्यास कार्यालयाला विलंब करता येतो काय? या अहवालात ब्लिचिंग पावडरची तपासणी केल्याचा उल्लेख आलेला नाही.

कार्यकारी अभियंता : ब्लिचिंग पावडर पुरवठया बाबत मागविण्यात आलेल्या दरपत्रकांची कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वी माहे डिसेंबर मध्ये ३,०००/- रुपयांची एक याप्रमाणे

रेट लिस्ट द्वारे मागविण्यात आलेल्य ब्लिचिंग पावडरचे देयक हस्तांतर करण्याचे प्रलंबित आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : ब्लिचिंग पावडर खरेदी सारख्या अत्यावश्यक प्रकरणामध्ये कार्यकारी अभियंता यांनी अशा प्रकारे तुकडे तुकडे पाडून खरेदी करता येते काय?

लेखाधिकारी : नियमाप्रमाणे अशी खरेदी करता येत नाही.

श्री.प्रदीप जैस्वाल : हातगाडया दुरुस्ती प्रकरणाच्या अहवालाबाबत खुलासा व्हावा.

मा.सभापती : भांडार विभागातील खरेदी व्यवहाराची चौकशी करण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक झाली आहे.त्यंच्या कडून सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झाल्या नंतर यावर चर्चा करण्यात येईल.

श्री.यादव अशोक सायन्ना : चिकलठाणा येथील आक्षेपार्ह बांधकाम असलेल्या इमारतीचे काम बंद करण्यात आले किंवा नाही हयाचा खुलासा व्हावा.

शहर अभियंता : चिकलठाणा येथील इमारतीचे बांधकाम बंद आहे.कार्यालयाने पाठविलेले पत्र गुत्तेदाराला मिळाले आहे.तसेच क्वालिटी कंट्रोल मार्फत सदर बांधकामाची चौकशी करुन घेण्याबाबत मा.उप आयुक्त मा.आयुक्तांशी चर्चा करणार आहेत.तद्नंतर योग्य कार्यवाही करण्यात येईल.

**विषय क्र. २०८:**

दिनांक २५,ऑगस्ट,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.कचरु नवपुते : ठराव क्र. २०५ चे काम तातडीच्या स्वरुपाचे असल्याने "ए-१" वर करुन घेणे आवश्यक आहे.

मा.सभापती : ठराव क्र.२०५,१९७ चे काम "अे-१" वर करुन घेण्यास परवानगी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २५-८-१९८९ रोजी संपन्न झालेल्या समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २०९:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,प्रभाग क्र. (१५) मधील काचीवाडा येथे १५० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रुपये २,००,२००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितर ठराव क्र. १० / १० /दिनांक ८-६-८९ अन्वये मिळालेली आहे.

सदर कामासाठी जाहीररित्या निविदा मागविल्या असता पुढील प्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

१) मो.इसाक मो.हुसेन १०.५ % कमी दराने
२) सजनानी कन्स्ट्रक्शन ५.८५ % कमी दराने

तुलनात्मकदृष्टया मो.इसाक मो.हुसेन यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५ % कमी दराची आहे.

मंजुरीच्या विचारार्थ सादर.सदरील कामात लेबर चार्जेस रक्कम रु. ५८,५२१/- इतके आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. (१५) मधील काचीवाडा येथे १५० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाबाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५ % कमी दराचे गुत्तेदार श्री.मो.इसाक मो.हुसेन यांचे दरपत्रकास तसेच सदरील कामात लेबर चार्जेस रक्कम रु. ५८,५२१/- या रकमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१०:**

उप अभियंता (ग.व.सुधारणा) यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक २४-११-८८ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. ५९४ / ४० अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर मो.कबीरनगर प्रभाग क्र. ५६ अंतर्गत ३५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. पुर्वरचित अर्धगोलाकार गटार बांधणेच्या अंदाजपत्रक रक्कम रु. ८७,५२०/- च्या खर्चाच्या कामासाठी प्रकअ निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.शेख इकबाल अहमद | ५ % अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| २) श्री.बी.एस.गायकवाड | १ % अंदाजपत्रकापेक्षा कमी |

सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा १ % कमी दराची निविदा श्री.बी.एस. गायकवाड यांची असून ती मान्य करणे बाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कबीरनगर प्रभाग क्र.(५६) अंतर्गत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. पुर्वरचित अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ % कमी दराचे गुत्तेदार श्री.बी.एस.गायकवाड यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २११:**

उप अभियंता,(ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, दि. २४-११-१९८८ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. ५३२ / १० अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर मो.नक्षत्रवाडी प्रभाग क्र. ५४ अंतर्गत खांडकी बसविणेच्या कामाकरीता तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रु. १७,९१५/- च्या खर्चाच्या कामासाठी प्रकट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १) श्री.सै.शौकत अली | अंदाजपत्रकापेक्षा ११ % कमी |
| २) श्री.अे.के.थोरात | अंदाजपत्रकापेक्षा २१ % कमी |
| ३) श्री.सलीमुद्दीन सिद्दीकी | अंदाजपत्रकापेक्षा १५ % कमी |
| ४) श्री.दिलीप जैस्वाल | (सदर एजन्सीने कमी अथवा जास्त लिहीले नाही दर १९ असे भरले आहे.) |
| ५) श्री.शेख इकबाल अहेमद | अंदाजपत्रकापेक्षा २१ % कमी |
| ६) श्री.अे.अे.अबेदी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ % कमी |
| ७) श्री.सय्यद रफीकोद्दीन | अंदाजपत्रकापेक्षा १८ % कमी |

सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २१ % कमी दराच्या निविदा दोन्ही पैकी श्री.शेख इकबाल यांची २१ % कमी दराची निविदा स्विकारणेची शिफारस आहे.ती मान्य करणेबाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नक्षत्रवाडी प्रभाग क्र. ५४ अंतर्गत खांडकी बसविणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१ % कमी दराचे गुत्तेदार,श्री.शेख इकबाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१२:**

उप अभियंता,(ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,दिनांक २४-११-८८ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. ५९५ / ४१ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर मो. मिलींदनगर प्रभाग क्र. ५६ अंतर्गत खांडकी पेव्हींगचे काम करणेच्या अंदाजपत्रक रक्कम रु. १०१००/- च्या खर्चाच्या कामासाठी प्रकट निविदाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

१) श्री.हिदायतुल्ला आझमी ०.२१ % अंदाजपत्रकापेक्षा कमी
२) श्री. इकबाल अहमद ३.०० % अंदाजपत्रकापेक्षा जास्त

सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ०.२१ % कमी दराची निविदा श्री. हिदायतुल्ला आझमी यांची असून ती मान्य करणेबाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मिलींदनगर,प्रभाग क्र. ५६ अंतर्गत खांडकी पेव्हींगचे काम करणेबाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२१ % कमी दराचे गुत्तेदार श्री. हिदायतुल्ला आझमी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१३:**

प्रभाग क्र. (५३),मो.बनेवाडी येथील जालाननगर (दक्कन फ्लोअर मिलचे पाठीमागे) मंजुरा रेखांकना मध्ये २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. व १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३१०९४७/- ला स्थायी समिती ठराव क्रमांक १०८८ / ४ / दिनांक २०-४-८९ नुसार मान्यता मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. ३ / ५३९४ / ८९ / दिनांक १६-६-८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री.बी.अे.काल्डा १६.९ % कमी
२) श्री.पॉल कन्स्ट्रक्शन १५.९५ % कमी
३) श्री.मझरुल हक्क १७.१७ % कमी
४) श्री.एम.एम.बेग १९.९० % कमी
५) श्री.मे.आनंद बिल्डर्स २६.६ % कमी
६) श्री.एस.ए.नवाब १९.७५ % कमी
७) श्री. पी.जे.तमखाने १८.८८ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २६.६ % कमी दराचे मे.आनंद बिल्डर्स यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सन्माननीय सभासद,श्री. अलफखाँ हुसेनखाँ यांचे कडील लेखी मागणी नुसार सदर प्रस्तावावर पुढील सभेत विचार करण्यात येईल.

**विषय क्र. २१४:**

प्रभाग क्र. (४६) मो.समर्थनगर पोलीस वर्कशॉप ते श्री.देशपांडे यांच्या घरापर्यंत अर्धगोलाकार पुर्वरचित गटार व दगडी गटार बांधणेचे अंदाजपत्रक रक्कम रु. २१४८३०/- ला ठराव क्र. १०९८ / दि. १३-३-८८ द्वारे अंदातपत्रकास मंजुरी मिळालेली असून स्थायी समिती ठराव क्र. ३० / इि. २९-६-८९ द्वारे सदर काम श्री.सईद खान यांच्या मार्फत करुन घेण्यास मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामास रोड क्रॉसिंग साठी आर.सी.सी.पाईप टाकण्याची तरतूद आहे.परंतु दिनांक २०-८-८९ चे मा.आयुक्त यांचे पहाणी व सूचना नुसार आर.सी.सी.पाईप ऐवजी आर.सी.सी.स्लॅब टाकण्याचे अतिरिक्त अंदाजपत्रक ( Extra Item) रक्कम रु. १८,३८०/- चे तयार करण्यात आले असून सदर काम मुळ अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या रु. १८,३८०/- चे तयार करण्यात आले असून सदर काम मुळ अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या बचत मधून करण्यात येईल.करीत मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रभाग क्र.(४६),मो.समर्थनगर पोलीस वर्कशॉप ते श्री.देशपांडे यांचे घरापर्यंत रोड क्रॉसिंगसाठी आर.सी.सी.पाईप ऐवजी आर.सी.सी.स्लॅब टाकण्याचे (एक्स्ट्रा ॲटम) कामा अंतर्गत तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १८,३८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१५:**

प्रभाग क्र.(५०), मो.उस्मानपुरा पोस्ट ऑफीस समोरील एस.डब्ल्यू.जी. ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होत असून सदर लाईन ॲप्रुटींग करुन नविन १०" व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु. २६,५८४/- चे तयार करण्यात आले असून सदर भागातील नागरिकांच्या तक्रारी त्वरीत निवारण करण्यासाठी सदर काम "अ-१" निविदा तहत अंदाजपत्रकीय दराने श्री.ए.आर.शेख,गुत्तेदार यांचे मार्फत करुन घेण्यात येत आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.(५०),मो.उस्मानपुरा पोस्ट ऑफीस समोरील एस.डब्ल्यू.जी.ड्रेनेज लाईन ॲप्रुटींग करुन नविन १०" व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे रक्कम रुपये २६,५८४/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्याने "अ-१" निविदा तहत अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार,श्री.ए.आर.शेख यांचे मार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,प्रभाग क्र. (१५) येथील महानगरपालिकेच्या चेलिपुरा उर्दु शाळेची खास दुरुस्ती करणे बाबतच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सार्वजनिक बांधकाम,खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. १०,१००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च "इमारत दुरुस्ती" या सदराखाली करण्यात येईल.

सदर काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे स्थायी समितीची मंजुरी अपेक्षीत धरुन हे काम श्री. हाजीखान,गुत्तेदार यांच्याकडून अे-१ करारनामावर अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे हाती घेण्यात आले आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.(१५) येथील महानगरपालिकेच्या चेलीपुरा उर्दु शाळेची खास दुरुस्ती करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १०,१००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे गुत्तेदार,श्री. हाजीखान यांचे कडून अे-१ करारनामावर अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे पुर्ण करुन घेण्यास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २१७:**

सहाय्यक आयुक्त-२ औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९८९-९० सालात महापालिकेस लागणारे छपाई साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे.त्याप्रमाणे कमी दराच्या दरपत्रक धारकांच्या नांवासमोर अनुक्रमांक दिलेले आहेत.

अ)मे.श्री.गणेशमुद्रणालय:.१,२,३,४,५,६,७,१२,१३,१४,१५,२०,२१,२२,२३,२६,२७२९,३२,३५,३६,
३७,३८,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,५३,५४५७,५८,६०,६७,६८,७०,७१.

ब) मे.श्री.वल्लभ प्रिंटींग प्रेस :- अ.क्र.८,९,१०,११,६३,६४,६७.

क) मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस :- अ.क्र.१६,१७,१८,१९,५५,५६,५९,६१,६२.

ड) मे.लिबर्टी लॉ बुक बायंडर्स २४,२५,२८,३०,३१,३३,३४,३९,४९,५०,५१,५२,६५,६६,७२.
ॲण्ड प्रिंटर्स

तरी वरील प्रमाणेच्या कमी दराच्या दरपत्रक धारकांच्या नावासमोर दिलेल्या अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे इ.स.१९८९-८९ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका प्रशासनास लागणारे छपाई साहित्य निम्ननिर्दिष्ट दरपत्रके धारकांकडून त्यांचे नांवासमोर निर्दिष्ट अ.क्र. अंतर्गतचे तुलनात्मकदृष्टया कमी दराचे छपाई साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ)मे.श्री.गणेशमुद्रणालय:.१,२,३,४,५,६,७,१२,१३,१४,१५,२०,२१,२२,२३,२६,२७२९,३२,३५,३६,
३७,३८,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,५३,५४५७,५८,६०,६७,६८,७०,७१.

ब) मे.श्री.वल्लभ प्रिंटींग प्रेस :- अ.क्र.८,९,१०,११,६३,६४,६७.

क) मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस :- अ.क्र.१६,१७,१८,१९,५५,५६,५९,६१,६२.

ड) मे.लिबर्टी लॉ बुक बायंडर्स २४,२५,२८,३०,३१,३३,३४,३९,४९,५०,५१,५२,६५,६६,७२.
ॲण्ड प्रिंटर्स

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८:**

सहाय्यक आयुक्त-२, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९८९-९० सालात महापालिकेस लागणारे इतर स्वच्छता साहित्य (झाडू,टोपले,टीकास इत्यादी) खरेदी करावयाचे आहेत.त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.त्याप्रमाणे कमी दराच्या दरपत्रक धारकांच्या नांवासमोर साहित्याचे अनुक्रमांक दिलेले आहेत.

अ)मे.विजय :- अ.क्र.१,१२,१३,१४,१५,१६,१७,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२७,२९,३०,३१,३२,३३.
जनरलस्टोअर्स

ब) मे.इन्शा : - अ.क्र. २,३,४,५,६,७,८,९,१०,११,२८,३४,३५.
हार्डवेअर

क) मे.मनोज :- अ.क्र. १८,२६,३१,३३.
इन्टरप्रायजेस

वरील प्रमाणेच्या कमी दराच्या दरपत्रक धारकाच्या नांवासमोर दिलेल्या अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे इ.स.१९८९-९० या वित्तीय वर्षासाठी म.न.पा. प्रशासनासाठी लागणारे स्वच्छतेच्या कामाबाबतचे साहित्य (उदा.झाडू,टोपले,टीकास आदी) निम्ननिर्दिष्ट दरपत्रक धारकांकडून त्यांचे नांवा समोर निर्दिष्ट अ.क्र.अंतर्गतचे तुलनात्मकदृष्टया कमी दराचे स्वच्छतेच्या कामा अंतर्गतचे साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ)मे.विजय :- अ.क्र.१,१२,१३,१४,१५,१६,१७,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२७,२९,३०,३१,३२,३३.
जनरलस्टोअर्स

ब) मे.इन्शा : - अ.क्र. २,३,४,५,६,७,८,९,१०,११,२८,३४,३५.
हार्डवेअर

क) मे.मनोज :- अ.क्र. १८,२६,३१,३३.
इन्टरप्रायजेस

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९:**

शिक्षणाधिकारी,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट,१९८९ निमित्त म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना बिस्कीटे वाटप करण्यात आली.ही बिस्किटे मे. रुप एजन्सी (ब्रिटानिया बिस्किटचे अधिकृत विक्रेते) यांचे कडून एकूण १०,९३४/- (दहा हजार नऊशे चौतीस) रुपयांची पुरविण्यात आली. तरी सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट, १९८९ निमित्त म.न.पा.शालेय विद्यार्थ्यांना बिस्किट वाटपासाठी खर्च करण्यात आलेल्या रक्कम रु. १०,९३४/- च्या रकमेस

तसेच मे. रुप एजन्सी यांचे कडून केलेल्या खरेदीस कार्योत्तर मान्यता सर्वानुमते प्रदान करण्यात येते.

**विषय क्र. २२०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९८९-९० हया आर्थिक वर्षात टाटा कंपनीच्या वाहनांना स्पेअर पार्टस पुरवठा करणे व वार्षिक करार करणे हया कामासाठी निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके वसूल झालीत.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.शिल्पा ट्रेडर्स, औरंगाबाद. | प्राईज लिस्ट पेक्षा १० % कमी |
| २) मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद | प्राईज लिस्ट पेक्षा १२.५ % कमी |

कमी दराचे दरपत्रक मे.जैन ट्रेडर्स,औरंगाबाद हयांचे असून प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेस सन १९८९-९० हया आर्थिक वर्षात टाटा कंपनीच्या वाहनांना स्पेअर पार्टस पुरवठा करणे व वार्षिक करार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व प्राईज लिस्ट पेक्षा १२.५ % कमी दराचे मे. जैन ट्रेडर्स,औरंगाबाद हयांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,प्रभाग क्र. (८),हर्सुल येथील डॉ.आंबेडकर पुतळयाच्या मागील प्रस्तुतच्या छत नसलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन ती समाज मंदिर म्हणून वापरण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ८६,९१५/- चे स्थायी समिती बैठक दि.२९-६-८९ रोजी विषय क्र. ७९ / ६ नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. जा.क्र.मनपा / बांधवि-१ / ४१० / ८९ दि. २५-७-८९ नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण आठ निविदा विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा फार्म दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि. १७-८-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.ए.ए.अबेदी | १२ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) श्री.मोहंमद सलिम | ५ % | --//-- |
| ३) श्री.अब्दुल सलाम | ६ % | --//-- |
| ४) श्री.करिम पटेल | १८ % | --//-- |
| ५) श्री.एस.बी.सदवाणी | ५ % | --//-- |
| ६) श्री.व्ही.आर.पाटील | १० % | --//-- |

वरील अ.क्र.४ श्री.करिम पटेल यांचे निविदेचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १८ % कमी दराचे आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.(८),हर्सुल येथील डॉ.आंबेडकर पुतळयाच्या मागील प्रस्तुतच्या छत नसलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन ती समाज मंदिर म्हणून

वापरण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८ % कमी दराचे गुत्तेदार श्री.करिम पटेल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, प्रभाग क्र.(१६),हर्षनगर येथे खडी रस्ते तयार करण्याच्याकामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १३,४००/- चे स्थायी समिति बैठक दि. २९-६-८९ रोजी विषय क्र. ७८ / ५ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.४ / जा.क्र./ मनपा / बांधवि-१ / ४१० ८९ दि.२५-७-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा फॉर्म विकल्या गेले. त्यापैकी दर भरुन तीन निविदा फॉर्म प्राप्त झाल्या. त्या दि. १७-८-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १)श्री.रविंद्रसिंग | ५ % | अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| २) श्री.जाविदखान | ८ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) श्री.अब्दुल सलाम | १ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |

वरील अ.क्र.२ श्री.जाविद खान यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे म्हणजे ८% कमी दराचे आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. (१६),हर्षनगर येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ % कमी दराचे गुत्तेदार श्री.जाविदखान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, प्रभाग क्र. (४०) येथे जाफरगेट आठवडी बाजाराला कंपाऊंड व ओटे बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिति बैठक दिनांक ६-७-८९ ला विषय क्र. ९९ / १४ प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. २,९९,२३०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.४ / जा.क्र/ मनपा /बांधवि-१ / ४१० / ८९ / दि. २५-७-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पाच निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १७-८-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.एच.असोशिएटस | १० % | कमी |
| २) श्री.कुलवंतसिंग | १८.७७ % | कमी |
| ३) श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | १४.८९ % | कमी |
| ४) श्री.कैसरखान | १६.८६ % | कमी |
| ५) श्री.एस.ए.नवाब | १६.४७ % | कमी |

वरील अ.क्र. २ श्री.कुलवंतसिंग यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १८.७७ % कमी दराचे आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. (४०) येथे जाफरगेट आठवडी बाजाराला कंपाऊंड व ओटे बांधणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७७ % कमी दराचे गुत्तेदार,श्री.कुलवंतसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,प्रभाग क्र.(६),गितानगर (आझाद कॉलेज समोर) येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. १७-६-८९ रोजी विषय क्र. ५८ / १५ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ६७,७००/- ला मंजुरी प्राप्त झ ाालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ४ / जा.क्र./ मनपा / बांधवि-१ / ४१० / ८९ दि. २५-७-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा फॉर्म विकल्या गेल्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाल्या,त्या दि. १७-८-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.प्रकाश एस.केदार | ०.०१० % | कमी |
| २) श्री.एस.एच.असोशिएटस | ५% | जास्त |
| ३) श्री.मोहंमद सलिम | १० % | जास्त |

वरील अ.क्र.१ श्री.प्रकाश एस.केदार यंचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ०.०१०% कमी दराचे आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.(६),गितानगर (आझाद कॉलेज समोर) येथे खडीरस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० % दराचे गुत्तेदार श्री.प्रकाश एस.केदार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२५:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,दिनांक १७-६-८९ च्या स्थायी समिती विषय क्र. ५८ / १६ अन्वये मंजुरी मिळाल्या नंतर मो.किलेअर्क प्रभाग क्र. (५) अंतर्गत खांडकी पेव्हींगचे काम करणेच्या अंदाजपत्रक रक्कम रु. ५२४१०/- च्या खर्चाच्या कामासाठी प्रकट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण एकच निविदा निर्धारित वेळेत दर भरलेली प्राप्त झाली ती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अे.अे.अबेदी | ०.०५ % | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी. |

तरी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे गुत्तेदार,श्री.अे.अे.अबेदी यांची निविदा मान्य करणे बाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किलेअर्क प्रभाग क्र.(५) अंतर्गत खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे गुत्तेदार,श्री.अे.अे.अबेदी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२६:**

उप अभियंता,(ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा,प्रभाग क्र. (६०) गलिच्छ वस्ती येथील सार्वजनिक संडासला लोखंडी दरवाजा पाण्याचा हौद तसेच किरकोळ दुरुस्ती करण्याच्या कामासाठी स्थायी समिती दि. ८-६-८९ च्या ठराव क्र. १५

/१५ अन्वये ७०४१०/- च्या खर्चाच्या कामास मान्यता मिळाल्यानंतर कार्यालयातर्फे स्थानिक गुत्तेदारांकडून अ-१ नमुन्यावर दरपत्रके मागविली असता एकूण तीन पदपत्रके दर भरलेली प्राप्त झाली मी खालीलप्रमाणे.

१) श्री.कल्याण बाळाजी पवार अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.अब्दुल सलाम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त
३) श्री.शेख शरीफ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ % जास्त

सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रक श्री. कल्याण बाळाजी पवार यांचे असून ते मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिककलठाणा,प्रभाग क्र.(६०) गलिच्छ वस्ती येथील सार्वजनिक संडासला लोखंडी दरवाजा,पाण्याचा हौद तसेच किरकोळ दुरुस्ती करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री. कल्याण बाळाजी
पवार यांचे अ-१ नमुन्यातील दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२७:**

प्रभाग क्र. (४४) येथील क्रांतीचौक पोलिस स्टेशनच्या समोर बौध्दविहार बांधणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे दराने रक्कम रु. २५,८७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती या सदरच्या खर्च भांडवली या शिर्षकाखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. (४४),येथील क्रांतीचौक पोलीस स्टेशनच्या समोर बौध्द विहार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २५,८७५ /- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२८:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केली की,दिनांक २४-११-१९८८ च्या स्थायी समितीत विषय क्र. ५९०/ ३६ अन्वये मोहल्ला कबीरनगर व नागसेन नगर प्रभाग क्र. (५६) येथे १० बैठकीच्या संडासाची संख्या वाढविणे बाबत संख्या वाढविणे बाबत रक्कम रु. २६,९२०/- च्या खर्चाच्या कामास मंजुरी मिळाल्यानंतर जाहीर प्रकटनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या.त्याखालीलप्रमाणे.

१) श्री.अे.के.थोरात १९ % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी.
२) श्री.अे.अे.अबेदी ०९ % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी
३) श्री. एच.के.पवार ०५ % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी

सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% कमी दराची श्री.अे.के.थोरात यांची निविदा मान्य करणे बाबतच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कबिरनगर व नागसेननगर प्रभाग क्र (५६) येथे १० बैठकीच्या संडासाची संख्या वाढविणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९ % कमी दराचे गुत्तेदार,श्री.अे.के. थोरात यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. २२९:**

शहर अभियंता हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की,दि. ३०-८-८९ रोजी मनपाच्या जुन्या तीन वाहनांचे तसेच भंगार पार्टस,टायर,टयुब्स इ.चे जाहीर लिलाव करण्यात आले असता खालील प्रमाणे जास्तीत जास्त किंमत झाली.

| अ.क्र. | तपशील | जास्त बोली दराचे नांव | अपसेट व्हॅल्यू | लिलावात आलेली किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | एम.एच.बी.-३८०३ फायर ब्रिगेडचे वाहन | एम.के.बेग औरंगाबाद | १५०००=०० | २४,५००=०० |
| २ | एम.टी.बी.-१३७५ मेटॅडोर | मिर्झा निशान बेग | ५०००=०० | २३,२००=०० |
| ३ | बी.वाय.जी.-१२७८ जिप | हुसेनखान नजिबखान | ८५००=०० | ३४,३००=०० |
| ४ | जुने टायर,टयुब १११ नग फ्लॅज | प्रकाश जयस्वाल | ६५००=०० | १५,६००=०० |
| ५ | भंगार सामान अंदाजे ५ टन | रामकिशन गुप्ता | १५०००=०० | २९,०००=०० |
| ६ | खराब काचा | अशमत खान | ३००=०० | ४५०=०० |
| ७ | तेलाचे रिकामे डबे ५ लि.चे ३०० नग | प्रकाश जयस्वाल | ९००=०० | १०००=०० |
| ८ | ट्रेचिंग ग्राऊंड वरील पडलेल्या मैला गाडया व २ पाण्याच्या टाक्या | अशमत खान | ३५००=०० | ४६००=०० |
| | | एकूण रुपये | ५४,७००=०० | १३२६५०=०० |

जाहरी लिलावाच्या वेळी स्थायी समिती अध्यक्ष हे हजर होते व त्यांनी अ.क्र.१ ते ३ सोडून बाकीचे सामान संबंधीत एजन्सी कडून पैसे भरुन माल देण्यासाठी परवानगी दिली.

ॲटम क्र. १ ते ३ साठी वाहनांच्या जाहीर लिलावात जास्ती बोली बोलणाऱ्यांना वहाने नेण्यासाठी मंजुरी मिळावी,तसेच इतर ४ ते ८ साठी मंजुरी मिळावी.तसेच हया हरासीसाठी अंतिम मान्यता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम क्रमांक ७९ अन्वये महानगरपालिकेची जंगम मालमत्ता रु. ५००० चे वर देण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहेत.

हरासदार जास्त दिवस थांबण्यास तयार नसल्यामुळे स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यास वाहनांची आलेली किंमत भरुन घेऊन वहाने संबंधितांच्या ताब्यात देण्यात येतील.सर्वसाधारण सभेची मान्यता हयास मिळेल हया आशेवर स्थायी समितीने हया हराशीत आलेल्या सर्व रकमा भरुन घेऊन ज्याचा त्याला माल देण्यास परवानगी द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.३०-८-८९ रोजी जाहीर लिलावाद्वारे महापालिका मालकीची अ.क्र.१ ते ८ पर्यंतची जुनी वहाने आणि टायर टयुब इ. निकामी मालाची अ.क्र.१ ते ८ ॲटमचे समोर दर्शविलेल्या प्रमाणे विक्री करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | तपशील | जास्त बोली दराचे नांव | अपसेट व्हॅल्यू | लिलावात आलेली किंमत |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | एम.एच.बी.-३८०३ फायर ब्रिगेडचे वाहन | एम.के.बेग औरंगाबाद | १५०००=०० | २४,५००=०० |
| २ | एम.टी.बी.-१३७५ मेटॅडोर | मिर्झा निशान बेग | ५०००=०० | २३,२००=०० |
| ३ | बी.वाय.जी.-१२७८ जिप | हुसेनखान नजिबखान | ८५००=०० | ३४,३००=०० |
| ४ | जुने टायर,टयुब १११ नग फ्लॅज | प्रकाश जयस्वाल | ६५००=०० | १५,६००=०० |
| ५ | भंगार सामान अंदाजे ५ टन | रामकिशन गुप्ता | १५०००=०० | २९,०००=०० |
| ६ | खराब काचा | अशमत खान | ३००=०० | ४५०=०० |
| ७ | तेलाचे रिकामे डबे ५ लि.चे ३०० नग | प्रकाश जयस्वाल | ९००=०० | १०००=०० |
| ८ | ट्रेचिंग ग्राऊंड वरील पडलेल्या मैला गाडया व २ पाण्याच्या टाक्या | अशमत खान | ३५००=०० | ४६००=०० |
| | | एकूण रुपये | ५४,७००=०० | १३२६५०=०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३०:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की,ज्युबली पार्क वॉटर वर्क्स येथील ७५ अश्व शक्तीची मोटार वायंडींग मध्ये स्पार्किंग होऊन जळाली आहे.या मोटारीस रिवायंडीग करण्याच्या कामासाठी रु. ८५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व हे काम अत्यंत तातडीचे असल्याकारणामुळे त्यासाठी दरपत्रके बोलाविण्यात आली होती.एकूण ५ दरपत्रके वसूल झाली.सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.श्रीराम इलेक्ट्रीकल वर्क्स,औरंगाबाद यांचे दरपत्रक असून रुपये ६५००/- चे आहे.काम तातडीचे असल्यामुळे करुन घेण्यात आलेले आहे.त्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे ज्युबली पार्क वाटर वर्क्स येथील ७५ अश्व शक्तीची मोटार जळाल्याने रिवायंडींग करण्याचे तातडीचे काम श्रीराम इलेक्ट्रीकल वर्क्स हयांचे कडून संबंधीतांचे कमी दराचे दरपत्रकान्वये म्हणजेच रक्कम रु.६५००/- मध्ये करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १५सप्टेंबर,१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शुक्रवार , दिनांक १५ सप्टेंबर,१९८९रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका समिती सभागृहात स्थायी समिती सभेस मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखाँ हुसेनखाँ
२) // इकबालसिंग प्रितमसिंग गील
३) // घडामोडे मोतीराम नारायणराव.
४) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) // नवपुते कचरु चंद्रभान
६) // मगर शंकर जिजाराम
७) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
८) // स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
९) // सावे मोरेश्वर दिनानाथ

**विषय क्र. २३१:**

दिनांक २ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : सरस्वती भुवन महाविदयालयाचे जलनिःसारण विषयक कामाची संचिका गत ८/१०महिन्यांपासून प्रलंबित असण्याचे कारण काय? खुलासा व्हावा.

उप अभियंता (जलिःसारण) : मा.आयुक्त हयांनी सविस्तर आराखडयासह सादर करणे विषयी आज्ञापिन केले होते.सध्या प्रस्तुतची संचिका आवश्यक त्या मंजुरीसाठी सभापती स्थायी समिती हयांचेकडे अगेषित केली आहे.आगामी स्थायी समिती बैठकीत स्थायी समितीचे निर्णयासाठी प्रस्तावित केली जाईल.

श्री.प्रदीप जैस्वाल : आजचे स्थायी समिती सभेत आयुक्त,उपायुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हयापैकी कुणीही उपस्थित नाहीत.त्यांना सभेस उपस्थित राहणे कमीपणाचे वाटते काय? तेव्हा आजच्या सभेचे कामकाज स्थगित करणे उचित राहील.हा स्थायी समिती सदस्यांचा अवमान आहे.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : सभागृहात अधिकाऱ्यांचे बाबतीत गैर वक्तव्य करणे योग्य नाही.

मा.सभापती : मनपाचे उपायुक्त किरकोळ रजेवर आहेत व आयुक्त अतिक्रमण हटविण्याचे कामात व्यग्र आहेत.अशाही परिस्थितीत स्थायी समिती सभेचे महत्व कमी लेखता कामा नये.किमान प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सदरची जबाबदारी सोपविणे उचित झाले असते.

श्री.कचरु नवपुते : मला चिकलठाणा वार्ड क्र. ६० चे अंतर्गत शाळेच्या बांधकामाचा प्रश्न आयुक्तांना विचारावयाचा आहे.सदरील प्रश्नाचे उत्तर कोण देणार? हयाचा खुलासा व्हावा.

सह.संचालक नगररचना : नगर रचना कायदयाचे कलम २६ अन्वये प्लॅन झाला आणि संदर्भीय कायदयाचे कलम ३० प्रमाणे शासनाचे मंजुरीसाठी दाखल केला.मात्र प्लॅन प्रमाणे ही जागा "नो डेव्हलपमेंट" आरक्षित झालेली आहे.

श्री.मोरेश्वर सावे : महानगरपालिका प्राधिकरणाने प्रस्तावित जागा शाळेसाठी विकत घेतलेली आहे.त्याशिवाय सदरचे जागेस संरक्षक भिंत देखील बांधली आहे.सदरची जागा "नो डेव्हलपमेंट" मध्ये आरक्षित असतांना संरक्षक भिंतीसाठी खर्च का करण्यात आला?

श्री.कचरु नवपुते : चिकलठाणा प्रभागात २१५० विद्यार्थी आहेत.त्यांना बसावयास जागा नाही हे उचित नव्हे.

श्री.मोतीराम घडामोडे : प्रस्तावित शाळा बांधणी प्रकरणांतर्गत कुणाची जबाबदारी आहे?

मा.सभापती : आयुक्त,उपायुक्त हया उभयंतांपैकी वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी पैकी सभेस कुणीही उपस्थित नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येते.स सभासदांनी चिकलठाणा शाळेच्या विषयी जो मुद्दा उपस्थित केला त्या प्रकरणांतर्गत म.न.पा.आयुक्तांनी चौकशी करुन योग्य तो खुलासा करावा.

श्री.मिर्झा अन्वर बेग हातगाडया,जलनिःसारण इ.बाबतच्या चौकशीचे काय झाले? आयुक्तांनी चौकशी करु नका असे संबंधित अधिकाऱ्यांना आज्ञापित केले काय? याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : जलनिःसारण अधिकारी यांचे प्रशिक्षणासाठी स्थलांतर झाले होते ते चौकशीचे काम आता सुरु होईल.

श्री.प्रदीप जैस्वाल : साप्ताहिक चपराक मध्ये आलेल्या जकात विषयक गंभीर आरोपाबाबत संबंधित संपादकास नोटीस देण्यात आली होती.त्याचे काय झाले ?

विधी सल्लागार : प्रथम पाठविलेली नपेटीस "विना वसूल" ( ) होऊन वापस आली होती.मा.आयुक्तांशी चर्चा करुन संबंधीतांस पुनः नोटीस पाठविली आहे.हयाचा खुलासा अद्याप प्राप्त झाला नाही.

श्री.स.अ.एकबालुद्दीन : सुराणा कॉम्प्लेक्स चौकशीची प्रगती काय?

मा.सभापती : सदरचे प्रकरणी संबंधीत स.सभासदांशी विचार विनिमय करुन उपसमितीची बैठक बोलावण्यात येईल.

श्री.मोरेश्वर सावे : गत सभेत प्रस्ताव क्र. २१६ अंतर्गत टॉयलेट वॉक्स पाडल्याबाबत चर्चा झ ाली होती.तत्संबंधीचा विचार अंदाजपत्रक तयार करतांना का करण्यात आला नाही?

शहर अभियंता : उक्त उल्लेख केलेली शाळा आणि विषय क्र. २०९ अंतर्गतची शाळा विभीन्न आहेत.टॉयलेट पाडल्याबाबतचा अहवाल मालमत्ता अधिकारी हयांचेकडे पाठविला आहे.

मा.सभापती : चेलीपुरा येथील शाळेच्या टॉयलेट पाडण्याबाबतचे प्रकरणांतर्गत चौकशी करणेस संबंधीत अधिकारी टाळाटाळ करीत असल्यास आयुक्तांनी सदरचे प्रकरणात जातीने लक्ष घालावे व मालमत्ता अधिकारी व सहा.संचालक,नगर रचना यांनी एकत्र बसून या प्रकरणी वैधानिक कार्यवाही करावी.

श्री.मोरेश्वर सावे : गत ५० वर्षापासून प्रस्तुतची शाळा शासनाचे ताब्यात आहे.परंतु सध्या त्या जागेवर अतिक्रमण करुन संबंधित शेजारी आपला अधिकार सांगत आहे हे कसे?

श्री.प्रदीप जैस्वाल : गत सभेत २१३ क्रमांकाचा ठराव पारीत झाला असतांना निर्णय कसा बदलण्यात आला हयाचा खुलासा व्हावा.

श्री.मोरेश्वर सावे : एखादया सभासदाने अशा प्रकारचे पत्र दिले तर ठराव रद्द किंवा पुढे ढकलण्याची तरतुद आहे काय?

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : ५० % विकास खर्च भरल्यानंतर ले-आऊट रेखांकन मंजूर होते.गत एप्रिल,१९८९ मध्ये १००% विकास खर्च भरल्याशिवाय संस्थेची कामे हाती घेता येणार नाही असे ठरले होते.त्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणे अगत्याचे आहे.

श्री.मोरेश्वर सावे : ज्या ठिकाणी १००% विकास खर्च भरलेला आहे त्या ठिकाणीची कामे होत नाही मग ज्या ठिकाणचा ५० % किंवा त्यापेक्षा कमी विकास खर्च भरलेला आहे अशा ठिकाणची कामे होत आहेत हे संयुक्तिक नाही.

मा.सभापती : विकास खर्चाची २१३ क्रमांकाच्या कामास मंजुरी देण्यात येते.परंतु विकास खर्चाची उर्वरित थकबाकी रक्कम अदाई नंतरच कामास सुरुवात करावी.

स.अ.एकबालुद्दीन श्री.मिर्झा अन्वर बेग : बुढ्ढीलेन भागात जलि:सारण अंतर्गतचे पाणी पिण्याचे पाण्यात मिसळून प्रदुषित पाणी नागरिकांना प्यावे लागते. ज्यामुळे रोगराई होण्याची दाट शक्यता आहे.

मा.सभापती : असे असल्यास जलवितरण व जलनि:सारण अभियंता हया उभयंतानी सतर तपासणी करुन आवश्यक ती पुर्तता करावी.त्यासाठी वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी हरकत नाही.

**ठराव :**

"ठराव क्रमांक २१३ च्या कामास मंजुरी देण्यात येते.परंतु विकास खर्चाची उर्वरीत थकबाकी रक्कम अदाई नंतरच कामास सुरुवात करावी." या दुरुस्तीसह दिनांक २ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३२:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र. १५० मी मी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३८,७६५/- चे तयार करण्यात आले असून मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४२ मधील मो.खोकडपुरा येथे १५० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. ३८,७६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३३:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की, वार्ड क्र. १९ मधील बुढीलेन येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. १९,६४५/- अंदाजपत्रकास ठराव क्र.१८ दि. २९-६-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे.

मनपा / पापु /१६६० /८८ दि. १६-८-८८ अन्वये पाईपसह सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता एकही निविदा विक्री झाली नव्हती.

आयुक्तांच्या दि. २३-९-८८ अन्वये फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा विक्री झाली नाही.

त्यानंतर स्थायी समिती ठराव क्र. ७४२ / दि. २८/१२/८८ स अधिन राहून स्थानिक अशा तीन कंत्राटदाराकडून कोटेशन हस्तगत केली असता पुढील प्रमाणे कोटेशन प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) जावेद खान | ४.५ % | जास्त दराने |
| ३) सिद्दीकी झेड.ए. | ३ % | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांचे असून अंदाजपत्रकीय दराचे आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १९ मधील बुढीलेन येथे ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३४:**

उपअभियंता ग.व.सुधारणा यांनी प्रस्ताव सादर केला की, दि. ८-६-८९ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. १४ तहत मंजुरी मिळाल्यानंतर मोहल्ला हर्सुल वार्ड क्र. ८ येथील पाच बैठकीचे सार्वजनिक शौचालयाचे बांधकामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५३,२५०/- च्या खर्चाच्या कामासाठी प्रकट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) मॅकवेल कन्स्ट्रक्शन | ०.१० % | कमी दराची |
| २) खर्डीकर | ५ % | जास्त दराची |

श्री.मॅकवेल कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ०.१० % कमी दराची आहे.ती मान्य करणेबाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८ येथील हर्सुल येथील पाच बैठकीचे सार्वजनिक शौचालयाचे बांधकामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० % कमी दराचे श्री.मॅकवेल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३५:**

वार्ड क्र. २१ मो.घाटी येथे २५० मीमी ची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १५,२२५/- ला स्थायी समिती ठराव क्र. १०८ दि. १२-७-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. ६१५ / ८९ दि. ४-८-८९ द्वारे "अ-१" करीता कोटेशन मागविले असता एकूण तीन कोटेशन वसूल झाले असून त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) करण इंटरप्राइजेस | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) सय्यद मजीत अन्वर | ६ % | जास्त |
| ३) चेअरमन महाराष्ट्र संघ | ३ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.करण इंटरप्राईजेस यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२१ मो.घाटी येथे २५० मीमी ची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. करण इंटरप्राईजेस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३६:**

वार्ड क्र. १७ मिरजंग मज्जीद लोटाकारंजा येथे १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १२,५६३/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. १११४ दि.२८-४-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.४ / ४८२ / ८९ दि. २०-६-८९ द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता दोन निविदा विकण्यात आल्या असून दोन्ही निविदा वसूल झाल्या.त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) साजीद अहमद | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) शाकील विर्ल्स | ४ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री. साजीद यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१७ मिरजंग मज्जीद लोटाकारंजा येथे १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे करीता तुलनात्कदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. साजीद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३७:**

वार्ड क्र. १७ लोटाकांरजा येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. २३,७८८/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. १११३ दि. २८-४-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.४ / ४८२/ ८९ दि. २०-६-८९ द्वारे अ-१ नमुन्यावर निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आल्या असून सदर दोन्ही निविदा वसूल झालेल्या आहेत व त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) साजिद अहेमद | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) कैसर खान | २ % | जास्त |

तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. साजिद अहेमद यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १७ लोटाकारंजा येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया कमी दराची व अंदाजपत्रकीय दराचे श्री.साजिद अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३८:**

वार्ड क्र. १४ शहाबाजार येथे यु.सी.आर.गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ६४,०००/- चे तयार करण्यात आले आहे.परंतु ती जुनी गटार फुटलेली आहे. त्यामुळे सदर

ठिकाणी पाणी साचते त्यामुळे तेथे दुर्गंधी सुटून नागरिकांना त्रास होतो व सदरील गटारीचे पाणी जवळील ड्रेनेज लाईनच्या चेंबरमध्ये जाते.लाईनसुध्दा वारंवार चोकअप होते.त्यामुळे सदर ठिकाणी नविन गटार बांधणे जरुर आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १४ शहाबाजार येथे यु.सी.आर.एस.गटार बांधणेच्या कामाकरीता रक्कम रु. ६४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३९:**

वार्ड क्र. ३० मो.दिवाण देवडी येथे सिटीजन्स प्रेस ते नाल्यापर्यंत २५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४१,६५०/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील ठिकाणी १५० मीमी व्यासाची लाईन असल्यामुळे ती वारंवार बंद पडते त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढतात.त्यामुळे सदरील कमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्यामुहे अ-१ वर उपलब्ध गुत्तेदाराकडून करुन घ्यावयाच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३० मो.दिवाण देवडी येथील सिटीजन्स प्रेस ते नाल्यापर्यंत २५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ४१,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.काम ए-१ वर करुन घेण्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**विषय क्र. २४०:**

वार्ड क्र. ३८ मो.भवानीनगर येथे १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. २५,७३३/- चे तयार करण्यात आले आहे.सदर ठिकाणी म्हणजे मो.भवानीनगर व संजय नगर या भागात ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.कारण सदरील ठिकाणी ड्रेनेज लाईनचे पाणी रोडवरुन वाहते.त्यामुळे दुर्गंधी सुटते त्यामुळे सदर काम तातडीने "अ-१" निविदेतहत उपलब्ध गुत्तेदार श्री.बी.एस.राठोड यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३८ मो.भवानीनगर येथे १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन

**विषय क्र. २४१:**

वार्ड क्र. ४२ मो.सब्जीमंडी येथे महानगरपालिका शाळेजवळ नालीची दुरुस्ती करणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १८,८३७/- चे तयार करण्यात आले आहे.सदर ठिकाणी पूर्णपणे नाली तुटलेली आहे.त्यामुळे येथील रस्त्याची रुंदी कमी झाली असून तेथील नागरिकांना त्रास होतो.सदर नालीवर ढापे टाकून रस्ता रुंद होऊ शकतो.त्यामुळे नागरिकांचा त्रास कमी होऊ शकेल. करीता सदर काम करणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४२ मो.सब्जीमंडी येथे महानगरपालिका प्राथमिक शाळेजवळ नालीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रु. १८,८३७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४२:**

वार्ड क्र.५६ मो.राहुलनगर सादत नगर येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ९४,५३०/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी १५० मीमी व्यासाची लाईन नादुरुस्त असल्यामुळे वारंवार चोकअप होते.त्यामुळे सदरील लाईन काढून ३०० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.तरच नागरिकांचा त्रास कमी होईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : प्रथम १५० मीमी ची जलनिःसारण लाईन टाकली जातेव तद्नंतर पुनः २५० मीमी किंवा ३०० मीमी ची लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक दाखल केले जाते.यामुळे मनपा प्राधिकरणाचे आर्थिक नुकसान होते.करीता यापुढे आगामी १० ते २० वर्षाचा विस्तार विचारात घेऊन जलिःसारण योजना आखण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५६ मो.राहूलनगर सादत नगर येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु.९४,५३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४३:**

वार्ड क्र. २६ भोलेश्वर मार्केटजवळ २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१३,८५०/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील ठिकाणी १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन असून सदर लाईनवर रोड असल्यामुळे चोकअप होते.करीता सदर लाईनकाढून २५० मीमी व्यासाची लाईन टाकणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २६ भोलेश्वर मार्केट जवळ २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. १३,८५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

पाईप लाईन बदलण्याचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी लाईनचे अंदाजपत्रकाची संचिका जोडावी.

**विषय क्र. २४४:**

वार्ड क्र. ३५ कैसर कॉलनी येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,५४,२००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी अस्तित्वात असलेली १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन नादुरुस्त असल्याने सदर लाईन वारंवार चोकअप होत असल्याने सदर ठिकाणी ३०० मीमी व्यासाची लाईन टाकणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३५ कैसर कॉलनी येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. १,५४,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४५:**

वार्ड क्र.३९ मो.रोकडीया हनुमान कॉलनी येथे यु.सी.आर.एस.गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३९,५५०/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील ठिकाणी वाहणारे सांडपाणी हे गल्ल्या व रोडवरुन वाहते.त्यामुळे नागरिकांना त्रास होतो.करीता सदर काम तातडीचे "अ-१" निविदेवर बोलावून करुन घेण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३९ मो.रोकडीया हनुमान कॉलनी येथे यु.सी.आर.एस.गटार बांधणेच्या कामाकरीता रक्कम रु. ३९,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सदर कामाची तातडी लक्षात घेता "अ-१" निविदेतहत काम करुन घेण्यास नियमाप्रमाणे करावी.

**विषय क्र. २४६:**

वार्ड क्र.१२ मो.किराडपुरा येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. २३,९५९/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी अस्तित्वात असलेली ६" व्यासाची ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होत असल्याने सदर ठिकाणी १२" व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.सदरील मोहल्ल्यातील वाहणारी घाण व दुर्गंधी लक्षात घेता सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.कैसरखान यांचेकडून "अ-१" निविदेतहत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र. १२ मो.किराडपुरा येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. २३,९५९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता हे काम "अ-१" निविदेतहत अंदाजपत्रकीय दराने श्री.कैसर खान यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४७:**

वार्ड क्र.५७ मो.रचनाकार कॉलनी येथे २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. २२,०७९/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील ठिकाणी १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईल अस्तित्वात असून या लाईनवर भागीरथनगर डी.एड.कॉलेज,बी.एड.कॉलेज वस्तीगृह,देवगिरी कॉलेज,रचनाकार कॉलनी या भागाचे लोक असल्याने अस्तित्वात असलेली १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन लाहन पडत असल्याने त्याऐवजी २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.रचनाकार कॉलनी येथे २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेऐवजी ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी.सदर कामासाठी रक्कम रु. २२,०७९/- च्या व्यतिरिक्त येणाऱ्या अतिरिक्त खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४८:**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की,मध्यवर्ती जकात नाका व इतर नाक्या करीता फ्लड लाईट बसविण्याच्या कामाक्रीता रक्कम रु. २३,८१४/- चं अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.त्यास मान्यता देण्यात यावी.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मध्यवर्ती जकात नाका व इतर जात नाक्या करीता फ्लड लाईट बसविण्याच्या कामाकरीता रक्कम रु. २३,८१४/- च्या अंदाकपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २४९:**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की,औरंगपुरा येथील सुपर मार्केट या इमारतीचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरीता पहिल्यांदा निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा वसूल झाल्या होत्य.त्या तिन्ही निविदाचे दर अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा जास्त असल्यामुळे निविदा रद्द करण्यात आल्या.त्यानंतर दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या.सदर अंदाजपत्रकात पार्ट "ए" वायरींगचे काम व पार्ट "ब" फिटींगचे काम असे दोन भाग करण्यात आलेले होते.आलेल्या चार निविदा स्थायी समितीपुढे ठेवण्यात आल्या असता दि. १६-३-८९ च्या स्थायी समितीने पार्ट "ए" च्या कामास मंजुरी दिली व पार्ट "ब" च्या म्हणजे फिटींगच्या कामास मंजुरी दिलेली नाही.त्यानंतर संबंधीत ठेकेदारांनी दि. २५-४-८९ रोजी पत्र देऊन कळविले की,पार्ट "ए" चे कामाकरीता माझ्या निविदाच्या दरापेक्षा १० % जासत दर दिल्यास काम करण्यास तयार आहे.

म्हणून पुन्हा तिसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता मे.लुना इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३३.३ % जास्त दराचे निविदा आहे.

सुपर मार्केट इमारतीचे विद्युतीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक हे सन १९८६-८७ च्या सा.बां.खात्याच्या (विद्युत) दरसुची नुसार (डि.एस.आर.) तयार केलेले आहे.

मे लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदाचे दर सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या विद्युत शाखेच्या दरसुचीप्रमाणे २२.६९ % जास्त दर येतात.

परंतु मा.आयुक्तांच्या आदेशानुसार कार्यालयीन प.क्र.४१४९ / ८९ दिनांक २७-७-८९ अन्वये निविदा पत्रकाच्या दराबाबत वाटाघाटी करण्याकरीता बोलावण्यात येवून दि. ५-८-८९ रोजी वाटाघाटी केल्या असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांनी सदर कामाकरीता त्यांनी भरलेल्या निविदाच्या दरात ३.३ % दर कमी केल्या बाबत लेखी कळविले.

त्यानुसार मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदाचे दर ३० % जास्त येतात व सन १९८८-८९ च्या दर सुचीच्या दरानुसार १९.६६ % जास्तीचे दर येतात.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या त्या कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या? या निविदा स्थायी समितीसमोर न येता आयुक्तांनी परस्पर वाटाघाटीसाठी कशा केल्या? प्रस्तावित इमारतीचा उपयोग कसा केला जाईल? हयाचा खुलासा व्हावा व इमारतीचे उपयोगाबाबत निश्चित धोरण स्पष्ट व्हावे.

मा.सभापती : जनसंपर्क अधिकारी यांनी प्रत्येक बैठकीस हजर रहाणे आवश्यक आहे.परंतु तसे होत नाही.गत सभेत जनसंपर्क अधिकारी हयांचेवर कार्यवाही करणेसंबंधी कळविले होते.परंतु तसे झाल्याचे कळाले नाही.

श्री.मोरेश्वर सावे : स्थानिक वृत्तपत्रांऐवजी महाराष्ट्र राज्य स्तरावरील जास्त खपाचे वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत.सदरची निविदा रद्द करुन पुनः निविदा मागविण्यात याव्यात.

**ठराव :**

सुपर मार्केटची विद्युत वायरींग फिटींगचे काम करणेऐवजी या इमारतीसाठी म.रा.वि.मंडळाचे पोलपासून सुपर मार्केट पर्यंतचे फक्त कनेक्शन व मीटर देण्याचे काम महानगरपालिकेने करावे.तांत्रिक अडचण असल्यास विद्युत फिटींगचे काम त्या त्या गाळा धारकाने स्वखर्चाने करुन घ्यावे किंवा भाडेकरुने म.न.पा.प्रशासनाचे नावाने मीटर घ्यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,वार्ड क्र.३६ किराडपुरा येथे समाजमंदिर बांधणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२०-४-८९ विषय क्र.११०७ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ५,२८,३४५/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ४ जा.क्र.मनपा / बांधवि / १ / ४१० ८९ दि.२५-८-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा फार्म दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १७-८-८९ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.एस.ए.नवाब | ०.०२ % कमी |
| २) श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकाप्रमाणे |

वरील श्री.एस.ए.नवब यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ०.०२ % कमी दराचे आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदरचे संमाज मंदिर बांधकामा अंतर्गतचे काम मोठे व आर्थिक खर्चाचे असल्याने जास्त खपाचे वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन पुनः निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५१:**

शहर अभियंता हयांनी प्रस्ताव सादर केला की,विविध वाहनांच्या स्प्रे पेंटींगच्या कामासाठी सन १९८९-९० च्या आर्थिक वर्षात करार करण्यासाठी निविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके वसूल झालीत.पैकी दोन्ही एजन्सीचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | पेंटचा प्रकार | मे.परमार ॲटो गॅरेज यांचे दर | मे.याकुब गॅरेज यांचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | जीप | डिस्को पेंट | २५.०० | ३१००.०० |
| २ | मेटॅडोर | एनॅमल पेंट | १८५०.०० | १९००.०० |
| ३ | टाटा ४०७ | --//-- | २१००.०० | २०००.०० |
| ४ | महिंद्रा मिनीट्रक | --//-- | १९००.०० | २०००.०० |
| ५ | प्रिमियर पी ट्रक | --//-- | १९००.०० | २०००.०० |
| ६ | फायर ब्रिगेड | --//-- | २८००.०० | २९००.०० |
| ७ | टाटा टिप्पर | --//-- | २२००.०० | २३००.०० |
| ८ | प्रिमियर / डॉजट्रक | --//-- | २२००.०० | २०००.०० |
| ९ | टाटा / डॉज टँकर | --//-- | २८००.०० | २६००.०० |
| १० | टँकर ट्राली | डिस्को पेंट | १९५०.०० | २०००.०० |
| ११ | टॅक्टर | एनॅमल पेंट | १५००.०० | १८००.०० |
| १२ | टॅक्टर ट्राली | --//-- | १५००.०० | १८००.०० |
| १३ | रोलर | --//-- | १६००.०० | १८००.०० |
| १४ | एम.एम.टँक ३००० लि. | --//-- | ११५०.०० | १२.०० |
| १५ | एम.एम.टँक ५०००लि. | --//-- | १४००.०० | १५००.०० |
| १६ | गारवेज कॉम्पॅक्टर | --//-- | ४०००.०० | ३५००.०० |

अ.क्र.१,२,४,५,७,८,१०,१२,१३,१४,१५ साठी मे.परमार ॲटो गॅरेज यांचे दर कमी असून अ.क्र.३,६,९,१६ साठी मे.याकुब गॅरेज औरंगाबाद यांचे दर कमी आहेत.कमी असलेले दरास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

सदरचे प्रस्तावांतर्गतचे पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन १९८९-९० या आर्थिक वर्षात पि-,पि-६ डॉज ट्रक्स वाहनाच्या स्पेअर पार्टस पुरवठा करण्याकरीता वार्षिक करार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन (३) निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) मे.विकास ट्रेडर्स,औरंगाबाद प्राईज लिस्टपेक्षा १५.९० % जास्त दराने
२) मे.शिल्पा ट्रेडर्स,औरंगाबाद --//-- २४.१ % जास्त दराने
३) मे.जैन ट्रेडर्स,औरंगाबाद --//-- २५.१ % जास्त दराने

वरील सर्वात कमी दर मे.विकास ट्रेडर्स,औरंगाबाद यांचे असून प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदरचे प्रस्तावांतर्गतचे कामासाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन १९८९-९० या आर्थिक वर्षात मेटॅाडोर वाहनाच्या स्पेअर पार्टस खरेदी करण्याकरीता वार्षिक करार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) मे.धूत मोटर्स, औरंगाबाद प्राईज लिस्टपेक्षा १५ % जास्त दराने
२) मे. जेथलिया ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद प्राईज लिस्टपेक्षा ४.१ % जास्त दराने

वरीलपैकी सर्वात कमी दर मे.जेथलिया ॲटोमोबाईल्स,औरंगाबाद यांचे असून प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

धूत मोटर्स हे अधिकृत विक्रेते असल्याने व त्यांचे दर १५ % जास्त असल्याने त्यांचेसोबत मा.सभापतींनी वाटाघाटी कराव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,विविध प्रकारच्या वाहनांच्या पाटामोपींगच्या कामाकरीता सन १९८९-९० हया आर्थिक वर्षात करार करण्यासाठी निविदा पत्रके वसुल झालीत.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | मे.याकूब गॅरेज,औरंगाबाद | मे.परमार ॲटो गॅरेज,औरंगाबाद |
|---|---|---|---|
| १ | प्रिमियर पी - ४ | ५००.०० | ५२५.०० |
| २ | प्रिमियर पी - ६ | ५००.०० | ५२५.०० |
| ३ | टाटा टिप्पर / टॅंकर / कॉम्पॅक्टर | ६३०.०० | ६५०.०० |
| ४ | टाटा ४०७ | ५५०.०० | ६००.०० |
| ५ | मेटॅाडोर | ४५०.०० | ४००.०० |
| ६ | महिंद्रा पी - ४ ट्रक | ५००.०० | ४५०.०० |
| ७ | जीप | ३००.०० | २६०.०० |
| ८ | टू व्हील ट्राली | २५०.०० | २४०.०० |
| ९ | फोर व्हील ट्राली | ५००.०० | ४५०.०० |
| १० | फायर ब्रिगेडचे वाहन | ५५०.०० | ५२५.०० |

वरीलपैकी अ.क्र.१ ते ४ चे दर मे.याकुब गॅरेज,औरंगाबाद हयांचे कमी असून अ.क्र. ५ ते १० पर्यंतचे दर मे.परमार ॲटो गॅरेज,औरंगाबाद हयांचे आहेत.ज्या त्या कमी भरलेल्या एजन्सीकडून घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : अभियांत्रिकी विभाग,भांडार,जकात इ. विभागाबाबत आम्ही साशंक आहोत.अद्यापही भांडार व कचराकुंडया विषयीची माहिती मिळाली नाही.

**ठराव :**

सदरचे प्रस्तावांतर्गतचे कामासाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५५:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.१८ मधील कबाडीपुरा (नेहरु भवन) जवळ ८० मीमी व्यासाची जलवाहनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १०,८००/- चे असून ठराव क्र. २५३ दि. १७-८-८८ अन्वये मंजुर झालेले आहे.

मनपा / पापु / ७०० / ८८ दि.२३-८-८८ अन्वये जाहिररित्या (पाईपसह) निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही.

मा.आयुक्तांच्या दि. ३०-११-८८ च्या आदेशान्वये सदरील काम अ-१ नमुन्यावर करुन घेण्यास्तव स्थानिक कंत्राटदाराकडून कोटेशन प्राप्त केली असता खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) जावेद खान | ३ % | जास्त दराने |
| ३) सिद्दीकी झेड.आर | ४ % | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांचे दरपत्रक सर्वात कमी दराचे म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे आहे.करीता मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांचे अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रक स्विकारणेच्या मंजुरीस्तव सादर.

सदरील कामात पाईप वगळता लेबर चार्जेस रुपये २१५७/- इतके आहे.करीता विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१८ मधील कबाडीपुरा (नेहरु भवन) जवळ ८० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे मे.मॅकवेल कॉन्ट्रॅक्टर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २५६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,वार्ड क्र.४६ येथील औरंगपुरा बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय ८० डी.पी.रोडसाठी एस.बी.कॉलनी नाल्यामध्ये रिअेनिंग वॉल बांधणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१७-६-८९ रोजी विषय क्र.४४१ / १६ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.६,३४,६२५/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ३ / ८९-९० जा.क्र.मनपा / बांधवि १ / ३५५५ / ८९ दि.२७-६-८९ नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सात निविदा फॉर्म विकल्या गेल्या.त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत सहा निविदा फॉर्म भरुन प्राप्त झाल्या.त्याचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.ए.नवाब | १४.१४ % | कमी |
| २) // बी.ए.काल्डा | १३.९. % | कमी |
| ३) // डि.अजितसिंग | ६.५ % | कमी |
| ४) // ए.एल.कोठारी | ६ % | कमी |
| ५) // कुलवंतसिंग | १०.७० % | कमी |
| ६) // एच.एस.असोशिएटस | अंदाजपत्रकाप्रमाणे | |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १४.१४ % कमी दराचे श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रक आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ येथील औरंगापुरा बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय ८० डी.पी.रोडसाठी एस.बी.कॉलनी नाल्यामध्ये रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१४ % कमी दराचे श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २५७:**

१९८८-८९ या वर्षात महानगरपालिकेच्या शाळेतील इ.१ ली ते ७ वी च्या अनुसूचीत जाती / जमाती व भटक्या विमुक्त जाती / जमातीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटपास स्थायी समितीच्या प्रस्ताव व ठराव क्र. ५५ दि.५-८-८८ नुसार मंजुरी प्राप्त आहे.मा.आयुक्तांच्या दि.३-९-८९ च्या बैठकीतील तोंडी आदेशानुसार यात काही बदल केले आहेत.

विद्यार्थ्यांकडून २५ % रकमेचा सहभाग घेण्यात आला होता.परंतु मनपा शाळेत गरीब व झोपडपट्टीतील विद्यार्थी असतात म्हणून १०० % अनुदानावर शालेय व गणवेश वाटप करण्यात यावे.

गतवर्षी एक गणवेश देण्यात आला होता.परंतु कमीत कमी दोन गणवेशांची आवश्यकता असते.म्हणून २ गणवेश एका विद्यार्थ्यास देण्यात यावे.

वहया महाराष्ट्र पाठय पुस्तक मंडळ,औरंगाबाद कडून घेण्यात याव्यात.

शासन अंगीकृत गोदावरी गारमेंटस,औरंगाबाद यांचेकडून गणवेश खरेदी करण्यात यावेत व इतर वस्तुंसाठी निविदा मागविण्यात याव्यात.

विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे साहित्य वाटप करणे योग्य.

| अ.क्र. | वस्तु | नग | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | गणवेश | २ | १ ली ७ वी |
| २ | कंपास पेटी कॅडेट | १ | ४ थी ७ वी |
| ३ | स्कुल बॅग वाटा खाकी रंग नं.१४ | १ | १ ली ते ७वी |
| ४ | बॉलपेन (साधी रिफील) | २ | ४ थी ते ७ वी |
| ५ | पाटी (पत्र्याची) | १ | १ ली ते ३ री |
| ६ | रंगपेटी (कॅमल वैक्स) | १ | ४ थी ते ७ वी |
| ७ | ड्रॉईंग वही | १ | ४ थी ते ७ वी |
| ८ | वहया (२०० पृष्ठ) | ४ | ४ थी |
| ९ | वहया (२०० पृष्ठ) | ६ | ५ वी ते ७ वी |

गतवर्षी रु.२०,०००/- चे साहित्य खरेदी केले आहे.यावर्षी रु.५०,०००/- या उपक्रमावर खर्च करण्यात यावे.सदर खर्च "नागरी मुलभूत सेवा प्रकल्प" या शिर्षांतर्गत करण्यात यावा.एकूण तरतूद रु.एक लाखाची आहे.प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका शाळेत गरीब व झोपडपट्टीतील विद्यार्थी शिक्षण घेत असल्यामुळे सन १९८९-९० करीता १००% अनुदान तत्वावर महापालिका शाळेतील इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या अनुसूचित जाती / जमाती व भटक्या विद्यार्थ्यांना

खालील दर्शविलेले शालेय साहित्य व गणवेश वाटप (एका विद्यार्थ्यांस दोन ड्रेस) करण्यासाठी रक्कम रु. ५०,०००/- देण्यात येते.

| अ.क्र. | वस्तु | नग | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | गणवेश | २ | १ ली ७ वी |
| २ | कंपास पेटी कॅडेट | १ | ४ थी ७ वी |
| ३ | स्कुल बॅग वाटा खाकी रंग नं.१४ | १ | १ ली ते ७वी |
| ४ | बॉलपेन (साधी रिफील) | २ | ४ थी ते ७ वी |
| ५ | पाटी (पत्र्याची) | १ | १ ली ते ३ री |
| ६ | रंगपेटी (कॅमल वैक्स) | १ | ४ थी ते ७ वी |
| ७ | ड्रॉईंग वही | १ | ४ थी ते ७ वी |
| ८ | वहया (२०० पृष्ठ) | ४ | ४ थी |
| ९ | वहया (२०० पृष्ठ) | ६ | ५ वी ते ७ वी |

उपरोक्त साहित्यापैंकी गणवेश आणि वहयांची खरेदी अनुक्रमे शासन अंगीकृत असलेल्या गोदावरी गारमेंटस,औरंगाबाद व महाराष्ट्र पाठय पुस्तक मंडळ औरंगाबाद यांचेकडून आणि उर्वरित साहित्य निविदाद्वारे खरेदी करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.कार्यवाही व्हावी.

यानंतर मा.सभापती हयांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २२-९-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शुक्रवार , दिनांक २२ सप्टेंबर, १९८९रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) // घडामोडे मोतीराम नारायण
३) // गील एकबालसिंग प्रितमसिंग
४) // स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतुबुद्दीन

**विषय क्र. २५८:**

दिनांक १५ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.एकबालसिंग गील : मागील सभेतील विषय क्र. २५० बाबत संबंधीत वार्डाचे नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रकाचा विचार करुन कमी दराचे गुत्तेदाराबरोबर वाटाघाटी करुन संबंधीतास काम देण्यात यावे.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : विषय क्र.२५० च्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली तर या कामासाठी ज्या गुत्तेदाराचे दर कमी आहेत त्यांना टाळणे योग्य होणार नाही.

मा.आयुक्त : विषय क्र.२५० बाबत सभागृहाने मागील सभेत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.इतिवृत्त कायम करतांना तयार करण्यात आलेल्या इतिवृत्तांत फक्त तांत्रिक दुरुस्ती करता येईल.तेव्हा एकदा निर्णय झ ाल्यानंतर तो बदलता येणार नाही.

मा.उप-आयुक्त : विषय क्र. २५० मध्ये सदर कामाच्या निविदाची प्रसिध्दी जास्त खपाचे वृत्तपत्रात देण्यात यावी असे म्हटले आहे,तेव्हा जास्त खपाचे वृत्तपत्राच्या नांवाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.याशिवाय किती रकमेपर्यंतच्या अंदाजपत्रक असलेल्या कामाकरीता निविदा मागवितांना विषय क्र. २५० मध्ये उल्लेख,केल्याप्रमाणे जास्त खपाचे वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी याबाबत निर्णयात्मक भूमिका ठरविण्यात यावी.

विधी सल्लागार : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६६ चे पोटकलम ६,७ सभागृहास वाचून दाखविले.

मा.आयुक्त : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.६६ चे पोटकलम ६ व ७ प्रमाणे ठराव क्र. २५० मध्ये बदल करणे योग्य नाही.असा पायंडा पाडणे योग्य होणार नाही.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : जर एखादया सभेतील ५० % किंवा त्यापेक्षा जास्त सभासदांनी एखाद्या ठरावात बदल करता येईल.

सचिव : विषय क्र.२५० चे ठरावात नोंदविण्यात आलेला निर्णय चुकीचा नाही.तो सर्वानुमते ठरल्याप्रमाणे नोंदविण्यात आला आहे.

श्री.अलफखाँ हुसेनखाँ,श्री.एकबालसिंग गील : विषय क्र.२५० बाबत संबंधीत वार्डाचे नगरसेवकांनी केलेली मागणी आणि कामाची तातडी लक्षात घेता या कामासाठी अल्प मुदतीची लघुनिविदा आजच वृत्तपत्राकडे प्रसिध्दीसाठी देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

मा.सभापती : इतिवृत्तावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही.त्यामुळे शिक्कामोर्तब होणेपूर्वी बदल करणेस हरकत नसावी.सन्माननीय सभासदांच्या मागणीनुसार विषय क्र. २५० चे काम तातडीचे असल्याने या कामासाठी लघु निविदा मागविण्यात याव्यात.याबाबत संबंधीत विभागाने त्वरीत कार्यवाही करावी .तसेच महापालिकेने जाहिरात प्रसिध्दी बाबत वृत्तपत्रांची जी क्रमवारी ठरविली आहे त्याशिवाय रुपये पाच लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम असलेल्या कामांच्या निविदा स्थानिक वृत्तपत्रांव्यतिरिक्त दैनिक सकाळ व क्रमवारीत आले नसल्यास दै.मराठवाडा व दै.लोकमत इत्यादी वृत्तपत्रात क्रमवारीने प्रसिध्दीस देण्यात याव्यात.

श्री.मोतीराम घडामोडे : मागील सभेत फिनेल खरेदीबाबतच्या चौकशी अहवालाबाबत काय प्रगती झाली अशी विचारणा केली असूनही त्याबाबतचा इतिवृत्तात उल्लेख नाही.फिनेलच्या अहवालाबाबत खुलासा व्हावा.

लेखाधिकारी : मुख्य लेखा परिक्षक किरकोळ रजेवर आहेत.तेव्हा फिनेल बाबतचा अहवाल आगामी स्थायी समिती सभेत देण्यात येईल.

श्री.स.अहमद एकबालोद्दीन : वार्ड क्र.१८ मधील रोहिलागल्ली,जुनाबाजार येथील काही कामांच्या संचिका अद्यापपर्यंत मंजुरीसाठी सभागृहापुढे ठेवण्यात आल्या नाहीत.याबाबत वारंवार संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.तेव्हा या कामाच्या संचिका सध्या कोणत्या विभागाकडे विचाराधीन आहेत याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता (ड्रेनेज) : वार्ड क्र.१८ मधील तीन कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत.त्याबाबत तपासणी करुन खुलासा करण्यात येईल.

मा.सभापती : वार्ड क्र.११ चे पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

श्री.मोतीराम घडामोडे :वार्ड क्र.११ चे पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी आवश्यकता असल्यास सभासद फंडाच्या राखीव निधीतून खर्च करण्यात यावा.

मा.आयुक्त : वार्ड क्र.११ चे पाणी पुरवठा व्यवस्था प्रकरणी कार्यकारी अभियंता कार्यवाही करतील.

**ठराव :**

दिनांक १५ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २५९:**

वार्ड क्र.३ मो.बुऱ्हाणी कॉलनी,(न्यु इरा हौसिंग सोसायटी) येथे ६" व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे निविदेस स्थायी समितीचा ठराव क्र. २७/१०१९ व दि.२१-३-८९ नुसार सदर काम श्री.एस.बी.साळवे गुत्तेदार यांचे मार्फत अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २६ % कमी दराने करुन घेण्यास मंजुरी मिळालेली आहे.

परंतु संबंधीत गुत्तेदार काम करण्यास तयार नसल्याने त्यांचे अनामत रक्कम जप्त करुन सदर काम दुसऱ्या क्रमांकावर असलेले गुत्तेदार श्री.शंकर भैरव यांचेमार्फत त्यांनी

निविदेत दर्शविलेल्या दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २४.७० % कमी दराने काम करण्यास तयार आहात काय याबाबत खुलासा मागविण्यात आला होता तरी सदर गुत्तेदाराने काम करण्यास मान्य केलेले आहे.

करता सदर काम अंदाकजपत्रकाच्या दरापेक्षा २४.७० % कमी दराचे म्हणजे त्यांनी त्यांच्या निविदेत दर्शविलेल्या दराने श्री.शंकर भैरव,गुत्तेदार यांचे मार्फत करुन घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३ बुऱ्हाणी कॉलनी (न्यु इरा हौसिंग सोसायटी) येथे ६ "व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले दरपत्रक धारक गुत्तेदार श्री.शंकर भैरव यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७० % कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६०:**

वार्ड क्र.४ मो.आरिफ सोसायटी अशिफ बाग,घाटी येथे प्लॉट नं.८९ ते सोसायटीच्या मोकळया जागेपर्यंत ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या अंदाजपत्रक रक्कम रु. ८०,६७५/- ला स्थायी समिती ठराव क्र.१६४ दि. २७-७-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.७ / ८९-९० दिनांक २५-८-८९ नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या होत्या व तीन्ही निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.बी.आर.आनंद | ३.४ % जास्त |
| २) // आनंद बिल्डर्स | अंदाजपत्रकीय दराने |
| ३) // रणविरसिंग | १.३० % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.३० % कमी दराचे श्री.रणवीरसिंग यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४ मो.आरि‍ि सोसायटी अशिफ बाग,घाटी येथे प्लॉट नं.८९ ते सोसायटीच्या मोकळया जागेपर्यंत ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३० % कमी दराचे श्री.रणविरसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६१:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,फुलेनगर गलिच्छ वस्ती वार्ड क्र.

येथे नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी अस्तित्वात असलेली परत बसविणेच्या कामासाठी कार्यालयातर्फे जाहीर प्रकटनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या,त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सलीमुद्दीन सिद्दीक | ६ % | जास्त |
| २) // सय्यद रफीओद्दीन | ०.०१ % | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) // पॉल कन्स्ट्रक्शन | ०.५ % | जास्त |

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची निविदा श्री.सय्यद रफीओद्दीन यांची असून सदर कामाच्या खर्चाची रक्कम रु. १,४५,३५०/- एवढी आहे व त्यास स्थायी समिती दि. २४-११-१९८८ ठराव क्र. ५९६ अन्वये मान्यता मिळाली आहे.

तरी सय्यद रफीओद्दीन यांची निविदा मान्य करणे बाबतच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फुलेनगर गलिच्छ वस्ती येथे नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी अस्तित्वात असलेली परत बसविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराचे श्री.सय्यद रफीओद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६२:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केली की,मोहल्ला हर्षनगर वार्ड क्र.१६ येथील बैठकीचे सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणे व दोन स्वतंत्र वॉटर टँक बांधणेच्या कामास स्थायी समिती दि. ८-६-८९ च्या ठराव क्र. १२ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर कार्यालयातर्फे स्थानिक गुत्तेदारांकडून अ-१ नमुन्यावर दरपत्रके मागविली असता एकूण तीन दरपत्रके दर भरलेली प्राप्त झाली.ती खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.भास्कर तात्याराव मिरधे | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) // शेख इकबाल अहमद | ५ % | जास्त |
| ३ // हबीब खान | ३ % | जास्त |

सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दराचे श्री.भास्कर तात्याराव मिरधे यांचे दरपत्रक मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१६ मो.हर्षनगर येथील बैठकीचे सार्वजनिक संडासाची दुरुस्ती व दोन स्वतंत्र वॉटर टँक बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. भास्कर तात्याराव मिरधे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६३:**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,क्रांतीनगर स्लम येथे २० बैठकीचे संडास तयार करणे बाबत कार्यालयातर्फे जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन दर भरलेल्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन | ५.११ % | कमी |
| २) // पी.जे.तमखाने | ५ % | जास्त |
| ३) // आनंद बिल्डर्स | ७.३ % | कमी |
| ४) // एन.जी.गुनवानी | १० % | कमी |

सर्वात कमी दराची निविदा श्री.एन.जी.गुनवानी यांची असून ती अंदाजपत्रकापेक्षा १० % कमी दराची आहे.परंतु श्री.गुनवानी यांचेकडे ४.५० लाखाची दोन कामे व इतर विभागातीलही बरीच कामे आहेत. ती अद्याप पूर्ण झालेली नाही.करीता दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.आनंद बिल्डर्स यांची ७.३ %`मी दराची निविदा मान्य करणे योग्य होईल अशी शिफारस केल्यानंतर मा.आयुक्तांनी इतर कोणताही पर्याय नसल्यामुळे गलिच्छ वस्ती

सुधारणेच्या कामात विलंब होऊ नये म्हणून दुसऱ्या क्रमांकाची श्री.आनंद बिल्डर्स यांची ७.३ % दराची निविदा मान्य करणेसाठी प्रस्तावित केले आहे.मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीनगर स्लम येथे २० बैठकीचे संडास तयार करणेच्या कामासाठी गलिच्छ वस्ती सुधारणेच्या कामात विलंब होऊ नये म्हणून दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले दरपत्रकधारक श्री.आनंद बिल्डर्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३ % कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६४:**

वार्ड क्र.२९ मो.पुर्णानंद भंडार ते जनता बाजार पर्यंत २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३१,३०१/- ला स्थायी समिती ठराव क्र. १११२ दि. २८-४-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. २ / ४०५ /८९ दि. १६-५-८९ द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आल्या असून सदर दोन्ही निविदा वसूल झालेल्या आहेत व त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) अ.बी.कुलकर्णी ०.०१ % कमी
२) शे.शरीफ १ % जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराचे श्री.अ.बी.कुलकर्णी यांचे दरपत्रक आहे.करीता विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३९ मो.पुर्णानंद भंडार ते जनता बाजार पर्यंत २५० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराचे श्री.अ.बी.कुलकर्णी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६५:**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की,शहरातील विद्युत खांबावर लाईटचे फिक्चर लावण्याकरीता लागणारे ब्रॅकेट व ५"X३" साईज सिमेंट पोल, अँगल पोलचे क्लॅप खरेदी करण्याकरीता रक्कम रु.१,६४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे,त्यास मंजुरी देण्यात यावी.

तसेच सदर काम तातडीच्या स्वरुपाचे असल्यामुळे ब्रॅकेट व क्लॅप ५"X३" सिमेंट पोल,अँगल पोल खरेदी करण्याकरीता निविदा सुचना क्र.मनपा / लाईट / ६२५ / ८९ दि. २१-८-८९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत चार निविदा वसूल झाल्या आलेल्या निविदा दि. १३-९-८९ रोजी उघडण्यात आल्या त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वस्तुंचा तपशील | किर्ती इंटरप्राईजेस | वर्षा मेटल वर्क्स | पाटील एन पाटील | मनिषा इंजिनिअरिंग |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्ट्रीट लाईट "बी" क्लास जी.आय.पाईप | रु.७५.०० प्रति नग | ७३.०० प्र.नग | ७४.७५ प्र.नग | ७४.९५ प्र.नग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ब्रॅकेट,२५ मीमीX१.२ मी प्रति नग एकूण १००० | | | | |
| २ | ५" X ३" साईजचे एम.एस.क्लॅप२ नटबोल्ट सहीत एकूण १६०० नग | रु. ३४.३५ प्र.नग (पेअर) | ३२.०० प्र.नग | ३३.३५ प्र.नग | ३४.१० प्र.नग |
| ३ ब) | रेल पोल ९०,६५,७५ साईज दोन नटबोल्टसह २०० नग | ३३.४० प्र.नग | ३२.०५ | ३२.९५ | ३३.०५ |
| क) | अँगल पोल क्लँप नटबोल्टसह १०० नग | रु.३६.१० प्र.नग | ३४.५० | ३५.५५ | ३५.९५ |
| ड) | सिमेंट पोलचे क्लँप नटसह १०० नग | रु.३६.९५ प्र.नग | ३४.७२ | ३५.९५ | ३६.०५ |
| ३ | स्ट्रीट लाईट ब्रॅकेट मर्क्युरीसाठी २५ X १.२ एम.एम.चे "बी" क्लास जी.आय.पाईप रिडयुसरसह १०० नग | रु.९६.४५ प्र.नग | ९५.०५ | ९८.३५ | ९८.५० |
| ४ अ) | ५"X३" साईज एमएस क्लँप ३ नटबोल्टसह १५० नग | ३६.८५ प्र.नग | ३४.०५ | ३६.१० | ३६.१५ |
| ब) | रेल पोलचे क्लँप नटबोल्टसह ९०,६५,७५- ३० नग | ३४.९० प्र.नग | ३२.९५ | ३३.९५ | ३४.५० |
| क) | सिमेंट पोलचे क्लँप नटबोल्टसह २० नग | ३२.५५ प्र.नग | ३०.०० | ३१.८० | ३२.०५ |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोतीराम घडामोडे : सभागृहापुढे मंजुरीसाठी असलेल्या कामासाठी वसूल झालेल्या निविदांकडे दृष्टीक्षेप टाकल्यास या कामासाठी रिंग झालेली आहे असे दिसते.अशा रिंग प्रकरणाला प्रतिबंध घालता येणार नाही काय?

मा.आयुक्त,मा.उपायुक्त : हया बाबतीत काय उपाययोजना किंवा प्रतिबंध घालता येईल हयाचा सभागृहाने विचार करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विद्युत खांबावर लाईटचे फिक्चर लावण्याकरीता लागणारे ब्रॅकेट व ५" x ३" सिमेंट पोल,अँगल पोलचे फ्लँप खरेदी करण्याकरीता रक्कम रु. १,६४,०००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच प्राप्त झालेल्या निविदां पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असलेले मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे खालील दर्शविलेल्या दरांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | वर्षा मेटल वर्क्स यांचे दर |
|---|---|
| १ | रु. ७३.०० प्र.नग |
| २ अ) | रु. ३२.०० प्र.नग |
| २ ब) | रु.३२.०५ प्र.नग |
| २ क) | रु. ३४.५० प्र.नग |
| २ ड) | रु. ३४.७२ प्र.नग |
| ३ | रु. ९५.०५ प्र.नग |
| ४ अ) | रु. ३४.०५ प्र.नग |
| ४ ब) | रु. ३२.९५ प्र.नग |
| ५ क) | रु. ३०.०० प्र.नग |

**विषय क्र. २६६:**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की,चिकलठाणा येथील एम.आय.डी.सी.परिसरातील बारा (१२) चौकात २५० वॅट सोडियम व्हेपर प्रत्येकी दोन दिवे लावण्याच्या कामाकरीता रक्कम रु.१,००,०००/- च्या अंदाजपत्रकास दि. १९-८-८९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र. १५२ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा वसुल झाल्या,त्या निविदा दि. १३-९-८९ रोजी उघडण्यात आल्या त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.इगल इलेक्ट्रीकल्स ४.५ % जास्त दराने
२) युनिव्हर्सल इलेक्ट्रीकल्स ८ % जास्त दराने
३) मे.लुना इलेक्ट्रकल्स २ % जास्त दराने

मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २ % जास्त दराची निविदा आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील एम.आय.डी.सी. परिसरातील १२ चौकात २५० वॅट सोडियम व्हेपर प्रत्येकी दोन दिवे लावण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ % जास्त दराचे मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६७:**

शहर अभियांता यांनी अभिप्राय दिला की,शहरातील सोडियम व्हेपर लाईट करीता लागणारे ४०० वॅट चोक बजाज अथवा जी.ई.सी.मेक ८० नग खरेदी करण्याकरीता रक्कम रु. ६१,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.त्यास मंजुरी देण्यात यावी.

सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत फक्त तीन निविदा वसुल झाल्या.प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १३-९-८९ रोजी उघडण्यात आल्या,त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. चिंतामणी ट्रेडींग कंपनी | रु. १०७४/- | प्र.नग |
| २) मे.इंडस्ट्रीयल सेल्स कार्पोरेशन | रु. १०८५/- | प्र.नग |
| ३) मे.पगारीया इन्टरप्राईजेस | रु.१०८० /- | प्र.नग |

मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे प्रति नगास रु.१०७४/- या दराची निविदा आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.एकबालसिंग गील : मकबरा रोडवर सोडियम व्हेपरचे दिवे लावण्यात यावेत.

मा.आयुक्त : विभागीय आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार मकईगेट ते मकबरा रस्त्याचे रुंदीकरण आणि विद्युतीकरणाचे काम टाऊन हॉल ते मकबरा पर्यंतच्या रस्त्यावर सोडियम व्हेपरचे दिवे लावण्याचा विचार करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील सोडियम व्हेपर लाईटकरीता लागणारे ४०० वॅट चोक बजाज अथवा जी.ई.सी.मेक ८० नग खरेदी करण्याकरीता रक्कम रु. ६१,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते

तसेच सदरील कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे प्रति नगास रु. १०७४/- या दराचे मे. चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६८:**

शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की,टेलिग्राफ ऑफिस व रंगीन गेटजवळील सोडियम व्हेपर दिव्यांचे केबलिंग वर्क करण्याकरीता रक्कम रु. १३,८५८.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.त्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच सदर कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा वसूल झाल्या.आलेल्या निविदा दि. १३-९-८९ रोजी उघडण्यात आल्या त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) ईगल इलेक्ट्रीकल्स | ५ % | जास्त |
| २) रिगल इलेक्ट्रकल्स | ४ % | जास्त |
| ३) बुश इलेक्ट्रीकल्स अँड इंजिनिअर्स | २.५ % | जास्त |
| ४) लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकाच्या दरात | |
| ५) शांती इलेक्ट्रीकल्स | ४ % | जास्त |
| ६) युनिव्हर्सल इलेक्ट्रीकल्स | ०.१ % | कमी |
| ७) ओमशांती इलेक्ट्रीकल्स | ५ % | जास्त |

मे.बुश इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनियर्स यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २.५ % कमी दराची निविदा आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टेलिग्राफ ऑफिस व रंगीन गेटजवळील सोडियम व्हेपर दिव्याचे केबलिंग वर्क करण्याकरीता रक्कम रु. १३,८५८/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सदर कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५ % कमी दराचे मे. बुश इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इजिनियर्स यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिध्दार्थ उद्यानातील नील गाईच्या पिंजऱ्यात दुभाजक टाकण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९८८-८९ च्या मंजुरा दराप्रमाणे रु. १४,६२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास स्थायी समिती विषय क्र.१५१ दि. २५-८-८९ प्रमाणे स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे.

तसेच सदरील काम दि. २-९-८९ च्या स्थायी समितीमध्ये मा.सभापती यांनी परवानगी दिल्यानुसार अ-१ करारनाम्यावर करुन घ्यावे असे ठरले.त्या अनुषंगाने अ-१ नमुन्यात दरपत्रके मागविली असता खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सुभाष पुंडलिक नाईक | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) // कैसर खान | २ १/२ % | जास्त |
| ३) // अब्दुल सलाम | ३ १/२ | जास्त |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या दरपत्रकात श्री. सुभाष पुंडलिक नाईक यांचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाचे दर आलेले आहेत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानातील निल गाईच्या पिंजऱ्यात दुभाजक टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सुभाष पुंडलिक नाईक यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिध्दार्थ उद्यानातील अस्वलांच्या पिंजऱ्यात वाढ करुन मोठा करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ८८-८९ च्या मंजुर दराप्रमाणे रु. ३९,३६६.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. १५६ दि. २५-८-८९ प्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

या कामास दि. २-९-८९ च्या स्थायी समितीमध्ये मा.सभापती यांनी दिल्यानुसार नमुना अ-१ करारनाम्यावरुन करुन घ्यावे असे ठरल्यावरुन अ-१ नमुन्यात दरपत्रके मागविण्यात आली असता खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अंबादास गोविंद इंगळे | अंदाजपत्रकाच्या दरात | |
| २) // सलिम अहेमद | ३ % | जास्त |
| ३) // एस.ए.नवाब | २ % | जास्त |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या दरपत्रकात श्री.अंबादास गोविंद इंगळे यांचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाचे दर प्राप्त झालेले आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानातील अस्वलांच्या पिंजऱ्यात वाढ करुन मोठा करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.अंबादास गोविंद इंगळे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. २७१:**

सहाय्यक आयुक्त-२ महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९८९-९० सालात महापालिकेस लागणारे स्टेशनरी व ड्रॉईंग साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत.त्यांचा तुलनात्मक तक्ता करण्यात आलेला असून कमी दराच्या दरपत्रधारकांच्या नांवासमोर साहित्याचे अनुक्रमांक दिलेले आहेत.

१) मे. हेमंत ट्रेडर्स, औरंगाबाद. अ) स्टेशनरी साहित्य - नाही.
ब) ड्रॉईंग साहित्य - नाही.

२) मे.मुरली स्टेशनरी, औरंगाबाद. अ) स्टेशनरी साहित्य - अ.क्र. १,४,१४,१५,१६,२१,२३,२७,२८, ३१,३४,३८,३९,४०,४६,४८,५३,५९,६०,६१,६७,७०,७१,७९, ८४,९०,९२,९४,१०१.
ब) ड्राईंग साहित्य - अ.क्र.३७,३८.

३)मे.जे.के.इन्टरप्राईजेस, औरंगाबाद. अ) स्टेशनरी साहित्य - नाही.
ब) ड्राईंग साहित्य - नाही.

४) मे.विजय जनरल स्टोअर्स, औरंगाबाद. अ)स्टेशनरीसाहित्य- २,३,५,६,७,८,९,१०,१३,१९,२०,२४,२६,३०, ३६,४३,४५,४९,५०,५१,५४,५५,५९,६०,६६,७०,७१,७४,७५,७६, ७८,८०,८५,८६,८७,८९,९३,९६,९७,९९,१०२.
ब) ड्राईंग साहित्य - १,५,७,९,११,१३,१५,१७,१९,२१,२३,२५,२७, २९,३१,३३,३५,३९.

५) मे.ईन्शा हार्डवेअर, औरंगाबाद. अ) स्टेशनरी साहित्य - ११,१२,१७,१८,२२,२५,२९,३२,३३,३५, ३८,४१,४२,४४,४७,५२,५६,५७,५८,६२,६३,६४,६५,६८,६९,७२, ७३,७७,८१,८२,८३,८८,९१,९५,९८,१००.
ब) ड्राईंग साहित्य - २,३,४,६,८,१०,१२,१४,१६,१८,२०,२२,२४, २६,२८,३०,३२,३४,३६,४०.

वरील प्रमाणेच्या कमी दराच्या दरपत्रक धारकाच्या नांवासमोर दिलेल्या अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० सालात महापालिकेस लागणारे स्टेशनरी व ड्राईंग साहित्य खरेदी करण्यासाठी मे.मुरली स्टेशनरी,मे.विजय जनरल स्टोअर्स,व

मे.इन्शा हार्डवेअर,औरंगाबाद यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या साहित्याच्या अनुक्रमांकाच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.याशिवाय निविदेप्रमाणे दाखल केलेल्या प्रत्येक वस्तुचे नमुन्यावर (सॅम्पल) उप आयुक्त व मुख्य लेखा परीक्षक व विभाग प्रमुख यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात आणि नमुन्याप्रमाणे पुरवठाधारकांनी केलेल्या मालाचा पुरवठा दिलेल्या (सॅम्पल) नमुन्याप्रमाणे आहे किंवा कसे? याची खात्री करुन घेतल्यानंतर पुरवठा करण्यात आलेला माल ताब्यात घ्यावा व क्वालीटी व क्वांटीटी नमुन्याप्रमाणे येते किंवा नाही याची वरचेवर संबंधितांनी चाचणी करावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-८-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा वृत्तांत.**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (१३)**

**शुक्रवार, दिनांक २९-९-८९रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१)मा.श्री.अलफखाँ हुसेनखाँ
२)--//--गील एकबालसिंग प्रितमसिंग
३) --//-- घडामोडे मोतीराम नारायणराव.
४) --//-- जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) --//-- नवपुते कचरु चंद्रभान
६) --//-- पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) --//--मगर शंकर जिजाराम
८) --//-- मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
९) --//--यादव अशोक सायन्ना
१०)--//-- स.अ. एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन.

**विषय क्र. २७२:**

दिनांक २ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : महापालिका निवडणूक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना दोन आगाऊ वेतन वाढी देणे बाबतचे पत्रक यापुर्वी सभागृहात देण्यात आले होते.तेव्हा या कर्मचाऱ्यांना दोन आगाऊ वेतन वाढी देणे बाबतचे पत्रक यापुर्वी सभागृहात देण्यात आहे होते.तेव्हा या कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी देणे बाबत काय कार्यवाही झाली? याचा खुलासा व्हावा.

मा.उपआयुक्त :फक्त विशिष्ट विभागांच्या कर्मचाऱ्यांनाच वेतन वाढ अदाई संबंधी विचार करणे योग्य होणार नाही. कार्यालयातर्फे काही कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाटी देण्यात आल्या आहेत आणि काही कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी विचाराधीन आहेत.त्यावेळी या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतन वाढ देण्याचा विचार केला जाईल.

श्री.मोतीराम घडामोडे : कर्मचारी निवडणूक विभागात रात्रंदिवस काम करीता आहे,म्हणून या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतन देण्याची मागणी करण्यात यावी?

मा.उपआयुक्त :कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत शासनाने काही नियम ठरवून दिले आहेत त्या नियमांचे अधिन राहूनच आगाऊ वेतनवाढ संबंधी निर्णय घेणे योग्य राहील.

मा.सभापती : आगाऊ वेतन वाढ प्रकरणी मा.उपआयुक्तांनी सखोल अभ्यास करुन या कर्मचाऱ्यांना वेतन वाढ,जादा काम भत्ता किंवा इतर कोणता पर्याय योजता येईल काय? याबाबत विचार करावा व पुढील सभेत अहवाल मांडावा.

श्री.एकबालसिंग गील : सर्वसाधारण सभेने उपअभियंता पदाच्या ४ जागा भरणेस मंजुरी दिली आहे.या ४ जागांपैकी ३ जागा कार्यालयाने यापुर्वीच भरल्या आहेत.परंतु ही जागा हेतुपुरस्पर भरली जात नाही किंवा एका विशिष्ट व्यक्तीसाठी राखून ठेवली जात आहे अशी माहिती मिळाली आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : शासनाच्या आदेशाप्रमाणे २ ऑक्टोंबर पर्यंत सर्व राखीव जागा भरण्यात याव्यात असे आदेश आहेत.तेव्हा शासनाचे आदेश असतांनाही ही जागा अद्याप भरली गेलेली नाही.यावरुन स.सभासदांनी सुचविल्या प्रमाणे उप अभियंताची एक जागा विशिष्ट व्यक्तीसाठीच राखून ठेवली आहे किंवा तसे प्रयत्न होत आहेत याचा खुलासा व्हावा.

मा.उपआयुक्त :महापालिकेने शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या संस्थाकडून आवश्यक उमेदवारांची यादी मागवून शिक्षकांच्या जागा भरल्या आहेत.तरीही विशिष्ट जमातीचे उमेदवार न मिळाल्याने वृत्तपत्रांमधून जाहिरात देण्यात आली आहे.या शिवाय पात्र उमेदवारांना कार्यालयातर्फे पदोन्नती देण्यात येत आहे.

श्री.एकबालसिंग गील : महापालिकेने उप अभियंतांच्या ३ जागा भरल्या आहेत मग उरलेली १ जागा का भरली नाही? ही जागा भरण्यासाठी कार्यालयाने काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.उपअभियंताचे पद भरण्यास मंजुरी देण्यात येवूनही अद्याप ही जागा न भरल्यामुळे या पदाचा लाभ ज्या कर्मचाऱ्याला मिळणार आहे त्यांना पदोन्नती मिळण्यास विलंब होत असल्याने आर्थिक नुकसान होणार आहे.

मा.उपआयुक्त : सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या ४ उप अभियंत्यांचे पदांपैकी ३ पदे मंजुरीपूर्व भरण्यात आली आहेत.त्यामुळे मंजुरी नुसार पदोन्नत केलेल्या कर्मचाऱ्यांना आदेश काढले आहेत उरलेल्या १ जागेसाठी निवड समिती कायम करण्यात आली असून सदर संचिका मंजुरीसाठी दाखल करण्यात आली आहे.

श्री.मोतीराम घडामोडे : स्थायी समितीने शहरातील स्मशान भुमी मध्ये स्मशान जोगी ठेवण्यास मंजुरी दिली आहे त्यानुसार या मंजुर जागांवर स्मशान जोगी समाजातील उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत वेळोवेळी मा.आयुक्तांची भेट घेण्यात आली परंतु स्मशान जोग्यांना अद्याप आदेश मिळालेले नाहीत.

मा.सभापती : ४ स्मशान भूमिवर काम करणाऱ्या स्मशान जोग्यांना दरमहा रु. ३००/- प्रमाणे मानधन देण्यात यावे.

त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

श्री.यादव अशोक सायन्ना : उपअभियंता या पदाची एक जागा रिकामी आहे.रिकामी असलेली जागा सर्वसाधारण उमेदवारातून किंवा राखीव उमेदवारातून भरली जाणार याबाबत आणि ही जागा भरण्यांसाठी किती दिवसाचा कालावधी लागेल याचा खुलासा व्हावा.

मा.उप आयुक्त : रिक्त असलेली एक जागा भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही कार्यरत आहे.उप अभियंता पदा करीता कार्यालयीन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना ८ वर्षाचा सेवाकाल,पदवीधर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत विचार करण्यात

येईल यासाठी निवड समितीची नेमणूक करण्यात येईल १ नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.यादव अशोक सायन्ना : उप अभियंताचे पद केव्हा भरणार या जागेवर कोणाला पदोन्नती देणार याची माहीती देण्यात यावी.न्यायालयाने जो मनाई हुकूम दिला त्याप्रमाणे कार्यवाही झाली काय? याचा खुलासा व्हावा.

मा.उप आयुक्त : न्यायालयाच्या स्थगिती आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री.एकबालसिंग गील : रिक्त उप अभियंताचे पद भरण्याचा निर्णय एक आठवडयात होईल का?

मा.उपआयुक्त : तशी निश्चिती देता येणार नाही.

मा.सभापती :शासनाने केलेल्या सूचनेप्रमाणे उप अभियंता व महापालिकेतील विविध स्थरातील

ठराव मागासवर्गीयांच्या सर्व राखीव जागा २ ऑक्टोंबर पुर्वी भरण्यात याव्यात असे म्हटले आहे.मा.आयुक्त यांनी शासनाने दिलेल्या आदेशानुसार सर्व क्षेत्रातील राखीव जागा भरणेसाठी शक्य तितक्या लवकर कार्यवाही करावी.

श्री.कचरु नवपुते : मागील सभेमध्ये चिकलठाणा शाळेच्याजागे विषयीचा प्रश्न उपस्थित केला होता त्यावूळी पुढील सभेत खुलासा करण्यात येईल अशी सूचना करण्यात आली होती.

सहाय्यक संचालक नगररचना : चिकलठाणा शाळेची जागा विकास आराखडयामध्ये "ना विकास क्षेत्रात" आरक्षित आहे ही जागा "ना विकास क्षेत्रातून" शाळेच्या उपयोगाकरीता खुली करण्यात यावी यासाठी शासनास पत्र देण्यात आले आहे.

श्री.प्रदीप जैस्वाल : चिकलठाणा शाळेची जागा ना विकास क्षेत्रात समाविष्ट होती तर या जागेभोवती तार कुंपन घालून खर्च का करण्यात आला?

श्री.अलफखाँ हुसेनखाँ : चिकलठाणा भाग महापालिकेकडे हस्तांतर झाला नव्हता त्यावेळी तयार करण्यात आलेल्या विकास आराखडयात विकास योजने नुसार चिकलठाणा शाळेची जागा ना विकास क्षेत्रात आरक्षित केली होती.तेव्हा विकास आराखडयातील ही जागा ना विकास आरक्षणातुन वगळून शालेय ईमारतीचे उपयोग्या करीत आरक्षित करणे जरुरीचे आहे.

श्री.कचरु नवपुते, श्री.अशोक सायन्ना,श्री.अलफखाँ : चिकलठाणा शाळेची जागा विकास आराखडयात ना विकसित क्षेत्रात आरक्षित असल्याचे सांगण्यात आले.परंतु सद्य परिस्थिती नुसार या भागात महापालिका आरोग्य केंद्र व अन्य बरीच घरे बांधण्यात आली आहेत तेव्हा चिकलठाणा भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रश्न विचारात घेता चिकलठाणा शाळेची जागा ना विकास क्षेत्रातून वगळण्या बाबतचा प्रस्ताव सहाय्यक संचालक,नगररचना यांनी सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा आणि काम चालू करावे.

श्री.मिर्झा अन्वर बेग : चिकलठाणा येथे बांधण्यात आलेले आरोग्य केंद्र याच जागेत आहे.त्या बांधकामाचे वेळी "ना विकास क्षेत्राचा" प्रश्न उपस्थित का झाला नाही.शाळेची इमारत बांधतांनाच ना विकास क्षेत्राचा प्रश्न कसा उपस्थित झ ाला याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : चिकलठाणा शाळेची जागा ना विकास क्षेत्रातून वगळण्या बाबतचा प्रस्ताव करणे

ठराव जरुरीचे आहे.तेव्हा आवश्यक तो प्रस्ताव ठेवण्यात यावा.

उप उभियंता : (ड्रेनेज) चिकलठाणा आरोग्य केंद्राची इमारत,चिकलठाणा गावठाणाचे हद्दीत उभी करण्यात आली आहे.

सहाय्यक संचालक : शासनाकडून आलेल्या पत्रात चिकलठाणा शाळेच्या उपयोगासाठी सदर जागा घेण्याची परवानगी मिळाली आहे.ही बाब लक्षात घेऊन मंजूरीसाठी दाखल केलेल्या आराखडयात सदर जागा ना विकास क्षेत्रा मधून शाळेच्या उपयोगासाठी अशी दुरुस्ती करण्याची शिफारस सप्टेंबर ८९ च्या पत्रात केली आहे.तेव्हा ठराव घेण्याची आवश्यकता नाही असे वाटते.

श्री.यादव अशोक सायन्ना : स्थायी समिती समोर ठराव येण्यापूर्वी अशा प्रकारे पत्र पाठवता येते का? याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : चिकलठाणा शाळेप्रकरणी मा.आयुक्त यांचेशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

श्री.शंकर मगर : वार्ड क्र.३७ इंदिरानगर भागात एकही शाळा नाही.शाळा बांधण्याचे दृष्टीने जागेची पाहणी करण्यात आली.अनेक पत्रेही देण्यात आली आहेत.परंतु शाळा बांधकामाचे अंदाजपत्रक अद्याप समिती समोर मंजुरीसाठी आले नाही.शाळेच्या जागेवर १५० फुटा पर्यंत अतिक्रमण झाले आहे.तेव्हा उरलेल्या जागेवर अतिक्रमण होऊ द्यावयाचे काय?

उप अभियंता (बांधकाम-१) : अर्थ संकल्पातील तरतूद संपुष्टात आल्याने या कामाचे अंदाजपत्रक तयार केले नाही.

मा.सभापती : वार्ड क्र.३७ येथील शाळेच्या जागेवर अतिक्रमण होत असल्याने जागेच्या संरक्षणाच्या दृष्टीने तार कुंपन घालण्याचे काम पुर्ण करण्यात यावे.

श्री.यादव अशोक सायन्ना : अंदाजपत्रक तयार करण्यात आले नाही असा खुलासा करण्यात आला आहे.ही बाब लक्षात घेता स्थायी समितीच्या सभा घ्यावयाच्या किंवा नाही याचा विचार करणे आवश्यक आहे.

लेखाधिकारी : मागील वर्षी मंजूर झालेल्या प्रस्तावांपैकी बरीच कामे अर्धवट राहील्याने अशा अर्धवट कामासाठी चालू वर्षाचे अर्थसंकल्पात स्पील ओव्हर कामाकरीता जास्त रक्कम ठेवावी लागली.अर्थसंकल्प नियमाप्रमाणे तरतुदीपेक्षा २० % जादा रकमेच्या कामांना मंजुरी घेता येते.सध्या माहे सप्टेंबर चालू असतांना २० % पेक्षाही जास्त रकमेच्या कामांना मंजुरी मिळाली आहे.याशिवाय समिती काही तातडीच्या कामांना मंजुरी देईल अशा वेळी ही मंजुरी ३० % पेक्षा जास्त होणार आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : मिटमिटा येथील समाज मंदिराच्या कामाचे काय झाले.

उप अभियंता (बांध-१) : मिटमिटा येथील समाज मंदिर बांधकामाच्या भिंतीचे आठ फुट उंचीपर्यंत काम झाले आहे.मध्यंतरीच्या काळात लोखंड उपलब्ध नसल्याने काम दिड महिना बंद होते.सध्या कार्यालयात लोखंड उपलब्ध होऊ लागले आहे.त्यामुळे आता कामाची गती वाढेल.

मा.सभापती : अधिकारी वर्गाने एखादया वस्तुची त्रुटी निर्माण झाल्यानंतर सदर वस्तु उपलब्ध

<u>ठराव</u> करुन घेण्याची कार्यवाही सुरु करणे योग्य नाही.यासाठी साठा संपण्यापूर्वीच नविन साठयाचे मागणीची कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे.

शहर अभियंता : शहर अभियंता पदाचा कार्यभार हाती घेतला त्याच वेळी लोखंडाचा साठा संपला होता.ही बाब लक्षात घेऊनच लोखंउ खरेदीची कार्यवाही अविलंब

सुरु केली आहे आणि त्या मागणीनुसार नोंदविण्यात आलेले लोखंड कार्यालयात जमा होत आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : मिटमिटा समाज मंदिराचे काम केंव्हा पूर्ण होईल? या कामासाठी किती कालावधी देण्यात आला होता?

उप अभियंता (बांधकाम-१) : कामासाठी उपलब्ध असलेले लोखंड उपलब्ध झाल्यानंतर दोन महिन्यात काम होईल.या कामासाठी सहा महिन्याची मुदत होती.

श्री.यादव अशोक सायन्ना : मिटमिटा येथे बांधण्यात येणाऱ्या समाज मंदिराच्या इमारतीवरुन विद्युत मंडळाची अति शक्तीची लाईन गेलेली आहे.ते योग्य आहे काय?

मा.सभापती : मिटमिटा समाज मंदिराचे बांधकामास ज्या संबंधीत अधिकाऱ्याने परवानगी दिली त्याबाबत मा.आयुक्तांनी चौकशी करावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : वॉर्ड क्र.१५ काचीवाडा येथील ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी समिती समोर का आहे नाही?

उप उपअभियंता (ड्रेनेज) : या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.पण अर्थसंकल्पातील तरतूद संपल्यामूळे मंजूरी मिळाली नाही.

मा.सभापती : मागील वर्षी ए-१ आणि रेट लिस्टच्या कामांवर किती खर्च झाला याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देणेस्तव आतापर्यंत तीन स्मरणपत्रे देण्यात आली आहेत.परंतु अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही.लेखाधिकारी यांनी अर्थसंकल्पाची सद्य माहिती द्यावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : वार्ड क्र. ४० येथील पुल बांधकामाचे काय झाले.

मा.सभापती : सदर कामाची माहिती पुढील सभेत ठेवण्यात यावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : वसंत भुवन येथे सर्व सोयी करण्यात याव्यात.

श्री.शंकर मगर : वॉर्ड क्र. ३७ इंदिरा नगर येथील सरफेस गटार बांधकामाचे दरपत्रक उघडून एक महिन्याचा कालावधी झाला आहे,परंतु दरपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव अद्याप स्थायी समिती समोर ठेवला जात नाही.

उप अभियंता (ग.व.सु.) : सदर कामासाठी सर्वात कमी दराचे दरपत्रक ३२ % कमी दराचे आहे.३२% कमी दराचे गुत्तेदाराकडून काम करुन घेणे शक्य नाही असा अभिप्राय देऊन सदर संचिका वरिष्ठांकडे पाठविण्यात आली आहे.मंजुरी नंतर त्यावर कार्यवाही केली जाईल.

श्री.यादव अशोक सायन्ना : स्थानिक वृत्तपत्रात महापालिकेचे अधिकारी काम ऐकत नसल्याने उपमहापौर राजीनामा देणार असे वृत्त प्रसिध्द झाले आहे,हे खरे आहे काय?

मा.सभापती : मा.आयुक्त आजच्या सभेस उपस्थित नाही.त्यामुळे राजीनामा प्रकरणी अधिकृत खुलासा होणे शक्य नाही.

श्री.मोतीराम घडामोडे :वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिलेल्या वृत्ताप्रमाणे उपमहापौर यांची कामे खरोखरच होत नसतील तर ही बाब निषेधार्ह आहे.तेव्हा या बाबत स्थायी समितीने ज्या कामांना मंजुरी दिली आहे परंतु अद्याप कार्यान्वित झाली नाहीत अशा कामांची यादी तयार करण्यात यावी,आणि मंजुर कामे पुर्ण न करण्यास जे अधिकारी जवाबदार असतील त्यांचे वर स्थायी समितीचे अधिकाराप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : उपमहापौर यांनी वृत्त प्रसिध्दीस देण्यापूर्वी या बाबतची पुसट कल्पनाही स्थायी समितीस दिली नाही.तेव्हा प्रसिध्दीस दिलेल्या वृत्ताबाबत मा. उपमहापौर यांना पत्र देवून माहीती घेण्यात येईल.

श्री.मोतीराम घडामोडे : शहरात स्त्रियांसाठी प्रसाधन गृहांची व्यवस्था करण्यासाठी सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मांडला असता,सदर प्रस्ताव स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावा असा निर्णय झालेला आहे.परंतु आज पर्यंत तसा ठराव समिती समोर मांडला गेला नाही.

मा.सभापती : शहरात स्त्रियांसाठी प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्याबाबत आवश्यक त्या जागांची माहिती दिल्यानंतर यावर विचार करण्यात येईल.

श्री.स.अ.एकबालुद्दीन :ड्रेनेजचे कामासाठी आवश्यक असलेले पाईप खरेदीच्या कामात हजारो रुपयाचा भ्रष्टाचार होत आहे.कार्यालयासाठी खरेदी करण्यात येणारे पाईपची बाजारात फक्त रुपये २०/- मिळतात.( या संबंधीचे पत्र मा.सभापती यांचेकडे दिले.)

मा.सभापती : मुख्य लेखापरिक्षक पाईप खरेदी प्रकरणाची चौकशी करतील आणि त्या संबंधीचा अहवाल अगामी स्थायी समिती बैठकीत देतील.

श्री.प्रदीप जैस्वाल : हातगाडया खरेदी बाबतच्या अहवालाचे काय?

मा.सभापती : हातगाडया आणि फिनेल खरेदी बाबतचा चौकशी अहवाल नुकताच प्राप्त झालेला आहे.या अहवालाच्या प्रती तयार करुन सभासदांना वाटप करण्यात येतील.

**ठराव :**

दिनांक २२ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७३:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वॉर्ड क्र.(४६) मधील मो.समर्थनगर येथील मा.प.विधी महाविद्यालयाच्या मुलांच्या वस्तीगृहाच्या उत्तरेकडील खाजगी जागेतून जाणारी १५० मी.मी.व्यासाची जलवाहीनी स्थलांतरीत करणेच्या कामाचे रक्कम रु. १४,०९५/-चे अंदाजपत्रकास ठराव क्र.९५ / १० दि. ६-७-८९ अन्वये मान्यता मिळाली आहे.

मनपा / पापु / २०५० / ८९ दि. ११-७-८९ अन्वये जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा पत्रके प्राप्त झाली.

१) श्री.अर्शद नोमी ०.०१ % कमी दराने
२) श्री.संजिव खर्डीकर ४ % जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमह दराची निविदा ठेकेदार,श्री.अर्शद नोमी यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराची आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.(४६) मधील मो.समर्थनगर येथील मा.प.विधी महाविद्यालयाच्या मुलांच्या वस्तीगृहाच्या उत्तरेकडील खाजगी जागेतून जाणारी १५० मीमी व्यासाची जलवाहीनी स्थलांतरीत करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे गुत्तेदार,श्री.अर्शद नोमी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७४:**

उप अभियंता,(ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.शहाबाजार वॉर्ड क्र. (१४) येथे हयुम पाईप कव्हरचे काम करणेसाठी स्थायी समिती ठराव क्र. १२ / १२/ दि.८-६-८९

अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ८८,०००/- ला मंजुरी मिळाली असून स्थानिक गुत्तेदारांकडून अ-१ नमुन्यावर दरपत्रके मागविली असता एकूण तीन दरपत्रके दर भरलेली प्राप्त झाली ती खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) वर्षा कन्स्ट्रक्शन | अ.प.पेक्षा | २ % | जास्त |
| २) सय्यद साजेद अन्वर | अ.प.पेक्षा | ३ % | जास्त |
| ३) श्री.शेख शरीफ | अ.प.पेक्षा | ०.०१ % | कमी |

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराचे दरपत्रक श्री.शेख शरीफ हयांचे आहे.तरी ते मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहाबाजार वार्ड क्र. (१४) हयुम पाईप कल्व्हर्टचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराचे गुत्तेदार,श्री.शेख शरीफ यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७५:**

वॉर्ड क्र. (१९) मो.जुना बाजार येथे मिया बेग यांच्या घरासमोरील १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकीच्या १९८७-८८ च्या दरपत्रकानुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १०,१७५/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन दहा वर्षापूर्वी टाकण्यात आलेली आहे.त्यावेळेस सदरील लाईनवर लोड कमी होते परंतु सध्या सदरील लाईनवर लोड वाढल्यामुळे लाईन वारंवार चोकअप होते. करीता जुनी लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. (१९),मो.जुना बाजार येथे मिया बेग यांच्या घरासमोरील १५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत तयार करण्यात आलेले रु.१०,१७५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७६:**

वॉर्ड क्र. (४१),सादिया टॉकीजच्या मागे दलालवाडी येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ५१,७००/- ला स्थायी समिती ठराव क्र.११०३ / २९ / दि. २०-४-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३ / ५३९४ / ८९ / दिनांक १६-६-८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विकण्यात आल्या होत्या व केवळ सहा निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) स.रफिउद्दीन | १८ % | कमी |
| २) महेमुद खान | ५.० % | कमी |
| ३) अमिनोद्दीन खान | १८.० % | कमी |
| ४) म.इसाक म.हुसेन | ७.५ % | कमी |
| ५) आनंद बिल्डर्स | १६.३ % | कमी |

६) सुरेश बी.सदवानी २०.३ % कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.३ % कमी दराचे श्री.सुरेश बी. सदवानी यांचे दरपत्रक आहे.करीता पुढील कार्यवाहीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.(४१),सादिया टॉकीजच्या मागे दलालवाडी येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.३ % कमी दराचे गुत्तेदार,श्री.सुरेश बी.सदवानी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७७:**

वॉर्ड क्र.(३६),मो.बायजीपुरा येथील ट्रेचिंग ग्राऊंड वरील म.न.पा. क्वार्टरसाठी संप वेल व पाण्याच्या टाक्या बसविणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,२१,२८०/- ला स्थायी समिती बैठक दि. ८-६-८९ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.२ / जा.क्र.मनपा / बांधवि-१ / २८७१ / ८९ / दि.१९-५-८९ नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा फॉर्म विकल्या गेले त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पाच निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाले. ते दिनांक १९-६-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आले त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.ए.के.थोरात | ५ % | कमी |
| २) श्री.एन.जी.गुणवानी | १० % | कमी |
| ३) श्री.एस.ए.नवाब | ४ % | जास्त |
| ४)श्री.एल.एम.पडघन | ४.५ % | जास्त |
| ५) श्री.कुलवंतसिंग | १९.५० % | जास्त |

वरीलपैकी श्री.एन.जी.गुणवानी यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १० % कमी दराचे आहे.परंतु यांच्याकडे पडेगांव शाळाचे काम व जाधवमंडी शाळेचे काम संथ गतीने काम चालू आहे.त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे गुत्तेदार,श्री.ए.के.थोरात यांना विचारणा केली असता त्यांनी अंदाजपत्रकापेक्षा ५ % दराने भरलेले आहे त्या दराने ते काम करण्यास तयार आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : सदर कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत किंवा हे काम श्री.गुनवाणी यांना देण्यात यावे.शिफारस केल्याप्रमाणे सदर काम दिल्यास महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.

श्री.शंकर मगर : श्री.थोरात हे नविन गुत्तेदार आहेत त्यांनी संरक्षित भिंत बांधण्याचे एकच काम केले आहे.तेव्हा कामाची किंमत लक्षात घेता श्री.थोरात हे काम पुर्ण करु शकतील किंवा कसे हयाबाबत सारासार विचार व्हावा.

श्री.प्रदीप जैस्वाल : सदर काम गुत्तेदार,श्री.गुणवानी यांना देण्यात यावे.

मा.सभापती : प्रास्तावित कामासाठी लघु निविदा मागविण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.(३६),मो.बायजीपुरा येथील ट्रेचिंग ग्राऊंड वरील म.न.पा. क्वार्टरसाठी संपवेल व पाण्याच्या टाक्या बसविणे बाबतच्या कामासाठी प्रास्तावित सर्व निविदापत्रके रद्द करण्यात येवून अल्प मुदतीच्या लघु निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २७८:**

वॉर्ड क्र.(५८),मो.जवाहर कॉलनी येथील आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक पर्यंत २० मीटर रस्त्यांचे रुंदीकरणासह खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभग यांचे कडील सन १९८८-८९ चे डि.एस.आर.दराने

| | |
|---|---|
| १) घरे तोडलेली माती उचलणे | ६०,००० |
| २) खडी रस्ता तयार करणे | ४,३३,०१२ |
| ३) हयुम पाईप कल्व्हर्ट बांधणे | ७३,०२८ |
| | ५,६६,०४० |

चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरचे काम हे सरकार कडून पाच करोड रुपयाचे अनुदान प्राप्त झाल्यावरच निविदा मागवून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.एकबालसिंग गिल : आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक या जवाहर कॉलनी वसाहतीला जोडणाऱ्या रस्त्यावरील घरे नुकतीच पाडण्यात आली आहेत.तेव्हा हा रस्ता विकास आराखडयातील डी.पी.रोड आहे काय?

सहा.संचालक,नगर रचना : आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौकाच्या मुळ रस्त्याची रुंदी ३० फुट असून ती आता २० मीटर म्हणजे ६६ फुट झालेली आहे.सदर रस्ता नॉन डि.पी.रोड आहे.विनापरवानगी घरे पाडण्यास स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता नाही असे वाटते.

श्री.यादव अशोक सायन्ना : आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक हा रस्ता नॉन डी.पी. आहे तर मुळ रस्त्याची रुंदी २० मीटर करण्यास स्थायी समितीची परवानगी घेतली आहे काय?

श्री.मोतीराम घडामोडे : मुळ ३० फुटाचा रस्ता ६६ फुट झाला त्यासाठी बाधीत होणारी घरे पाडण्यास विरोध नाही परंतु या रस्ता रुंदीकरणामध्ये किती घरे पाडण्यात आली व ही जमीन कोणाच्या मालकीची आहे?याचा खुलासा व्हावा.

मा.उपआयुक्त : आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक हा मुळ रस्ता ज्या रुंदीचा होता त्या रुंदीचाच ठेवण्यात आला आहे.या रस्त्याच्या कडेला असलेल्या भूखंड धारकांनी मुळ भुखंडाव्यतिरिक्त रस्त्याच्या कडेला जादा बांधकाम केले होते.अशी बांधकामे पाडण्यात येऊन मुळ रस्ता कायम करण्यात आला आहे.

मालमत्ता अधिकारी : या रस्त्यामध्ये अंशतः पुढे आलेली ८० घरे तोडण्यात आली आहेत.रस्त्यासाठी आवश्यक असलेली जागा जमिन मालकाने सोडली होती त्या जागेवर रस्त्याचे दुतर्फा पुढे आलेली घरे तोडण्यात आली आहेत.

श्री.एकबालसिंग गील : मुळ रस्ता ३० फुटा ऐवजी ६६ फुट करण्याचे काम स्थायी समिति अथवा सर्वसाधारण सभा यांचे मंजुरी शिवाय करता येते काय?

श्री.यादव अशोक सायन्ना : मा.आयुक्त हे स्थायी समिती,मा.महापौर किंवा उपमहापौर यांना विश्वासात घेऊन काम करीत नाहीत या कामाचा मुळ रस्त्याच्या विकासाचा नकाशा सभागृहात पहावयास मिळाला नाही त्यास स्थायी समितीची परवानगी नाही.

श्री.मिर्झा अन्वर बेग : आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक या रस्त्याचे काम शासनाकडून मिळणाऱ्या ५ कोटी रकमेतून हाती घेण्यात येईल असे प्रस्तावात म्हटले आहे.परंतु शासनाकडून मिळणारे ५ कोटी अनुदानाची रक्कम अद्याप प्राप्त झ

ालेली नाही.तेव्हा हे काम कशा प्रकारे हाती घेतले जाईल याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : विकास आराखडा तयार करतांना व रोडचे रुंदीकरण करतांना मा.आयुक्त स्थायी समितीस विश्वासात घेत नाहीत हे योग्य नाही.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.प्रस्तावातील वरील मुद्दयांबाबत मा.आयुक्त यांच्याकडे चौकशी करण्यात यावी.

**विषय क्र. २७९:**

आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी प्रास्तावित केले आहे की,शहरातुन साथीचे रोगांचा प्रादुर्भाव कमी करणेसाठी पाणी शुध्दीकरणाच्या गोळया खरेदी करणे जरुरी आहे.त्याप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रातून जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या.एकंदर पाच निविदा प्राप्त झाल्या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ज्योती दिप ट्रेडर्स | ८०/- | प्रती | १००० | गोळया |
| २) जस इंटरप्रायझेस | ८१=५० | प्रती | १०० | गोळया |
| ३) प्रिमियर असोसिएट | ७२=७५ | प्रती | १००० | गोळया |
| ४) टिव्हीन फॉरमास्युटीकल्स | दर नमुद केलेले नाहीत | | | |
| ५) मंगलम ट्रेडर्स | ८४/- | प्रती | १००० | गोळया |

त्यापैकी कमी दराचे दरपत्रक मे.प्रिमियर असोसिएट नागपुर यांचे दर ७२=७५ पैसे प्रति हजार गोळीसाठी आहेत ते मंजुर करण्यात येऊन अंदाजपत्रकातील रक्कमे नुसार खरेदी करण्यात येऊन त्यांचे बरोबर करार पत्रक करणेसाठी मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातुन साथीचे रोगांचा प्रादुर्भावा कमी करणेसाठी पाणी शुध्दीकरणाच्या गोळया खरेदी करणे बाबत सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.प्रिमियर असोसिएट,नागपुर यांचे दर ७२=७५ पैसे प्रति हजार गोळीसाठी या दराने अंदाजपत्रकातील रकमेनुसार खरेदी करण्यास तसेच त्यांचे बरोबर करारपत्रक करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८०:**

महानगरपालिकेतर्फे चालवण्यात येणाऱ्या आरोग्य केंद्रासाठी औषधी व साहित्य खरेदी करणेसाठी दि. १७-७-८९ रोजी जाहीर प्रगटन देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या.खालील औषध विक्रेत्यांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.अंदाजपत्रकातील रक्कमेतून खर्च करण्यास मान्यता देण्यात यावी.

१) कॉमन मेडीकल दर सर्वात जास्त

२)बी.एन.के.इन्टरप्राईजेस हयांचे अ.क्र. ८,४२,५७,८४,९२,१०७,१२४,१५३,२४९ (एकूण ९) व

३)सर्जिकोमेडीकलहयांचेअ.क्र.१,१०,२७,३२,३४,५४,६६,७७,८४,७९,८६,८७,९१,९४,९५,१०७,११७,

१३७,१३८,१४४ (एकूण २०) प्रकारची औषधे.

४)किंकरेब्रदर्सहयांचे अ.क्र.
२,४,५,७,११,१२,१५,१६,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२८,२९,३०,

३१,३२,३५,३७,३९,४०,४१,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५६,५८,
५९,६१,६४,६५,७०,७२,७३,७४,७५,७६,७८,८०,८१,८२,८३,८४,८५८८,८९,९०,

९३,९६,९७,९८ ते
१०६,१०८,१०९,११०,१११,११२,११४,११५,११६,११८,ते
१२३,१२५,ते १३३,१३५,१३६,१४०,१४१,१४२,१४३,१४५,१४६ते
१५२,१५४,
१५५,१५७ ते १६४,१६८ (अ व ब) १७०,१७३ ते २४८ २५०,२५१ ते
२५७,
२५९ ते २७४,२५६ ते २९० ते २९१ येणेप्रमाणे (एकूण २३९)
प्रकारची औषधे.

१) आणि कमल मेडीकल ॲण्ड जनरल यांचे अ.क्र.३,६,१३,१४,४३,६०,६२,६३,६७,६८,६९,७१,
११३,१३४,१४९,१५६,१६५,१६७,१६८ (सी),१६९,२५८,२७५
(एकूण २३)

तुलनात्मकदृष्टया मे.बी.एन.के.यांचे एकूण नऊ ॲटम मे.सर्जिको यांचे (२०) ॲटम मे.किंकरे ब्रदर्स यांचे एकूण (२३९) ॲटम तसेच कमल मेडीकल यांचे एकूण २३ कमी दराचे ॲटमवर दर्शविलेल्या क्रमांकाचे मंजुर करुन त्यांचे बरोबर करार करणेसाठी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे महानगरपालिका संचलित आरोग्य केंद्रांसाठी औषीधी व साहित्य खरेदी करणेस्तव

२) बी.एन.के.इन्टरप्राईजेस हयांचे अ.क्र. ८,४२,५७,८४,९२,१०७,१२४,१५३,२४९ (एकूण ९) व
३) सर्जिकोमेडीकलहयांचेअ.क्र.१,१०,२७,३२,३४,५४,६६,७७,८४,७९,८६,८७,९१,९४,९५,१०७,११७,
१३७,१३८,१४४ (एकूण २०) प्रकारची औषधे.

किंकरे ब्रदर्स हयांचे अ.क्र.
२,४,५,७,११,१२,१५,१६,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२८,२९,३०,

३१,३२,३५,३७,३९,४०,४१,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५६,५८,
५९,६१,६४,६५,७०,७२,७३,७४,७५,७६,७८,८०,८१,८२,८३,८४,८५८८,८९,९०,

९३,९६,९७,९८ ते
१०६,१०८,१०९,११०,१११,११२,११४,११५,११६,११८,ते
१२३,१२५,ते १३३,१३५,१३६,१४०,१४१,१४२,१४३,१४५,१४६ते
१५२,१५४,
१५५,१५७ ते १६४,१६८ (अ व ब) १७०,१७३ ते २४८ २५०,२५१ ते
२५७,

२५९ ते २७४,२५६ ते २९० ते २९१ येणेप्रमाणे (एकूण २३९) प्रकारची औषधे.

४) आणि कमल मेडीकल ॲण्ड जनरल यांचे अ.क्र.३, ६, १३, १४, ४३, ६०, ६२, ६३, ६७, ६८, ६९, ७१,
११३, १३४, १४९, १५६, १६५, १६७, १६८ (सी),१६९, २५८, २७५ येणे

प्रमाणे एकूण (२३) प्रकारची औषधे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे वरील नमुद केलेल्या ॲटम प्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८१ :**

सहाय्यक आयुक्त-२,औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की,विनियम व उपविधीची पुस्तके छपाई करुन घ्यावयाची आहेत.त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | | मे.श्री.मुद्रणालय | मे.लिबर्टी लॉ बुक बायंडर्स ॲण्ड प्रिंटर्स |
|---|---|---|---|
| १ | उपविधी छपाई मराठी व इंग्रजी | ७१=८० प्र.पेज | ६८=०० प्र.नग |
| २ | प्लास्टीक कव्हर | ९=९० प्र.नग | ९=०० प्र.नग |
| ३ | वायंडींग चार्जेस | १२=७० प्र.पुस्तक | ११=०० प्र.पुस्तक |

स्थायी समितीचा ठराव क्रमांक १६२ / ३१ / दि.१९-८-१९८९ द्वारे सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

तुलनात्मक तक्त्यामध्ये मे.लिबर्टी लॉ बुक बायंडर्स ॲण्ड प्रिन्टर्स यांचे दर कमी आहेत.उपविधीची २०० नग पुस्तके छपाई करुन घेण्यासाठी कमी दराची निविदा स्विकारण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे विनियम व उपविधीची पुस्तके छपाई करणे अत्यावश्यक असल्याने मे.लिबर्टी लॉ बुक बायंडर्स ॲण्ड प्रिन्टर्स हयांनी दरपत्रकात नमुद केलेल्या रक्कम रु. ६८=०० प्रती पेज या दराप्रमाणे विनियम व उपविधींची एकूण २०० (दोनशे) पुस्तके छापून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. २८२ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सध्या पाणी पुरवठा भांडारात दोन दिवस पुरेल इतका ब्लिचिंग पावडरचा साठा आहे व पुर्वीच्या पुरवठाधारकाने माल पुरवठा केलेला नाही.

सध्या ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याची निविदा अंतिम करण्याचे काम चालू आहे व निविदा अंतिम करण्यास वेळ लागेल.त्यादृष्टीने दैनंदिन वापरासाठी (१०) मे.टन ब्लिचिंग पावडर उपलब्ध पुरवठाधारक यांचेकडून परिसर अभियांत्रिकी मंडळाने मान्य केलेले दर या दराने (१०) मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यांस व मंजुरी मिळण्यास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्या पाणी पुरवठा भांडारात दोन दिवस पुरेल इतका ब्लिचिंग पावडरचा साठा असल्यामुळे व ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याची निविदा अंतिम करण्याचे काम चालू असून निविदा अंतिम करण्यास वेळ लागणार असल्याने दैनंदिन वापरासाठी (१०) मे.टन ब्लिचिंग पावडर उपलब्ध पुरवठाधारक यांचेकडून परिसर अभियांत्रिकी मंडळाने मान्य केलेल्या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८३ :**

वॉर्ड क्र.२० मध्ये नुर कॉलनी नाल्यास लागून २५० मीटर मि.व्यासाची लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्र रुपये १५३५०/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील ठिकाणी अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन ही खुप जुनी असल्यामुळे तसेच कमी व्यासाची आहे.तसेच सदरील लाईनला नुर कालनी नाल्याजवळील भाग तसेच भडकल गेट दिशेकडून येणाऱ्या लाईन जोडलेल्या असल्यामुळे वारंवार बंद पडते व त्यामुळे तेथील नागरिकांना बराच त्रास सहन करावा लागतो.त्यामुळे नविन लाईन टाकणे आवश्यक आहे.सदरील काम तातडीचे असल्यामुळे अ-१ निविदे अंतर्गत श्री.संजय जैस्वाल यांच्याकडून करुन घेण्याची मा.आयुक्त यांची मंजुरी घेण्यात आली आहे.तरी सदरील काम श्री.संजय जैस्वाल यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२० मध्ये नुर कॉलनी नाल्यास लागून २५० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे बाबत तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१५३५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील लाईनला अनेक लाईन जोडलेल्या असल्याने लाईन वारंवार बंद पडत असल्यामुळे "अ-१" निविदे अंतर्गत गुत्तेदार,श्री.संजय जैस्वाल यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८४ :**

स.सभासद,श्री.यादव अशोक सायन्ना यांनी जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित औरंगाबाद यांनी अध्यक्ष,स्थायी समिती,महानगरपालिका,औरंगाबाद यांना पत्र क्र.विजाभज / औ.बाद / ३१२ / ८९ दि. २८-९-८९ अन्वये केलेल्या विनंती नुसार.

१) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून भटक्या व विमुक्त समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नीशल आहे.
२) महामंडळ भटक्या विमुक्त लाभधारकांना निरिनिराळे उद्योग धंदे करण्यासाठी वित्तीय संस्थामार्फत कर्ज देऊन त्यामध्ये २५ % वीज भांडवल,४ % व्याजाने महामंडळामार्फत दिले जाते.
३) महामंडळाने औरंगाबाद महापालिका हद्दीतील भटके,विमुक्त हया जाती अंतर्गत २३५ लाभधारकांना निरनिराळे उद्योगधंदे करण्यासाठी रुपये १,७०,०००/- विज भांडवल पुरविले आहे.महाराष्ट्र शासनाने या समाजास स्वावलंबी होण्यासाठी एक संधी याद्वारे उपलब्ध करुन दिली आहे.
४) औरंगाबाद महापालिकेतर्फे सदर संस्थेस महापालिका उत्पन्नातून महापालिका हद्दीतील लाभधारकांना रु.१,७०,०००/- किंवा शक्य असेल तेव्हढे अनुदान आर्थिक सहाय्य देऊन शासकीय योजनेस हातभार लावणेस,प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.यादव अशोक सायन्ना : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ म.औरंगाबाद हे भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी कार्य करीत असुन या पत्रकासोबत जोडलेल्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद महापालिकेतर्फे आर्थिक सहाय्य देणे योग्य होईल.या संस्थेचे कार्य संपुर्ण औरंगाबाद जिल्हयात कार्यरत असल्याने औरंगाबाद जिल्हयातील नगरपालिकांनी सदर संस्थेस आर्थिक सहाय्य दिले आहे.

मा.उपआयुक्त :औरंगाबाद महापालिका शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसारमहसुली उत्पन्नाचा बांधील खर्च वजा जाता उरलेल्या रकमेपैकी ५ % रकमेची तरतुद अर्थसंकल्पात करीत असुन सदर रक्कम शहरातील दुर्बल घटकातील भागाच्या विकासासाठी करीत असते.यामुळे सदर संस्थेस अशा प्रकारे आर्थिक सहाय्य करता येणार नाही असे वाटते.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित हे औरंगाबाद जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी कार्य करीत असुन शासन अंगीकृत असल्याने महापालिका सभासदांना वार्डाचे विकासासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेल्या २५ हजारांचे तरतुदीमधून स.सभासद श्री.गंगाधर गाडे,श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.एकबालसिंग गील,श्री.प्रदीप जैस्वाल,श्री.शंकर मगर,श्री.मोतीराम घडामोडे प्रत्येकी रक्कम रु. ५ हजार याप्रमाणे एकूण रक्कम रु. ३०,०००/- चे आर्थिक सहाय्य वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित औरंगाबाद यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५ :**

स.सभासद श्री.मोतीराम घडामोडे हयांनी तोंडी प्रस्ताव मांडला की,वसंतराव नाईक महाविदयालयात दि.१२ व १३ आक्टोंबर १९८९ रोजी विविध कालखंडातील औरंगाबाद हया विषयावर दोन दिवसासाठी मराठवाडा पातळीवर मराठवाडा इतिहास परिषद आयोजित केली आहे.प्रस्तावित परिषदेसाठी महानगरपालिके उचित अनुदान द्यावे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे वसंतराव नाईक महाविदयालयात येथे दि.१२ व १३ आक्टोंबर १९८९ रोजी आयोजीत मराठवाडा पातळीवरील मराठवाडा इतिहास परिषदेसाठी महानगरपालिकेतर्फे रक्कम रु. ५०००/-(पाच हजार) मात्राचे अनुदान हस्तांतरण सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १६-१०-१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा वृत्तांत.कार्यक्रम पत्रिका क्रमांक (१४)**

**सोमवार, दिनांक १६-१०-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१)मा.श्री.अलफखाँ हुसेनखाँ
२)--//--गील एकबालसिंग प्रितमसिंग
३) --//-- घडामोडे मोतीराम नारायणराव.
४) --//-- जैस्वाल प्रदीप शिवनारायण
५) --//-- नवपुते कचरु चंद्रभान
६) --//--मगर शंकर जिजाराम
७) --//-- मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
८) --//--यादव अशोक सायन्ना
९)--//-- स.अ. एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन.
१०)--//-- सावे मोरेश्वर दिनानाथ

**विषय क्र. २८६ :**

दि.२९ सप्टेंबर,१९८९ रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.प्रदीप जैस्वाल : दि. २९-९-८९ भरलेल्या सभेतील विषय क्र.२७२ मधील चर्चेनुसार निवडणूक विभागात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ प्रकरणी मा.उपायुक्तांनी काय कार्यवाही केली?

मा.आयुक्त : कर्मचाऱ्यांना अगाऊ वेतनवाढ देणेबाबत शासनाने नियम केले आहेत.तसेच आगाऊ वेतनवाढ देणे ही बाब प्रशासकीय आहे.तेव्हा या प्रकरणी प्रशासकीय स्तरावर शासनाने केलेल्या विहीत नियमाप्रमाणे विचार होईल.

श्री.प्रदीप जैस्वाल : निवडणूक विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला मिळणे आवश्यक आहे.सदर कर्मचारी गेल्या दीड वर्षीपासुन या प्रकरणी मागणी करीत आहेत.तेव्हा या प्रकरणावर आजच निर्णय व्हावा व या प्रकरणी कार्यरत असलेली संचिका सभागृहाचे निदर्शनास आणण्यात यावी.

मा.सभापती : निवडणूक विभागात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यासंबंधीची संचिका पुढील सभेत ठेवण्यात यावी.

श्री.कचरु नवपुते :विषय क्र. २७२ मधील चर्चेनुसार चिकलठाणा शाळेच्या जागा प्रकरणी मा. आयुक्तांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे ठरले होते.त्याबाबत काय निर्णय झाला याचा खुलासा व्हावा.

सहा.संचालक नगररचना : चिखलठाणा शाळेच्या जागा संदर्भात ठराव घेण्याची आवश्यकता नाही असा मा.आयुक्तांनी शेरा दिला आहे.

श्री.अलफखॉ.हुसेनखाँ : जुन्या नगरपरिषद क्षेत्राव्यतिरिक्त महापालिका क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या भागाचा विकास आराखडा तयार करुन सन १९८५ मध्ये शासनाकडे मंजुरीसाठी दाखल करण्यात आलेली आहे.दाखल करण्यात आलेल्या विकास आराखडयात नियोजीत चिखलठाणा शाळेची जागा शैक्षणिक झोनसाठी व त्या लगतची जागा सार्वजनिक आरोग्य केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली आहे.प्रशासनाच्या चुकीच्या खुलाशामुळे शासनाने त्यात बदल केला आहे.त्यामुळे आज हा प्रश्न उपस्थित झाला.तेव्हा उपस्थित झालेल्या प्रश्नाची उकल व्यवस्थित रितीने करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

श्री.मोरेश्वर सावे : शासनाकडे मंजुरीसाठी दाखल केलेल्या विकास आराखडयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : चिखलठाणा शाळा प्रकरणाची संचिका पाहिली असता त्यात काही मुद्दे निदर्शनास आलेले आहेत.या मुद्दयांवर प्रत्यक्ष चर्चा करुन या प्रकरणी निर्णय घेण्यात येईल.

श्री.मोरेश्वर सावे : ठराव क्र. २८२ अन्वये परिसर अभियांत्रिकी मंडळाने मान्य केलेल्या दराने १० मे. टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यास मंजुरी मिळालेली आहे.परंतु मंडळाने मान्य केलेले दर प्रचलीत बाजार भावापेक्षा जास्त दराचे आहेत.तेव्हा प्रशासनाला आवश्यक असलेली ब्लिचिंग पावडर प्रचलीत बाजारभाव मंडळाने मान्य केलेल्या भावापेक्षा कमी दराचे असल्याने खुल्या बाजारातुन का खरेदी करण्यात आली नाही? तसेच ठराव क्र.२८४ मध्ये मा.उपायुक्तांनी केलेला खुलासा योग्य आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे सभासद स्वेच्छानिधीतून आर्थिक सहाय्य देता येत नसेल तर महापालिका निधीतून या संस्थेस आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

मा.सभापती : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, औरंगाबाद.या संस्थेस महापालिका निधीतून रु.२५,०००/- चे आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

श्री.प्रदीप जैस्वाल : विषय क्र.२७२ अंतर्गत वार्ड क्र.४० स्थित पुलाचे बांधकामाबाबतची माहिती पुढील सभेत ठेवण्यात येईल असा खुलासा आहे.तेव्हा याप्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

उपअभियंता बां-१ : सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन मंजूरीसाठी पाठवले आहे.

शहर अभियंता : पुलाचे बांधकामासाठी आवश्यक असलेला निधी शिल्लक नाही म्हणून या कामाला अद्यापपर्यंत मंजुरी दिलेली नाही.

मा.सभापती : वार्ड क्र.४० अंतर्गतचे पुलाचे बांधकाम प्रकरणी मुख्य लेखा परिक्षक यांचेशी चर्चा करुन मंजुरीचा विचार केला जाईल.

श्री.स.अ.एकबालुद्दीन : गेल्या दोन-तीन सभांमध्ये बरीचशी कामे हाती घेणे संदर्भात फंड उपलब्ध नसल्याचा खुलासा करण्यात आला आहे.तेव्हा मागील वर्षी खर्च झालेली रक्कम योग्य रित्या खर्च झाली आहे काय? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. व्यंकटेशनगर भागात टाकण्यात आलेल्या ड्रेनेज पाईप लाईनचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या कामामध्ये आणि रेटालिस्टच्या कामामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.या निकृष्ट

कामाची पाहणी वर्तमान सभेनंतर ताबडतोब करण्यात यावी.या संबंधीचे लेखी पत्र मा.सभापती यांच्या कडे सादर करीत आहे.

मुख्य लेखा परीक्षक : अर्थसंकाल्पातील काही शिर्षकाचे फंडातील तरतुदीप्रमाणे कामांना मंजुरी देता येणार नाही.फंड उपलब्ध नसल्यामुळे थांबुन असलेल्या कामांचा विचार सुधारीत अंदाजपत्रकाचे वेळी केला जाईल.

श्री.मोतीराम घडामोडे : स.सभासद श्री.स.अ.एकबालुद्दीन यांनी केलेल्या खुलाशाशी मी सहमत आहे.तेव्हा या प्रकरणाची चौकशी व्हावी.

मा.सभापती : स.सभासद श्री.स.अ.एकबालुद्दीन यांनी केलेली तक्रार गंभीर स्वरुपाची आहे.तेव्हा मा.आयुक्त यांनी सदर प्रकरणी जातीने लक्ष देऊन चौकशी करावी व या चौकशीचा अहवाल शक्य तितक्या लवकर स्थायी समितीकडे पाठवावा. तसेच अर्थसंकल्पातील तरतुदीबाबत अर्थसंकल्पातील तरतुद,मंजुरी मिळालेल्या कामांची एकूण रक्कम आणि शिल्लक इत्यादी प्रकारची सविस्तर माहिती तयार करुन सभागृहापुढे सादर करावी.

श्री.शंकर मगर : वार्ड क्र. ३७ इंदिरानगर येथील सरफेस गटारीचे बांधकामाबाबतची संचिका वरिष्ठांकडे पाठविण्यात आली असून मंजुरीनंतर त्यावर कार्यवाही केली जाईल असा उपअभियंता स्लम यांनी खुलासा केला होता.तेव्हा या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

उपअभियंता स्लम : सदर कामाची संचिका मा.आयुक्तांचे मंजुरीसाठी आज दाखल केली आहे.

मा.सभापती : उपअभियंता यांनी केलेला खुलासा योग्य.एखादया कामास किती वेळ लागेल याचा विचार करुन अधिकाऱ्यांनी सभागृहात खुलासा करावा.तसेच एखादया प्रश्नासंबंधी अधिकाऱ्याने खुलासा केल्यानंतर पुढील सभेत त्याबाबतची योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था संबंधीत अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे.

श्री.मोतीराम घडामोडे : सभागृहाने मागविलेली माहिती पुरविण्यात दिरंगाई झाल्यास अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे अधिकार समितीस आहेत.तेव्हा वार्ड क्र.३७ चे कामात झालेल्या दिरंगाई बाबत उप अभियंता स्लम यांची वेतनवाढ थांबविण्यात यावी किंवा संबंधीत अधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस देण्याची शिफारस मा.आयुक्त यांचेकडे करावी म्हणजे सभागृहाने वेळोवेळी मागितलेली मागीतलेली माहिती अधिकाऱ्यांकडून वेळेवर मिळेल.

श्री.एकबालसिंग गील : वार्ड क्र. २१ मधील कंपाऊंड वॉलच्या कामाची संचिका गेल्या सहा महिन्यापासून प्रलंबित आहे.याबाबत वारंवार मागणी करुनही या कामाचे अंदाजपत्रक समितीसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आले नाही.

श्री.यादव अशोक सायन्ना : उप अभियंता स्लम यांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे इंदिरानगर सरफेस गटार बांधकामाची संचिका त्यांचेकडे नसून सदर संचिका मंजुरीसाठी वरिष्ठांकडे पाठविली आहे.ही बाब लक्षात घेता स.सभासदानी सुचविल्याप्रमाणे संबंधीतावर कार्यवाही करता येईल काय?याचा विचार करणे आवश्यक आहे.तेव्हा जे अधिकारी संचिका प्रलंबित ठेवण्याबाबत जबाबदार असतील अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत विचार व्हावा.

श्री.मोतीराम घडामोडे : स.सभासदांनी केलेल्या सुचनेशी सहमत आहे.आजच्या सभेमध्ये गत समितीचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.यानंतर अर्थसंकल्पातील

तरतुदीबाबत संबंधीत विभागाकडून अहवाल आल्यानंतर कामांना मंजुरी देण्याबाबत विचार करण्यात यावा.

मा.सभापती : स्थायी समितीमध्ये जे जे निर्णय होतात त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.स्थायी समितीचे निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी न झाल्यास संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द मा.आयुक्त यांचेकडे कार्यवाही करण्याची शिफारस केली जाईल.स.सभासदांचे असे निदर्शनास आल्यास प्रत्येक अधिकाऱ्यास पत्र लिहावे.

श्री.स.अ.एकबालुद्दीन : ड्रेनेज कामासाठी आवश्यक असलेले पाईप खरेदी प्रकरणाची मुख्य लेखा परिक्षकांमार्फत चौकीशी करुन त्यांसंबंधीचा अहवाल पुढील सभेत देण्यात येईल असा खुलासा विषय क्र.२७२ मध्ये नोंदविण्यात आला आहे.तेव्हा त्यासंबंधीच्या अहवालाबाबत खुलासा व्हावा.

मुख्य लेखा परिक्षक : ड्रेनेज कामासाठी आवश्यक असलेले पाईप खरेदी बाबतच्या संचिका नुकत्याच संबंधीत विभागाकडून प्राप्त झाल्या असून सभासदांच्या मागणीनुसार संबंधीत संचिका तपासणीचे काम चालू आहे.तपासणीचे काम पूर्ण झाल्यानंतर यासंबंधीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात येईल.

मिर्झा अन्वर बेग : स्थायी समितीने शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन धारकांकडून मागील तीन वर्षाची पाणीपट्टी वसुल करुन असे नळ कनेक्शन नियमीत करण्याबाबत निर्णय घेतला आहे.परंतु याबाबत अद्यापही काहीही कार्यवाही झाली नाही.

मा.सभापती : स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे अनधिकृत नळांबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी माहीती घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

प्रदीप जैस्वाल : हातगाडया खरेदी बाबतच्या चौकशी अहवालावर चर्चा करण्यात यावी.

मा.सभापती : स्थायी समितीने लेखाधिकारी यांच्या मदतीने जलगृह अभियंता व मालमत्ता अधिकारी यांनी हातगाडया खरेदी प्रकरणी चौकशी अहवाल तयार करण्याचा निर्णय घेतला होता.सभागृहाकडे प्राप्त झालेला अहवाल जलगृह अभियंता किंवा मालमत्ता अधिकारी यांचेकडून दाखल झालेला नाही.

प्रदीप जैस्वाल : मागील सभेत नादुरुस्त हातगाडया व कुंडया दुरुस्तीसाठी पाठविल्या आहेत असा खुलासा सा.आयुक्त-२ यांनी केला होता.परंतु आजही झोन क्र.२ मध्ये नादुरुस्त हातगाडया पडून असल्याचे निदर्शनास येते.तेव्हा याचा अर्थ असा की,संबंधीत अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

श्री.मिर्झा अन्वर बेग,श्री.अलफखान हुसेनखान : झोन क्र.२ मध्ये पडून असलेली नादुरुस्त हातगाडी ही दुरुस्तीसाठी पाठविण्यात आलेल्या हातगाडयांपैकीच आहे असे म्हणता येणार नाही.

श्री.मोतीराम घडामोडे : हातगाडया खरेदी प्रकरणासंबंधी दाखल करण्यात आलेल्या अहवालासी सभागृह सहमत नाही तेव्हा तो अहवाल नामंजुर करण्यात यावा.---------------

मा.सभापती : हातगाडया खरेदी प्रकरणासंबंधी सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जलगृह अभियंता आणि मालमत्ता अधिकारी यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल द्यावा.या चौकशी प्रकरणात संबंधीत अधिकाऱ्यांनी खरेदी केलेल्या हातगाडया व कुंडया नमुन्याप्रमाणे आहेत किंवा नाही तसेच त्या कोठे वाटप करण्यात आल्या हयाची सखोल चौकशी व्हावी.

श्री.यादव अशोक सायन्ना : मिटमिटा समाज मंदिराचे बांधकामाबाबत मा.आयुक्त यांनी चौकशी करावी असे ठरले होते,तेव्हा या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

उपअभि-(बांध-१) : मिटमिटा समाज मंदिराचे बांधकामावरुन विद्युत मंडळाची अतिशक्ती दाबाच्या लाईनबाबत म.रा.वि.मंडळाचे संबंधीत अधिकाऱ्यांची भेट घेण्याच्या दोन वेळा प्रयत्न केला परंतु दोन्हीही वेळेस संबंधीत अधिकाऱ्याची भेट झाली नाही.या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेले लोखंड कार्यालयात उपलब्ध झाले आहे.

श्री.यादव अशोक सायन्ना : अप्पाची वाडी येथे विद्युत व्यवस्था करण्यासाठी १२ विद्युत पोलसाठी म.रा.वि.मंडळाकडून मंजुरी मिळाल्याचा खुलासा संबंधीत अधिकाऱ्यांनी दोन महिन्यापुर्वी सभागृहात केला आहे.परंतु अद्याप आवश्यक ती व्यवस्था झालेली नाही.तेव्हा दिवाळीचे सणासुदीचे दिवसात तरी येथील नागरिकांना विद्युत व्यवस्था उपलब्ध करुन दिली जाईल काय?

शहर अभियंता : या प्रकरणी म.रा.वि.मंडळाकडे चौकशी केली असता जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे फंडातून सदर काम हाती घेण्यात येईल असा खुलासा करण्यात आला होता.परंतु विद्युत मंडळाचे सदर काम जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे फंडातून करता येणार नाही.तेव्हा ए.आय.आर.प्रमाणे आवश्यक ती रक्कम भरणा करण्यास कळविले आहे.याबाबत विद्युत मंडळाचे संबंधीत अधिकाऱ्याकडे पुन्हा चौकशी करण्यात येईल.

यादव अशोक सायन्ना : अधिकाऱ्यांनी सभागृहास पुरविलेली सर्व माहिती दिशाभूल करणारी आहे गेल्या दीड वर्षापासून या प्रकरणी सतत मागणी करण्यात येत आहे.परंतु अद्याप पर्यंत काम पुर्ण झालेले नाही.तेव्हा या प्रकरणाचा अंतिम निर्णय होण्याच्या दृष्टीने विद्युत मंडळाकडून पत्र केव्हा आले?त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली? चौकशी व्हावी.

श्री.मोरेश्वर सावे,श्री.शंकर मगर,श्री.मोतीराम घडामोडे : सार्वजनिक दिवाबत्तीबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी आहेत.त्यादृष्टीने संबंधीत वार्डाचे नगरसेवक सदर तक्रारी दुर करण्याबाबत या विभागाकडे वारंवार मागणी करतात.नगरसेवकांनी मागणी करुनही तक्रारी दुर केल्या जात नाहीत.तेव्हा आताच चर्चा झाल्याप्रमाणे या विभागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याची समितीने मा.आयुक्तांकडे शिफारस करावी.

मोरेश्वर सावे : दि. १२-१०-८९ ला असलेली जिल्हा नियोजन व विकास मंडळाची मिटींग काही कारणास्तव होऊ शकली नाही.ही मिटींग विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनानंतर होईल.

श्री.मोतीराम घडामोडे : फिनेल खरेदी चौकशीचा अहवाल सर्व सभासदांना वाटप करण्यात आला आहे.यावर आजच्या सभेत चर्चा करावयाची आहे.परंतु या विषयासंबंधीचे संबंधित अधिकारी (लेखाधिकारी) आरोग्य वैद्यकिय अधिकारी व सहाय्यक आयुक्त-२ सभागृहात उपस्थित नाहीत.ही बाब योग्य नाही.सदर अधिकाऱ्याची उपस्थिती फिनेल अहवालाचे संबंधाने आवश्यक आहे.तेव्हा पुढील सभेत उक्त अधिकाऱ्यांना हजर राहण्यास सांगावे म्हणजे या अहवालावर चर्चा घडवून आणता येईल.

मा.सभापती : लेखाधिकारी रजेवर आहेत व अन्य अधिकारी प्रशासकीय कामात असल्यामुळे सभागृहात उपस्थित नाहीत.तेव्हा या अहवालावर नंतर विचार करण्यात येईल.

श्री.मोरेश्वर सावे : मागील सभेमध्ये जलनि:सारण विभागासाठी अर्थसंकल्पातील तरतुद संपली आहे.अशी माहिती पुरविण्यात आली होती.परंतु आजच्या विषय पत्रिकेवर जलनि:सारणाचे काही प्रस्ताव सभागृहापुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.तेव्हा अर्थसंकल्पातील तरतुदीत मंजुरी असतांना जलनि:सारणाचे विषय सभागृहापुढे कसे आले? तेव्हा अर्थसंकल्पातील तरतुदीत मंजुरी मिळालेली एकूण रक्कम आणि शिल्लक या विषयीची संपूर्ण माहिती सभागृहास पुरविण्यात आल्यानंतर यावर विचार व्हावा.

श्री.मोतीराम घडामोडे : आजच्या विषय पत्रिकेवरील विषय क्र.१ मंजुर करुन अर्थसंकल्पाबाबत संपुर्ण खुलासा झाल्यानंतरच विषय पत्रिकेवरील विषयांना मंजुरी देण्यात यावी असा ठराव मांडतो.

श्री.अशोक सायन्ना, श्री.मोरेश्वर सावे : मा.सभासदांचे सुचनेबाबत सहमत आहोत.

श्री.यादव अशोक सायन्ना : १) मे १९८९ मध्ये आप्पाची वाडी येथील विद्युत पोलबाबत म.रा.वि.मंडळाचे कोटेशन प्राप्त होऊनही सदर प्रकरण कार्यवाहीसाठी सभागृहापुढे न ठेवणे.

२) मागील सभेत जलनि:सारण विभागाची अर्थसंकल्पातील तरतुद संपली आहे असा खुलासा केल्यानंतरही आजच्या सभेत या विभागाचे विषय पत्रिकेवर मंजुरीसाठी सभागृहापुढे ठेवणे.

३) आप्पाची वाडी येथेल विद्युत पोलबाबतची संपुर्ण संचिका मा.सभापती यांनी प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतरही या प्रकरणी निर्णय न घेणे या कारणांसाठी मी सभात्याग करीत आहे.असे सांगून स.सभासद श्री.अशोक सायन्ना यांनी सुमारे ५=०० वाजता सभात्याग केला.

श्री.मोरेश्वर सावे : गत समितीमध्ये काचीवाडा येथील ड्रेनेजच्या कामाचा ठराव चर्चेला आला होता.तेव्हा काचीवाडा येथील ड्रेनेज कामास मंजुरी देण्यात येणार असेल तर आजच्या विषय पत्रिकेवरील ड्रेनेज कामांना मंजुरी देण्यात येईल.

मा.सभापती : काचीवाडा जलनि:सारणाच्या कामाबाबतचे अंदाजपत्रक संबंधिताने सभागृहापुढे सादर करावे.

**ठराव :**

ठराव क्र.२७८ मध्ये "सदर प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवण्यात यावा.प्रस्तावातील वरील मुद्यांबाबत मा.आयुक्त यांचेकडे चौकशी करण्यात यावी. "च्याऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ मो.जवाहर कॉलनी येथील आकाशवाणी चौक ते त्रिमुर्ती चौकापर्यंत २० मीटर रस्त्याचे रुंदीकरणासह खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी एकूण रक्कम रुपये ५,६६,००,०४० चे अंदाजपत्रकास १) घरी तोडलेली माती उचलणे रु.६०,०००/- + २) खडी रस्ता तयार करणे रु. ४,३३,०१२/- + ३) हयुम पाईप कल्व्हर्ट बांधणे रु. ७३,०२८/- सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदरचे काम शासनाकडून ५ कोटी रुपयाचे अनुदान प्राप्त झाल्यानंतर सुरु करण्यात यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.तसेच ठराव क्र. २८४ मध्ये महापालिका सभासदांना वार्डाचे विकासासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेल्या २५ हजाराचे तरतुदीमधून स.सभासद श्री.गंगाधर गाडे,श्री.यादव अशोक सायन्ना,श्री.एकबालसिंग गील,श्री.प्रदीप जैस्वाल,श्री.शंकर

मगर,श्री.मोतीराम घडामोडे प्रत्येकी रक्कम रु. ५ हजार यांप्रमाणे एकुण रक्कम रु. ३०,०००/- चे आर्थिक सहाय्य वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित औरंगाबाद यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी."च्या ऐवजी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित औरंगाबाद यांना महानगरपालिका फंडातून रक्कम रु. २५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी."या दुरुस्त्यांसह दि.२९-९-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. २८७/२ :**

वार्ड क्र. २४ मो.नागेश्वरवाडी,मेवाड लॉज जवळ सी.आय.एम.गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३३२००/- चे तयार करण्यात आले आहे.सदर ठिकाणी जुनी असलेली गटार ही पुर्णपणे अस्ताव्यस्त होऊन तुटलेली आहे.सदरील ठिकाणी वाहणारे सांडपाणी हे रोडवरुन वाहते.त्यामुळे तेथील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.करीता नविन १२१ मीटर लांबीची गटार-(सी.आर.एस.) बांधणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२४ मो.नागेश्वरवाडी,मेवाड लॉज जवळ सी.आर.एस.गटार बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. ३३,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८८/३ :**

वार्ड क्र. ४६ शिवाजी चौक ते समर्थनगर एम.पी.लॉ कॉलेज पर्यंतची १५० मी.मी. व्यासाची लाईन अपरुटींग करुन ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १,६४,५७९/- चे तयार करण्यात आले आहे.शिवाजी चौक ते समर्थनगर चौक मार्गे सिल्लेखाना रस्त्यावर असलेली १५० मी.मी व्यासाची लाईन पुर्णपणे चोकअप होते व नाल्यातून पाणी वाहते.सदर लाईनवर जास्त लोड असल्यामुळे सदर ठिकाणी ३०० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ शिवाजी चौक ते समर्थनगर एम.पी.लॉ कालेज पर्यंतची १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु. १,६४,५७९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८९/४ :**

वार्ड क्र.३८ मो.ढोरपुरा येथे सार्वजनिक संडास दुरुस्त करणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु.९५००/- ला स्थायी समिती ठराव क्र.१९ / १०८१ /दि.२१-३-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.४ / ४८२ / ८९ दि. २०-६-८९ द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विकण्यात आल्या होत्या व दोन्ही निविदा वसुल झाल्या आहेत व त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.संतोष पगारे अंदाजपत्रकीय दराने
२) // ए.बी.कुलकर्णी ३ % जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री.संतोष पगारे यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३८ मो.ढोरपुरा येथे सार्वजनिक संडास दुरुस्तीसाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दराचे श्री.संतोष पगारे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९०/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,गुलशन महल ते चंपा मस्जिद या नियोजित १०० फुट डी.पी.योजना अंतर्गत रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रकास स्थायी समिती दि.८-६-८९ विषय क्र.१७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.या रस्त्यामध्ये शहाबाजार जवळ अशोकनगर स्लम भागातील घरे (झोपडया) बाधीत होत आहेत.तेथून हलवून मजनुहिलच्या दक्षिण पायथ्याजवळ (वार्ड क्र.१३) पुनर्वसन करणे जरुरी आहे.त्याकामाचे लोआऊट अंतर्गत खडी रस्ते नाल्या बांधणे व पाण्याकरीता बोअरींग करणेबाबतच्या कामासाठी रक्कम रु. ८,७४,८६०/- चे सन १९८८-८९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली खर्च या सदराखाली सरकारकडून ५ करोड प्राप्त होणाऱ्या तरतुदी मधून करता येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : प्रस्तावातील कामाचा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून करण्यात येईल असे नमूद केले आहे.परंतु या कामासाठी शासनाकडून अनुदान मिळाले आहे काय? तसेच या अनुदानातून कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहेत? याचा सविस्तर आराखडा तयार करणे आवश्यक आहे.आराखडा तयार करतांना स्थायी समितीच्या सभासदांना विश्वासात घेणे आवश्यक आहे या बाबींची पुर्तता झाल्यानंतरच यावर विचार करण्यात यावा.

मा.सभापती : शासनाकडून प्राप्त होणारे ५ कोटीचे अनुदानाबाबत आणि या रकमेतून हाती घेण्यात येणाऱ्या कामाबाबतचा सविस्तर आराखडयाबाबत स्थायी समितीशी चर्चा करुन मा.आयुक्त यांनी सदरचा आराखडा संमत करुन घ्यावा.

श्री.मोतीराम घडामोडे,श्री.मोरेश्वर सावे : महापालिका कर्मचाऱ्यांना ३० दिवसांचा बोनस या मथळयाखाली दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे.महापालिका प्रशासनामध्ये लोकप्रतिनिधीची कार्यरत असतांना मा.आयुक्त हे मा.महापौर,मा.सभापती,स्थायी समिती किंवा स्थायी समिती सदस्य यांना विश्वासात न घेता आर्थिक बाबींवर निर्णय घेतात ही बाब योगय नाही.पालिका प्रशासनामध्ये आर्थिक बाबीसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार स्थायी समितीला असतांना मा.आयुक्तांनी घेतलेली भुमिका योग्य नाही.कर्मचाऱ्यांना बोनस देण्यास सभागृहाचा विरोध नाही.परंतु किमान

मा.महापौर,मा.सभापती,स्थायी समिति यांना विश्वासात घेऊन कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या बोनसचा निर्णय मा.आयुक्तांनी घ्यावयास हवा होता.

उपआयुक्त : प्रशासनाने दाखल केलेल्या सन १९८९-९० चे अर्थसंकल्पास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली असून,अर्थसंकल्पात कर्मचाऱ्यांचे पगार भत्ते,बोनसच्या रकमेस मंजुरी देण्यात येणारे बोनसचा प्रश्न समितीसमोर ठेवण्याची आवश्यकता वाटली नाही.

मा.सभापती : महापालिका कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे बोनस बाबत सभागृहात चर्चा झाली.समितीस विश्वासात न घेता मा.आयुक्त बोनसबाबत जो निर्णय जाहीर व्यक्त केला त्या बाबत ही सभा निषेध व्यक्त करते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलशन महल ते चंपा मस्जीद या नियोजीत १०० फुट डी.पी.योजना अंतर्गत रस्त्यांमध्ये शहाबाजार जवळ अशोक नगर स्लम भागातील घरे (झोपडया) बाधीत होत आहेत.त्या तेथून हलवून मजनुहिलच्या पायथ्याजवळ वार्ड क्र.१३) पुनर्वसन करण्याचे कामाचे लेआऊट अंतर्गत खडी रस्ते,नाल्या बांधणे व पाण्याकरीता बोअरींग व जागेचे लेव्हलींग करणे बाबतच्या कामासाठी रक्कम रु. ८,७४,८६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.मोतीराम घडामोडे : समिती सभागृहात पत्रकारांसाठी केलेल्या व्यवस्थेमुळे सभागृहातील संभाषण पत्रकारांना व्यवस्थित ऐकू येत नाही अशी त्यांची तक्रार आहे.आयुक्तांनी सांगूनही संबंधितांनी कार्यवाही केलेली नाही.कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : स.सभासदांनी अपुर्ण माहितीवार अशा प्रकारचे वक्तव्य करणे योग्य नाही.अधिकाऱ्यांच्याही काही अडचणी असतील.तेव्हा त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या पाहीजेत.

श्री.मोतीराम घडामोडे : समितीने घेतलेला निर्णय,मा.उपायुक्ताच्या सुचना यांचा विचार न करता सभापती सभासदांचे सुचनांना मान देत नाहीत.म्हणून मी सभा त्याग करीत आहे.असे सांगून स.सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी सुमारे ५=४५ वाजता सभात्याग केला.

**विषय क्र. २९१/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र.३३ शहागंज येथील भाजी मंडईतील दुकानासमोर शेड तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३७,५७०/- चे सन १९८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च इमारत दुरस्ती या सदराखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३३ शहागंज येथील भाजी मंडईतील दुकानासमोर शेड तयार करणेच्या कामासाठी रक्कम रु.३७,५७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९२/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,महानगरपालिका टाऊन हॉल परिसरात कर आकारणी विभागाच्या दक्षिण बाजुला कार्यालयीन कामाकरीत शेड बांधायचे ठरले आहे.(प्रस्तुतच्या महानगरपालिका कार्यालयामध्ये परिसरात नविन प्रशासकीय इमारत बांधते वेळी जुने शेडवजा कार्यालय तुटणार आहे.) त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१५,०००/- चे सन १०८८-८९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च प्रशासकीय इमारत बांधणे या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.--------------

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : तात्पुरते शेड उभारणेसाठी अशा प्रकारे तीन चार लाख रु. खर्च करण्यापेक्षा औरंगपुरा मार्केट किंवा महापालिका मालकीच्या इतर कोणत्याही ठिकाणी प्रशासकीय विभाग हलवून आर्थिक बचत करावी.

**विषय क्र. २९३/८ :**

वार्ड क्र.५७ हमालवाडी रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे गटार बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ४०,९१५/- ला स्थायी सिमिती ठराव क्र. १०४ दि.१३-७-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण सोळा निविदा विकण्यात आल्या व केवळ दहा निविदा वसूल झालेल्या आहेत.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.एच.चौधरी | २३.६० % | कमी |
| २) // शकील बिल्डर्स | २१.२१ % | कमी |
| ३) // सुरेश बी. सदवानी | १९ % | कमी |
| ४) // आनंद बिल्डर्स | २१.३ % | कमी |
| ५) // आर.बी.चव्हाण | २४.५ % | कमी |
| ६) // सय्यद रफीऊद्दीन | १९.१० % | कमी |
| ७) // जे.के.गोरोवर | १८.१० % | कमी |
| ८) // एम.कलिमोद्दीन | २१.८६ % | कमी |
| ९) // बी.आर.आनंद | १९.९९ % | कमी |
| १०) // के.बी.काल्डा | १६.९९ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २४.०५ % कमी दराची निविदा श्री.आर.बी.चव्हाण यांची आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.हमालवाडी,रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे गटार बांधण्याच्या कामासाठी तुलनातमकदृष्टया सर्वात कमी व अंदापपत्रकीय दरापेक्षा २४.०५ % कमी दराची श्री.आर.बी.चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९४/९ :**

वार्ड क्र.३० मो.अंगुरीबाग येथील गटारीची दुरुस्ती करुन त्यावर आर.सी.सी.स्लॅब टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु.२७,९३५/-ला स्थायी समिती ठराव क्र. २९ / १५ दि. २९-६-८९ द्वारे मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५ / ४३२६ / ८९ दि. ४-८-८९ नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूणचा निविदा विकण्यात आल्या व केवळ दोन निविदा वसुल झाल्या असुन तुलनात्मक दर तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अन्सारी जी.एम. | ५.९५ % | कमी |
| २) // सुरेश बी.सदवानी | ०.१०% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०? कमी दराचे श्री.सुरेश सदवानी यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३० मो.अंगुरीबाग येथील गटारीची दुरुस्ती करुन त्यावर आर.सी.सी.स्लॅब टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० % कमी दराचे श्री.सुरेश सदवानी यांचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९५/१० :**

वार्ड क्र.५८ मो.भरत नगर येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ४५,४००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ८३ दि. २१-६-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. ५ / ४३२६ / ८९ दि. ४-८-८९ नुसारर बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विकण्यात आल्या व केवळ १२ निविदा वसुल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.शकील बिल्डर्स | १९.९९ % | कमी |
| २) // सुरेश बी.सदवानी | १९.४० % | कमी |
| ३) // अन्सारी जी.एम.मुजतवा | १९.९८ % | कमी |
| ४) // आर.बी.चव्हाण | २१.०५ % | कमी |
| ५) // मोहंमद खान | २२.५ % | कमी |
| ६) // स.रफीयोद्दीन | २०.५ % | कमी |
| ७) // रणवीरसिंग | १९.९ % | कमी |
| ८) // के.बी.काल्डा | २२.९९ % | कमी |
| ९) // एकबाल अहेमद | २१ % | कमी |
| १०) // बी.आर.आनंद | २६.३० % | कमी |
| ११) // जावेदखांन | २१.२० % | कमी |
| १२) // एस.के.मिसाळ | २३.५१ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २६.३० % कमी दराचे श्री.बी.आर.आनंद गुत्तेदार यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५८ मो.भरत नगर येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबतच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय

दरापेक्षा २६.३० % कमी दराचे श्री.बी.आर आनंद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९६/११ :**

वार्ड क्र. ३९ मो.रोकडीया हनुमान कॉलनी येथे यु.सी.आर.एस.गटार बांधणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३९,५५०/- ला स्थायी समिती ठराव क्र. २४५ दि. १५-९-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदरील ठिकाणी वाहणारे सांडपाणी रोडवरुन गल्ल्यात वाहते व नागरिकांना होणारा त्रास होणारा त्रास लक्षात घेता सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने सदर कामासाठी परवानाधारक ठेकेदाराकडून अ-१ नमुन्यात तीन निविदा बोलावण्यात आल्या आहेत.व त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.आनंद बिल्डर्स | ४.९९ % | जास्त |
| २) // शे.रफीक | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३) // एम.एम.बेग | ३ % | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री.शे.रफीक यांचे दरपत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मोरेश्वर सावे : वार्ड क्र.३९ रोकडीया हनुमान कॉलनी येथे यापुर्वी जुनमध्ये हाती घेतलेले काम अर्धवट स्थितीत पडून आहे.हयामुळे कामामुळे भागात राहणाऱ्या नागरिकांना वाहतुकीस त्रास सहन करावा लागत आहे.तेव्हा अर्धवट असलेल्या कामाबाबत प्रथम निर्णय झाल्यानंतरच प्रस्तावातील कामास मंजुरी देण्यात यावी.

मा.सभापती : सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की,सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २९७/१२ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,वार्ड क्र.११ मधील मो.सिडको येथील आंबेडकर नगर झोपडपट्टी येथे ३" व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु. ३४.३७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.११ मो.सिडको येथील आंबेडकर नगर झोपडपट्टी येथे ३" व्यासाची अे.सी.जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता रक्कम रु. ३४,३७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९८/१३ :**

सभागृह नेते हयांच्या वापरासाठी एक ॲम्बॅसेडर कार डिलक्स मॉडेल पेट्रोलवर चालणारी खरेदी करण्यासाठी औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेत्याकडून दरपत्रके बोलावली असता एकूण दोन दरपत्रके वसुल झालीत त्यांचे झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे.कैलास एजन्सीज प्रा.लिमिटेड,औरंगाबाद - रु. १,३९,१००/-

२) मे.भारत इंजिनिअरींग,औरंगाबाद - रु. १,३८,३५०/-

पैकी कमी दराचे दरपत्रक मे.भारत इंजिनिअरींग कंपनी,औरंगाबाद हयांचे असून त्यांना आदेश देऊन कार खरेदी करण्यात आली आहे.कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सभागृह नेते हयांच्या वापरासाठी एक ॲम्बेसेटर कार डिलक्स मॉडेल पेट्रोलवर चालणारी खरेदी करण्यासाठी कमी दर असलेले मे.भारत इंजिनिअरींग कंपनी,औरंगाबाद यांचे रु. १,३८,३५०/- च्या दरपत्रकास तसेच कार खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९९/१४ :**

वार्ड क्र.१८ मो.जुनाबाजार येथे डॉ.कादरी यांच्या घराजवळ १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रु.११,७३५/- ला स्थायी समिती ठराव क्र.१०१ दि.६-७-८९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६ / ६१५ /८९ दि.४-८-८९ द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा वसूल झाल्या आहेत.त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.एस.के.वाहोद्दीन - अंदाजपत्रकीय दराने
२) // एस.के. रफीक - ८ % जास्त
३) // कैसर खान - ५ % जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.एस.के.वाहोद्दीन यांचे दर पत्रक आहे.करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१८ मो.जुना बाजार येथे डॉ.कादरी यांच्या घराजवळ १५० मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.एस.के.वाहोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती
महानगरपालिका,औरंगाबाद.